Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**June-2021 Volume-11 Issue-21**

## *Changing Perspectives of Language, Literature, Science and Social Science*

**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
**'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)**

**Dr. Mahadeo Walunj**
Principal
College of Arts, Bhigwan, Indapur, Dist. Pune Maharashtra

Dr. Ranjan Kalita
Principal
Rangapara College, Amaribari, Rangapara, Assam

**Executive Editors**
**Dr. Prashant Chavare, Rakesh Ch. Sarkar, Mr. Santosh P. Mane**

















**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*June-2021 Volume-11 Issue-21*

*On*

## *Changing Perspectives of Language, Literature, Science and Social Science*

**Chief Editor**

**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)

**Dr. Mahadeo Walunj**
Principal
College of Arts, Bhigwan, Indapur, Dist. Pune Maharashtra

**Dr. Ranjan Kalita**
Principal
Rangapara College, Amaribari, Rangapara, Assam

**Executive Editors**
Dr. Prashant Chavare, Rakesh Ch. Sarkar, Mr. Santosh P. Mane

Editorial Board

| | | |
|---|---|---|
| Dr. Bhaskar Gatkul | Dr. Surendra Shirsat | Prof. Balasaheb Kharat |
| Prof. Sham Satarle | Mr. Atul Sarmah | Mr. Nupam kr Palit |
| Prof. Sandip Sathe | Dr. Pradnya Lamture | Dr. Rakesh Moulick |

**Published by-** Principal, College of Arts, Bhigwan, Indapur, Dist. Pune Maharashtra & Principal, Rangapara College, Amaribari, Assam

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | अध्ययन - अध्यापनातील स्थित्यंतरे (औपचारिक शिक्षणाकडून ऑनलाईन शिक्षणाकड.....)<br>डॉ. महादेव पंढरीनाथ वाळुंज | 1-3 |
| 2 | COVID-19 – भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>प्रा. शाम सातर्ले | 4-7 |
| 3 | उजनी धरण : एक अभ्यास<br>प्रा. भाऊसो नवनाथ सकुंडे | 8-11 |
| 4 | कोविड — १९ : खेळ, खेळाडूवरील परीणाम व उपाय योजना<br>श्री. सुरेश मच्छिंद्र शिंदे | 12-14 |
| 5 | पुणे प्रशासकीय विभागातील प्रमुख धर्मनिहाय लोकसंख्येचा भौगोलिक विश्लेषणात्मक अभ्यास (2001 ते 2011)<br>-रवींद्र हांडे | 15-18 |
| 6 | सागरशास्त्राचे जनक छत्रपती शिवाजी महाराज<br>Dr.Madhukar Vithoba Jadhav | 19-22 |
| 7 | कोकणची लोककला : दशावतार<br>Prof. Tendolkar Dipa Dattaram | 23-25 |
| 8 | कोरोनाचा मराठी भाषेवरील प्रभाव<br>डॉ. सीमा नाईक - गोसावी | 26-27 |
| 9 | कोव्हिड १९ च्या परिप्रेक्षातील ई - गव्हर्नन्सची उपयुक्तता<br>प्रा. डॉ. झाकीर हुसेन हाकीम संदे | 28-30 |
| 10 | असमीया खान-पान और इसका बदलता चलन<br>बर्णा शर्मा | 31-33 |
| 11 | प्राथमिक शिक्षा पर कोविड –19 का प्रभाव<br>सीमा यादव, डॉ.मृत्युन्जय मिश्रा | 34-36 |
| 12 | अधोबोधन संकल्पना आणि प्रतिमान<br>श्री. अंकुश रामचंद्र बनसोडे | 37-41 |
| 13 | शाश्वत विकास आणि भारत<br>प्रा. सौ. रुपाली गोवर्धन दिकोंडा | 42-44 |
| 14 | "कोरोणा 19 महामारीचे भारतातील सामाजिक परीणाम"<br>बाळासाहेब भानुदास खरात | 45-48 |
| 15 | गोपाळ गणेश आगरकरांच्या सुधारणावादी लेखनाचा ऐतिहासिक अभ्यास<br>श्री. सुरेश नामदेव दांडगे, डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे | 49-53 |
| 16 | कोव्हीड काळामध्ये शैक्षणिक ग्रंथालयासमोरील आव्हाने<br>डॉ.सौ.अपर्णा मकरंद कुलकर्णी | 54-57 |
| 17 | चिरकाल भूजल विकासात भूजल संचयन, पुनर्भरण आणि व्यवस्थापनाची भूमिका<br>प्रा. डॉ. अनिल निवृत्ती शिंदे | 58-61 |
| 18 | वैद्यकिय व्यवसायातील अनैतिकता : एक विवेचन<br>डॉ. अतुल म. महाजन | 62-66 |
| 19 | विशिष्ट कालखंडाचा अभ्यास : संज्ञा व १९८० नंतरचा कालखंड (ग्रामीण भाग)<br>डॉ. प्रज्ञा नागेश लामतुरे | 67-69 |
| 20 | ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ, डॉ.के.बी कणकुरे | 70-79 |
| 21 | जबाबदार पर्यटन: शाश्वत विकासासाठी सर्वोत्कृष्ट पद्धती<br>प्रा. सुनील दशरथ साळवे, डॉ. सुहास आव्हाड | 80-84 |

| | | |
|---|---|---|
| 22 | स्वास्थ्य पर कोविड-19 महामारी का प्रभाव<br>**डॉ. प्रीति बैश्य** | 85-88 |
| 23 | स्त्रियांच्या सामाजिक समस्या व स्त्रियांच्या सबलीकरणासाठी केलेले उपाय व कायदे<br>**डॉ.गजानन बापुराव ठाकरे** | 89-93 |
| 24 | कोव्हीड - 19 महामारीचे भारतातील सामाजिक जिवनावरील परिणाम<br>**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा** | 94-97 |
| 25 | 'कोविड–१९' चा जनजीवनावरील प्रभाव आणि परिणाम.<br>**प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी** | 98-101 |
| 26 | कोव्हीड-१९: विषाणू संसर्ग, प्रादुर्भाव आणि परिणाम, वर्षे २०२०<br>**प्रा .डॉ . दिगंबर बिरादार** | 102-108 |
| 27 | राष्ट्रवादी नेते छ. राजे शाहू महाराज<br>**डॉ. विशाल आर जाधव** | 109-110 |
| 28 | 'श्रीमान योगी' कादंबरी व तिची 'गरुडझेप' व 'श्रीमान योगी' हे नाट्यरूपांतरे<br>**प्रा. डॉ. गेजगे देविदास साधू** | 111-116 |
| 29 | आधुनिक कुक्कुटपालन व्यवसायाचा अभ्यास<br>**डॉ. शकुंतला माने** | 117-121 |
| 30 | नांदेड जिल्ह्यातील भूईमूग पीकाचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा.डॉ.यु.एस.कानवटे** | 122-125 |
| 31 | शाश्वत शेती विकासासाठी "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना.<br>**डॉ. लहू सिताराम वावरे, डॉ. साळवे जगन्नाथ मोतीराम, प्रा. प्रताप बाबुराव शिंद** | 126-130 |
| 32 | लोककला आणि लोकजीवन<br>**प्रा.शिवाजी वाघमारे** | 131-133 |
| 33 | भाषा आणि जनमाध्यमांची अध्यापन शास्त्रामधील उत्क्रांती<br>**डॉ. जनार्धन परकाळे** | 134-136 |

# अध्ययन - अध्यापनातील स्थित्यंतरे

## (औपचारिक शिक्षणाकडून ऑनलाईन शिक्षणाकडे......)

**डॉ. महादेव पंढरीनाथ वाळुंज**
प्राचार्य, कला महाविद्यालय, भिगवण ता. इंदापूर जि. पुणे
mahadeowalunj@gmail.com

**प्रस्तावना :-**

अध्ययन-अध्यापन ही अतिशय महत्त्वाची आणि सतत चालणारी प्रक्रिया असते. आपण अध्ययन-अध्यापनाचा संबंध केवळ शाळा महाविद्यालयातील अध्यापनाशी जोडत असतो. वास्तविक पहाता प्रत्यक्ष जीवनातील अध्ययन-अध्यापन अधीक प्रभावी आणि महत्त्वपूर्ण असते म्हणूनच 'शिक्षक आधी धडा शिकवितात आणि मग परीक्षा घेतात तर जीवन आधी परीक्षा घेते आणि मग धडा शिकविते' असं अर्थपूर्ण सुभाषित सर्वत्र ऐकायला मिळते. याचा मतितार्थ शाळा महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापनातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जगण्यातील अनुभव कसे आत्मसात करायचे, त्याच्याशी कसे समायोजन साधायचे, जगण्याला, जीवनातील संघर्षाला कसे सामोरे जायचे याचा वस्तुपाठ शिक्षणातून मिळणे अपेक्षीत आहे. अर्थात अध्ययन-अध्यापन ही प्रक्रिया माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत अव्याहतपणे चालणारी महत्त्वपूर्ण प्रक्रीया आहे. तिच्यामध्ये काळानुरूप खूप स्थित्यंतरे झालेली आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे अध्ययन अध्यापनाचा प्रवास औपचारिक शिक्षणाकडून ऑनलाईन शिक्षणाकडे होते आहे. या सर्व स्थित्यंतरांचा वेध घेऊ यात.

**अध्यापन म्हणजे काय**

अध्ययन म्हणजे आत्मसात करणे, ग्रहण करणे. तर "अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांना ज्ञानानुकुल बनवणे, त्यांना स्वतः अध्ययन करण्याची सवय लावणे, चांगल्याचा शोध घ्यायला शिकविणे" [१] या व्याख्येतून डॉ. माधव पोतदार यांनी अध्यापनाचा नेमका हेतू व्यक्त केलेला आहे तर सुषमा वर्मा म्हणतात ,"अध्यापन म्हणजे शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्यातील परस्पर संवाद असतो. " [२] अशी शिक्षक विद्यार्थी यांच्यामधील संवादाची साधने काळानुरूप बदलत गेलेली आहेत. त्यामुळे सध्याच्या अध्यापनात देखील आमूलाग्र बदल झालेला आहे. परंतु अध्ययन-अध्यापनचा हेतू अध्ययन करणा-याला ज्ञानानुकूल बनवणे, सक्षम करणे हाच असतो. एकंदरीत विचारसमृध्दी, अनुभवसमृध्दी, भाषासमृध्दी व भावसमृध्दी या दिशेने अध्यापनाचा प्रवास होणे अपेक्षीत असते. यासाठी शिकण्याची प्रक्रीया सुकर होईल असे करणे ही शिक्षकाची महत्त्वाची जबाबदारी असते. आज शिक्षकांची भूमिका काळानुरूप बदलत चालली आहे किंवा परिवर्तनाच्या रेट्यामुळे शिक्षक बदलत चालला आहे. यातील काही बदल चांगले आहेत परंतु काही बदल या प्रक्रियेच्या अंत करतील असे भयावह आहेत. तिच परिस्थिती विद्यार्थ्यांच्याबाबतीत देखील आहे. सभोवतालच्या बदललेल्या सामाजिक , सांस्कृतिक वातावरणामुळे, तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे त्याच्या अध्ययन प्रक्रीयेत आमूलाग्र बदल होत आहे. त्यामुळे आजचा विद्यार्थी गोंधळलेला दिसतो आहे. अध्ययनाच्या सुंदर प्रक्रीयेपासून तुटून तो केवळ माहिती वहाणारा हमाल वाटतो आहे. या सगळ्या बदलांचा विचार आपण विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि अध्यापन साधने या मुद्द्यांच्या आधारे करू यात.

**अध्ययन अध्यापनातील स्थित्यंतरे :-**

अगदी प्राचीन काळापासून मानवी गरजांपासून शिक्षणाचा उदय व विकास होत गेला. अलिकडे संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, दळणवळणाची साधने, प्रसार माध्यमे इ. क्षेत्रात वेगाने स्थित्यंतरे घडून येत आहेत त्यानुसार मानवांच्या गरजांमध्ये व जीवनशैलीत बदल होत आहेत. जगाबरोबर राहता यावे. मानवाच्या बदललेल्या गरजांची पुर्तता व्हावी व पुढील पिढी स्वयंपूर्ण व्हावी यासाठी अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन प्रक्रियांमध्ये बदल होणे अगदी स्वाभाविक आहे

खरतर ज्ञानार्जन व ज्ञानदान करण्यासाठी आत्मसमर्पण करायला शिकविणारी भारतीय संस्कृती असून अगदी पुरातन काळापासून भारतीय संस्कृतीने शिक्षकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. प्राचीन काळी शिष्याने गुरूगृही जाऊन अध्ययन करण्याची आपली परंपरा होती. गुरूच्या घरी अध्ययन करण्यासाठी शिष्य जात असे. अध्ययन करणा-या शिष्याला स्वावलंबी बनविण्यासाठी अध्ययनाबरोबरच इतर सर्व प्रकारची कामे करावी लागत असत. अशा परंपरेने सुरू झालेल्या शिक्षणासाठी साधन म्हणून धुळपाटी, निसर्ग आणि गुरूचे ज्ञान व अध्ययन कौशल्ये हीच साधने असायाची. अक्षरे धुळपाटीवर गिरवली जायची म्हणून त्यांना धुळाक्षरे ही म्हटले जात होते. हा काळ म्हणजे पुर्वजांकडून व्यवसायानुरूप शिक्षण व्हायचे त्यामुळे शिकण्या शिकविण्याच्या प्रक्रियेचा संबंध विशिष्ट समाजापुरताच मर्यादित होता. त्याला सार्वत्रीक शिक्षणापर्यंत आणण्यात इंग्रजांचे कार्यही महत्त्वाचे आहे. टप्प्याटप्प्याने गरजेनुसार शैक्षणिक साधने बदलत गेली आहेत. त्यानुसार अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया बदलली आहे.

गुरूगृही जाऊन अध्ययन करणारा शिष्य कालांतराने शाळा महाविद्यालयांमध्ये येऊ लागला आणि तिथे अध्ययन-अध्यापन होवू लागले. इंग्रजांनी सार्वत्रीक शिक्षणाची सुरूवात केली त्यामध्ये त्यांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ मिळावे हा हेतू असला तरी येथील समाजजीवनात सुधारणा होण्यात त्याचा चांगला परिणाम झालेला आहे. अधिकाधीक नवनवीन शैक्षणिक साधनांची ओळखही आपल्याला इंग्रजांमुळे झाली. गावोगाव शाळा निघू लागल्या. मोठ्या शहरांमध्ये महाविद्यालये सुरू झाली आणि वर्षानुवर्ष शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजांना शिक्षणाची संधी मिळू लागली त्यामुळे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात बदल होऊ लागले.

खडू, फळा, पुस्तक, वही, पाटी, पेन्सील, नकाशे, चित्रे, पोस्टर्स अशा नवनवीन साधनांचा वापर होऊ लागला या साधनांमुळे शिकण्याची प्रक्रीया सुलभ होण्यास नक्कीच हातभार लागत होता. आपला देश स्वतंत्र झाल्यावर अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्याच्या हेतूने भारत सरकारने इ. स. १९६८ मध्ये कोठारी आयोगाची स्थापना केली. त्यांच्या शिफारीनुसार शासनाने शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले. यामध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, विज्ञान तंत्रज्ञानावर भर देणे, सामाजिक, नैतिक मूल्यांची जपवणूक करणारे शिक्षण दिले जावे इत्यादी बाबींचा विचार करून अभ्यासक्रम तयार करण्यात आले. अर्थात हे सारे असले तरी या सगळ्याला अनेक मर्यादा होत्या त्यामुळे इंग्रजांच्या कारकून तयार करण्याच्या हेतूने सुरू केलेल्या शिक्षणप्रवासात फार मोठा बदल झाला नाही. साधनसामग्री बदलली, अध्ययन-अध्यापनात माहितीची देवाणघेवाण झाली तरी विद्यार्थ्यांमध्ये विचार, भावना, संस्कार, समृध्दीचा टप्पा दूरच राहिला. असे असले तरी उत्तम गुरू-शिष्यांची फार मोठी परंपरा आपणाकडे निर्माण झालेली आहे हे विसरता येणार नाही.

अध्ययन-अध्यापनामध्ये अध्यापन साधनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. डॉ. विलास रणसुरे म्हणतात, " हजार शब्द जे विद्यार्थी मनात वर्तनबदल घडवून आणू शकत नाहीत, तो बदल एक शैक्षणिक साधन घडवू शकते. अध्यापन साधने ही फुलातील गंधासारखी व पक्वान्नास असलेल्या केशराच्या स्वादासारखी असतात. अध्यापन साधने अध्यापनात रमणीयता, नाविन्यता व आकर्षकता निर्माण करतात." [3] एकंदरीत अध्यापन साधने ही अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. ग्रामोफोन, चित्रे, तक्ते, वस्तू, फलक, रेडिआ, टेपरेकॉर्डर, टेलिव्हिजन, चलचित्रपट, व्हिडीओ, संगणक इत्यादी साधनांचा वापर करून कल्पक अध्यापक आपले अध्यापन परिपूर्ण, विद्यार्थीकेंद्री करत असतो. त्याचप्रमाणे उत्तम अध्ययनार्थी या साधनांचा कौशल्याने वापर करून स्वतःचे अध्ययन सुलभ व प्रभावी करून यशस्वी होत असतो.

एकविसाव्या शतकात अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत आमूलाग्र बदल होत आहेत. त्याचा प्रभाव संपूर्ण जगावर पडतो आहे. एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या सगळ्या सोबतच नव्याने आलेले कोरोनासारख्या संकटामुळे केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. या अचानक आलेल्या संकटाने संपूर्ण जग गोंधळून गेलेले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रीयेत खूप बदल झालेला आहे आणि तो होणे अगदी स्वाभाविक आहे किंवा ती काळाची गरज बनलेली आहे.

एकविसाव्या शतकात विद्यार्थीच नव्हे तर समाजातील सर्व घटकांच्या ज्ञानग्रहणाच्या/शिकण्याच्या प्रक्रीयेमध्ये खूप बदल झालले आहेत. सामान्य माणूस तर बरेचसे ज्ञान (खरतर ती माहिती आहे पण त्यालाच तो ज्ञान समजतो आहे) सोशल मिडिया व्दारे मिळवितो आहे. व ही माहिती वेगाने तो इतरांकडे पाठवितो आहे. त्या माहितीची कोणतीच खातरजमा न करता तो स्वतः त्यावर विश्वास ठेवतो आहे आणि आपल्या संबंधीतांनाही तसे करण्याचा आग्रह धरतो आहे. ही अतिशय गंभीर आणि घातक गोष्ट आहे. त्यामुळे त्याचा अध्ययन अध्यापन प्रक्रीयेकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलतो आहे. हे दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांनाही सोशल मिडिया, वेगवेगळ्या वेबसाईड्स, युट्यूब, फेसबुक, व्हॉट्ॲप, ईमेल, वेगवेगळे चॅनल्स, रेडिओ, दूरदर्शन यांच्या माध्यमातून हवी मी माहिती सहज मिळते आहे. पण या साधनांच्या माध्यमातून मिळणारी माहिती म्हणजे ज्ञान नव्हे किंवा शिक्षणही नव्हे. माहितीचा स्फोट झाला आहे पण त्यामुळे सुसंस्काराची प्रक्रीया बाधीत झाली आहे. या सा-यामुळे शिकण्या शिकविण्याच्या सुंदर प्रक्रियेमध्ये बाधा येते आहे. शिकविणे म्हणजे संस्कार करणे, शिकविणे म्हणजे ज्ञानानुकूल करणे, शिकविणे म्हणजे विचार व भावसमृध्द करणे, शिकविणे म्हणजे घडविणे ही सुंदर प्रक्रिया यामुळे खंडीत होते आहे. त्यामुळे एक प्रकारचा कृत्रिमपणा, भावशून्यता, निर्जीवपणा समाजात वाढताना दिसतो आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी गेल्यामुळे सर्व नात्यांमधला संवाद कमी होत चाललेला आहे. त्याला गुरू शिष्याचे नातेही अपवाद नाही. हे सारं आपण अनुभवत होतो, पहात होतो. आणि पालक, शिक्षक, सूज्ञ नागरीक म्हणून आपण आपल्या मुलांना या तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊ दयायचं नाही म्हणून कसोशीने प्रयत्न करत होतो. परंतु कोरोना संकटानंतर ऑनलाईन शिक्षण हे काळाची गरज बनले आहे आणि अर्थात भविष्यात याचे प्रमाण वाढतेच राहणार! कारण नव्या शैक्षणिक धोरणात औपचारिक शिक्षणास समांतर महाजालीय शिक्षणास प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकृत करण्यात आलेले असून त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतीच ३८ विद्यापीठातील १७१ अभ्यासक्रमांना अनुमती दिली असून या शैक्षणिक वर्षापासून (२०२१-२०२२) हे महाजालीय अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. युजीसी ने यापूर्वीच ४० टक्के अध्यापन महाजालीय करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यामुळे भविष्यात कोरोना संपला तरी औपचारिक शिक्षणाकडून ऑनलाईन शिक्षणाकडे सुरू झालेला प्रवास थांबणार नाही कारण तो कोरोनाच्या आधीपासून सुरू झालेला आहे कोरोनाने त्याला प्रचंड गती दिलेली आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी मुलांना जाऊ दयायचं नाही यासाठी प्रयत्न करणा-या पालकांना, शिक्षकांना स्वतःहून मुलांच्या हातात मोबाईल, टॅब, लॅपटॉप इत्यादी दयायची वेळ आलेली आहे. या कोरोनाच्या संकटकाळात ऑनलाईन का असेना पण मुलांचे काही तरी शिकणे सुरू आहे. ही पालक आणि शिक्षकांना अल्प समाधान देणारी बाब पण यात अध्ययन अध्यापनातला जिवंतपणा नाही. अहो! पुस्तकातला अभ्यासक्रम ऑनलाईन शिकविता येईल पण 'जगणं कस शिकवायचं ऑनलाईन!.....' ही अतिशय गंभीर समस्या आहे.

शिक्षण क्षेत्रात अनेक पातळयांवर आमूलाग्र बदल होत आहेत. या बदलांचा एक भाग आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधीत आहे. तंत्रज्ञानाला विरोध नाही त्याचा वापर केलाच पाहिजे पण त्यामुळे माणूस यांत्रिक होतो आहे असे जाणवते आहे. गुरू-शिष्य पंरपरा खंडीत होते आहे अशी भिती वाटते आहे. विद्यार्थी, पालक बदलले आहेत. कष्टाने, संयमाने यश वा ज्ञान मिळविण्यापेक्षा त्यांना फक्त मिळविण्यात आनंद आहे. त्यासाठीचे मार्ग प्रामाणिक असावेत असा पालकांचा, विद्यार्थ्यांचा वा शिक्षकांचा आग्रह दिसत नाही. (अर्थात याला काही अपवाद नक्कीच आहेत) ही फार मोठी धोक्याची घंटा आहे.

मोठ्या प्रमाणात पालक आपल्या इच्छा, आकांक्षा मुलांवर लादत आहेत. मार्कासाठीची जिवघेणी स्पर्धा सुरू आहे त्यामुळे शाळांची क्रिडांगणे अबोल होत आहेत आणि आता तर या कोरोना महामारीने सा-या शाळाच अबोल करून टाकल्या आहेत. ऑनलाईन शिक्षण सुरू आहे ते आपल्या समाधानासाठी पण त्यात शिकण्या-शिकविण्याचा जिवंतपणा नाही. शाळेत येताना - जातानाचा प्रवास, मित्रांसोबतची मस्ती, खेळलेले नानाविध खेळ, सुख -दुःखातला सहभाग, अनुभवांची देवाण-घेवाणं इ. इ. असंख्य बाबी मधूनच संस्कार होऊन जगणं समृध्द होणार आहे. या सा-याला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजही आज पारखा झाला आहे. एकुणच अध्ययन अध्यापनात बदल झालेले आहेत त्याला तंत्रज्ञानाबरोबरच विद्यार्थी आणि पालकांची बदललेली मानसिकताही कारणीभूत आहे. त्यावर कोरोनामहामारीचाही फार मोठा परिणाम झाला आहे. संशोधक, अभ्यासक तासंतास ग्रंथालयात घालवत असतो पण या नव तंत्रज्ञानाने ग्रंथालयात जाणे कमी झाले आहे. घरोघर आतुरतेने पेपरची वाट पहाणारे, दिवाळी अंक खरेदी करणारे कमी झाले आहेत. या सगळ्या बाबी आता ऑनलाईन मिळू लागल्या आहेत. ग्रंथालय, वाचनालय, शिक्षकांची जाग नवतंत्रज्ञान घेत आहे त्यामुळे अध्ययन अध्यापनाचा सुंदर प्रक्रीयेतील सजीवता कमी होत चाललेली आहे. त्यामुळे सुसंस्कृतपणा, चांगुलपणा, माणूसकी ही मूल्ये समाजात कमी होत चालली आहेत.

कोरोनामुळे मार्च २०२० पासून अध्ययन अध्यापन बंद झाले आहे. अनेक वर्गाचे निकाल परीक्षा न घेताच लावण्यात आले आहेत तर विद्यापीठीय स्तरावर अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन महाजालीय (इंटरनेट) संपर्क माध्यम व साधनांव्दारे झाले आहे. या बदलांमुळे भारतीयांची संगणक साक्षरता वाढलेली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मोबाईल व संगणकच संपर्क व कार्यपध्दतीचे माध्यम बनल्याने सर्वसाधारण समाज संगणक व डिजिटल साक्षर झाला आहे. शिक्षण क्षेत्रात खाजगी महाजालीय शिक्षणाचा नवा उद्योग सुरू झाला त्यामुळे शिक्षण प्रक्रिया ऑनलाईन सुरू झाली. मानवी हस्तक्षेपी म्हणजे पारंपरिक औपचारिक शिक्षणच आदर्श

होय हे अधोरेखित झाले कारण या नव्या बदलाने विद्यार्थी एकाकी झाला आहे. त्याचे शंका निरसन टप्प होते आहे. अध्ययन अध्यापनात एक प्रकारचा कृत्रिमपणा आला आहे. पालकांवरील आर्थीक आणि मानसिक ताण वाढलेला आहे. श्रीमंत गरीब अशी दरी वाढते आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मार्गदर्शन, सहकार्य, धाक यामुळे प्रगतीची संधी मिळायची ती या नव्या बदलांमुळे संपुष्टात येणार आहे. मुले सातत्याने घरात व मोबाईल, संगणकाच्या जाळयात यामुळे त्यांचे मानसिक स्वाथ्य बिघडणार आहे असे असंख्य दुष्पपरिणाम कोरोनामुळे सुरू असलेल्या ऑनलाईन शिक्षणामुळे व नव्या शैक्षणिक धोरणात याला दिलेल्या महत्त्वामुळे होणार आहेत.

**समारोप :**

विनोबांच्या मते शिकविणे म्हणजे संस्कार करणे, आपण विद्यार्थ्यांना शिकवित नसतो तर खरे म्हणजे त्यांचे मनच संस्कारीत करीत असतो. हे संस्कारीत करताना ते सुगंधीतही कसे होत राहील याचा विचार अधिकाधिक व्हायला हवा. डोक्यावर ओतण्यापेक्षा ज्ञान डोक्यात जाणे ते तिथे स्थिरावणे, त्यातून मन संस्कारीत होणे आणि संस्कारातून ते अधिकाधिक कार्यक्षम बनवणे ही अध्यापनाची खरी बैठक असायला हवी. जिथे संस्कार तिथे आकार हे ध्यानी घेऊन केले जाणारे अध्यापन हे निश्चितच परिणामकारक होते." [४] माधव पोतदार यांनी अध्यापनातून असलेल्या रास्त अपेक्षा आणि त्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. परंतु दुर्दैवाने आज माहिती देण्यावरच भर दिसतो आहे. विद्यार्थ्यांना शिक्षकांशिवाय माहिती मिळविण्याची, अल्पावधीत माहिती मिळविण्याची असंख्य साधने त्यांच्या हाताशी आहेत. तो अशा मिळविलेल्या माहितीलाच ज्ञान समजून खूष आहे त्यामुळे ज्ञानार्जनाचा आनंदाला आणि त्यातून होणा-या संस्काराला आज तो पारखा झालेला आहे. अर्थात याला शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचा मार्काधिष्ठीत दृष्टीकोणही कारणीभूत आहे. म्हणूनच अध्ययन अध्यापनात झालेल्या स्थित्यंतराचा, आलेल्या तंत्रज्ञानाचा विद्यार्थी आणि शिक्षकांनी संयमाने वापर केला तर त्यांना अध्ययन अध्यापनात खूप चांगली मदत होणार आहे, शिकण्या शिकविण्याची प्रक्रीया सुकर होणार आहे. परंतु विद्यार्थी जर या नवसाधनांच्या आहारी गेले तर ते अध्ययन अध्यापनाच्या सुंदर प्रक्रियेला मुकणार आहेत. लीला पाटील म्हणतात, "दिसण्याचं पाहण्यात, पाहण्याचं समजण्यात, समजण्याचं शिकण्यात आणि शिकण्याचं कृतीत रूपांतर होण्यासाठी आपण शिकवायला हवं" [५] पण ऑनलाईन शिक्षणामध्ये हे शक्य नाही. ऑनलाईन शिक्षणातून विद्यार्थ्यांना भरपूर माहिती मिळेल या माहितीमुळे त्यांना भरपूर मार्कस् मिळतील पण भरपूर माहिती व मार्कस् असून देखील ते जीवनात अपयशी ठरण्याची अधीक शक्यता आहे म्हणून अध्ययन अध्यापनातील नव्या स्थित्यंतरांचा डोळसपणे स्विकार करून संयमाने वापर करायला हवा.

**संदर्भ टीपा :**

१. 'मराठीचे अध्यापन' डॉ. माधव पोतदार, सुयोग प्रकाशन, पुणे, प.आ. २००५ पृ. १३१.
२. 'उत्तम अध्यापनाची रहस्ये' (मूळ संपादन व प्रस्तावना - डॉ. श्रीमती विनय किरपाल, मराठी अनुवादाचे संपादन व प्रस्तावना - डॉ अशोक केळकर) मराठी अनुवाद - डॉ. संध्या काणे, डायमंड प्रकाशन, पुणे प. आ. २००८ (लेख - अध्यापन : विद्यार्थ्यांशी परस्पर संवाद - सुषमा वर्मा) पृ. २०६.
३. 'मराठीचे आशययुक्त अध्यापन', डॉ. विलास रणसुरे, संघमित्रा प्रकाशन, मिरज. प. आ. २००६ पृ. १५५.
४. 'मराठीचे अध्यापन' डॉ. माधव पोतदार, सुयोग प्रकाशन, पुणे, प.आ. २००५ पृ. ५ व ६.
५. 'लिहिणं मुलांचं : शिकवणं शिक्षकाचं', लीला पाटील, उन्मेष प्रकाशन, पुणे. प.आ. १९९३ पुनर्मुद्रण २००६. पृ. ८७

# COVID-19 – भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**प्रा. शाम सातर्ले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला महाविद्यालय,, भिगवण
satarlesham@gmail.com

**गोषवारा :-**

आज कोरोना विषाणुमुळे संपुर्ण जग अडचणीत आहे. बहुतांश देशाचे अर्थिक व्यवहार ठप्प झालेले दिसुन येत आहे. कोविड-19 विषाणुचा मोठया प्रामाणावर होणारा संसर्ग रोखण्यासाठी जगामध्ये लॉकडाऊनसारख्या उपायांचा वापर करण्यात येत आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादन, सेवा आणि उद्योग बंद करण्यात आलेले आहेत. जगानं आतापर्यंत दोन महायुध्दे अनुभवलेली आहेत परंतु या महायुध्दाची झळ काही देशांना लागलीच नव्हती. या महायुध्दामध्ये जे देश सहभागी झाले नव्हते तिथली अर्थव्यवस्था आणि नागरीक सुरक्षीत होते. अर्थात त्यावेळी अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण मोठया प्रामाणावर झालेले नव्हते. आजच्या परिस्थितीचा विचार करता कोरोना विषाणुमुळे मागील महायुध्दापेक्षाही गंभीर परिस्थिती जगामध्ये निर्माण झाली आहे.आलेल्या महामारीमुळे संपुर्ण जग भयभीत झालं आहे. सर्वशक्तिमान व विकसित समजल्या जाणाऱ्या अमेरीका आणि युरोपीयन देशांनी या महामारीसमोर हात टेकले आहेत. जागतीक अर्थव्यवस्थेचे महायुध्दामुळे जेवढे नुकसान होणार नाही त्यापेक्षा अधिक नुकसान या महामारीमुळे होईल असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे. भारतामध्ये सरकारनं लॉकडाऊन जाहीर केलं आहे. कोणत्याही देशामध्ये टाळेबंदी जाहीर करणं ही फार आनंदाची गोष्ट नाही. अशा प्रकारचा निर्णय घेण्यापुर्वी भविष्यामध्ये कोणत्या समस्या निर्माण होउ शकतील आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेवर तसंच नागरीकांच्या उपजीवीकेवर कोणते दुरगामी परीणाम होतील याचा परीपुर्ण विचार सरकारनं नक्कीच केला असणार आहे. कोरोनामुळे संपुर्ण जग महामंदीत लोटले जात आहे. जागतिक बँक आणि जगातल्या इतर संस्थांच्या अहवालाद्वारे असं दिसुन येतंय की भविष्यामध्ये संपुर्ण जगाला काही अडचणींना सामोरं जावं लागणार आहे. कोरोना विषाणुमुळे जागतिक आणि देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर होणा'या परिणामांवर विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :-**

कोरोनाच्या संकटामुळे संपूर्ण जगभरात आर्थिक मंदी येणार हे तर निश्चित आहे. पण या संकटाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. कोरोनाचं संकट येण्याआधीच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासदरात ऐतिहासिक घसरण नोंदवण्यात आली होती. त्यात आता आपण मागील एक वर्ष झाले कोरोणाचा सामना करत आहोत, संपूर्ण जगातून कमी होणारी मागणी, गुंतवणुकीवर होणार परिणाम या सगळयांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेपुढे मोठं आव्हान निर्माण झाले आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेवर तीन महत्त्वाच्या गोष्टी परिणाम करणार आहेत खासगी उपभोगासाठीचा खर्च कमी होणार, गुंतवणूकीत कपात आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर होणारा परिणाम यामुळे अर्थव्यवस्थेपुढे मोठंप्रश्नचिन्हउभेराहिलआहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेवर कोणत्या परिस्थितीत काय परिणाम होऊ शकतात?

परिस्थिती १ –

भारतासह संपूर्ण जगात मंदी येणार. चीनने कोरोना विषाणूच्या प्रसारावर नियंत्रण मिळवले आहे आणि आता चीनमधील उत्पादन पूर्वीप्रमाणे सुरु झाले आहे. इतर देशांनीही कोरोनाचा प्रसार थांबवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आहेत. तसेच त्यानंतर अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी सर्व देशांमधील सरकार मोठ्या प्रमाणात आर्थिक पॅकेजेस जाहीर करतील. या परिस्थितीत 2020-21 या आर्थिक वर्षात भारताचा विकासदर वजा 7.7% राहिला आहे. 2021-22 या आर्थिक वर्षात11% राहण्याची शक्यता आहे.

परिस्थिती – २

भारत जेव्हा कोरोनाच्या प्रसारावर नियंत्रण मिळवेल तेव्हा जागतिक मंदीला सुरूवात झालेली असेल या परिस्थितीत जागतिक आर्थिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जागतिक अर्थव्यवस्थेशी ताळमेळ कसा राहतो ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. त्यामुळे परिस्थिती -१ मध्ये अपेक्षित विकासदरापेक्षा भारताचा विकासदर वजा ४.ते ४.५ टक्के राहण्याची शक्यता आहे

परिस्थिती – ३

भारतात कोरोनाचा प्रसार वाढला तर लॉकडाऊन परत वाढणार; जागतिक मंदी या परिस्थितीमुळे दुहेरी संकट निर्माण होऊ शकते. एक तर देशांतर्गत आणि जागतिक मागणी घटणार आणि लॉकडाऊन वाढले तर त्याचे धक्के भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात बसणार. या परिस्थितीत भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकासदर घसरु शकतो.

मागणीवर होणारा परिणाम

खासगी उपभोग

अर्थव्यवस्थेच्या स्थितीवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे मागणी. पण लॉकडाऊनमुळे मागणी कमी झाल्याने अर्थव्यस्थेवर त्याचा मोठा परिणाम होणार आहे. भारतातील शहरी भागात नियमित रोजगार किंवा पगार मिळवणारे (बिगर कृषी क्षेत्रातील)३७ टक्के लोक हे असंघटित क्षेत्रात मोडतात आणि शहरी भागातील लॉकडाऊनमुळे त्यांच्या नियमित उत्पन्नावर परिणाम होणार आहे.

पुरवठ्यावर होणारा परिणाम

संपूर्ण जगात कोरोणामुळे लॉकडाऊन जाहीर करत असल्यामुळे छोटे-मोठे कारखाने बंद ठेवावे लागत आहेत. परिणामी कच्च्या मालाचा अपूर्ण पुरवठ्यामुळे आयात करणाऱ्या कंपन्यांना फटका बसत आहे.

इंधनाच्या किमती वाढत असल्याने अर्थव्यवस्थेमध्ये पैसै खेळता ठेवणे कठीण

कोरोनाच्या आकस्मिक संकटामुळे कार्पोरेट कंपन्यांना रोख पैशांची चणचण भासू लागली आहे. आर्थिक परिस्थिती आणखी बिघडली तर या कंपन्यांना बाजारातून कर्ज घेऊन ही चणचण कमी करणे कठीण होणार आहे. त्यातच इंधनाच्या किमतीही वाढत आहे. कापड आणि तयार कपड्यांच्या उद्योगापुढीलं आव्हानं

1) पुढचे काही महिने मागणीतील कपातीमुळे भारताच्या कापड उद्योगाच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो.

2) जगातील लॉकडाऊनमुळे कच्च्यामालाचे दर वाढून भारतात त्याचे परिणाम जाणवतील, देशांतर्गत बाजारात काही वस्तुंचे भाव वाढू शकतात. 3) पुढचे काही महिने परिस्थिती अशीच राहिली तर देशांतर्गत किरकोळ बाजारावरही परिणाम जाणवणार . 4) देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी घटली तर उत्पादन क्षेत्रावर परिणाम होऊन रोजगारावर त्याचा परिणाम होऊ शकतो. 5) कापड आणि तयार कपड्यांच्या उद्योगातील उत्पादनाचे प्रमाण एप्रिल ते जून या तिमाहीमध्ये १० ते १२ टक्क्यांनी घटण्याची शक्यता. 6) कापसाचे दर ३ टक्क्यांनी घटले आहेत आणि पुढील काही महिन्यात हे दर आणखी घटण्याची शक्यता आहे. वाहन उद्योगावरील सध्या आणि भविष्यात होणार परिणाम पैशांच्या उपलब्धतेत कपात झाल्याने बाजारपेठेवर परिणाम होणार

A) प्रवासी वाहनं आणि टू/फोर व्हिलर वाहनांचे क्षेत्र

या क्षेत्रातील मंदी कायम असल्याने मागणी वाढण्याची शक्यता नाही. त्यातच आताच्या परिस्थितीमुळे या क्षेत्राला आणखी मोठा फटका बसला आहे. त्यात ग्राहकांची क्रयशक्ती नसल्याने मागणी वाढण्याची शक्यता नाही.

B) व्यावसायिक वाहनांचे क्षेत्र

1) अनावश्यक सेवांवर लॉकडाऊनमुळे बंदी असल्याने व्यावसायिक वाहनांची मागणी घटणार
2) तरलता आणि रोखतेच्या अभावामुळे आधीच विक्री कमी झाली असताना पुढच्या काही महिन्यात परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता
3) वाहननिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना त्यांचे नवीन उत्पादन लाँच करण्याची योजना ग्राहकांची क्रयशक्ती वाढेपर्यंत पुढे ढकलावी लागणार

4) ग्राहक जीवनावश्य वस्तू म्हणजे अन्न आणि औषधांवर खर्च करण्यास प्राधान्य देणार असल्याने इतर वस्तू खरेदीची विचार पुढे ढकलला जाईल. परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर वाहनांच्या बाजारपेठेत तेजी येऊ शकेल.

5) जागतिक स्तरावर वाहनांच्या सुट्या भागांचा पुरवठा करणारी साखळी विस्कळीत झाल्याने वाहनांचे सुटे भाग महागण्याची शक्यता

बांधकाम उदयोगावरील सध्याचा आणि दीर्घकालीन परिणाम

1) नवीन घरांच्या मागणीत मोठी घट होण्याची शक्यता असून नवीन प्रकल्पांची संख्याही घटण्याचा अंदाज आहे.

2) अमेरिका आणि युरोपमधील संभाव्य मंदीमुळे व्यावसायिक बांधकामांची सध्या असलेली मागणी कमी होण्याची शक्यता किंवा या वर्षाच्या दुसऱ्या सत्रात ही मागणी वाढण्याची शक्यता. 3. लॉकडाऊनमुळे देशातील किरकोळ व्यापार क्षेत्रावर परिणाम झाला असून येत्या काळातही पुरवठा आणि वाहतूक विस्कळीत झाल्याने या क्षेत्रातही मंदीची शक्यता आहे. 4. कोरोनाच्या महासंकटाचा सगळयात आधी फटका बसलेल्या क्षेत्रांपैकी आदरातिथ्य क्षेत्र एक आहे. या क्षेत्रात मोठं आर्थिक नुकसान आणि रोजगार जाण्याची शक्यता आहे. 5. सर्वच क्षेत्रांना मोठा धक्का बसला असल्याने बांधकाम क्षेत्रात नव्यानं होणारी गुंतवणूक ठप्प होण्याची शक्यता आहे.

कृषी क्षेत्रावरील सध्याचा आणि दीर्घकालीन परिणाम

शेती हा देशाचा कणा आहे आणि सरकारने तो अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केल्यामुळे या क्षेत्रावर कमी प्रमाणात परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर बियाणे, किटकनाशके आणि खतांच्या मागणीमध्ये घट होण्याची शक्यता कमी आहे. सध्याच्या रब्बी मोसमासाठी शेतमजुरांच्या स्थलांतरणाला रोखण्यात येऊ नये. ग्रामीण भागातील शेती उत्पादनावर लक्ष केंद्रीय केल्यास कोरोनाच्या संकटाचा कृषी क्षेत्रावर आणि भारताच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर जो दुष्परिणाम होणार आहे त्याला चांगले प्रत्युत्तर ठरेल. पण सध्या कृषी बाजारपेठेवरही लाकडाऊनचा परिणाम झाल्याने खरीपाच्या पेरणीसाठी बियाणे, खते, किटकनाशके उशीरा उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने खरीपाच्या हंगामावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

शेतीसाठीचे आवश्यक साहित्य बियाणे – सर्वच राज्यांनी बियाण्यांना अत्यावश्यक वस्तुंच्या यादीत टाकल्याने यावरील परिणाम अत्यंत कमी असणार तयार मालाची विक्री करुन निर्यात करणे आणि कच्च्या मालाच्या आयातीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यावर परिणाम होणार खते – कमी परिणाम होणार पण वाहतूक आणि बंदरांमधून माल बाहेर येण्याच्या प्रक्रियेत अडचणी येणार खाद्यपदार्थांची किरकोळ बाजारपेठ- फळे, दूध आणि भाजीपाल्याच्या वाहतुकीला परवानगी देण्यात आली आहे. पण अफवांमुळे पोल्ट्री व्यवसायाला (अंडी आणि चिकन) मोठा फटका बसला आहे. ताजे मांस आणि सागरी खाद्याच्या किरकोळ दुकानांबाबत सरकारी धोरण स्पष्ट नसल्याने गोंधळाची परिस्थिती. लॉकडाऊन लांबले तर खाद्यपदार्थांच्या मागणीत वाढ होऊ शकते. किराणा माल घरपोच देणाऱ्या ऑनलाईन बाजारपेठेला पोलिसांचे निर्बंध आणि वाहनं थांबवली जात असल्याचा मोठाफटकाबसलाआहे. अन्नप्रक्रिया उद्योग – अन्नप्रक्रियेशी संबंधित सर्व उद्योग सुरु आहेत. पण कुशल आणि अकुशल कामगारांच्या आंतरराज्य प्रवासावरील बंधनांमुळे परिणाम होत आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम झालेला नाही. पण केंद्र सरकारने पुरवठा साखळी सुरळीत होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कारखानदारांनीही आता कमी मनुष्यबळात जास्तीत जास्त काम करुन मागणी पूर्ण करण्याची गरज आहे. देशांतर्गत बाजारपेठेवर याचा कमी परिणाम होण्याची शक्यता आहे. खाद्यपदार्थांची निर्यात – भारताचे सगळयात मोठे निर्यातदार असलेले अमेरिका, युरोपमध्ये कोरोनाचा परिणाम पुढील बरेच महिने जाणवत राहणार आहे. मागणीतील कपात आणि निर्यात प्रक्रियेतील अडचणी यामुळे निर्यातीवर परिणाम होण्याची शक्यता. निर्यात न होणारा माल देशांतर्गत बाजारपेठेत उपलब्ध करुन देण्यात आला तर त्याचाही फायदा होऊ शकतो. आंबा, द्राक्ष, सागरी खाद्यपदार्थ यांच्या निर्यातीवर परिणाम झाल्याने पुढच्या काळात उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.

खाद्यपदार्थ आणि कृषीक्षेत्रासाठी शिफारशी

कोरोनाच्या संकटकाळात खाद्यपदार्थांच्या सुरळीत पुरवठ्यासाठी धोरण

1) राज्य सरकारांनी आणि केंद्राने जीवनावश्यक वस्तुची यादी करुन त्यांच्या वाहतुकीत अडथळे येणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.
2) शेती आणि अन्नप्रक्रिया उद्योगाबद्दलच्या अफवा आणि खोट्या बातम्यांविरोधात कठोर कारवाई केली गेली पाहिजे
3) जीवनावश्यक वस्तुंच्या वाहतुकीसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या फास्टटॅगसारख्या सुविधांचा वापर केला पाहिजे.
4) खाद्यपदार्थांच्या वाहतुकीसाठी महामार्गांवर स्वतंत्र कॉरिडॉर करणे
5) खाद्यपदार्थांच्या वाहतुकीसाठी पास आणि मंजुरीकरीता आधारकार्डचा उपयोग करावा

या क्षेत्रावरील आर्थिक ताण कमी करणे

खरीप हंगामासाठी सर्व राज्य सरकारांनी मोफत बियाणे, खते उपलब्ध करुन द्यावे बंदरांवर शेती उत्पादनांना प्राधान्य देण्यात यावे. 2021 या आर्थिक वर्षासाठी देशांतर्गत आणि निर्यातक्षम बाजारपेठेसाठी सरकारनं इन्सेटिव्ह जाहीर केल्यास पैसा खेळता राहील.

शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंची वाहतूक करणाऱ्यांना सुरक्षा

1) बियाणे, खते, किटकनाशके यांची वाहतूक करणाऱ्या अखेरच्या व्यक्तीचा विमा संरक्षण दिले जावे.
2) या वस्तुंच्या शहरी आणि ग्रामीण भागातील वाटपासाठी बेरोजगार युवकांची नोंदणी करुन त्यांना काम देण्यात यावे
3) शेतमजुरांची कमतरता जाणवल्यास ड्रोनद्वारे पिकांवर फवारणी करता येऊ शकते.
4) कामगारांची नोंदणी असलेले राष्ट्रीय रजिस्टर तयार करुन ते आधारकार्डला जोडल्यास देशात जिथे मजुरांची आणि कामगारांची आवश्यकता आहे तिथे त्यांना पोहोचवणे सोपे जाऊ शकते.
5) ई कॉमर्सचा वापर करुन एपद्वारे मागणी नोंदवून वस्तू घरपोच गेल्या तर रस्त्यांवर गर्दी होणार नाही.
6) शेतमालाला योग्य दर आणि शेतमजुरांची उपलब्धता असेल तर शेतकरी खरीपात पेरणीसाठी प्रोत्साहित होतील
7) आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट याच्या आधारावर मंजुरीची प्रक्रिया राबवली गेली तर ते सोयीचे होईल.

**निष्कर्ष**

कोरोना व्हायरसने जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम केला आहे प्रत्येक देश व्हायरसचा बळी ठरला आहे. हजारो कोटींचा तोटा झाल्याने प्रत्येक देशाने येणाऱ्या काळात अर्थव्यवस्थेला चालना देण्याची गरज आहे.

**संदर्भ:-**

1) Agarwal A. N. (2001) Indian Economy Problems of Development and Planning

2) Datta R. and K.P.M. Sundharam (2007) Indian Economy

5) शेतकरी मासिक

6) Padam Poudel & 7 (2020) COVID-19 and its Global Impact on Food and Agriculture, Journal of Biology And Todays World

7) Vikas Rawal & Manish Kumar(2020) COVID-19 Lockdown: Impact on Agriculture and Rural Economy, Published by Society for Social and Economic Research

8) कृषी कायदे, 2020, ॲड. सुधीर बिरजे

9) भारतीय अर्थव्यवस्था, रमेश सिंह

# उजनी धरण : एक अभ्यास

**प्रा. भाऊसो नवनाथ सकुंडे**
कला महाविद्यालय, भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे.

**प्रास्तविक -**

यशवंत सागर किंवा भीमा सिंचन प्रकल्प या नावाने ओळखल्या जाणारे उजनी धरण हे भीमा नदीवरील धरण आहे. हे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्याच्या उजनी गावाजवळ असलेले एक चिनाकृती गुरुत्व धरण आहे. या धरणाचे पाणी पुढे नीरा-नरसिंहपूर (ता. इंदापूर) येथे नीरा-भीमा संगमावर जाऊन मिळते. सोलापूर जिल्ह्यातील एकमेव व एकच धरण उजनी धरणाला **'यशवंतसागर'** असेही संबोधले जाते. विशेष म्हणजे हे धरण सोलापूर जिल्ह्यात असून या जिल्ह्यात वा परिसरात थोडसुद्धा पाऊस पडला नाही तरी हे धरण १००% भरते त्याचे कारण पुणे जिल्ह्यातील पश्चिम भागात भरपूर पाऊस पडतो हे आहे.

**उद्दिष्ट्ये : -**

१. उजनी धरणासंदर्भातील तांत्रिक व बांधकाम संदर्भातील माहिती अभासणे.
२. उजनी धरणाच्या उपयुक्ततेचा अभ्यास करणे.
३. उजनी धरण पाणलोटावर अवलंबून क्षेत्रातील व्यवसायांची माहिती अभासणे.
४. उजनी धरणामुळे निर्माण झालेल्या समस्या अभ्यासणे.

**धरणाचे बांधकाम**

उजनी धरणाची बांधणी इ.स. १९६६ सुरू करण्यात आली. हे काम इ.स. १९८० साली पूर्ण झाले. धरण बांधण्यासाठी एकूण रक्कम रुपये ९६.७७ कोटी खर्च त्यावेळी आला.[1] धरणाची मोजमापे पुढीलप्रमाणे आहेत. दगडी धरण ५६.४० मीटर, मातीचे धरण ३९.११ मीटर, धरणाची लांबी दगडी धरण ९१४ मीटर, मातीचे धरण १६२० मीटर, एकूण लांबी २५४० मीटर आहे. उजनी धरणास एकूण ४१ दरवाजे आहेत प्रत्येक दरवाजाचा आकार हा १२.७ मीटर एवढा आहे.[2]

**धरणासाठी बुडीत क्षेत्र आणि बाधित गावे-**

उजनी धरणासाठी तीन जिल्ह्यामधील एकूण ५१ गावे बाधित झाली. त्यामध्ये पुणे जिल्हा २५ गावे, सोलापूर जिल्हा २३ गावे, अहमदनगर जिल्हा ०३ गावे पाण्यात गेली. या तिन्ही जिल्ह्यामधील ४७ हजार लोकसंख्या या धरणामुळे बाधीत झाली. बुडीत क्षेत्रामध्ये एकूण २९ हजार हेक्टर क्षेत्र या धरणाच्या पाण्याखाली गेले, त्यापैकी २६७५० हेक्टर खाजगी क्षेत्र, ६०५ हेक्टर वन क्षेत्र, १६४५ हेक्टर सरकारी क्षेत्र पाण्याखाली गेले. उजनी धरण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या धरणाची पाणी साठविण्याची एकूण क्षमता ३३२० .द.ल.घ.मी आहे. उपयुक्त साठा १५१७.१९ द.ल.घ.मी, मृत साठा १८०२.८१ द.ल.घ.मी. एकूण पाणी साठा ११७ टि.एम.सी (१००%) १२३ टि.एम.सी (१११%) एवढी प्रचंड आहे.[3]

**धरण बांधण्याचा उद्देश -**

भीमा नदी, जी पश्चिम घाटाच्या भीमाशंकर येथून उगम पावते आणि भीमा खोऱ्यात नदी व नाले निर्माण होतात, त्यावर बावीस बंधारे बांधले आहेत त्यापैकी उजनी धरण हे एक आहे. प्रकल्प सिंचन, जलविद्युत, पिण्याचे आणि औद्योगिक पाणीपुरवठा आणि मत्स्यपालनासंबंधी विकासाचे बहुउद्देशीय लाभ प्रदान करते. सिंचनाच्या पुरवठ्यामुळे विशेषत: सोलापूर जिल्ह्यात ५०० कि.मी. (१९० चौरस मैल) शेतीचा फायदा होतो.[4] जलाशयातून शेती क्षेत्राला सिंचनासाठी पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रामुख्याने दुष्काळ आणि दुष्काळ परिस्थितीत होणारी टंचाई कमी होण्याचे उद्दीष्ट आहे. हिंदूंचे विशेषत: वारकरी सांप्रदायाचे एक महत्त्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूर सारख्या शहरांना येणाऱ्या पुराची शक्यता हे धरण कमी करते. सिंचनाच्या सुविधेचा परिणाम म्हणून, सिंचनाच्या परिस्थितीत उगवलेली काही महत्त्वाची पिके ऊस, गहू, बाजरी आणि कापूस आहेत.

**परिसरातील हवामान व पाऊस**

भीमा नदी खोऱ्यात उष्णदेशीय पावसाळी हवामानाचा अनुभव आहे. दक्षिण-पश्चिम मान्सूनद्वारे पाऊस पडतो. धरणाच्या परिसरातील पाऊस ५०० मिलिमीटर, उगम परिसरातील पाऊस ४३२० मिलिमीटर, जास्तीत जास्त पर्जन्यमान ४३२० मिलिमीटर कमीत कमी पर्जन्यमान ४६१ मिलिमीटर इतके आहे. ७५ टक्के विश्वासर्हतेने सेवा ६२८४ द.ल.घ.मी आहे. धरणाच्या पाणी नियंत्रण पातळी पहाता नदीचा तळ ४५८.१७० मीटर, सिंचन विमोचन तळ ४८७.२०० मीटर, विसर्ग करण्याची पातळी ४९१.०३० मीटर, पूर्ण संचय पातळी ४९६.८३० मीटर, दगडी धरण माथा पातळी ५०१.४० मीटर, माती धरण माथा पातळी ४९९.८७० मीटर अशाप्रकारे धरणाच्या पाण्याचे नियंत्रण केले जाते.[5]

**भौगोलिक वैशिष्ट्ये**

उजनी धरण ज्या भीमा नदीवर बांधले गेले आहे, ती नदी पश्चिम घाटातील भीमाशंकर टेकड्यांमधून उगम पावते, ज्यास सह्याद्री डोंगराची रांग देखील म्हटले जाते. कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यात रायचूरजवळ भीमा नदी कृष्णा नदीला मिळते. भीमा नदीच्या पात्रात कुंडली नदी, कुंडला नदी, घोड नदी, भामा नदी, इंद्रायणी नदी, मुळा नदी, मुठा नदी, पावना नदी, बोरी, सीना, माण, भोगवती आणि नीरा या मुख्य उपनद्या आहेत. भीमा नदीला एक आंतरराज्य नदी पात्र लाभले आहे ते महाराष्ट्रात ७५ टक्के आणि कर्नाटक २५% आहे. या दोन्ही राज्यांचा समावेश आहे. नदीचे खोरे उत्तर, मध्य आणि दक्षिण तीन विभागांमध्ये विभागले गेले आहे, नदीचा मुख्य प्रवाह भीमा धरण बांधलेल्या मध्यभागी आहे, तर दक्षिण विभागात पाच जलाशयांचे वर्चस्व आहे.[6] धरणाच्या वरील खोऱ्यात ग्रामीण-शहरी आणि कृषी-औद्योगिक उपक्रम आहेत. पश्चिमेकडून पूर्वेकडे उतार असलेल्या नदीपात्र क्षेत्रात कृषी-हवामानातील फरक आहेत. पाणी वहन क्षेत्रात सुपीक शेती आहे आणि तिच्या नदी प्रणालीवर अनेक जलसंपदा विकास प्रकल्प तयार केले गेले आहेत. फ्लेमिंगो (रोहित) हा परदेशी पक्षी हिवाळ्यात या जलाशयावर येतो.[7] या जलाशयातील पाण्याचा पुणे, सोलापूर आणि अहमदनगर या तीन जिल्ह्यांतील शेतीला भरपूर फायदा झाला आहे.

या उजनी धरणाच्या तळाशी ऐतिहासिक पळसनाथ मंदिर (पळसदेव ता. इंदापूर) व इनामदारवाडा (सुगाव ता. करमाळा) असून दुष्काळाच्या वेळी म्हणजेच पाणीसाठा कमी झाल्यावर या ऐतिहासिक वास्तूंच्या दर्शनासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत असतात. इ.स. २०१६ च्या दुष्काळावेळी गाजलेल्या सैराट या मराठी चित्रपटाचे काही भाग या धरणाच्या परिसरात चित्रीत करण्यात आले आहे. गेल्या ४० वर्षापूर्वी सोलापूर जिल्ह्याला असे ऐतिहासिक उजनी धरण लाभले असले तरी या धरणातील पाणी मात्र संपूर्ण जिल्ह्यातील तालुक्यांपर्यंत अजूनही पोहोचले नाही.

**धरणातील कालवे**

धरणाला दोन कालवे आहेत. डावा कालवा १२६ किलोमीटर, तर उजवा कालवा १३५ लांबीचा आहे. कालव्याची बेगमपूर शाखा ५३ किलोमीटर, कुरुल शाखा ६५ किलोमीटर, मोहोळ / कारंबा शाखा ६५ किलोमीटर आहे. त्याचप्रमाणे उस्मानाबाद पाणीपुरवठा योजना, सीना- माढा जोड प्रकल्प, सोलापूर, उस्मानाबाद, पंढरपूर या शहरांना पाणीपुरवठा योजना या धरणातून गेलेल्या आहेत. सीना-माढा कालव्यासाठी १९ किलोमीटरचा बोगदा असून हा देशातील पहिला नदीजोड प्रकल्प आहे.[8]

**लाभ क्षेत्र**

उजनी धरणामुळे पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील हजारो हेक्टर क्षेत्र बागायती खाली आलेले आहे. त्यामध्ये सिंचन क्षेत्र एकूण दोन लाख पाचशे सत्ताविस हेक्टर, ओलिता खालील एकूण एक लाख सत्तेचाळीस हजार आठशे हेक्टर, सिंचन क्षेत्र एकूण चौतीस हजार आठशे त्र्याऐंशी हेक्टर एवढी प्रचंड जमीन सिंचनाखाली आली आहे.[9]

बागायती क्षेत्राबरोबरच कारखानदारी आणि औद्योगीकरणासाठी सुद्धा या धरणाचा मोठ्या प्रमाणात फायदा झालेला आहे. पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती या तालुक्यातील औद्योगीकरणासाठी मोठ्या प्रमाणात या धरणातून पाणीपुरवठा होतो इंदापूर तालुक्यातील कर्मयोगी सहकारी कारखाना, निरा भीमा साखर कारखाना, गुळ

कारखाने, लोणी देवकर औद्योगिक वसाहत यामुळेच विकसित झाली. त्याचप्रमाणे भादलवाडी गावाजवळील बल्लरपूर पेपर आणि पल्प कंपनीला सुद्धा धरणाच्या पाण्याचा उपयोग होतो. बारामती तालुक्यातील औद्योगीकरणासाठी या धरणातून पाणीपुरवठा होतो. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने आणि औद्योगीकरणासाठी या धरणातूनच मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो.[10]

**इतर रोजगार**

उजनी धरणामुळे शेती क्षेत्राबरोबरच मासेमारी हा व्यवसाय सुद्धा मोठ्या प्रमाणात विकसित झाला. त्यामुळे अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्याचबरोबर हजारो मैलाचे चे अंतर पार करून फ्लेमिंगो (रोहित) हा परदेशी पक्षी हिवाळयात या जलाशयावर येतो. या पक्षांना पाहण्यासाठी अनेक पर्यटक उजनी धरणाला भेट देतात त्यामुळे सुद्धा रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत.[11]

**निर्माण झालेल्या समस्या :-**

**अवैध वाळू उपसा-**

धरणाच्या पाणलोट क्षेत्रात बेसुमार वाळू उपसा केल्याने पर्यावरण धोक्यात आले आहे. धरणाच्या क्षमतेवरही अनिष्ट परिणाम होत आहे. महसूल विभागाची धडक मोहीम व बेकायदा बोटी जप्त करणे अशा कारवायांनाही वाळू माफिया दाद देत नाहीत. बोटी राजकीय दबावाखाली पुन्हा ताब्यात घेतल्या जातात. त्यामुळे या बोटी कठोर अधिकाऱ्यांनी स्फोटाने उडवून देण्याच्या घटनाही घडत आहेत. बहुतांश वेळेला अधिकारी, राजकारणी व ठेकेदार यांची अभद्र युती होत असल्याने बेसुमार उपसा सतत होत राहतो.[12]

**दूषित पाणी -**

पुणे शहर व भीमा नदीच्या काठावर असणारे कारखाने, औद्यगिक वसाहती यांचे दूषित पाणी नदीपात्रात सोडल्यामुळे ते धरणात जमा होते. त्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होते त्याचा परिणाम मासेमारी व्यवसाय, पिण्याचे पाणी, शेती व्यवसाय याच्यावरती मोठ्या प्रमाणात पडत आहे त्यामुळे या प्रदूषित पाण्यामुळे अनेक आजारांना लोक बळी पडत आहेत.[13]

**पाणीवाटप प्रश्न**

उजनी धरणाची निर्मिती झाली तेव्हा पाणीवाटपातचे नियोजन हे पुणे जिल्हा आणि सोलापूर यांसाठी करण्यात आले होते. परंतु काळानुसार त्याच्यात अनेक बदल होत गेले त्यामुळे हा पाणीवाटपाचा प्रश्न आत्ता मोठ्या प्रमाणात गंभीर झाला आहे.[14]

**पुनर्वसनाचा प्रश्न-**

उजनी धरणामुळे ५१ गावांचे पुनर्वसन करण्यात आले. त्याच्यामुळे सत्तेचाळीस  हजार एवढी लोकसंख्या बाधित झाली. परंतु अजूनही काही गावातील लोकांना आपला हक्क मिळालेला नाही. काही लोकांच्या समस्या अजूनही आहेत त्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे झालेली नाही त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न अजूनही राहिलेला आहे.[15]

**निष्कर्ष –**

उजनी हा महाराष्ट्रातील दुसरा सर्वात मोठा धरण पाणिसाठा आहे. यामुळे याच्या अभ्यासाची गरज वाटली. या शोधनिबंधात उजनी धरणामुळे पुणे, सोलापूर आणि अहमदनगर या अवर्षण प्रवण जिल्ह्यांचा विकास होण्यास सुरुवात झाली. धरणाच्या प्रचंड क्षमतेमुळे शेती, उद्योगधंदे, मासेमारी  व इतर कृषीपुरक व्यवसाय, पक्षी पर्यटन आदि व्यवसाय भरभराटीस आले. यातून साखर कारखानदारीचा विकास झाला. या प्रकल्पामुळे धरणाचा परिसर संपुर्ण पणे आणि बारमाही स्वरुपात बागायती झाला. या सकारात्मक बाबी घडत असल्या तरी पुनर्वसन, वाळू उपसा, पाणी प्रदुषण, पाणी वाटपाचा प्रश्न अशा समस्या निर्माण झाल्या.

## संदर्भ आणि तळटीपा -

1. http://www.youtube.com/c/prabhudevaLG

2. Ibid.
3. Ibid.
4. https://mr.m.wikipedia.org/wiki
5. Ibid.
6. Ibid.
7. मुलाखत- श्री. संदिप नगरे, मौजे कुंभारगाव, ता. इंदापूर.
8. http://www.youtube.com/c/prabhudevaLG
9. Ibid.
10. धरण बांधालगत भेट देउन अधिकारी वर्गाकडून मिळालेली माहिती.
11. इंदापूर तालुका बाजार समिती भिगवण मासळी बाजार, भिगवण येथे क्षेत्रभेटीद्वारे.
12. https://www.esakal.com/paschim-maharashtra/solapur/inside-story-about-construction-ujani-dam-solapur-district-305724
13. ibid.
14. ibid.
15. https://m.facebook.com/story.php

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 25June-2021, Volume-11, Issue-21
Changing Perspectives of Language, Literature, Science and Social Science

# कोविड — १९ : खेळ, खेळाडूवरील परीणाम व उपाय योजना

**श्री. सुरेश मच्छिंद्र शिंदे**
शिक्षकेतर कर्मचारी कला महाविद्यालय, भिगवण
Emai ID : sureshshinde19870@gmail.com

**प्रस्तावना :**

लॉकडाऊन दरम्यान भारताच्या अभिजात ॲथलॅस्थिंना मानसीक व शारिरीक अव्हानाचा सामना करावा लागला. क्रिडा विज्ञान आणि मानसशास्त्र तज्ञ असे म्हणतात की, भारतीय क्रिडा पट्टुना येणा—या कठिण काळात सोयी सुविधांच्या अभावी खेळाचा सराव करणे गरजेचे आहे. उपलब्ध असेल त्या ठिकाणी प्रशिक्षकांच अभावी सराव चालू ठेवणे गरजेचे आहे. कोराना व्हायरस या साथीच्या रोगाचा प्रसार जगभर झाल्यामुळे संबधीत देशामध्ये लॉकडाऊन जाहीर झाले आहे. लॉकडाऊन जाहीर झाल्यामुळे अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धा अनेक देशांना रद्द कराव्या लागल्या आहेत.

**कोविड — १९ : खेळ, खेळाडूवरील परीणाम व उपाय योजना :**

खेळाडूंना या लॉकडाऊन मुळे खूप सा—या अडथळयांना सामोरे जावे लागाले आहे. यामध्ये जे खेळाडू एक ही दिवस ग्राउंडवर न जाता घरी रहावे लागले आहे. खेळाडुंना सराव करण्यासाठी मैदान उपलब्ध होत नव्हते. खेळाडू घरामध्ये व्यायाम करतात पण त्यांना योग्य ते मार्गदर्शन सहित्य वातावरण हे उपलब्ध होत नव्हते. सांघिक खेळाचे समन्वय होत नसल्याने सराव देखील करण्यास अडचणी येत होती. मुलांमध्ये घरी राहून नैराश्यमय वातावरण निर्माण होऊ लागले. परीणामी शांत असणारे खेळाडू चिडचिडपणा करु लागला. त्यामुळे त्याची संपूर्ण जिवन शैली बदलून गेली. शालेय स्तरावरील सर्वच स्पर्धा, संघटनेच्या क्रिडा स्पर्धा व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व स्पर्धा न झाल्यामुळे खेळाडुंचे वैयक्तीक फार मोठे नुकसान झाले. उदा. लॉकडाऊन काळात ज्युनिअर मधून युथ मध्ये प्रवेश, युथ मधून सिनीअर मध्ये प्रवेश. ज्या खेळाडुकडे ऑनलाईन माध्यम नव्हते त्यांना भारतातील खेळ प्राधिकरण, क्रिडा प्रबोधनी, क्लब व विविध क्रिडा संघटनेचा सराव प्रोग्रॅम न मिळू शकल्यामुळे त्यांचे अधिक नुकसान झाले. व्यायाम प्रशिक्षणात भार, प्रशिक्षण, सर्किट प्रशिक्षण, लॉग रन, अशा विविध धारीत प्रशिक्षणाचा अभाव दिसुन आल्यामुळे स्पर्धेत या व्यायामाचा फायदेशीर परीणाम दिसून येण्याची शक्यता काहीशा बाबतीत कमी असेल. नवख्या खेळाडुंना अधिक सराव प्रशिक्षण कार्यक्रम माहित नसल्यामुळे लॉकडाऊन काळात बराच गोंधळ दिसुन आला. डाईट कसा घ्यायचा आणि सरावाचा प्रोग्रॅम कसा तयार करायचा हे अनेक खेळाडुंना लवकर समजत नसल्याने ब—याच प्रमाणात नवख्या खेळाडुंचा तोटा झाला. बॉक्सींग, हॉकी, फुटबॉल, बॅडमिंन्टन, टेबल टेनिस, क्रिकेट आदी खेळाडुंचे कौशल्य वेळोवेळी सुधारणे गरजेचे असते. पण लॉकडाऊन काळात ही सर्व कौशल्य खेळाडूंना वैयक्तीक पातळीवर कराव्या लागल्या. त्यामुळे ते किती बरोबर आहे हयात स्पष्टता येवू शकली नाही. (अनुभवी खेळाडुंना सोडून)

**व्यायाम :** शारिरीक कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी केलेल्या परीश्रमाला आपण व्यायाम असे नाव दिले आहे. त्यापासून आपणास समानधान आणि आनंद प्राप्ती अपेक्षित असते.

**व्यायामाचे प्रकार :**

विशिष्ठ गटातील स्नायुंची ताकद वाढविणारे व्यायाम उदा. वजन
उचलणे, उंच उडी, लांब उडी, दोर उडी, गोळा फेक.
शरिरीक लवचिकता वाढविणारे व्यायाम उदा. सुर्यनमस्कार,
योगासने
पोटाचे व्यायाम

अनेक खेळ खेळल्याने खेळाडुंचा व्यायाम होतो. शरीर बळकट होते व खेळातील शिस्त जिवनाला वेगळे वळण देवून जाते. खेळ जरी खेळाडुंच्या शारिरीक क्षमतेवर दर्जेवर अवलंबून असले तरी तो स्वत: कशा प्रकारे आमलात आणतो यावरती निर्भर असते.

**आहार :** लॉकडाऊनच्या काळात संपूर्ण देशत जीवनाअवश्यक वस्तू मिळवण्यस खंळाडुंना खूप त्रास झाला. सामान्य जनतेला दोन वेळेसचे जेवण मिळणे मुश्कील होते तिथे या खेळाडुंच काय होणार ? तरी जसा मिळेल व उपलब्ध होईल असा संतुलीत आहार खेळाडुंनी घेवून आपण नियमीत सराव चालू ठेवावा.

**दररोजचा खेळाडुंचा घ्यावयाचा आहार :**

१. लॉकडाऊन व सामान्य काळात खेळाडुंनी पौष्टीक व सकस आहार घेतला पाहिजे.
२. लॉकडाऊन काळात खेळाडुंची रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी जे पदार्थ मदत करतील ते खाणे.
३. पालेभाज्या, दाळ व फळे घेणे.
४. सर्व जीवन सत्वे आपल्या शरिराला मिळतील याकडे अधिक लक्ष घालून असा आहार घ्या की त्यातुन आपल्याला जीवन सत्वाची कमतरता भासणार नाही.

५. खनिजे, प्रथिने, जिवन सत्व मिळतील असा आहार घ्यावा.
६. जे पदार्थ चरबी वाढविण्यासाठी कारणीभूत ठरतील असे पदार्थ खाणे टाळा.
७. प्रोटीन युक्त आहारांचा समावेश आपल्या जीवन शैलीत राहू द्या.
८. वनस्पती स्त्रोत उदा. हरभरा, सोयाबीन, तुर, मुग, उडिद, काजू, बदाम, गहु, तांदुळ व पालेभाज्या ईत्यादी.
९. मांसाहार : अंडी, मांस, व मासे
पौष्टीक आहार : दूध, लोणी, तुप, व मुबलक पाणी ईत्यादी आहार जसा उपलब्ध असेल असा घ्यावा.

**कोविड काळात स्पर्धा आयोजन समित्या :**

१. क्रिडांगण व आखणे व्यवस्था समिती
२. निवास व्यवस्था समिती
३. प्रथम उपचार समिती
४. भोजन व्यवस्था समिती
५. न्याय निवाडा समिती
६. प्रसिध्दी समिती
७. स्वागत समिती
८. परितोषक वितरण समिती
९. उद्घाटन व समारोप समिती
या सर्व समित्यांनी व्यवस्थीत काम केले असता सर्वच स्पर्धा व्यवस्थीत व काळतीपुर्व पार पडतील.

**खेळाडुंची उदिद्ष्टे :**

१. खेळाडुंनी स्वत:ची क्षमता ओळखुन राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दर्जेदार कामगीरी करणे.
२. देशासाठी खेळताना संपुर्ण देशाला त्या खेळाडुवर गर्व वाटला पाहिजे अशी कृती किंवा कामगीरी केली पाहिजे.
३. खेळाडुंनी ध्येय आखूण ते साध्य करण्यासाठी स्वत:ला झोकून दिले पाहिजे.
४. ठरवलेले ध्येय ही मोठी असतात तर उदिद्ष्टे ही छोटी असतात हे लक्षात घेत वैयक्तीक रित्या किंवा सांघिक रित्या पुर्ण करणे हे खेळाडुसाठी महत्वाचे असते.
५. सर्व खेळाडुंनी स्पर्धेत पदक मिळवणे असे उदिद्ष्ट नाही तर पदकासोबात त्याने खेळाडु वृत्तीचे वर्तन केले पाहिजे.
६. संघातील खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शक, कर्णधार यांना मान सन्मानाने आदर पुर्वक वर्तन खेळाडुकडून झाले तर खेळाडूंची ध्येय पुर्ण होवू शकतात.
७. खेळाडुंनी आपल्या खेळाबद्दल व साहित्याबद्दल आदर ठेवणे महत्वाचे आहे.
८. एखाद्या राज्यात किंवा देशात ज्या ठिकाणी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या ठिकाणच्या संस्कृती विषयी आदर ठेवला पाहिजे.
९. संघातील सिनिअर खेळाडू व माझी खेळाडुंचा आदर केला पाहिजे व त्यांच्या अनुभवाचा आदर केला पाहिजे.
१०.स्पर्धा कोणत्याही असो त्या स्पर्धा आहेत हेच म्हणून खेळले तर खेळाडुंचे ध्येय साध्य होउ शकतात.

प्रशिक्षकाने सांगितलेल्या गोष्टीचे पालन केले पाहिजे. तर त्यांनी आखलेल्या योजना व डावपेचचा वापर त्या त्यावेळेस स्पर्धा असलेल्या वातावरणात केला तर उपयोगी ठरु शकेल हे मान्य केले पाहिजे. अपयश हि यशाची पाहिली पायरी आहे. हे दिवस असेच राहणार नाहीत. ज्या प्रमाणे सुर्य आपणाला जसा रोज प्रकाश देतो रात्र झाल्यानंतर आपणाला उद्या सुर्य उगवणार नाही असे वाटते पण तो आपला धर्म सोडत नाही. तसेच खेळाडुंनी न खचता कोणतीही परिस्थीती असो नियमीत सराव करुन आपल्या भारत देशाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर जगात गाजवावे.

**समारोप :**

खेळ म्हटल की, यश अपयश आलेच कधी हार तर कधी जीत होणार पण हार हि हासत स्विकारता आली पाहिजे. हारणारा खेळाडु जिंकलेल्या खेळाडूंचे प्रथम अभिनंदन करतो. खेळातुन येणारी ही खेळाडू वृत्ती जीवनात फार उपयोगी पडते. प्रत्येकाला आपल्या जीवनात केव्हा ना केव्हा अनेक सकंटाना तोड द्यावे लागते. तर कधी हार पत्कारावी लागते. अशा वेळी खेळाडु वृत्ती असेल तरच आपण पुढे जातो. अपयशाने खचून जाणा—यांच्या हातुन काहीच घडत नाही. जशी हार तशी जित ! हार झाल्याने खचून जावू नका तसेच जीत झाल्याने फुगून जावू नका अस सच्या खेळाडू सांगतो. खेळातील जय ज्या प्रमाणे सयंमाने स्विकारावा तसाच जीवनातील विजय हा विनम्रतेने स्विकारावा. खेळात हार जीत

असली तरी खेळ खेळले जातात ते मैत्रीसाठी! ऑलंपिक, विम्बल्डन, एशियाड आदी विविध खेळाच्या जागतीक स्पर्धा वर्षभर खेळल्या जातात. एकमेकांचे कौतुक करण्यासाठी स्नेहाचा हात पुढे करण्यासाठी! खेळामुळेच आपली उत्साही वृत्ती टिकून राहते. खेळाचे विश्व एक प्रचंड मोठे विश्व आहे. ज्यात अनेक विक्रम स्थापीत केले जतात व कालांतराने ते मोडले ही जातात.

“Optimism is essential to achievement and it is also foundation of courage and progress.”

“ कोणतेही यश मिळवण्यासाठी आशावाद आवश्यक असतो. आणि आशावाद हा ते यश मिळविण्यासाठी लागणा—या धाडसाचा आणि त्या यशाचा अस्सलतेचा पाया असतो. ”

**संदर्भ :**

१) http://mr.m.wikipedia.org
२) http://books.google.in
३) पलसाने न.न. नवरे सं. २००३ उपयोजित
४) मानसशास्त्र कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५) तान व आरोग्य — बर्वे बी एन

# पुणे प्रशासकीय विभागातील प्रमुख धर्मनिहाय लोकसंख्येचा भौगोलिक विश्लेषणात्मक अभ्यास (2001 ते 2011)

**रवींद्र हांडे**

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, एस एन डी टी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे-38.

Email: ravindrahandegeo@gmail.com.

**गोषवारा:**

धर्म हा घटक सांस्कृतिक भूगोलामधील एक महत्वाचा घटक आहे. भारतात अनेक धार्मिक समुदायाचे लोक वास्तव्य करतात. भारत हा निधर्मी असून याबाबतीत प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. महाराष्ट्रात सुद्धा धर्माच्या बाबतीत विविधता आढळते. महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या प्रगत अशा पुणे प्रशासकीय विभागातही हि विविधता दिसून येते. पुणे प्रशासकीय विभागातील जिल्ह्यांतील इस 1991 ते 2011 या कालावधीतील धर्मनिहाय लोकसंख्येचे वितरण व वाढीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनात केला गेला आहे.

***बीजशब्द:*** लोकसंख्या वाढ दर, लोकसंख्या वितरण, लोकसंख्या प्रमाण

**प्रस्तावना:**

धर्म हा मानवी भूगोलातील तसेच मानवी जीवनाचा एक महत्वाचा घटक आहे. सामाजिक, आर्थिक, सांकृतिक आणि लोकसंख्या विषयक घटकांचा धर्मावर थेट परिणाम होत असतो. महाराष्ट्र तसेच पुणे प्रशासकीय विभागात धार्मिक लोकसंख्येचे वितरण व वाढ सर्वत्र सारखी दिसून येत नाही. अनेक भौगोलिक ऐतिहासिक घटकांचा धार्मिक लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम झालेला दिसून येतो. विशिष्ठ भौगोलिक प्रदेशात, विभागात एखाद्या धर्माच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी जास्त आढळते. धर्माचा परिणाम एखाद्या प्रदेशातील लोकसंख्या वाढ व वितरणावर होतो. (क्लार्क, 1972) महाराष्ट्रात 2011 च्या जणगणनेनुसार हिंदू 79.83%, मुस्लीम 11.54%, बौद्ध 5.81%, जैन 1.25%, ख्रिचन 0.96%, शीख 0.20%, निधर्मी 0.25% व इतर धर्मीय 0.16% लोकसंख्या होती.

**ध्येये आणि उद्दिष्ट्ये:**

1. पुणे प्रशासकीय विभागातील धार्मिक लोकसंख्येचे वितरण अभ्यासणे.
2. पुणे प्रशासकीय विभागातील जिल्हानिहाय धार्मिक लोकसंख्येची वाढ अभ्यासणे.

**अभ्यासपद्धती:**

सदर संशोधनासाठी द्वितीय माहिती स्रोताचा प्रामुख्याने वापर केला असून यामध्ये जनगणना अहवाल 1991, 2001 व 2011 यांचा संदर्भ घेतला आहे. विश्लेषणासाठी प्रामुख्याने विविध संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर केला आहे.

**अभ्यासक्षेत्राची ओळख:**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुणे प्रशासकीय विभागाची निवड करण्यात आलेली आहे. हा विभाग महाराष्ट्रात दक्षिण मध्य भागात वसलेला आहे. अक्षवृत्तीय विस्तार 15°45’ उत्तर ते 19°24’ उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार 73°19’ पूर्व ते 76°15’ पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. विभागाचे एकूण क्षेत्रफळ 57235 चौकिमी असून पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. अभ्यास क्षेत्राच्या दक्षिणेला कर्नाटक राज्य, पश्चिमेला कोकण प्रशासकीय विभाग, उत्तरेला नाशिक विभाग तर ईशान्येला औरंगाबाद विभाग आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार पुणे प्रशासकीय विभागाची लोकसंख्या 23449049 एवढी आहे.



**विश्लेषण:**

तक्ता क्र. 1: 2011 नुसार पुणे प्रशासकीय विभागातील धर्मनिहाय लोकसंख्या

| धर्म | एकूण लोकसंख्या | एकूण लोकसंख्येतील प्रमाण |
|---|---|---|
| हिंदू | 20397848 | 86.98 |
| मुस्लीम | 1788093 | 7.62 |
| ख्रिचन | 173153 | 0.73 |
| शीख | 32381 | 0.13 |
| बौद्ध | 585192 | 2.49 |
| जैन | 411065 | 1.75 |
| इतर | 13160 | 0.05 |
| निधर्मी/ धर्म न सांगितलेले | 48157 | 0.2 |
| **एकूण** | **23449049** | **100** |

संदर्भ: Census of India, District census Handbooks 2011




2011 च्या जनगणनेनुसार पुणे प्रशासकीय विभागाची एकूण लोकसंख्या 23449049 असून यामध्ये सर्वात जास्त म्हणजे 86.98% लोकसंख्या हिंदू धर्मीयांचे होते, त्याखालोखाल मुस्लीम धर्मियांचे प्रमाण 7.62 एवढे आहे. यामध्ये धर्मन सांगितलेले/ निधर्मी लोकांचे प्रमाण 0.2% आहे. पुणे प्रशासकीय विभागाची 2001 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 19997808 इतकी होती ती 2011 च्या जनगणनेनुसार 23449049 इतकी झाली. विभागाचा लोकसंख्या वाढीचा दर 17.25% आहे. तर अनुक्रमे महाराष्ट्र व भारताचा 15.99% आणि 17.70% आहे. राज्याच्या तुलनेत पुणे प्रशासकीय विभागाचा लोकसंख्या वाढीचा दर जास्त आढळतो.

तक्ता क्र.2: पुणे प्रशासकीय विभाग: धर्मनिहाय लोकसंख्या, वितरण व वाढ

| जिल्हा | वर्ष | हिंदू | | मुस्लीम | | ख्रिचन | | शीख | | बौद्ध | | जैन | | इतर | | निधर्मी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | लोकसंख्या | प्रमाण(%) | एकूण लोकसंख्या |
| पुणे | 2001 | 6197349 | 85.7 | 452397 | 6.3 | 116661 | 1.6 | 21938 | 0.3 | 321948 | 4.5 | 104073 | 1.4 | 11283 | 0.2 | 6906 | 0.1 | 7232555 |
| | 2011 | 8090254 | 85.8 | 673704 | 7.14 | 134192 | 1.42 | 27090 | 0.29 | 340404 | 3.61 | 127786 | 1.36 | 9873 | 0.1 | 26105 | 0.28 | 9429408 |
| सातारा | 2001 | 2533359 | 90.2 | 125661 | 4.5 | 3759 | 0.1 | 1107 | 0 | 128570 | 4.6 | 12156 | 0.4 | 1359 | 0 | 3033 | 0.1 | 2808994 |
| | 2011 | 2691952 | 89.62 | 146970 | 4.89 | 4408 | 0.15 | 1182 | 0.04 | 141315 | 4.7 | 12810 | 0.43 | 676 | 0.02 | 4428 | 0.15 | 3003741 |
| कोल्हापूर | 2001 | 3077263 | 87.3 | 236895 | 6.7 | 16078 | 0.5 | 2082 | 0.1 | 37932 | 1.1 | 147285 | 4.2 | 2288 | 0.1 | 3359 | 0.1 | 3523162 |
| | 2011 | 3379906 | 87.2 | 286558 | 7.39 | 15573 | 0.4 | 1570 | 0.04 | 29766 | 0.77 | 154882 | 4 | 1274 | 0.03 | 6472 | 0.17 | 3876001 |
| सांगली | 2001 | 2243478 | 86.8 | 203524 | 7.9 | 9696 | 0.4 | 1312 | 0.1 | 35142 | 1.4 | 85160 | 3.3 | 1123 | 0 | 4089 | 0.2 | 2583524 |
| | 2011 | 2440312 | 86.47 | 239607 | 8.49 | 9098 | 0.32 | 1260 | 0.04 | 38210 | 1.35 | 87453 | 3.1 | 769 | 0.03 | 5434 | 0.19 | 2822143 |
| सोलापूर | 2001 | 3386955 | 88 | 377579 | 9.8 | 9625 | 0.3 | 2752 | 0.1 | 38497 | 1 | 27904 | 0.7 | 1438 | 0 | 4793 | 0.1 | 3849543 |
| | 2011 | 3795424 | 87.9 | 441254 | 10.22 | 9882 | 0.23 | 1279 | 0.03 | 35497 | 0.82 | 28134 | 0.65 | 568 | 0.01 | 5718 | 0.13 | 4317756 |

संदर्भ: Census of India, District census Handbooks 2001, 2011

2011 मध्ये हिंदू धर्मीय लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येमध्ये 2001 च्या लोकसंख्येशी तुलना करता पुणे जिल्ह्यात 0.1 ने वाढले आहे परंतु इतर उर्वरित चारही जिल्ह्यात ते कमी झालेले आहे. मुस्लीम धर्मीयांची लोकसंख्या सर्वच जिल्ह्यात 2011 मध्ये वाढलेली दिसून येते. ख्रिचन धर्मियांच्या बाबतीत लोकसंख्येचे प्रमाण सर्वच जिल्ह्यात कमी झालेले आढळते. शीख धर्मीय लोकसंख्येचे प्रमाण दहा वर्षात वाढलेले दिसून येते. बौद्ध धर्मीय लोकसंख्या सातारा जिल्हा वगळता इतर जिल्ह्यातील लोकसंख्येचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. जैन धर्मीय लोकसंख्येचे प्रमाण सातारा जिल्ह्यात वाढलेले आढळते तर इतर जिल्ह्यात दहा वर्षात एकूण लोकसंख्येपैकी प्रमाण कमी झालेले आढळते. इतर धर्मीय आणि धर्म न सांगितलेले यांचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**दशवार्षिक धार्मिक लोकसंख्या वाढ(2001-2011):**

तक्ता क्र.3: पुणे प्रशासकीय विभागातील धर्मनिहाय दशवार्षिक लोकसंख्या

| धर्म | एकूण लोकसंख्येतील प्रमाण | | एकूण लोकसंख्येतील प्रमाण | | दशवार्षिक प्रमाण बदल |
|---|---|---|---|---|---|
| | 2001 | 2011 | 2001 | 2011 | |
| हिंदू | 17438404 | 20397848 | 87.2 | 86.98 | -0.22 |
| मुस्लीम | 1396056 | 1788093 | 6.98 | 7.62 | 0.64 |
| ख्रिचन | 155819 | 173153 | 0.77 | 0.73 | -0.04 |
| शीख | 29191 | 32381 | 0.14 | 0.13 | -0.01 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **बौद्ध** | 562089 | 585192 | 2.81 | 2.49 | -0.32 |
| **जैन** | 376578 | 411065 | 1.88 | 1.75 | -0.13 |
| **इतर** | 17491 | 13160 | 0.08 | 0.05 | -0.03 |
| **निधर्मी/ धर्म न सांगितलेले** | 22180 | 48157 | 0.11 | 0.2 | 0.09 |
| **एकूण** | 19997808 | 23449049 | 100 | 100 | |

संदर्भ: Census of India, District census Handbooks 2001, 2011

तक्ता क्र. 3 मध्ये 2001 व 2011 मधील लोकसंख्या वाढीचे निरीक्षण केले असता मुस्लीम व निधर्मी लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली दिसून येते. इतर धर्मियांच्या प्रमाणामध्ये घट झालेली आढळते.

**सारांश:**

1. हिंदू धर्मीय लोकसंख्या वाढीचे प्रमाण कमी झालेले आहे. दहा वर्षाच्या कालावधीत ते 87.2 वरून 86.98 एकूण लोकसंख्येपैकी आढळते. 0.22 % ने कमी झालेले आहे.
2. मुस्लीम धर्मीय लोकसंख्या प्रमाण 6.98 वरून 7.62 झालेले आहे व त्यात 0.64 ने वाढ झालेली आढळते तसेच निधर्मीय लोकसंख्येचे प्रमाण 0.09 ने वाढलेले आहे.
3. विभागात बौद्ध धर्मियांचे प्रमाण 2.81 वरून घटून 2.49 झाले आहे.
4. ख्रिचन, शीख, जैन या धर्मीय लोकसंख्या प्रमाणातही घट दिसून येते.

**संदर्भ:**

1. *District Census handbook (2001, 22201): Pune District, Government of Maharashtra*
2. *Census Handbook in India (2011): The General Registrar & Census, Commissioner of India*
3. *District census handbook (2001, 2011): Sangli district, government of Maharashtra*
4. *District census handbook (2001, 2011): Satara district, government of Maharashtra*
5. *District census handbook (2001, 2011): Solapur district, government of Maharashtra*
6. *District census handbook (2001, 2011): kolhapur district, government of Maharashtra*
7. *Census of India (2011) : Religious tables, Govt. of India publication*
8. *Chandna, R. C. (2012) : Geography of population, Kalyani Publishers, Ludhiana.*
9. *Bhende, A. A. and Kanitkar, T. (1998) : Principles of Population Studies, Himalaya Publishers, Bombay.*
10. *Sawant, S. B. And Athavale, A. S. (1994) : Population Geography, Mehta Publishing House, Pune.*
11. *Wankhede, D (June 2010): Article "Distributional Pattern of Major Religious Communities in Maharashtra: A Spatio- Temporal Analysis"*
12. *Bhakare P. "Spatio-Temporal Changes in Population Structure of in Population Structure of Pune Division of Maharashtra." PhD, Thesis, Shivaji University, Kolhapur, 2010.*

# सागरशास्त्राचे जनक छत्रपती शिवाजी महाराज

**Dr.Madhukar Vithoba Jadhav**
Assisent Professor, Department of History, Y.C.College, Halkarni, Tal-Chandgad, Dist-Kolhapur
E-mail:- mvjhistory12@gmail.com

**सारांश –**

छत्रपती शिवाजी महाराज सागरनीती तज्ञ होते. छत्रपती विज्ञानवादी द्रष्टे राजे होते. छत्रपतींनी सागरीशास्त्राचे व्यवस्थापन करून भारतीय नौदलाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त करून दिले. कोकण किनारपट्टीवर सागरी गड उभे करून व बंदरे सुरक्षित बनवून भक्कम आरमाराची निर्मिती करून सागरी सुरक्षितता सुसज्ज केली.छत्रपतींनी सागरी किनारी भागातील सागाच्या जंगलाचा उपयोग करून सुंदर व भक्कम तारवे बांधून घेतले. त्यावर तोफा बसवून लढाऊ आरमार बनवून सागरी किनारपट्टी सुरक्षित केली. नौदल क्षेत्रामध्ये सर्वात प्रभाव टाकणारी आणि लोकप्रियता निर्माण करणारी घटना म्हणजे सागरी सामर्थ्य होय. छत्रपतींना समुद्रातील भरती व ओहोटीची चांगली माहिती होती. सागराचे विशाल रूप, उसळणाऱ्या लाटा, फेसाळणारे पाणी, पाण्याची हालचाल, समुद्रातील जैवविविधता, समुद्रातील खाडी, सागरी वाहतूक या महत्वपूर्ण घटकांची छत्रपतींना अचूक माहिती होती.

**प्रस्तावना –**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरशास्त्राची माहिती घेऊन नाविक दलाची निर्मिती केली व भारताच्या इतिहासात एका नवीन पर्वाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांना आरमाराची सुरुवात श्री. गणेशा पासून करावी लागली. स्वराज्याच्या या प्रयोगाला धाडसी मावळ्यांनी साथ दिली. कोकणातील सर्व दर्यावर्दी जमातींनी छत्रपतींना मनापासून मदत केली. हा हा म्हणता समुद्रावर दरारा निर्माण झाला. आरमार हा स्वतंत्र लष्कर विभाग निर्माण झाला. आरमारी सेनापती म्हणजे सरखेल सागराध्यक्ष हे पद छत्रपतींनी निर्माण केले व स्वराज्याची गलबते सागरावर उसळया घेऊ लागली. यातूनच छत्रपतींनी सागराला एक वेगळे महत्त्व प्राप्त करून दिले.

**उद्देश –**

१. छत्रपती शिवाजी महाराजांचे सागरशास्त्रीय विचार आजच्या आधुनिक कालखंडामध्ये किती महत्वाचे आहेत हे स्पष्ट करणे.
२. मध्ययुगीन कालखंडामध्ये छत्रपतींनी वैज्ञानिक दृष्टी डोळ्यासमोर ठेऊन सागराचे महत्व सर्व जगासमोर आणले.
३. छत्रपतींची सागरशास्त्रीय वास्तववादी मुल्ये काळाच्या किती पुढे होती याचे विवेचन समाजासमोर मांडणे.

**गृहीतके–**

१. छत्रपती शिवाजी महाराजांचे सागरशास्त्रीय विचार मार्गदर्शक व प्रेरणादायी आहेत.
२. छत्रपती शिवाजी महाराजांचे सागरशास्त्रीय मुल्ये जगाला नवी दृष्टी देणारी आहेत.

**महत्वाचे शब्द –** दर्यासारंग, समुद्रगमन, युध्दनौका, सामर्थ्यशाली, फिरंगी, दर्यावर्दी, भरती-ओहोटी

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. महत्वपूर्ण अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. याचबरोबर वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके या साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन –**

छत्रपतींना लहानपणापासूनच सामेद्राचे आकर्षण होते.त्यांना समुद्रस्नांनाची अतिशय आवड होती. त्यामुळे छत्रपती लहान असताना महाड येथील बाणकोटच्या खाडीत मुद्दाम येऊन राहिले होते. तेव्हाच छत्रपतींनी सागराचा अभ्यास करून सागरावरती सुसज्ज असे आरमार उभे करावयाचे ठरविले.[१] छत्रपतींच्या सागरी युध्दनीतीतील स्थान सर्वश्रेष्ठ आहे हे मान्य करावे लागते.[२] सागरशास्त्रीय इतिहासामध्ये विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, कुलाबा, रत्नागिरी, दांडा-राजापुरी,खांदेरी,उंदेरी या किल्ल्यांना महत्वाचे स्थान आहे.[३]

छत्रपतींच्या आरमाराचा इतिहास आजही तेवढाच समृध्द व वैभवशाली आहे. छत्रपतींनी सागरामध्ये ज्या दिवशी आरमारची सुरुवात केली त्या दिवसाला म्हणजेच आजही २४ ऑक्टोंबर १६५७ हा 'मराठा आरमाराचा' स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. छत्रपतींनी सामार्थ्शाली सागरी युध्दनौका बांधल्या. सागरावर आपले सामर्थ्य निर्माण केले. या सर्वाहून महत्वाचे म्हणजे त्यांनी समुद्रागमन करून वेगळी वाट निर्माण केली.[४] हिंदूमध्ये समुद्रगमन वर्ज्य होते. जहाजातून समुद्रगमन करणा-यास त्याने प्रायश्चित घेतले तरीही त्याला परत धर्मात

घेऊ नये. असा निर्बंध होता. जगभर व्यापारासाठी जाणारे हिंदू यामुळे थांबले. परंतु छत्रपतींनी हे दंडक उधळून लावले. छत्रपतींनी यावर विजय मिळविला व समुद्रात आरमार उभे केले. जलदुर्ग बांधले. व्यापारी युध्दनौका बनवून सागरी सफरी केल्या. स्वत: सागरी युध्द मोहिमा काढून स्वत: समुद्रोल्लंघन करून नवी वाट निर्माण केली व भारतामध्ये विज्ञान तंत्रज्ञानाची मशाल पेटविली.[५]

सागरी बंदरात येणा-या सर्व जहाजांवर नियंत्रण ठेवण्याची संधी या नौदलामुळे मिळाली. सागरी समुद्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. सागरावरील परकीयांची मक्तेदारी या नौदलाने मोडून काढली. स्वराज्याच्या नौदलाने परकीय इंग्रज, सिद्दी यांच्या संयुक्त नौदलाचा पराभव करून स्वराज्याच्या नौदलाचे सामर्थ्य दाखवून दिले.[६] कोकण किना-यावरील सोनकोळी, कोळी, भोई, हटकर, गावीत, खारवी, वारली, दलदली, भंडारी, सुतार,कातकरी आदी. दर्यावर्दी जातींच्या लोकांनी सागरी नौदल म्हणजे स्वराज्याच्या कार्य कर्तुत्वाची ती एक निशाणी होती हे सिद्ध केले. सागरी जीवन त्यांच्या नसानसात भिनले होते. या सागरी दर्यावर्दींना कोकण कोनार्याची सर्व माहिती होती. सागरी जहाजावरील लागणारे चलाखीचे काम व वेगवान हालचाली यामध्ये ते तरबेज होते. ते नाविक गोलंदाजीत अगदी निष्णांत होते. सागरी किनार्यावर शौर्य गाजविण्याची जिद्द त्यांच्या रोमारोमात भरलेली होती. या हुशारीचा उपयोग करून छत्रपतींनी सागरनीती भक्कम केली.[७]

भरती-ओहोटी, समुद्र प्रवाह, वादळे, हवामानातील बदल, समुद्रातील खाडी व जहाज बांधणी आदी. विषयांवरील ज्ञानात छत्रपती सर्वश्रेष्ठ होते. याचा वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी सामर्थ्याच्या वाढीसाठी प्रभावीपणे केला.[८] स्वराज्याचे संरक्षण करण्यासाठी छत्रपतींचे आरमारी नौदली सामर्थ्यशाली बनले. त्यामध्ये भंडारी, कोळी, आगरी या दर्यावर्दीचा वाटा खूप मोठा होता. छत्रपतींच्या नाविक सामर्थ्यासाठी या दर्यावर्दींनी खूप मोठे योगदान दिले.[९] छत्रपतींना कोकणातील किनारपट्टीवरील गुणी, त्यागी व शौर्य गाजविणारी मनसे मिळाली. दौलतखान, मायनाक, लायजी सरपाटील, सिद्दी मिस्त्री, इब्राहीम खान, वल्लभदास, रामजी अनंत सुभेदार, बालाजी आवजी चित्रे, सुंदरजी परभूज, दादंभट उपाध्ये, विश्वनाथ भट्ट हडप, बाळकृष्ण संगमेश्वरकर, सुभानजी नाईक, अडिवरेकर तावडे, दसपतीकर शिंदे, मोकाशी, खानविलकर, सावंत, शिर्के, धुळप, केशव पंडित, दर्यासारंग आंग्रे यांच्यामुळेच कोकण किनारपट्टी अजिंक्य बनली.[१०]

पोर्तुगीज सागरी बोटी बांधण्याच्या कलेत तरबेज आहेत याची माहिती महाराजांना मिळाल्यावर छत्रपतींनी त्यांना आपल्या नोकरीत ठेऊन घेतले. रुय लै तांब व्हियेगस व त्याच्या पुत्राच्या नेतृत्वाखाली छत्रपतींनी जहाजे बांधण्यास सुरुवात केली. [११] त्यांच्या बरोबर चारशे पोर्तुगीज कारागीर जहाजे बांधण्याचे काम करीत होते. स्वराज्यातील नाविक कारगिर ही जहाज बांधणीमध्ये पोर्तुगीजां एवढेच तरबेज झाले. [१२]आरमारी सेनापती म्हणजे सरखेल म्हणजे सागराध्यक्ष हे पद छत्रपतींनी निर्माण केले व स्वराज्याची गलबते सागरावर उसळया घेऊ लागली.[१३]

छत्रपतींनी सुसज्ज युध्दनौका बांधून कुलाबा हे मुख्य ठिकाण ठेवले होते. कुलाबा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, अंजनवेल या ठिकाणी स्वराज्याच्या गोद्या होत्या. या ठिकाणी मोठ-मोठी जहाजे बांधण्यात येत असत. [१४] सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथेही युध्दनौका ठेविल्या होत्या.[१५] कल्याण, भिवंडी, वासी, पनवेल या बंदरामध्ये लढाऊ गतबते बांधली. [१६] छत्रपती शिवाजी महाराजांचे लढाऊ बंदर म्हणून पेनचा उल्लेख मिळतो. या बंदराला स्वराज्याच्या आरमारीवाढीसाठी महत्त्व होते. [१७] छत्रपतींनी सागरावर श्रेष्ठत्व निर्माण करण्यासाठी आरमारी सामर्थ्य बळकट केले. सभासदाने म्हटले आहे 'छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले खोगीर समुद्रावर घातले. [१८] छत्रपतींच्या आरमारात पुढील प्रमाणे जहाजे होती. तरांडी, गतबते, गुराबा, तरांडी, तारू, पगार, तिरकाटी, माचवा, बाभोर, पाल, होडी, महागिरी, परब, जुग, लहकुरी इ. [१९] अशा विविध धाटणीची चार पाचशे सुसज्ज जहाजे तयार करविली.[२८] दहा पांच लक्ष रुपये खर्च केला. समुद्रात सत्ता बसविली.[२०]

छत्रपतींच्या आरमारात एकूण ४५ प्रकारची जहाजे होती.[२१] नौकाची व्यवस्था सुसज्ज करण्यासाठी गोदीमध्ये पाण्याची पातळी कायम राखण्यासाठी प्रवेश मार्गावर नियंत्रक दरवाजे बसवावे लागत.गोदीमुळे पाण्याची पातळी कायम राहते. बोटी धक्याला घासत नाहीत व वादळामुळे त्यावर परिणामही होत नाही.[२२] योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून छत्रपतींनी आरमारी बोटीची रचना केली होती. छोट्या पातळ पण भक्कम ह्या बोटी समुद्रातील उथळ व खोलगट पाण्यात ही अचूक व वेगवान हालचाली करीत असत.सागरी हालचालीचे केलेले योग्य नियोजन हे त्यांच्या यशाचे गमक होते. [२३]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वज्यामध्ये ७५० जहाजे होती. सागरामध्ये ५००० नाविक सैन्य सज्ज होते.[२४] सागरामध्ये आपली जहाजे ओळखण्यासाठी वेगवेगळया रंगाची निशाणे होती.दिशादर्शक यंत्रे व दुर्बिणी होत्या. युध्द सैन्यांनी सुसज्ज अशा युध्द नौका होत्या. स्वराज्यातील नौसेनापतीचा ही एक ध्वज होता तो ध्वज पांढराशुभ्र होता. आजही असाच ध्वज आरमारी सैनिक वापरतात. [२५] कल्याण व भिवंडी येथे जहाजे आणि घरे बांधण्यासाठी लागणारे टीबर जातीचे लाकूड मुबलक प्रमाणात मिळत असे. या लाकडाला इंग्रज 'भारताचा ओकवृक्ष' म्हणत.आपल्या

जहाजांच्या दुरुस्तीसाठी ते याच लाकडाचा उपयोग करीत असत.[२६] योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून महाराजांनी आरमारी बोटीची रचना केली होती. छोट्या पातळ पण भक्कम ह्या बोटी समुद्रातील उथळ व खोलगट पाण्यात ही अचूक व वेगवान हालचाली करीत असत. सागरी हालचालीचे केलेले योग्य नियोजन हे त्यांच्या यशाचे गमक होते. [२७] जहाजांना किंवा नौकांना मार्गदर्शन करण्यासाठी सागरी मार्गामध्ये दीपगृहे, इशारे वजा देणारी चिन्हे व तरंगते झेंडे आदी. योजना करावी लागत असे. यातून प्रवास सुरक्षित होत असे. [२८]
सागरी लढाय्यामध्ये छत्रपतींनी दारुगोळ्याचा वापर केला. फोंडा किल्ल्याच्या लढाईमध्ये छत्रपतींनी किल्ल्याच्या सभोवती मोठे सुरूग लावून किल्ला जिंकून घेतला.[२९] किल्ले सुवर्णगड हे मराठा आरमाराचे महत्वाचे केंद्र होते.[३०] कुलाबा येथे आरमाराचे मुख्य ठाणे करून तेथे दारू गोळयांचा साठा करून ठेवण्यात आला होता. सागरी युद्धामध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करता आला.[३१] सागरी आरमाराचे महत्व ओळखून छत्रपतींनी दारुगोळा, शस्त्रास्त्रे, रसद याची काळजी घेऊन आरमार सुसज्ज केले.[३२] सागरी युद्धामध्ये शत्रू विरोधात बंदुका वापरल्याचे पुरावे मिळतात.छत्रपती शिवाजी महाराजांनी बंदुका आणि आधुनिक प्रकारची शस्त्रास्त्रे संग्रहित करण्याचा सतत प्रयत्न केला. [३३] सागरावरती आपले प्रभुत्व निर्माण करून सुसज्ज आरमाराच्या साह्याने यशस्वी सागरी मोहिमा काढणारे व त्यात विजय मिळविणारे त्यातून नौदलाचे महत्व वाढवून सागरनीती यशस्वी करणारे छत्रपती हे एकमेव राजे होत. [३४]

सागरी किल्ल्या विजयदुर्गचे वैशिष्ट म्हणजे परकीय शास्त्रज्ञ हेन्री लॉकीएरहा १८९७ मध्ये सूर्यग्रहणाचे निरक्षण करण्यासाठी या किल्ल्यावरती आला होता. त्याने ज्या ठिकाणी निरक्षणासाठी दुर्बिणी लावल्या होत्या ते सिमेंटचे ओटे आज ही आपणास तेथे दिसून येतात. येथूनच त्याने हेलियम वायूचा शोध लावला. किल्ल्याच्या साक्षीने लागलेला हा एक शोध म्हणजे जगाच्या इतिहासातील क्रांतिकारी घटना मानवी लागेल. [३५]
विजयदुर्गाची महत्वाची व आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे गडाच्या पश्चिम व उत्तर बाजूला समुद्राच्या तळाशी सुमारे ४०० मीटर लांबीची तटबंदी आहे. [३६] ही तटबंदी इ.स. १९९१ मध्ये वेस्टर्न नेव्हल कमांड आणि गोव्याच्या नशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनॉग्राफी या दोन संस्थाच्या जहाजांनी व पाणबुड्यांनी संशोधकाच्या साह्याने शोध घेतला असता समुद्रात एक दगडी भिंत असल्याचे आढळून आले.[३७] ही भिंत छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधल्याचे अनुमान काढले आहे.[३८] परकीयांची अनेक जहाजे या भिंतीला थटून फुटून रसातळाला गेल्याची नोंद इतिहासामध्ये दिसून येते. सागराच्या आहोटीच्या वेळी सुध्दा ही भिंत दिसत नाही.[३९] दुर्गाच्या भिंतीला समांतर अशी ही भिंत आहे.ही भिंत जवळ जवळ एक किलो मीटर आहे. किना-यापासून खोल तिचे बांधकाम करण्यात आलेले आहे. विजयदुर्ग किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी जर शत्रूच्या बोटी आल्या तर या भिंतीवर आपटून फुटत असत.[४०]

**मूल्यमापन –**

छत्रपतींनी सागरी बांधकाम स्थापत्य शास्त्रामध्ये वापरलेल्या शिशावरून व चुन्याच्या वापरावरून असे दिसून येते की स्वराज्यामध्ये शिसे तयार करण्याचे व चुना तयार करण्याचे यंत्र व तंत्र अवगत होते. हे एक महाराजांचे वैज्ञानिक वेगळेपण असल्याचे त्यातून महाराजांच्या लष्करी तंत्रशास्त्रातील कुशलतेची साक्ष पटते. खाडी व सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी जयगड, गोपाळगड, पूर्णगड या किल्ल्यांचा उपयोग होत असे.सागरी किना-यालगतच्या किल्ल्यांचा उपयोग रसद पुरवठा, आरमाराला संरक्षण व सागरी जहाजांना संरक्षण देण्यासाठी केला जात असे. याच किल्ल्यांचा उपयोग छत्रपतींनी सागरी तळ म्हणूनही केला. हे किल्ले म्हणजे सागरी आरमाराचे शक्तीस्थान होते. यातून छत्रपतींनी स्वराज्याची सामुद्रिक शक्ती वाढविल्याचे स्पष्टपणे दिसते. छत्रपतींनी सागरावरील प्राकृतिक रचनेला व भौगोलिक स्थानाचा उपयोग करून अचूक जागी किल्ले, बंदरे व आरमारी तळ उभे केले. स्थानिक दर्यावर्दीच्या समुद्र व नौकानयनाच्या ज्ञानाचा उपयोग करून सागरी शक्ती ताकदवाण बनविली.

**संदर्भ ग्रंथ –**

1) पठाण यु. म. (संपा), सभासद बखर, पुणे, २०००, पृष्ठ ८७.
2) फाटक न. र,(संपा), भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई, जुलै १९७६, पृष्ठ ३४.
3) पित्रे का. ग, मराठ्यांचा युद्धेतिहास, पुणे, २०००, पृष्ठ १०५.
4) सातपुते मनोहर, शिवराय आणि शिवकालीन संदर्भ, डोंबिवली, २०११, पृष्ठ १८७.
5) कित्ता, पृष्ठ १८७.
6) हरदास बाळशास्त्री, छत्रपती शिवाजी, पुणे, १९६२, पृष्ठ ८१ व ८२.
7) बाहेकर एस. ए व देसले वसंत, क्षत्रिय कुलावंतस, श्री. राजा शिवछत्रपती औरंगाबाद, २००६, पृष्ठ ३७ व ३८.
8) कोलारकर श. गो. मराठ्यांचा इतिहास, नागपूर, २००९, पृष्ठ १२१.

9) बाहेकर एस. ए व देसले वसंत, क्षत्रिय कुलावंतस, श्री. राजा शिवछत्रपती औरंगाबाद, २००६, पृष्ठ ३८.
10) दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. २१ मार्च, २००५.
11) खोबरेकर वि. गो. मराठा अमलाचे स्वरूप, कोल्हापूर, १९८८, पृष्ठ २७.
12) परमानंद, श्री. शिवभारत, पृष्ठ २३.
13) दै. महाराष्ट्र टाइम्स, शुक्रवार, दि. १२ नोव्हेंबर २००४.१६.
14) चौधरी कि. का. (संपा), महाराष्ट्र राज्य गॅझिटीयर रायगड जिल्हा, महाराष्ट्र शासन,
15) मुबई, १९९३, पृष्ठ ६६७.
16) चौधरी कि. का. (संपा), महाराष्ट्र राज्य गॅझिटीयर रायगड जिल्हा, महाराष्ट्र शासन,
17) मुंबई, १९९३, पृष्ठ ७७५.
18) महाराष्ट्र राज्य गॅझिटीयर रायगड जिल्हा, पृष्ठ ७७५.
19) महाराष्ट्र राज्य गॅझिटीयर रायगड जिल्हा, महाराष्ट्र शासन,मुंबई, १९९३, पृष्ठ ८१३.
20) अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र (संपा), विलास खोले, पुणे, २००७, पृष्ठ
21) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, पुणे, १९७५, पृष्ठ ३८६.
22) फडतरे भूषण (संपा), मराठी सत्तेचा इतिहास, पुणे, २०११, पृष्ठ ११९.
23) सरदेसाई गो. स, मराठी रियासत, पुणे, १९७५, पृष्ठ ३८७.
24) खोबरेकर वि. गो. (संपा), भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई, एप्रिल-जून १९९२,
25) पृष्ठ २९.
26) Apte B.K, A HISTORY of The Maratha Navy and Merchantships, Bombay,
27) 1973, Page 136.
28) सहा मो. गु. प्रगत वास्तुशास्त्र, पुणे, १९८२, पृष्ठ २६५.३३.
29) रामदास रवींद्र वामन, सागरी सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई,
30) १८८१, पृष्ठ ०८.
31) बेंद्रे वा. सी. श्री. छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई, १९७२, पृष्ठ ४९७.
32) कित्ता, पृष्ठ ४९७.
33) कुलकर्णी अ. रा (संपा), आज्ञापत्र, पुणे, २००७, पृष्ठ ६९.
34) पवार जयसिंगराव (संपा), छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, २०११, पृष्ठ ७३.
35) केळुसकर कृ.अ. छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, २०१०, पृष्ठ २२४.
36) तापिकार श्रीकांत, शिवचरित्र, प्रतीक पुणे, २०१५, पृष्ठ ९९.
37) इतिहास संशोधन पत्रिका, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर, २०१७,पृष्ठ ३५.
38) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, पुणे, १९१०, पृष्ठ ३८७.
39) खोबरेकर वि. गो. (संपा), भारतीय इतिहास आणि संस्कृती, ऑक्टोंबर-डिसेंबर १९९९,
40) मुंबई, पृष्ठ २३.
41) डॉ. अ. रा. कुलकर्णी, मराठ्यांचा इतिहास, पुणे, १९७९, पृष्ठ १२०.
42) लिमये राजा, रणराज शिवाजी, दिलीपराज, पुणे, २००८, पृष्ठ ११९.
43) मिलिंद गुणाजी, अनवट, पुणे, २०११, पृष्ठ ४७.
44) चिले भगवान, गडकोट, कोल्हापूर, २००५, ११०.
45) कित्ता, पृष्ठ ११०.
46) नलावडे प्रमोद, (संपा), लोकराज्य, मुंबई, मे २०१५, पृष्ठ ४५.

# कोकणची लोककला : दशावतार

**Prof. Tendolkar Dipa Dattaram**
Departmental Of Hindi, Kankavali College Kankavali
Email- Shriravalnath@Gmail.Com

**प्रस्तावना :**

कोकण म्हणजे जणू स्वर्गच. ऋतु कोणताही असो प्रत्येक ऋतुत मन प्रसन्न करुन सोडणारे वातावरण या कोकणात असते. पावसाळा संपून हिवाळ्याची जसजसी चाहूल लागायला सुरुवात होते ती म्हणजे गावा-गावातील उत्सव आणि जत्रांची . मंदिरातील जत्रा म्हणजे तळ कोकणाची वेगळी ओळख. गावातील लोकांनी एकत्र यावे हा त्या मागचा उद्देश्य. या जत्रामागील दुकानं वेगवेगळ्या खाद्यपदार्थानी भरून असतात. अशा जत्रा आणि उत्सवांचे प्रमुख आकर्षण असते ते तिथे सादर होणारे “दशावतार”.

**दशावतार – पार्श्वभूमी / इतिहास**

कोकणची लोककला म्हणजे दशावतार होय. दशावताराला कोकणात “दहीकाला” सुद्धा म्हणतात. कोकण आणि दशावतार हे वेगळेच समीकरण पहायला मिळते. शेकडो वर्षाची परंपरा असलेली ही लोककला कोकणात अजूनही जपली गेली आहे. दशावतार म्हणजे विष्णूचे दहा अवतार. कर्नाटकातील “यक्षगान” परंपरेशी साधर्म्य असल्यामुळे याची पाळेमुळे दक्षिणेत रुजलेली असावित असे मानले जाते. गोवा सिंधुदूर्गात दशावतार तर रत्नागिरी रायगड मध्ये नमन असा या कलेचा प्रवास होत गेला. विष्णूचे दहा अवतार मत्स् ,कुर्म, वराह,नरसिंह,वामन , परशुराम, राम, कृष्ण ,कलकी आणि बुदध् यातील फक्त् वामन , परशुराम, राम आणि कृष्ण् हे चारच अवतार नाटकात दाखवले जातात. दशावतार रंगमंचावर सुरु होण्याआधी रंगमंचामागे गणपती आणि कलाकरांच्या साहित्यांची आरती आणि पुजा केली जाते. रंगमंचावरील सादरीकरणाचे स्वरुप हे वर्षानुरुप चालत आलेल्या पद्धतीनेच केले जाते. महत्वाचे म्हणजे दशावतारी नाटकाची लिखित संहिता नसते. स्वत:ची रंगभूषा करायला सुरुवात करण्याच्या काही क्षण अगोदर कोणते कथानक करायचे हे कलाकारांना सांगितले जाते. त्यानुसार प्रत्येक पात्र स्वत:चे संवाद तयार करतात.

**संशोधन हेतू :-**

कोकणातील दशावतार ही संकल्पना आपण पाहिलीच आहे. दशावतार म्हणजे विष्णूचे दहा अवतार समजले जातात. आणि हे अवतार एका आख्यायिकेच्या माध्यमातून सादर करणे म्हणजेच दशावतार होय. परंतु नाटक ही संकल्पना सुद्धा थोड्या फार प्रमाणात स्पष्ट होणे आवश्यक आहे. नाटक हा एक साहित्यप्रकार आहे.आणि त्याचबरोबर ते दृकश्राव्य् माध्यम पण आहे. नाटक या संज्ञेचा मुळ अर्थ अभिनय असा होतो . नट हा संस्कृत शब्द मुळात प्राकृतातील असून तो “नर्त” (म्हणजे नाचणारा ) या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन प्राकृतात आला. म्हणजेच नट म्हणजे अभिनय करणारा, सोंग करणारा व नाटक म्हणजे नाटयरुपाने सोंगाच्या रुपाने सादर करणे असा अर्थ रुढ झाला. देव दानवांचे युद्ध म्हणजे दशावतारी नाटकातील अजुन एक प्रमुख आकर्षण असते. दशावतार – कलाकार हे आपले व्यवसाय किंवा नोंकरी सांभाळून ही साधना करत असतात. त्यांची साधना ही श्रद्धेपाटी असते आणि त्यामुळे त्यांना सर्वत्र जनमानसात त्यांचा दर्जा वाढावा म्हणूनच हा लेख सादर करीत आहे. दशावतार हा कलाप्रकार पूर्ण भारतभर जावा. कलेविषयी आस्था निर्माण व्हावी म्हणून मी हा लेख सादर करीत आहे आणि हाच माझा हेतू आहे.

**उद्देश्य-:**

१) दशावतार ही लोककला अशी एक कला आहे ज्याच्यामधून मनोरंजन व त्याचबरोबर माहीती मिळते.

२) ही लोककला जिवंत रहावी.

३) या कलेच्या माध्यमातून नवीन-नवीन मूलांनी भाग घेवून त्यामधील गोडवा वाढवावा.

४) दशावतार या लोककलेमुळे संस्कृतीचे जतन केले जाते.

५) ज्याप्रमाणे मालवणी भाषा सात समुद्राच्या पलिकडे गेली आहे त्याचप्रमाणे दशावतार ही कला पण जावी.

**.समस्या व अडचणी-:**

१) या कलेमध्ये पुरुष वर्गाला प्राधान्य् दिले जाते.

२) दशावताराची कोणतीही संहिता नसते.

३) रात्रीच्या वेळी सादर केली जाते त्यामुळे पुरेसा प्रेषक वर्ग मिळत नाही.

४) कोकण तळ कोकणातील ही कला याच भागात विकसित झालेली दिसते.

५) या कलेचा कालावधी हा ४-५महिन्यांचा असतो.

६) त्यामुळे कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध होत नाही.

७) अशिक्षित व्यक्तींसाठी मर्यादा येतात.

**संशोधन पद्धती :-**

या शोध निबंधासाठी मी संशोधनासाठी दुसरी पद्धत उपयोगात आणली आहे. कारण दशावतार करणा-या व्यक्तिंना प्रत्यक्ष भेटणे गरजेचे होते. त्यांची मुलाखत घेणे गरजेचे होते.आणि म्हणूनच मी संशोधनाची दुसरी पद्धती वापरुन शोध पेपर लिहीला आहे.

**विवेचन / स्पष्टीकरण-:**

दशावताराला मराठी मध्ये दशावतार असेच म्हणतात. संस्कृतमध्ये दश अवतारा: या नावाने संबोधले जाते. अशी मान्यता आहे की श्रीविष्णू १0 वेळा भूतलावर प्रकट झाले आणि त्यांचे हे दहा अवतार म्हणजेच दशावतार होय. हिंदू धर्मात विष्णू देवाला सृष्टीपालन करणारा मानले गेले आहे. धर्माच्या रक्षणासाठी हिदू धर्मग्रंथ भगवत पुराणानुसार सतयुग ते कलियुगापर्यंत विष्णूचे २४ अवतार घेतले आहे. त्यामधील दहा प्रमुख अवतार दशावतार स्वरुपात प्रसिध्द आहेत . असा हा दशावतार तळ कोकणात म्हणजेच राजापूर ते वेगुर्ला येथील भागामध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दक्षिण कोकणचा भाग मानला तर कणकवली, देवगड , कुडाळ, मालवण, वेगुर्ला , दोडामार्ग या भागामध्ये मोठ्या प्रमाणात दशावतार पहायला मिळतो. तळ कोकणामध्ये याला "दहिकाला" असेही संबोधले जाते. विशेषत: मालवणी माणसाचा दशावतार हा श्वासच म्हणावा लागेल. प्रत्येक दशावतारी कलाकार आपल्या पात्राची तयारी स्वत:च करतो. प्रत्येकाचे संवाद स्वत:चेच असतात. रंगभूषाही स्वत:च केली जाते. रंगभूषेसाठी खडूचे रंग वापरले जातात. महत्वाची गोष्ट म्हणजे दशावतारी नाटकात काम करणारे सर्व कलाकार हे पुरुषच असतात. स्त्री भूमिका करणा-या पुरुषांचा मेकअप आणि पेहराव तर ख-या स्त्रियांना सुद्धा लाजवेल असा असतो. मात्र हे ही खरे आहे की रसिकांवर अभिनयाची मोहीनी घालणा-या दशावतारी कलाकरांचा या कलेतून मिळणारी आर्थिक मिळकत ही खूप कमी असते. मात्र असे असूनही कलाकार कलेच्या श्रध्देपोटी निष्ठेने काम करत असतात.

म्हणूनच या कलेचा व कलाकारांचा आदर व्हावा म्हणूनच मी हा लेख सादर करणे पसंद केले.

**सारांश :-**

प्रस्तुत शोध लेखाच्या माध्यमातून "दशावतार" या विषयी जनजागृती निर्माण व्हावी , खास करुन तळ कोकणामध्ये ही लोककला जोपासली जाते. ही कोकणातील कला भारत देशामध्ये विस्तारीत व्हावी आणि या कलेचा आस्वाद सर्व लोकांनी घ्यावा म्हणून हा प्रयत्न करणे काळाची गरज बनली आहे.

**सल्ला-:**

1) दशावतार ही लोककला जन – माणसात पोहचण्यासाठी वारंवार प्रयोग होणे गरजेचे आहे.

2) दशावतार कलेसाठी युवा वर्गाला प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.

3) दशावतारचे ट्रेनिंग  देणे आवश्यक आहे.

4) दशावतार हा प्रकार स्थानिक अभ्यासक्रमात देणे आवश्यक आहे.

5) पुस्तकांची निर्मिती होणे गरजेचे आहे.

6) पारंपारिक पद्धतीने चाललेल्या या लोककलेमध्ये नविनता आणणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ-:**

1. श्रीमद्भगवतगीता :चौथा अध्याय
2. शिवजागर – शिवजागर : डार्विनचा उत्क्रांतीचा सिध्दांन्त आपल्या  पुराणात दशावताराच्या रुपात खुप अगोदर सांगितला गेला आहे.
3. Hindu Mythology , Vedic and puranic: chapter 5  The Incarnations or Avataras of vishnu
4. पुराण कथा
5. Beclcerman, Bernard, Dynamics of Drama, New york, 1970
6. देसाई व शां . नट नाटक आणि नाटककार पुणे. 1956
7. काळे के.ना.प्रतिमा, रुप आणि रंग , पुणे 1976
8. प्रीस्टले, जे बी अनु गोळे. व ह. नाटककराची कला, पुणे 1974
9. कानेरकटव वसंत,नाटक : एक चिंतन पुणे,1974
10. काळे, के.ना.नाट्यविमर्श, मुंबई. 1961

# कोरोनाचा मराठी भाषेवरील प्रभाव

**डॉ. सीमा नाईक - गोसावी**
पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती- जि . पुणे, महाराष्ट्र
seemanaik69@gmail.com

जवळजवळ गेल्या २ वर्षांपासून संपूर्ण जग कोरोनाच्या जागतिक महामारीने ग्रासून गेलेले आहे. या कोरोनाने जगातील प्रत्येक लहानमोठ्या क्षेत्राला, घटकाला एकामागून एक धक्के दिले आहेत. आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, व्यापार, शेती, उद्योग, आरोग्य अशा समाजजीवनातील प्रत्येक क्षेत्र कोरोनाने हादरून टाकले आहे. सर्वात मोठा उच्चांक म्हणजे एखाद्या महायुद्धात जशी मोठ्या संख्येने माणसे मरावीत त्यापेक्षाही जास्त बळी कोरोनाने घेतले आहेत. सर्वदूर जिकडे- तिकडे 'कोरोना' हाच विषय चर्चिला जातो आहे. कधीही भरून न येणारे असे महाप्रलयंकारी नुकसान व तोटे कोरोनाने केले आहे. सर्व जगाची झोप उडवली आहे. समाजातील विविध लहान- मोठ्या घटकांवर जसा कोरोनाने प्रभाव टाकला आहे; तसाच परिणाम अथवा प्रभाव मराठी भाषेवर, साहित्यावर, साहित्यव्यवहारावर कोरोनाने केला आहे. या शोधनिबंधात कोरोनाने मराठी भाषेवर कसा प्रभाव टाकला याचा साकल्याने विचार येथे करायचा आहे. या निबंधात भाषेपुरते झालेले बदल, परिवर्तन आपण प्रामुख्याने पाहणार आहोत. कोविड- १९, कोरोना, लॉक- अनलॉक, मास्क, सोशल- डिस्टनसिंग, पॉझिटिव्ह , निगेटिव्ह, लॉकडाऊन, क्वारंटाईन असे अनेक इंग्रजी शब्द परवलीचे बनले आहेत. अगदी सुशिक्षितांपासून असाक्षर माणसापर्यंत असे शब्द रुळले आहेत आणि या शब्दांनी मराठी भाषेत रुजायला सहजपणे सुरुवात केली आहे. परक्या भाषेतील असे अनेक शब्द मराठीत रुजून एकप्रकारची शब्दांची ' आत्मसातीकरणाची प्रक्रिया' वेगाने घडते आहे.

१८९७ ची प्लेगची साथ, चिकनगुणिया, स्वाईन फ्ल्यू , एखाद्या तापाची साथ अशा अनेक रोगांच्या लाटा आल्या आणि गेल्या . पण त्यांचा फारसा परिणाम भाषेवर झालेला दिसला नाही . मात्र कोरोनामुळे आरोग्यक्षेत्रातील व इतर विविध घटकांतील शब्द अगदी सहजपणे स्वीकारलेले दिसतात. कोरोनाने मराठी साहित्यावरही काहीसा अल्प परिणाम झाला. अजून कोरोनावरचे साहित्य यायला काही कालावधी लागणार आहे. प्रकाशनव्यवहार थंड पडला. पुस्तकविक्रीही बंद झाली. पुस्तकप्रदर्शने थांबली. एवढेच काय? अखिल भारतीय साहित्यसंमेलनही कोरोनामुळे थांबले. एकूणच साहित्यव्यवहारात एक प्रकारची मंदीची लाट आली. सर्वकाही ऑनलाईन सुरु झाले.

साहित्यव्यवहारावर लक्षणीय परिणाम झाला नाही परंतु मराठी भाषेने व मराठी भाषिकांनी भाषा परिवर्तनाची ही प्रक्रिया सहजपणे पेलली व स्वीकारली. साहित्यव्यवहारावर लक्षणीय परिणाम झाला नाही परंतु मराठी भाषेने व मराठी भाषिकांनी भाषा परिवर्तनाची ही प्रक्रिया सहजपणे पेलली व स्वीकारली. लॉक- अनलॉक, रेमडेसिविर, कोविड -१९, आर. टी . पी . सी .आर टेस्ट ,अँटीजन टेस्ट, लॉकडाऊन, डेल्टा व्हेरिएन्ट, क्वारंटाईन, मास्क , वर्क फ्रॉम होम असे इंग्रजी शब्द रूढ करण्याचे काम माध्यमांनीही पार पडले आहे.

' पॉझिटिव्ह ' एका अर्थाने चांगला, होकारार्थी, सकारात्मक परंतु ' निगेटिव्ह ' म्हणजे नकारात्मक पण ' पॉझिटिव्ह आला ' म्हणजे त्याला कोरोना झाला आहे व ' निगेटिव्ह ' टेस्ट म्हणजे कोरोना नाही अशी ' अर्थच्युती ' ची प्रक्रिया येथे घडते. ' पॉझिटिव्ह ' शब्दाचा अर्थ घसरला आहे. सध्या अनेक प्रकारच्या ' व्हॅक्सीन ' ची चर्चा चालू आहे. कोव्हॅक्सिन, कोविशील्ड, स्पुटनिक अशी लशिंची नावे स्थिरावत आहेत. दूरदर्शन, आकाशवाणी, मोबाईल, इंटरनेट, वृत्तपत्रे, सोशल मीडिया, फेसबुक या सर्वांनी अनेक इंग्रजी शब्दांचा मारा करून मराठी भाषिकांच्या तोंडी शब्द रुळविले आहे. लस, पहिली लाट, दुसरी व तिसरी लाट, विलगीकरण, अलगीकरण, लसीकरण, बाधा, बाधित, शिथिल, काढा, टाळेबंदी , जिल्हाबंदी, नाकेबंदी, डोस , महामारी, साथ, तुटवडा, प्रादुर्भाव, चाचणी, संपर्क, संसर्ग, कक्ष असे मराठी मातीतल्या शब्दांना एकप्रकारची चालती आली आहे. या मराठी शब्दांच्या वापराचे प्रमाण वाढले आहे. 'काढा' किंवा 'वाफ' 'बाधा', 'लाट' असे अगदी अस्सल ग्रामीण शब्दांना वजन प्राप्त झाले आहे. दूरदर्शनवरच्या साबणाच्या जाहिराती, इम्युनिटी पावर (प्रतिकारशक्ती ) जाहिराती, स्वच्छतेच्या जाहिराती यातील भाषाही निरीक्षण करण्यासारखी आहे. कोरोनाने जाहिरातीच्या भाषेचा बाज बदलला आहे.

' ऑनलाईन ' ने तर सर्वांनाच ' ऑनलाईन ' केले आहे. ' सेमिनार' ऐवजी ऑनलाईन ' वेबिनार' होऊ लागले आहे. लाईव्ह सेशन, लिंक, गुगल मीट, झूम, होम लर्निंग मॅनेजमेन्ट सिस्टीम (LMS ), असे सर्व ऑनलाईन झाले आहे. 'बेड', ऑक्सिजन सिलिंडर, ऑक्सिजन बेड , पॉझिटिव्हिटी रेट, डेथ रेट, रिकव्हरी रेट , सॅनिटायझर, पीपीई किट्स , व्हेंटिलेटर अशा वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित शब्दांचा वापर वाढला आहे. असाक्षर माणसानेही सहजपणे ही भाषा आत्मसात केली आहे.खरेतर याला ' कोविडची भाषा' असे नाव द्यायला हवे. कोरोनाने मृत्यू झाला हे सांगायला काहीसा संकोच वाटतो म्हणून ........ चे अल्पशा आजाराने निधन झाले अशी वर्तमानपत्राची भाषा बदलली आहे. वर्तमानपत्रांनी कोरोनावर अनेक 'सदरे' , ' लेखमाला' , चालविल्या आहेत. जनजागृतीही होत आहे. गंमत म्हणजे पीपीई किटचा वापर चोरांनीही चोरी करण्यासाठी सुरु केला आहे.

' माझे गाव - माझी जबाबदारी ', ' माझे कुटुंब- माझी जबाबदारी ', ' घरी येऊ- लास देऊ ', अशी अनेक घोषवाक्ये उदयाला आले आहेत. प्रामुख्याने या कोरोना कालावधीत इंग्रजी भाषेतील शब्दांचा पगडा मराठी भाषिकांवर अगदी सहजपणे बसला आहे. ' हॉट- स्पॉट ', म्युटेशन, विकेंड लॉकडाऊन , टास्क फोर्स, फ्रंट लाईन वर्कर्स, पॅनडेमिक, व्हॅक्सिनेशन, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, स्वॅब, असे काहीसे उच्चरायला अवघड असलेले शब्दही मराठी भाषिक सहजपणे अवगत करू लागले आहेत.

एक इंग्रजी शब्द व जोडीला एक मराठी शब्द जसे - अँक्टिव्ह- रुग्ण , जनता- कर्फ्यू , कडक लॉक- डाऊन असे जोड शब्दही उदयाला आले आहेत. 'मास्क' हा लहानांपासून मोठ्यापर्यंत परवलीचा शब्द झाला आहे. सर्जिकल मास्क, एन- ९५ मास्क, यूझ अँड थ्रो मास्क असे मास्कपुराण वाढले आहे. ऑक्सिमीटर, थर्मोमीटर, फेस-शील्ड, टिश्यू- पेपर आणि इतर अनेक साधनांची नावे लोकांची पाठ झाली आहे. अँक्टिव्ह- रुग्ण, स्कोअर, डेड बॉडी, ऑक्सिजन लेव्हल ,स्लॉट , कोविड सेंटर , व्हायरस , अँब्युलन्स , स्ट्रेन , इ. शब्दांची चलती आहे.

फायझर, सिरम इन्स्टिट्यूट, मॉडर्ना, भारत बायोटेक, डीआरडीओ , इ . लस निर्माण करणाऱ्या कंपनीज लोकांच्या परिचित झाल्या आहेत. विषाणू , कक्ष, तंत्रस्नेही, चाचणी , तुटवडा, साथ, शिथील, बंधने असे मराठी शब्दही नव्याने मोठ्या प्रमाणात वापरले जाऊ लागले आहे. एकूणच साधारणपणे कोरोना कालावधीत मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे आक्रमण कसे झाले आहे व मराठी भाषिक समाजाने हे शब्दांचे आक्रमण कसे पचवले आहे हे पाहणे मोठे गमतीदार आहे. विविध प्रकारच्या भाषिक परिवर्तनाच्या प्रक्रिया या भाषास्तरावर घडताना आपल्या अनुभवाला येत आहे. उद्या जेव्हा कोरोनावर विविध प्रकारच्या मराठी साहित्याची निर्मिती होईल. तेव्हा हे सर्व शब्द आपल्याला पुन्हा भेटतील. एकूणच कोरोनाने जीवनातील सर्व क्षेत्रात जसे लहान - मोठे बदल घडविले आहेत त्याप्रमाणे मराठी भाषेवरही कोरोनाने आपला प्रभाव दाखविला आहे असे म्हणता येईल. आगामी काळात मराठी भाषेला चांगले भवितव्य असण्यासाठी दळण- वळणाचे बदलते स्वरूप व त्या दृष्टीने तयार होणारे शब्द यांचा साठा - तसेच दिवसेंदिवस भाषेचे डिजिटॅलायझेशन करून त्यादृष्टीने नव्याने भर पडत असलेली शब्दसंपत्ती अद्ययावत करणे गरजेचे वाटते. हे भाषाअभ्यासकांचे काम आहे.

**संदर्भ -**

1. कोरोना कालावधीतील विविध मराठी वृत्तपत्रे
2. मेहता मराठी ग्रंथजगत

# कोव्हिड १९ च्या परिप्रेक्षातील ई - गव्हर्नन्सची उपयुक्तता

**प्रा. डॉ. झाकीर हुसेन हाकीम संदे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल. ता. पलूस जि. सांगली.
Email: zakirhusensande@yahoo.com

**प्रस्तावना :**

सुशासन (Good Governance) आणि ई-प्रशासन (E-Governance) हे आजच्या युगातील सर्वांना परिचित होत असलेले आणि तेवढेच महत्त्वाचे शब्द बनले आहेत किंबहुना या शब्दरूपी संकल्पनेशिवाय आधुनिक युगात प्रगत आणि विकसित राष्ट्रे असो, विकसनशील राष्ट्रे असो वा तिसऱ्या जगातील मागास राष्ट्रे असोत, सर्वांनाच या संकल्पनेला सोडून विकासाची स्वप्ने पाहता येणार नाहीत. राष्ट्रातील अखिल मानव जातीच्या सर्वांगीण विकासाकरिता अर्थातच सु-शासन आणि सु-प्रशासन या संकल्पनांना पर्याय नसल्याचे दिसते. मानव जातीच्या विकास प्रक्रीयेमध्ये आजपर्यंत जेवढ्या उत्क्रांत्या झाल्या त्यातील सर्वोच्च आणि अद्ययावत सुधारणा या दोन नवीन संकल्पनाच्या रूपाने झालेल्या दिसतात. या दोन संकल्पनांना समांतर किंवा त्यापेक्षा श्रेष्ठ अशा कोणत्याही संकल्पना आज अखेर झालेल्या नाहीत. त्यामुळे या संकल्पनांच्या साहाय्याने जगाची आजची प्रगती संभवते. आजचा जो कालखंड आहे तो कोरोनासारख्या महामारीचा. या कालखंडाची सर्वात महत्वाची आणि उल्लेखनीय बाब म्हणजे हा रोग संसर्गजन्य असल्याने लोकांचा परस्पर सामाजिक संबंध तुटलेला आहे. लोकशाही व्यवस्था म्हणजे लोक आणि सरकार हे परस्परांच्या सहकार्याने, संपर्कानेच कार्यान्वित होणारी व्यवस्था आहे. नेमका हाच मुद्दा येथे कोरोना मुळे मुख्य पेचप्रसंग म्हणून उभा आहे. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी घरात राहणे आणि मानवी संपर्क रोखणे हा त्यावरील आजचा जगविख्यात आणि जगमान्य उपाय आहे. त्यामुळे सरकार, प्रशासन आणि लोक यांचा संपर्क पूर्णपणे नाहीसा झाला ही एक मोठी चिंतेची बाब ठरली. पण मानवाने शोधून काढलेल्या ई-गव्हर्नन्स मुळे ही समस्या बऱ्यापैकी निकाली निघाली आणि माणसामाणसांमध्ये कोणताही सामाजिक संपर्क न साधता सरकार व प्रशासन लोकांपर्यंत पोहोचले आणि लोक, सरकार व प्रशासनापर्यंत पोहोचले. सरकार आणि नागरिक यांच्या दुहेरी दळणवळणाची प्रक्रिया ई-गव्हर्नन्समुळे यशस्वी झाली. ई-गव्हर्नन्स मुळे मोठ्या प्रमाणात या कसोटीच्या प्रसंगी मानवी समुदायाला खूप मोठी मदत झाली. माहिती आणि तंत्रज्ञान महत्त्वाचे साधन म्हणून ई–गव्हर्नन्सने महत्त्वाची भूमिका पार पाडली. याचाच अभ्यास या निबंधामध्ये करण्यात येणार आहे.

**ई-गव्हर्नन्स संकल्पना :**

आधुनिक युगातील मानवी समुदायाला विकासाच्या वाटेवर घेऊन जाणारी ही महत्त्वाची संकल्पना आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये सरकार आणि लोक यांच्यातील परस्पर संपर्क मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. लोकांच्या सरकारकडून अपेक्षा वाढल्या आहेत. लोकसंख्येचा झालेला प्रस्फोट आणि लोकांच्या वाढत्या अपेक्षा आणि त्यांना तोंड देता देता शासकीय यंत्रणेची पुरेवाट होताना आपण दररोज पाहतोयच. कोरोनाच्या काळात तर प्रत्येक माणसाच्या समस्या प्रत्यक्ष समोरासमोर संपर्कात येऊन सोडवणे प्रशासनास अशक्यप्राय झालेले आहे. नागरिकांना सरकारकडून मिळणारी माहिती, सेवा, सवलती, योजना, उपचार तात्काळ हवे असतात. कोरोनासारख्या रोगाची कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला लागण झाली तर त्या कुटुंबात आणि परिसरात कशी तारांबळ उडते हे आपण 'याची देही याची डोळा' पाहतोयच. अशावेळी त्या कुटुंबाला कोणाचीही मदत आणि सहकार्य मिळण्याच्या अपेक्षा दूरावत जातात. या आणीबाणीच्या प्रसंगी जर कोणी कामी येत असेल, तर ती संकल्पना म्हणजे ई-गव्हर्नन्स होय. शासनसंस्थेच्या गुणात्मक, संख्यात्मक आणि मूल्यात्मक दर्जा वाढवणारी लोककल्याणाची आदर्श संहिता असे ई–गव्हर्नन्सच्या प्रक्रियेला म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला अधिक मजबुती देऊन सरकारच्या लोककल्याणाच्या हेतूला गतिमान करणारी ही संहिता. ई-गव्हर्नन्स ही व्यापक संकल्पना आहे. माहिती, विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच अत्याधुनिक विद्युत सूक्ष्म यंत्रांचा वापर करून शासन आणि नागरिक यांच्यातील आंतरक्रिया प्रस्थापित केली जाते. ई–गव्हर्नन्सचा अर्थ 'इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स' होय. म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून राज्यकारभार चालवणे होय. राज्यप्रशासन चालवताना सरकारचे निर्णय, धोरणे आणि निर्णयांची काटेकोर आणि बिनचूक अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असते. सरकार लोककल्याणाच्या दृष्टीने अनेक नवनवीन योजना प्रकल्प राबवित असते. तसेच नवनवीन व अद्ययावत कायदे करीत असते. या सर्व गोष्टींचा लाभ तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवीणे सरकारच्या दृष्टीने गरजेचे असते. त्याकरिता सरकारला विज्ञान-तंत्रज्ञान, सूक्ष्म विद्युत उपकरणे, सूक्ष्म दळणवळणाची साधने, विद्युत लहरी, इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल, संगणक, प्रिंटर, ई-मेल, सॅटेलाईट, वेबसाईट, लिंक इ. संपर्क साधने वापरून नागरिक व शासन यांच्यात अंतरक्रिया घडवून कायद्याची व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ई-गव्हर्नन्स ही संकल्पना खूपच उपयोगी ठरते. त्यालाच जोडून

आज उपलब्ध असलेल्या व्हाट्सॲप, फेसबूक, इन्सटाग्राम, वेबसाइट्स, वेबॲड्रेस, युट्युब, इंटरनेट यासारख्या समाज माध्यमांचा वापर करून देखील सरकार नागरिकांशी आंतरक्रिया वाढवते. अर्थात या सर्व इलेक्ट्रॉनिक दळणवळण आणि संपर्क माध्यमांचा, ज्ञान व कौशल्यांचा वापर करून राजकीय व्यवस्था आणि त्यांची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी ई–गव्हर्नन्सचा खूपच उपयोग होताना दिसतो. सरकारने लोकांचा शारीरिक, मानसिक त्रास कमी व्हावा तसेच वेळ, श्रम आणि पैशाची बचत होऊन नागरिकांना समाधान मिळावे यासाठी अनेक वेबसाईट्स कार्यान्वित केल्या आहेत. त्यामध्ये ई–रजिस्ट्रेशन, ई–पोलीस, ई–एज्युकेशन, ई–रिपोर्ट, ई–डेमोक्रसी, ई–सेन्सस, ई–अडमिनिस्ट्रेशन इत्यादी साईट्सचा वापर आज सर्व ठिकाणी व्यापक प्रमाणात होताना दिसतो. कोरोना महामारीच्या कालखंडात ई-गव्हर्नन्सची उपयोगिता अधोरेखित झाली. कोरोनापूर्व काळात ई-गव्हर्नन्स च्या माध्यमातून सरकार व नागरिक यांच्यात परस्पर संबंध आणि संपर्क होत होता. अनेक लोक अज्ञान व माहितीच्या अभावी आपली कामे प्रत्यक्ष सरकारी कार्यालयात जाऊन पारंपरिक पद्धतीने करून घेत होती. कोरोनाकाळात नेमका याच संपर्क प्रक्रियेवर निर्बंध आले. लॉकडाऊनच्या कठोर अंमलबजावणीमुळे लोकांना घरातून बाहेर पडणे अशक्य झाले. तरीसुद्धा दैनंदिन कामे थांबवता येत नव्हती. शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षा, लेक्चर्स, सेमिनार, कार्यशाळा, मीटिंगा, बँक व्यवहार इत्यादी कामे करण्यासाठी ई–माध्यमाशिवाय पर्याय राहिला नाही. नागरिकांनी सरकारी वेबसाईट्सचा पुरेपूर वापर करून सरकारी कामे उरकून घेतली. ज्यांना या गोष्टी माहीत नव्हत्या त्यांनी सुद्धा या सर्व गोष्टी आत्मसात केल्या. घराबाहेर न पडता सर्व कामे करून घेण्याचा प्रयत्न केला आणि बऱ्याच प्रमाणात त्यात यश मिळाले. कोरोनाच्या कालखंडात म्हणजे मार्च २०२० पासूनच लोकसंपर्काने रोग फैलावत असल्यामुळे लॉकडाऊन करण्यात आले. समाजात वाढत्या रुग्णांची संख्या आणि भयभीत झालेले लोक, सरकारी वेबसाईट, ई–मेल, टीव्ही, इंटरनेट वरून दिल्या जाणाऱ्या सूचना वरच विसंबून राहिली सरकारने या माध्यमांचा वापर करून तज्ज्ञ, प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ तसेच आधुनिक तंत्राचा वापर करून लोकांना धीर देत, त्यांच्या प्रश्न व अडचणीवर उपाय योजना करुन राज्यशकट चालवले. रोगांच्या भीतीने नातेवाईक आणि शेजारी-पाजारी सुद्धा एकमेकांशी संपर्कहीन झाले. आपूलकी, सहकार्य, मदत ही भारतीय समाजातील मुल्ये लोप पावली. या सर्व परिप्रेक्षात, जर कुटुंबात एखाद्याला रोगाची लक्षणे दिसू लागली तर मोबाईल फोनवरून सरकारी यंत्रणेला संपर्क साधण्यात आला. त्यासाठी सरकारी रुग्णालये, मदत केंद्रे, औषधोपचार, ॲम्बुलन्स यासाठी टोल फ्री नंबर सरकारकडून देण्यात आले. रुग्णाची माहिती जिल्हा कलेक्टरच्या वेबसाइटवरून, नगरपालिका, महानगरपालिका तसेच जिल्हा व कॉटेज तसेच सिव्हिल रुग्णालय यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली. जिल्ह्यातील गावात, ग्रामीण व शहरी तसेच प्रत्येक गल्ली, वॉर्डमध्ये असलेल्या रुग्णांची माहिती नावे, पत्ते ,फोन नंबर, उपलब्ध रुग्णालय, रुग्णालयातील बेडची संख्या, ऑक्सिजन व व्हेंटिलेटर यांनी युक्त असलेले बेड, ऑक्सिजनची उपलब्धता, कोरोना प्रतिबंधित क्षेत्रे, पर्यायी वाहतूक व्यवस्था, विलगीकरण कक्ष, कोव्हीड वार्ड, कोवक्सिन, कोविशील्ड, यासाठी ते देण्याची केंद्रे व त्याकरिता नोंदणीच्या वेबसाईट, लिंक, डॉक्टरांची माहिती, औषधे व त्यांच्या रक्ताच्या व घसा आणि नाकाच्या स्वाब चाचण्यांच्या लॅब ही माहिती सरकारी वेबसाईटवर लोकांना घरबसल्या मोबाईलवर व इंटरनेटच्या एका क्लिकवर मिळू लागली. त्यामुळे रोगाची लक्षणे दिसणाऱ्या रुग्णाला नेमके कोणत्या दवाखान्यात न्यायचे, कोणत्या वाहनाने व कशा पद्धतीने न्यायचे याची संपूर्ण माहिती सरकार तर्फे लोकांना घरीच मिळत होती. रुग्णांवर घरी प्रथमोपचार कोणते करावेत व नेमके कधी दवाखान्यात न्यावे, औषधे कोणती द्यावी, रुग्णांची काळजी कशी घ्यावी याची माहिती सरकारने घरोघरी ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून पोहोचवली. या सर्व सामूहिक प्रयत्नांचा परिणाम सर्वत्र दिसून आला आणि कोरोनाच्या साथीला आपण जगाच्या तुलनेने तोंड देऊ शकलो. सरकार, समाज, समाजसेवी संस्था, आरोग्य विभाग, या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांना यश आले आणि कोरोना संकटावर आपण चांगल्या पद्धतीने मात करू शकलो. कोरोनाचे संकट अजून पूर्णपणे संपलेले नाही तरी पण जगाच्या तुलनेत आपण चांगली कामगिरी केली आहे. या सर्व प्रयत्न, परिक्रमा आणि उपाययोजनेच्या प्रक्रियेमध्ये ई - गव्हर्नन्सचा भारतीय लोक समुदायाला चांगला फायदा झाला झाल्याचे दिसून येते. कोरोनाशी लढा देण्यासाठी सरकारने काही ई–संपर्कसाधने, संसाधने उपलब्ध करून दिली ती पुढीलप्रमाणे,

''National corona virus helpline Email ID – ncov2019@gmail.com

Corona helpdesk Whats App No – 9013151515''[१]

''Central Helpline Number For Corona Virus + 91– 11-23978046, 020-26127394

Central Health Ministry – 1075, +91-11-23978046''[२]

''MAHARASHTRA COVID HELPLINE 022-22027990''[३]

"Vaccination Registration - CO – WIN, Aarogyasetu, UMNG,"[४]

"7 आकस्मात वैद्यकिय टोल फ्री दुरध्वनी क्र. – १०८

8 नोव्हेल करोना विषाणू ( कोविड १९ ) राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र टोल फ्री दुरध्वनी क्र ०२०-२६१२७३९४ टोल फ्री दुरध्वनी क्र १०४"[५]

| Name of Zonal Office | Name of Regional Office | Whats App Helpline Number |
|---|---|---|
| Maharashtra<br>(Other than Mumbai )<br>( Pune) | Akola<br>Aurangabad<br>Kolhapur<br>Nagpur<br>Nashik<br>Pune ( Cantt_)<br>Pune (Akurdi)<br>Solapur | 0724-2414050<br>9405355287<br>9309866697<br>9555313189<br>0253-2360974<br>8767108057<br>8766467490<br>9404912406 |
| Thane (Thane) | Kandivali (West)<br>Kandivali ( East)<br>Thane (North)<br>Thane (South)<br>Vashi | 7977298051<br>9321482815<br>9321466977<br>9321666951<br>8928977985<br>9969036136 |

स्त्रोत – https : // www.epfindia.gov.in

अशा अनेक प्रकारच्या वेबसाईटस, टोल फ्री नंबर, हेल्पलाईन, हेल्पडेस्क, लिंक, ई -मेल इत्यादी अनेक संपर्कसाधने केंद्र आणि राज्य सरकारांनी तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, सरकारी दवाखान्यानी उपलब्ध करून, कोरोना रुग्णांची माहिती व साधने उपलब्ध करून दिली. त्यातूनच कोरोनाची महामारी चालू असताना लॉकडाऊनच्या काळात घरी बसून ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून जनतेचे दुःख दैन्य व हालअपेष्टा कमी करून त्यांना या संकटाच्या काळात धीर देऊन, त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाला. या सर्व प्रक्रियेमध्ये ऑनलाइन साधनांचा वापर करून रोगावर नियंत्रण करण्यासाठी ई–गव्हर्नन्स ही संकल्पना, यंत्रणा खूपच उपयोगी ठरली.

**समारोप :**

कोरोनाचे संकट संपूर्ण जगातील मानव जातीला गिळंकृत करते की काय अशी अनामिक भीती प्रत्येकाच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आणि नैसर्गिक होती. या रोगाशी सामना करताना जगातील अगदी विकसित राष्ट्रांची सुद्धा दमछाक झाली. लोकसंख्या नियंत्रित असलेली आणि आरोग्याच्या जागतिक दर्जाच्या अतिउत्तम सुविधा उपलब्ध असलेल्या अमेरिका, इंग्लंड, इटली यासारख्या देशांना सुद्धा अजूनही म्हणावे तेवढे यश आलेले नसताना, भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या आणि आरोग्याच्या तुटपुंजा सुविधा उपलब्ध असलेल्या विकसनशील देशाचे काय होईल, या विचाराने व्यक्तीच्या अंगाचा थरकाप उडाला. एक-एक क्षण मोजत भीतीच्या छायेखाली जगणाऱ्या नागरिकांना भारत सरकार व राज्य सरकारांनी जमेल तेवढे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरून मदत घेऊन या रोगावर नियंत्रण करण्याची पराकाष्टा केली. त्यासाठी अनेक उपाययोजना कामी आल्या. या सर्वांमध्ये सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे लॉकडाऊन मध्ये सुद्धा प्रशासन आणि समाज परस्परांपासून व प्रत्यक्ष संपर्कापासून दूर असताना सुद्धा ई- गव्हर्नन्समुळे या दोन्हीत परस्परसंबंध, संपर्क प्रस्थापित झाला. त्यातूनच लोकांचे दुःख हलके होऊन त्यांचे जगणे सुसह्य झाले. ही ई–गव्हर्नन्सच्या तांत्रिक संकल्पनेची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल.

संदर्भ

1. http : // www.acko.com
2. https : // www.mohfw.gov.in
3. https : // Indianhelpline.com
4. http : // www.mygov.in
5. https : // arogya.maharashtra.gov.in

# असमीया खान-पान और इसका बदलता चलन

**बर्णा शर्मा**

सहायक अध्यापिका, असमीया विभाग, पंडित दीनदयाल उपाध्याय आदर्श महाविद्यालय, तुलुङिया, बङाइगाँव

**भूमिका :**

कोरोणा-19 ने जागतिक पातळीवर आरोग्यविषयक मोठे संकट निर्माण केले आहे. ज्यामुळे असंख्य लोक मरत आहेत, मानवी दुःख पसरत आहे, आणि लोकांचे जीवन धोक्यात येत आहेत. हे केवळ आरोग्य विषयक संकट नाही तर एक सामाजिक आणि आर्थिक संकट देखील आहे.साथीच्या आजाराचा परिणाम समाजातील सर्व घटकांवर झाला आहे. तथापि विशेषतः गरिबीत राहणारे लोक वृद्ध व्यक्ती अपंग व्यक्ती मूलनिवासी आणि वांशिक अल्पसंख्यांक असुरक्षित सामाजिक गटयांचे मोठे नुकसान झालेआहे. स्थलांतरित किंवा विस्थापित लोकांसाठी कोणतीही घरे किंवा निवारा नसलेल्या लोकांना नंतरच्या काळातही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जीव वाचवण्यासाठी केलेल्याउपायांचा संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम होत . सार्वत्रिकरीत्या स्वीकारलेले मुख्य संरक्षण म्हणजे टाळेबंदी ज्यामुळे लोकांना शक्य असेल तेथे घरातून काम करण्यास भाग पाडले आहे त्यातून उत्पादकता कमी झाली आहे मनोरंजन आणि पर्यटन क्षेत्राचेमोठ्या प्रमाणात नुसकान झाले आहे. आर्थिक अडचणी आणि नोकरी गमावणे याचा विपरीत परिणाम म्हणून गुन्हेगारी मध्ये काहीशी वाढ होताना दिसून येते.

वेगवेगळया प्रकारच्या कचऱ्याची निर्मिती अप्रत्यक्षपणे पर्यावरणाचे संतुलन बिघडते कोरोना महामारी च्या काळात उपाययोजना म्हणून केलेल्या टाळेबंदी मुळे लोकांना घराबाहेर पडता आले नाही त्यामुळे ऑनलाईन शॉपिंगची क्रिया वाढली त्याचा परिणाम घरगुती कचऱ्यामध्ये वाढ झाली ऑनलाईन खरेदी केलेले खाद्यपदार्थ पॅक केले जातात म्हणूनच जैविक कचरा देखील वाढला वैद्यकीय क्षेत्रातील कचऱ्यामध्ये देखील मोठी वाढ झाली. कचरा संकलन सेवांच्या अंमलबजावणीत नवीन आणि मोठे अडथळे निर्माण झाले त्यामुळे कचरा संग्रहण आणि पुनर्वापर गटांना कचरा व्यवस्थापनाचे आव्हान निर्माण झाले मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वर पर्याय शोधण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजेत हे करुणा च्या निमित्ताने प्रकाशझोतात आले.

**समारोप**

कोरोणा19च्या साथीच्या रोगाने लोकांच्या जीवनातील गुणात्मक पैलूवर जसेशिक्षण,उत्पन्न, यावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडलाआहे. वैयक्तिक घटक विशेष म्हणजे रोगाबद्दलची चिंता आणि वैयक्तिक ओळख देखील खोलवर परिणाम करते. एखाद्या व्यक्तीची सामाजिक ओळख व सामाजिक जीवनावर परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे संवेदनशीलता आशावादी दृष्टिकोन पूर्वग्रह दृष्टीकोण याबाबतीत अनेक स्वरूपाचे बदल झालेले जाणवते.शारीरिक अंतराच्या अंमलबजावणी आणि सल्ल्यामुळे सर्व लोकांसाठी समान जीवन क्रिया आणि नातेसंबंध अबाधित रहावेत यासाठी नवीन मार्ग आणि उपाय शोधणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्य व्यवसायिक आणि इतर भाग धारकांनी सामाजिक कार्यक्रमांना आवश्यक ती मदत केली पाहिजे.कोरोना व्हायरस ही एक जागतिक महामारी आहे. जी आर्थिक क्रियाकलाप थांबवणे. आणि एकूणच आरोग्यास गंभीर स्वरूपाचा धोका उत्पन्न करते. जागतिक स्तरावर सामाजिक आर्थिक परिणाम बेकारी आणि दारिद्र्य निर्माण. शिक्षण क्षेत्र कामाच्या स्वरूपात बदल जीडीपी कमी करणे आणि आरोग्य सेवा करणाऱ्या कामगारांची जोखीम वाढविते.लॉकडाऊन मुळे हालचाली मर्यादितहोतात, आणि लोकांना मुख्यत्वे घरी बसावे लागते, परिणाम स्वरूप ऊर्जा मागणीत वाढ होते.पर्यावरणीय प्रदूषणात महत्त्वपूर्ण घट झाली. पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत झाली. शहरी व्यवस्थापनामध्ये व्हायरल इन्फेक्शन आणि इतर रोग कमी होण्यास मदत झाली. टिकाऊ विकासाला चालना देणारी धोरणे आखणे गरजेचे आहे.नागरिकांसाठी आरोग्यसेवा सुनिश्चित करणे गरजेचे झाले. सामाजिक अंतर

सुनिश्चित करणे आणि कायमस्वरूपी भविष्य घडविणाऱ्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे, याकडे लक्ष वेधले. भविष्यात असे कोणतेही संकट आले, तर ते रोखण्यासाठी संशोधन आणि विकासासाठी अधिक गुंतवणुकीची गरज निर्माण झाली.

**संदर्भ**

1- वृत्तपत्रे सकाळ, महाराष्ट्र टाईम,लोकसत्ता,लोकमत.

2- गुगलवेबसाईट.

3- विकपीडीया वेबसाईट.

# गोपाळ गणेश आगरकरांच्या सुधारणावादी लेखनाचा ऐतिहासिक अभ्यास

**श्री. सुरेश नामदेव दांडगे[1] डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे[2]**

[1]संशोधक, सहाय्यक प्राध्यापक, आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव

[2]संशोधन मार्गदर्शक, विभाग प्रमुख व संशोधनमार्गदर्शक, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

**गोषवारा**

19 व्या शतकात संपूर्ण भारतात दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा, उच्चनिच, भेदभाव, जातिभेद, गुलामगिरी, संकुचितपणा तसेच अनिष्ट रूढी परंपरांनी समाज निद्रिस्त बनून समाजात कमालीची विषमता निर्माण झाली होती. सन 1856 मधे जन्म झालेल्या पाश्चात्य व शास्त्रीय ज्ञान आणि नवीन शिक्षण अवगत केलेल्या आगरकरांच्या मनात समाजाच्या अज्ञानाविषयी विलक्षण चीड निर्माण झाली होती. त्यांच्या लेखनामुळे सामाजिक जीवनात घडून येणारा बदल परंपरानिष्ट, सामाजिक आणि धार्मिक रितीरिवाजांना धक्का देणारा ठरला होता. त्यांची सामाजिक आणि शैक्षणिक लिखाण, तत्कालीन सामाजिक समस्या सोडवण्याच्या त्यांच्या तंत्रांचा आणि प्रयत्नांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास त्यांच्या सुधारणेचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात येते. विवेक, बुध्दिप्रामाण्य आणि वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे विचारांच्या विकासावर होणारी बौध्दिक उत्क्रांती त्यांना अभिप्रेत होती.

आगरकरांनी व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आयुष्यभर लेखणी चालविली. व्यक्तीस्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यासारख्या घटकावरच त्यांचे परिवर्तन आधारभूत होते. त्यांची चिकित्सा, व्यावहारिक बुद्धी, समाज उध्दाराची भावना आणि समाज परिवर्तनासाठी त्यांच्यात असलेली इच्छाशक्ती या सर्व बाबींचा परिचय त्यांच्या लेखनातून होतो. त्यांची जीवननिष्ठा, घेतलेला ध्यास, अत्यंत पोटतिडकीने लेखनातून मांडलेल्या समस्या या मूलगामी परिवर्तन आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी दिशादर्शक आहे.

## गोपाळ गणेश आगरकरांच्या सुधारणावादी लेखनाचा ऐतिहासिक अभ्यास

आगरकरांनी व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आयुष्यभर लेखणी चालविली. व्यक्तीस्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यासारख्या घटकावरच त्यांचे परिवर्तन आधारभूत होते. त्यांची चिकित्सा, व्यावहारिक बुद्धी, समाज उध्दाराची भावना आणि समाज परिवर्तनासाठी त्यांच्यात असलेली इच्छाशक्ती या सर्व बाबींचा परिचय त्यांच्या लेखनातून होतो. त्यांची जीवननिष्ठा, घेतलेला ध्यास, अत्यंत पोटतिडकीने लेखनातून मांडलेल्या समस्या या मूलगामी परिवर्तन आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या जीवन चरित्राचे चिकित्सक पद्धतीने लेखन करताना त्यांनी आपल्या एकूण सार्वजनिक आयुष्यात केसरी वृत्तपत्राचे संपादक म्हणून ७ वर्षे आणि सुधारक या वृत्तपत्राचे संपादक म्हणून ७ वर्षे समाजाचे वेगवेगळ्या स्तरावर लेखनातून समाजातील दुष्ट, अमानुष रूढी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांच्या सामाजिक कार्याचा आणि सुधारणावादी विचारांचा वेगळेपणा या संशोधनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### आगरकरांच्या सुधारणावादी ग्रंथ लेखनाचा प्रारंभ

"पाश्चात्त्य राष्ट्रांचे कर्तृत्व व संपन्नता यामुळे दिपून गेलेल्या आपल्या सुशिक्षितांचा स्वाभिमान जागा करण्यासाठी महाराष्ट्रात 1870 नंतर पुनरुज्जीवनवादाची लाट उसळली."[1] त्यामध्ये आगरकरांच्या समाज सुधारणावादी लेखनाचा मोठा प्रभाव जाणवतो. कराडच्या अमृत श्रीपत नागपूरकरांच्या आवाहनानुसार आगरकरांच्या निबंध लेखन कार्यास प्रारंभ झाला, तर महाविद्यालयीन शिक्षण घेताना त्यांना परीक्षेची फी भरण्यास पैसे नसल्याने त्यांनी नाटक रचण्याचा प्रयत्न केला. यावरून त्यांनी लहान पासूनच लेखनकलेचा छंद जोपासला होता. "पाश्चात्य विद्यारुपी वाघिणीच्या दुधाने प्राप्त होणाऱ्या ज्ञानाने पाश्चात्त्य देशातील आपल्याला अनुकूल अशा नवीन कल्पनांचा व नवीन आचार-विचारांचा स्वीकार आपले लोक केव्हा करतील."[2] असे त्यांना वाटत होते

### डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस

आगरकर आणि टिळकांनी कोल्हापूरच्या छ. शिवाजी महाराजांची बाजू आपल्या वृत्तपत्रांमध्ये मांडल्यामुळे त्यांना मुंबईतील डोंगरीच्या तुरुंगात जावे लागले. डोंगरीच्या तुरुंगात त्यांनी सुरुवातीस 20-25 दिवस विविध विषयावर विचारविनिमय केला. त्यानंतर त्यांना तुरुंगात लिहिण्या वाचण्यास आवश्यक असलेले साहित्य दिले. तेव्हा आगरकरांनी तुरुंगातच दोन ग्रंथ लिहिले होते. ते म्हणजे "डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस आणि

शेक्सपियरच्या हॅम्लेट या नाटकाचे विकार विलसित असे मराठी भाषांतर"[3] केले होते. तुरुंगातील कारावासात लिहिलेले हे पुस्तक म्हणजे वैचारिक दृष्टीने अमोल असे आत्मवृत्त आहे. आगरकर-टिळकांनी ह्या आत्मचरित्रात ह्या दोघांनी मिळून देशसेवेला वाहून घेण्यापूर्वी कोण कोणते विचार केले होते, कोणकोणत्या अडचणी आल्या होत्या, कोणी कोणी मदत केली, कोणी अडचणीत टाकले."[4] अशा अनेक बाबींचा विचार तुरुंगावासात केला होता.

तत्कालीन परिस्थितीत भारतातील राजकीय पुढाऱ्यांना आणि सामाजिक सुधारकांना तुरूंगात डांबल्यामुळे त्यांना शारीरिक त्रास सहन करावा लागला असला तरी त्यांच्यासारख्या विद्वान विचारवंतास एरव्ही शांतपणे विचार विनिमय करण्यास वेळ मिळत नसे. "तुरुंगातील  निवांतपणाचा लाभ झाल्यानंतर त्यांना महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा करण्यास वेळ मिळाला होता."[5] त्यामुळेच त्यांना तुरुंगवासात असताना विचार करण्यास व लेखन करण्यास त्यांना भरपूर वेळ मिळाल्यामुळे त्यांनी 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस' या नावाचे पुस्तक लिहून आपल्या तुरुंगातील अनुभवाविषयी मत मांडले होते.

**विकार विलसित**

आगरकरांनी विकारविलसित या नाटकाची सुरुवात 1882 मध्ये केली होती. प्रत्यक्षात "1882 च्या एप्रिल महिन्यात प्रस्तुत पुस्तकास मी  आरंभ केला व ऑगस्ट महिन्यात डोंगरीवर असता ते तडीस नेले."[6] असे त्यांनी स्पष्ट करून या नाटकाच्या प्रयोगाचे सादरीकरण आर्योध्दारक मंडळीने केल्यास त्यापासून मिळणारे पैसे केसरी साप्ताहिकासाठीही वापरता येईल असा त्यांचा स्वाभिमानी स्वभाव होता. "नटवर्य गणपतराव जोशी यांनी आपल्या अभिनय नैपुण्याने आबालवृद्धांना परिचित केलेले 'हॅम्लेट' नाटक दुसरे कोणतेही नसून आगरकरांनी केलेले भाषांतरच आहे."[7] हॅम्लेट या नाटकातील शेक्सपीयरने मांडलेल्या संकल्पना मराठी भाषेत लोकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. "सेक्सपियरने सदतीस नाटके लिहिली त्यात चार फार गाजली. त्यातही हॅम्लेट हे सर्वश्रेष्ठ. त्याचा आस्वाद मराठी वाचकांना द्यावा असे ह्या सरस्वती पुत्राला वाटले ह्यात आश्चर्य काय? त्यांनी शब्दाला शब्द ठेवून देण्याचे भाषांतरी काम न करता सरस अनुवाद केला होता."[8] सेक्सपियरने हॅम्लेट मध्ये ज्या भावना मांडल्या होत्या, त्याच भावना त्यांनी आपले वैचारिक कौशल्य वापरून विचारविलसित मध्ये अनुवादित केल्या होत्या. थोडक्यात जगप्रसिद्ध कवींच्या साहित्याचे अवलोकन करता यावे यासाठी मराठीत हॅम्लेट नाटकाचे 'विचारविलसित' असे मराठी भाषांतर केले होते.

**केसरी वृत्तपत्र**

आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी "मंगळवार दिनांक 4 जानेवारी रोजी केसरीचा पहिला अंक प्रकाशित झाला."[9] या पहिल्याच अंकामध्ये लोकांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी "कोणकोणत्या गोष्टी लोकास हितकारक आहेत व कोणकोणत्या अहितकारक आहे, जुन्या चाली टाकून देण्यासाठी कोणत्या आहेत व नव्या घेण्यासारख्या कोणत्या आहेत."[10] हे सांगण्याचा त्यांनी तळमळीने प्रयत्न चालविला होता. प्रभावी आणि वैचारिक विषयांवर निबंध लिहून परिणाम कारक उत्कर्ष साधला. वृत्तपत्राचे वाचक भौतिक दृष्टीने सामान्य असल्याने एक वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली जोपासली.

केसरी वृत्तपत्रात लेखन करताना त्यांनी सनातन्यांचा खणखणीत भाषेत समाचार घेतला होता. त्यांच्या निबंध लेखनाचा आशय आधुनिक वाङमयाच्या इतिहासात एकमेवाद्वितीय आहे. त्यांचे हे दोन्ही ग्रंथ लोकांना भविष्यातही दिशादर्शक ठरतील. समाजात कोणावर अन्याय, जुलूम आणि जबरदस्ती झाल्यास कोणाचीही हिडमुर्वत न ठेवता अत्यंत धाडसाने अन्यायाविरुद्ध लोकांना जागरूक केले. राज्य व्यवस्थेतील दोष जबाबदार सरकारच्या निर्दशनास आणून देण्यासाठी सतत वृत्तपत्राचा उपयोग केला.

**केसरीतील निवडक निबंध**

आगरकरांनी केसरी वृत्तपत्रांमध्ये सामाजिक जागृतीसाठी अनेक प्रबोधन पर लेख लिहिले. केसरीतील नाविन्यपूर्ण लेख अधिकाधिक वाचकांना उपलब्ध होण्यासाठी केसरी वृत्तपत्राच्या वाचक आणि हितचिंतकानी

त्यांच्याकडे मागणी केल्यामुळे त्यांनी "केसरीतील निवडक निबंध या नावाची दोन पुस्तके अनुक्रमे 1887 आणि 1888 मध्ये संपादन प्रसिद्ध केली."[11] म्हणजेच आगरकर केसरी वृत्तपत्राचे संपादक असताना केसरीतील निवडक निबंध या नावाने प्रसिद्ध केलेल्या या दोन ग्रंथांमध्ये त्यांनी आटोपशीर पद्धतीने लिहिलेल्या समाज उपयोगी लेखाचा संग्रह केला आहे

**सुधारक वृत्तपत्र**

लोकमान्य टिळकांबरोबर वैचारिक मतभेद झाल्याने आगरकरांनी सन 1887 मध्ये केसरी चा राजीनामा देऊन 1888 पासून सुधारक नावाचे स्वतंत्र वृत्तपत्र चालविले. त्यांनी या वृत्तपत्रातून लेखणी अत्यंत संयमाने चालवून आपले विचार सभ्यपणे वाचकाच्या मनावर ठसविले होते. त्यांची सामाजिक निरीक्षण शक्ती अत्यंत पराकोटीची सूक्ष्म आणि पल्लेदार होती, प्रतिपक्षावर धारदार लेखणीचा प्रहार करून ते सडेतोड युक्तिवाद करत असत. वृत्तपत्र चालविताना "न्याय, नीती, समता व स्वातंत्र्य या चतु:सूत्रीवर राजकीय, सामाजिक, औद्योगिक कसला का विषय असेना, घासून तो स्पष्टपणाने व धाडसाने मांडणे पत्रकर्त्याचे काम आहे."[12] अशी त्यांची ठाम भूमिका होती. सुधारक वृत्तपत्राद्वारे त्यांनी लोकशिक्षणाचा उद्देश साध्य करून महाराष्ट्र जनाच्या जीवनात परिवर्तन घडवून त्यांचा स्वाभिमान जागृत केला.

स्त्री विषयक प्रश्नावर लेखन करताना त्यांनी अत्यंत संयमाने लेखन करून सुधारणाविरोधकांवर विचाराने प्रहार केले. तत्कालीन सामाजिक प्रश्न, प्रसंग आणि व्यक्तीबाबत स्पष्ट चित्र उभे करण्याचे काम त्यांच्या सामर्थ्यवान लेखणीने केले. समाज प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून सुधारक साप्ताहिकाची त्यांनी सुरुवात केली. इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार, अशा खणखणीत शब्दात त्यांनी सुधारकाचे धोरण निश्चित शब्दात व्यक्त केली आणि शेवटपर्यंत त्याच निर्धाराने सुधारकाचे संपादन केले. त्यांनी सुधारकातून बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेतून आपले विचार अत्यंत मुक्तपणे समाजापर्यंत पोहोचविले होते.

**वाक्यमीमांसा**

आगरकरांनी मराठी व्याकरणावर लिहिलेला क्रांतिकारी ग्रंथ म्हणजे व वाक्यमीमांसा होय. "वाक्याचे पृथक्करण व एकीकरण यांच्या नियमाविषयीचे हे व्याकरणविषयक पुस्तक विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे."[13] त्यांनी इंग्रजीप्रमाणे मराठी भाषेस उत्तरोत्तर काळात उन्नतवस्था प्राप्त होण्यासाठी वाक्यमीमांसा करण्याचा सन 1888 मध्ये सर्वप्रथम प्रयत्न केला. मराठी भाषेत "मराठी वाक्य आणि अवयव याचे विवेचन करणारे इंग्रजी भाषेच्या संपर्कातून मराठी भाषेची समृद्धी विकसित करण्यासाठी म्हणून 'बेन' च्या इंग्रजी व्याकरणाबरोबरच ऑरनॉल्ड, व्हिटने आणि मोरेल हायले,"[14] इत्यादींच्या व्याकरण विषयक ग्रंथांच्या आधारावर 'वाक्यमीमांसा' हे तिसरे पुस्तक लिहिले. पाश्चात्य विचार आणि भाषेचा प्रसार वाढला तरी मराठी भाषेचे महत्व आणि विकास 'वाक्यमीमांसा' या ग्रंथातून होईल अशी त्यांची खात्री होती. संस्कृत आणि इंग्रजी भाषेतील वाक्यरचनेची पद्धती मराठी भाषेच्या वाक्यरचनेसाठी वापरली जाऊ शकत नाही असा वाक्यमीमांसा ग्रंथातील लेखनावरून त्यांचा दृष्टिकोन होता.

''वाक्यमीमांसा' या छोट्या प्रबंधात त्यांनी वाक्य हा भाषेचा मूळ घटक कल्पून त्यातील उद्देश व विधेय या विभागांना अनुसरून शब्दाचे परीक्षण व वर्गीकरण करून दाखविले आहे."[15] यातून वाक्यातील उद्देश, विधेय आणि क्रियापदाचे महत्त्व विशद केले. त्यांनी आपल्या वृत्तपत्र आणि ग्रंथलेखनातून "महाराष्ट्रात नवी सृष्टी निर्माण केली. ती सृष्टी निर्माण करण्याइतकी प्रज्ञा इतकी सर्जनशक्ती आणि इतके वाणीचे प्रभुत्व त्यांच्या ठायी निश्चित होते."[16] या सर्व ग्रंथ लेखनातून त्यांचे व्यक्तिमत्व आणि लेखकाच्या अंगी साजेसे असणारे गुणविशेष पदोपदी दिसतात. "पाठीशी मुळीच द्रव्यबळ नसता द्रव्य साधनाकडे साफ दुर्लक्ष करून शाळेसारख्या बिनकिफायतीच्या व्यवसायात उत्साहाने पडणारे सुधारक आगरकर"[17] हे एकमेव होते. म्हणजेच आगरकर निर्धन अवस्थेत जन्माला आले आणि कोणतीही संपत्ती न जमविता निर्धन अवस्थेतच सन्न 1895 मधे मरण पावले.

थोडक्यात आगरकरांनी बुद्धीप्रामाण्यवादी व पुरोगामी भूमिका घेतल्याने समाजाचा त्यांच्यावर रोष होता. न खचता न डगमगता समाजाच्या रोषास तोंड देत विवेकपणाने लेखणी चालवून विविध स्वरूपाची ग्रंथरचना केली. स्वतः आगरकर ज्या काळात आणि ज्या परिस्थितीत सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक परिस्थितीवर लेखन करीत होते, त्या काळात भारतीय समाजात होणारा बदल बाल्यावस्थेत होता.

**प्रस्तुत संशोधनाचा वेगळेपणा**

भारतीय समाजाची परिस्थिती सुधारण्यासाठी आगरकरांचे अंतकरण तळमळत होते. अशिक्षिताप्रमाणेच उदासीन बनलेल्या सुशिक्षितांना समाजसुधारणेच्या माध्यमातून खडबडून जागे केले. त्यांनी परंपरानिष्ठ बनलेल्या लोकांना रूढीप्रियतेच्या खड्ड्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. ते राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्यवादी असून त्यांच्या अंत:करणात समाजाप्रती दया आणि करुणा होती. बालविधवा, केशवपन, सतीची चाल, अस्पृश्यता, जातिभेद, उपेक्षित भोळ्याभाबड्या स्त्रिया आणि दलितांना सोसावा लागणारा जुलूम, करावे लागलेले काबाडकष्ट यामुळे त्यांना संताप येत होता. यावरून तेकमालीचे बुद्धिप्रामाण्यवादी आणि प्रखर बुद्धिवादी होते.

**निष्कर्ष**

पाश्चात्य ज्ञानाने प्रबोधित झालेल्या आगरकरांनी समाजातील विषमता व अनिष्ट चालीरीती नष्ट करण्यासाठी कमालीचा पुढाकार घेतला. सामाजिक जीवनात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी नव्या विचारांची आणि नव्या जीवन पद्धतींचा अंगीकार केला पाहिजे असा व्यापक विचार आपल्या लेखनातून व्यक्त केला. भारतीय समाजाचे दारिद्र्य, सामाजिक अज्ञान आणि जातिभेदाच्या शृंखलानानी पोखरलेल्या समाजात त्यांनी लेखणीने प्रबोधन केले. समाजातील जातिसंस्था, गुलामगिरी, अस्पृश्यता, कर्मकांड, ग्रंथप्रामाण्य आणि धार्मिक-रूढी परंपरा तसेच बालविवाह, स्त्रीदास्यत्व, सामाजिक अंधश्रद्धा, केशवपन, सतीप्रथा यासारख्या अनिष्ट चालीरीतींनी गांजलेल्या व मरणोन्मुख झालेल्या लोकांना प्रबोधनाचाशिवाय पर्याय नव्हता. भारतीय समाजाची बौद्धिक दृष्ट्या अधोगती होऊन ते बंदिस्त व निर्जीव बनले होते, त्यांच्यात मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य आणि स्त्रियांची दुःखे दूर करण्यासाठी त्यांनी लेखनातून लोकशिक्षणाचा आग्रह धरला होता, अन्यायी, जाचक आणि खुळचट समजुतींवर त्यांनी आपल्या धारदार लेखणीने फटकारे मारले, आणि प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांना नामोहरम केले.

आगरकरांच्या अंगी वांङमय गुण असल्याने त्यांनी विविध प्रकारचे ग्रंथलेखन केले. तत्कालीन परिस्थितीत अत्यंत गंभीर विषयावर लेखन करून रेखीव व पद्धतशीर वांङमय निर्मिती केली. वाचकांच्या हृदयाला भिडणाऱ्या आकर्षक शैलीत त्यांनी लेखन केले. त्यांनी आपले सुधारणावादी विचार स्वतंत्र व पारदर्शक पद्धतीने मांडल्याने लोकशिक्षणाचा पाया घातला गेला. त्यांचे सुधारणावादी विचार त्यांच्या विविधांगी लेखनातून प्रतिबिंबित होतात. लेखनातून त्यांचा प्रखर युक्तिवाद, व्यासंगीपणा आणि निर्णायकक्षमता जाणवते. विविध विषयाची मार्मिक विवेचनपद्धत आणि विचारतत्वावरून त्यांच्या लेखनाच्या भारदस्तपणाचा प्रभाव जाणवतो

**संदर्भ**

1.सरदार गं. बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, व्हीनस प्रकाशन, पुणे, 1975, पृ. 181

2. देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1983, पृ .228

3. प्रिगोपाळ गणेश आगरकर ., राष्ट्रीय चरित्रमाला, पुणे, 1977 पृ .22

4. उपरोक्त, देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, पृ .224

**5. कोडोलीकर पु. द., महाराष्ट्राचे शिल्पकार लो:टिळक, महा राज्य साहि आणि संस्कृ मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, 2013, पृ .9**

6. आळतेकर मा.दा ., गोपाळ गणेश आगरकर ( चरित्र ), वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती, 1993, पृ .103

7. खांडेकर वि(व्यक्ती आणि कार्य) चरित्र-आगरकर .स ., गणेश महादेव आणि कंपनी, पुणे 1932, पृ .38

8. शिखरे दा. न. सुधारककर्ते आगरकर, कर्नाटक हाऊस चिराबाजार, मुंबई, 1953, पृ .33

9. मोरे सदानंद लो. बाळ गंगाधर टिळक, गंधर्व-वेद प्रकाशन, 2010, पृ .26

**10. कै. आगरकर गो. ग. (संपा.) केसरीतील निवडक निबंध, आर्यभूषण छापखाना, पहिले पुस्तक, दु. आ, 1937, पृ . 246**

11. फाटक न. र., लोकमान्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई, 1972, पृ. 50

12. गोखले पुआगरकरांची ओळख .पां ., इंद्रायणी साहित्य, सुधारित आवृत्ती, पुणे, 1969, पृ .123

13. उपरोक्त, खांडेकर विचरित्र-आगरकर .स ., पृ .67

14. कुंभार नागोराव, (संपा(, गो विचार : आगरकर .ग .दर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातूर, 1995, पृ .96

15. . उपरोक्त, देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, पृ. 247

16. सहस्त्रबुद्धे पु.ग ., केसरीची त्रिमूर्ती, केसरी प्रकाशन, प्रथमात्रती, पुणे, १९७४, पृ.206

17. उपरोक्त, फाटक न. र., लोकमान्य, पृ .24

# कोव्हीड काळामध्ये शैक्षणिक ग्रंथालयासमोरील आव्हाने

**डॉ.सौ.अपर्णा मकरंद कुलकर्णी..**
ग्रंथपाल, व्ही.पी. इस्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज & रिसर्च,सांगली.
मेल आयडी : aparnakul71@gmail.com

**सारांश :**
कोव्हीड हा जागतिक आपत्ती चा काळ २०१९ च्या शेवटी शेवटी सुरु झाला आणि २०२० मध्ये त्याने उग्र रूप धारण केले, आणि संपूर्ण जगावर त्याचा एवढा प्रभाव राहिला कि, त्यामुळे प्रत्येक क्षेत्रावर त्याचा काही काही प्रमाणात परिणाम दिसून आला. आरोग्य आणि वैद्यकीय घडामोडी इतक्या घडत गेल्या कि संपूर्ण जगभरातील सर्वच क्षेत्रात कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये उलथापालाथ घडत गेली. त्याच बरोबर सामाजिक, आर्थिक, राजकीय,सांस्कृतिक क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रामध्ये देखील अगदी प्रचंड प्रमाणात बदल होत गेले. ग्रंथालय आणि माहिती शास्त्र हे समाजाचे आणि शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वाचे अंग आहे. माहितीचा साठा संकलित करून वेळोवेळी उपभोक्त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे माहितीची देवाणघेवाण करणाऱ्या या क्षेत्राला देखील या जागतिक महामारीच्या आपत्तीमुळे काही प्रमाणामध्ये बदलावे लागते आहे. यामध्ये ऑनलाईन पद्धतीने सेवा देणे हि काळाची गरज बनत चालली आहे. या आपल्या सेवामध्ये बदल घडवून आणणे हे एक मोठे आव्हान आज शैक्षणिक क्षेत्रासमोर आणि त्यांच्याग्रंथालया समोर येऊन ठेपले आहे.

**कीवर्डस :** कोव्हीड 19, माहिती तंत्रज्ञान, ऑनलाईन शिक्षण पद्धती, सामाजिक अंतर, टाळेबंदी, ऑनलाईन ग्रंथालयीन सेवा, ई-रीसोर्सेस.

**प्रस्तावना :**
माहिती तंत्रज्ञानामुळे सर्वच क्षेत्रामध्ये क्रांती घडलेली होतीच, परन्तु सर्वच ठिकाणी त्याचा पुरेपूर वापर होताना दिसत नव्हता. कोव्हीडच्या एका सूक्ष्म अश्या विषाणूच्या संसर्गामुळे या माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे आता अपरिहार्य ठरले आहे. या विषाणूने सर्वांना सामाजिक अंतराचे भान ठेवणे अगदी अत्यावश्यक करून ठेवले आणि त्यामुळेच प्रत्येकाने आपापल्या घरात बसून या तंत्रज्ञानाच्या मदतीने सामाजिक माध्यमांच्या मदतीने ऑनलाईन पद्धतीने जोडले जाणे हि काळाची गरज बनली आहे. कोविड १९ अथवा करोना ही एक महामारीची साथ आरोग्य विषयक जागतिक आपत्ती आहे. या कोव्हीड च्या एका विषाणूने माणसाला एका वेगळयाच जीवनशैलीची सवय लावली. यामध्ये स्वच्छता ,निर्जन्तुकिकरण, आणि सामाजिक अंतर याला महत्व दिले गेले कारण हा विषाणूच तसा होता जो संक्रमित होत होता.

कोविड अथवा कोरोना म्हणजे नेमक काय ?

करोना व्हायरस रोग (COVID-19) हा संसर्गजन्य रोग आहे जो नव्याने सापडलेल्या करोना व्हायरसमुळे होतो. COVID-19 ने आजारी पडलेल्या बहुतेक लोकांना सौम्य ते मध्यम लक्षणे जाणवतात आणि विशेष उपचारांशिवाय बरे होतात. COVID-19 होण्यास कारणीभूत असलेल्या व्हायरसचे संक्रमण मुख्यत: एखादी संक्रमित व्यक्ती खोकल्यास, शिंकल्यास बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म द्रवबिंदूंद्वारे किंवा त्या व्यक्तीच्या श्वासोच्छवासाद्वारे होते. हे थेंब खूप जड असल्याने ते हवेत न राहता लगेच जमीनीवर किंवा पृष्ठभागांवर पडतात. एखादी व्यक्ती COVID-19 झालेल्या एखाद्या व्यक्तीच्या जवळ गेल्यास श्वासोच्छवासाद्वारे किंवा व्हायरस असलेल्या दूषित पृष्ठभागाला स्पर्श करून आपले डोळे, नाक किंवा तोंडाला स्पर्श केल्यास आपल्याला संसर्ग होऊ शकतो. आणि अश्या प्रकारे हा व्हायरस संक्रमित होताना आढळला. (https://lokmat.news18.com/national/corona-virus-india)

कोव्हीड काळामध्ये समाजावर आलेली बंधने :

ओपन समाजात लोक राहात होते, परंतु, सामजिक अंतराची वेळ समाजावर आल्यामुळे शासनाने टाळेबंदी जाहीर केली त्यामुळे टाळेबंदीच्या काळामध्ये लोक बंदिस्त समाजात राहू लागले. लोकांना घराबाहेर पडण्यासाठी परवानगी नसल्यामुळे लोक नोकरी, कामधंदा तसेच शिक्षण यापासून वंचित होऊ लागले. टाळेबंदीच्या या काळात असे अनेक बदल झाले. म्हणजेच या घटनेचा परिणाम अर्थव्यवस्था , शहरी समाज, गरीब, महिला, कामगार, गाव, यांच्या समाज मनावर दूरगामी होत गेले आणि होत आहेत. बंदिस्त समाजामध्ये मानवामध्ये परात्म भाव वाढला. त्याचा परिणाम म्हणून मानवाने तंत्रज्ञानचा मोठा उपयोग करून घ्यायचे ठरवले. या सोशल मिडीया च्या माध्यमा तून लोक एकत्र येऊ लागले. समोरासमोर भेट होणे शक्य नसल्यामुळे लोक ऑनलाईन पद्धतीने एकमेकास भेटू लागले. आणि

जवळजवळ प्रत्येकच क्षेत्रामध्ये या तंत्रज्ञाना चा वापर होऊ लागला. आणि ऑनलाईन शिक्षण पद्धती बंधनकारक होऊ लागली आहे.

कोव्हीड 19 : एक संवेदनशील कालखंड :

कोरोनाव्हायरस, उर्फ कोविड -19 नावामुळे एखाद्याचे शारीरिक आरोग्य आणि सुरक्षिततेबद्दल विचार करणे शक्य होते. यामुळे भीतीची भावना आणि रोग आणि आजारपणाची भावना उद्भवू शकते. सध्या ऑनलाइन आणि टेलिव्हिजनवरील बातम्यांकडे पूर्णपणे या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे. आपला फोन वापरणे किंवा बातमी ऐकल्याशिवाय चालू करणे अशक्य आहे. जे लोक आपली भीती व चिंता व्यक्त करतात त्यांच्याशी सोशल मीडिया गर्दी करत आहे. काही बाबतींत लोक दयाळू संभाषणे करण्याऐवजी आपल्या कुटुंबात या साथीच्या गोष्टी कशा व्यवस्थापित कराव्यात याविषयी चर्चा करीत आहेत. यासर्व प्रक्रियेमध्ये लक्ष केंद्रित आणि सामील असलेल्या प्रत्येकाच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. हा कालखंड अतिशय संवेदनशील आहे.

कोव्हीड 19 चा अनेक घटकांवरील परिणाम:

कोरोना व्हायरसचा उद्रेक झाल्यानंतर गेल्या काही दिवसांमध्ये शेअर बाजार कोसळल्याच्या बातम्या सर्वप्रथम ऐकायला मिळाल्या. कोरोनामुळे अर्थव्यवस्थेला खीळ, कोरोनामुळे शेअर बाजारात घसरण, गुंतवणूकदारांमध्ये अविश्वासाचे वातावरण अशा हेडलाइन्स सर्वांच्याच वाचण्यात किंवा ऐकण्यात येऊ लागल्या. पण अर्थव्यवस्था ही फक्त शेअर बाजार, गुंतवणूकदार या पुरतीच मर्यादित आहे का? अर्थव्यवस्था ही फक्त याच गोष्टींबद्दल नसते, तर आपल्याकडे जो किराणा येतो, भाज्या येतात, दूध येणं, वाहतूक हे सर्व घटक अर्थव्यवस्थेत येतात. त्यामुळे कोरोनाचा एकूण अर्थव्यवस्थेबरोबरच दैनदिन जीवनावश्यक गोष्टीवर देखील खोलवर परिणाम परिणाम झाला.

कोव्हीड 19 चा शिक्षण क्षेत्रावरील वरील परिणाम:

Education can be defined as the process of acquiring knowledge or habit through instruction Or study. Education is the process of bringing desirable change in the behavior of human Beings. The behavioral changes must be directed towards a desirable end. There should also be changed in Knowledge, attitude, skills and understanding. With the growing need of society, education has converted to many shapes such as adult, child, Physical, health, Technical education and so on.( https://www.passionineducation.com/types-of-education-formal-informal-non-formal/)

मानवाच्या वर्तणूकीमध्ये शिक्षणामुळे वैविध्यपूर्ण बदल घडून येतात. हेच वरील शिक्षणाच्या व्याखेवरून असे स्पष्ट होते आहे. म्हणूनच शिक्षण हि अविरत, अखंड चालणारी प्रक्रिया आहे, आणि ती चालू ठेवण्यासाठी सध्या च्या आपत्ती काळामध्ये ऑनलाईन पद्धतीचा वापर करणे हे अरिहार्य होऊन बसले आहे.

कोव्हीड 19 चा ग्रंथालयावरील परिणाम:

ग्रंथालय म्हणजे असा एक माहितीचा स्त्रोत असतो कि, ज्या ठिकाणी माहितीचा संचय वेगवेगळया स्वरूपामध्ये केलेला असतो आणि तो तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली मांडणी करून, त्याचे योग्य स्वरूपामध्ये व्यवस्थापन करून उपभोक्त्यांच्या मागणीप्रमाणे सेवेसाठी सज्ज ठेवलेला असतो. एएल ए च्या मते,ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे .....

The American Library Association defines the library as a collection of resources in a variety of formats being organized by the experts or information professionals provide access, convenient to the digital as well as to the physical information to targeted services and achieve the mission of educational needs by promoting society as a whole. Academic libraries is considered all those libraries which serve the university, colleges and its affiliated organizations provide services to their students, faculty and staff members. All larger institutions have their own libraries on their campuses which are specially serving the

various schools and department inside the institute some of the examples are health sciences, law and humanities libraries. (https://libguides.ala.org/library-definition)

कोव्हीड आपत्तीच्या या संवेदनशील काळामध्ये सर्व शाळा, महाविद्यालये ही काही काळांपुरती बंद होतील म्हणता म्हणता एका वर्षा बरोबरच दुसरे वर्ष देखील अनियमितझाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचा मोठा प्रश्न ऐरणी वर आला.त्यामुळेच ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय पुढे आला. संपूर्ण जगावर च ओढवलेल्या या आपत्ती मुळे सामाजिक अंतर पाळण्याच्य बंधनामुळे हि पद्धती रुजू झाली. सर्वत्र अध्ययन आणि अध्यापन सुरु झाले त्यामुळे त्याच्या अनुषंगिक येणाऱ्या गोष्टीमध्ये असणारी ग्रंथालये हि देखील सुरु ठेवणे अपरिहार्य च असल्यामुळे इ-शिक्षणाप्रमाणेच इ-ग्रंथालयीन सेवा देणे हे क्रमप्राप्तच ठरले.

वरील उल्लेख केलेल्या व्याख्येमध्ये माहितीचा जो वेगवेगळया स्वरूपामध्ये केलेला संचय हा ऑफ लाईन बरोबरच ऑनलाईन स्वरूपामध्ये उपभोक्त्यांना देणे हे एक आव्हाह्नच ग्रंथपालांसमोर येऊन ठेपले. माहिती तंत्रज्ञानामुळे हि क्रांती पूर्वीच घडलेली होतीच, परन्तु कोव्हीडच्या या काळामध्ये विषाणूच्या संसर्गामुळे या माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे आता अपरिहार्य ठरले आहे सर्वाना सामाजिक अंतराचे भान ठेवणे अगदी अत्यावश्यक करून ठेवले. मग ग्रंथालयांनी देखील अश्या पद्धतीने ऑनलाईन सेवा देण्यास सुरुवात करणे हे आव्हान जरी असले तरी ते आता शक्य झाले आहे.

ग्रंथालयातून आता कश्या पद्धतीने या सेवा देणे शक्य आहे ते पाहू............

सुरुवातीच्या काळामध्ये ग्रंथालये हि पारंपारिक स्वरूपामध्ये सेवा देण्यात तत्पर होती. परंतु संगणकाच्या शोधामुळे हि सेवा संगणक आणि संगणकीय जाळे यांच्या माध्यमातून अतिशय वेगवान पद्धतीने वाचकांपर्यंत विना अडथळा आणि विनासायास देता येणे तसेच वेगवेगळया इलेक्ट्रॉनिकस माध्यमाद्वारे हे अधिकच शक्य झाले आहे. या कोव्हीड च्या काळामध्ये हि सेवा देऊन वाचकांना हवी असलेली माहिती देता येणे शक्य होते आहे.

१. इमेल सध्याच्या बहुतांश ईमेल यंत्रणा इंटरनेटचा वापर करतातइलेक्ट्रॉनिक मेल ., ज्याला आपण रोजच्या वापरात ईमेल ह्या नावानी ओळखतो-, ती एका प्रकारची डिजिटल संदेशांची देवाण घेवाण आहे, जिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हवी असलेली माहिती त्यांच्या मेल आय डी वर पाठवून सामजिक अंतर ठेऊन देखील विद्यार्थ्यांची माहितीची गरज ग्रंथालयातून भागवता येते.

२.सोशल मिडिया :

मानवजातीच्या आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी क्रांती इंटरनेट आणि सोशल मीडिया क्रांती आहे. सोशल मीडिया ने संपूर्ण जगाला जवळ आणले आहे. आज अनेक व्यवसाय ऑफलाईन जगातून ऑनलाईन सोशल मीडिया वर आलेले आहेत. आजच्या युगात सोशल मीडिया जगातील सर्वात जलद संप्रेषणाचे साधन बनले आहे. सोशल मीडियाची लोकप्रियता लोकांमध्ये दिवसेंदिवस वाढत आहे आणि याचा उपयोग प्रत्येक वयातील लोक करीत आहेत. सोशल मीडियाच्या मदतीने कोणतीही बातमी खूप कमी वेळात जगभरात पोहोचवली जाते. वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे जगातील एका कोपऱ्यात बसलेला व्यक्ति दुसऱ्या कोपऱ्यातील आपले मित्र व नातेवाईक यांच्याशी संपर्क साधू शकतो व फक्त आवाज ऐकणे नव्हे तर त्यांच्याशी व्हिडिओ कॉल द्वारे समोरासमोर संपर्क प्रस्थापित करू शकतो. सोशल मीडिया चे अनेक प्लॅटफॉर्म आहेत. भारतासह जगभरात व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब इत्यादी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म प्रसिद्ध आहेत. याशिवाय फेसबुक, व्हॉटसअप व इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर आपले अकाउंट बनवून नवीन मित्र बनवले जातात आणि जुन्या मित्रांच्या संपर्कात राहिले जाते. सोशल मीडिया मुळे अनेक लहान मोठे व्यवसायिक ऑनलाइन स्वीच झाले आहेत. ज्यामुळे त्यांची विक्री वाढली आहे. ऑनलाईन आलेले सर्व व्यवसाय वेगाने प्रगती करीत आहेत. या सर्वात लोकप्रिय माध्यमाद्वारेग्रंथा लयीन सेवा देणे सहज शक्य झले आहे. वाचकांचे अकौंटस ओपन करून त्यावरून ग्रंठ्ल्यातील डिजिटल स्वरूपामध्ये उपलब्ध असलेली माहिती त्यांच्या पर्यंत पोहचविणे सोपे झाले आहे.

३. ई बुक्स: ई-पुस्तक म्हणजे एखाद्या पुस्तकाचे केलेले डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक रूपांतर होयपुस्तकाची पाने . किंवा चित्ररुपात न ठेवता ती वेगळया प्रकारच्या/पीडीएफटंकात साठविली जातात. जेणेकरून वाचक वापरत असलेल्या साधनाच्या पडद्याच्या आकाराप्रमाणे मजकूर आपोआप बदलतो आणि सुलभतेने वाचता येतो. (https://mr.wikipedia.org/wiki) अश्या प्रकारच्या ई बुक्स चा साठा आपल्या ग्रंथालया मध्ये ई डेटाबेस म्हणून संकलित केला तर वाचकांना हवे असलेले पुस्तक इ बुक्स स्वरूपामध्ये त्यांना हवे असेल त्यावेळी ग्रंथालयाकडून देता यु शकते.

4. ई प्रकाशने :

ज्याप्रमाणे ग्रंत, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, सार नियतकालिके, सूचीबद्ध साहित्य यांचे प्रकाशन केले जाते, त्याप्रमाणेच त्यांचे ई स्वरूपामध्ये म्हणजेच इलेक्ट्रॉनिकस स्वरूपामध्ये प्रकाशन केलं जाते त्या सर्व साहित्यास ई प्रकाशने असे म्ह्णतात.थोड्क्यात ई प्रकाशने म्हणजे वाचनसाहित्य ई स्वरूपामध्ये प्रकाशित करून विविध इलेक्ट्रोनिक्स साधनाच्या द्वारे वाचकांना असे साहित्य ई स्वरूपामध्ये पुरविणे.

5. वेब पोर्टल

एक वेबसाईट ज्यामध्ये विविध स्रोतांची माहिती एकत्रितपणे एकसारख्या पद्धतीने दाखवण्याच्या सुविधेला वेब पोर्टल असे म्हणतात.पोर्टल हा एक संग्रह आहे. पेज वर माहिती प्रदर्शित करण्यासाठी एक समर्पित क्षेत्र जे आकारावर अवलंबून असते. वेब पोर्टल ही एक खास डिझाइन केलेली वेबसाइट आहे जी बऱ्याचदा माहितीच्या एक्सेस बिंदू म्हणून काम करतेल शोध नेव्हिगेशनवेब पोर्ट .हे वैयक्तिकृत आणि वर्गीकृत सामग्रीचे लायब्ररी मानले जाऊ शकते ., वैयक्तिकरण, अधिसूचना आणि माहिती समाकलनास मदत करते आणि बऱ्याचदा कार्य व्यवस्थापन, सहयोग आणि व्यवसाय बुद्धिमत्ता आणि अनुप्रयोग समाकलन यासारख्या वैशिष्ट्ये प्रदान करते. ( https://mr.continuousdev.com/17352-web-portal-5553) याच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण करणे अतिशय सोपे आहे आणि हि सेवा एकत्रित किवा सामुहिक स्वरूपामध्ये उपभोक्त्यांना पुरविता येते.

कोव्हीड-19 काळातील ऑनलाईन सेवा देताना येणाऱ्या अडचणी :

वरील सर्व ऑनलाईन किवा डिजिटल स्वरुपामधील सेवे द्वारे उपभोक्त्यांना माहिती पोहचविणे हेसहज शक्य आहे. तरीदेखील यामधील काही अडचणी समोर येताना दिसतात. त्यामध्ये अनुक्रमे........

1. इंटरनेट सुविधा : प्रत्येक वाचकाकडे इंटरनेट सुविधा मिळेलच अशी खात्री ग्रंथालयीन कर्मचारी देऊ शकत नाहीत त्यामुळे अशा वेळी प्रत्यक्ष ऑफलाईन सेवा देणे हे क्रमप्राप्त असते. त्यावेळी सामाजिक अंतराचे भान राखून प्रत्यक्ष सेवा ह्या द्याव्या लागत आहेत.
2. कनेक्टिव्हिटी : एकावेळी अनेक वाचकांना जर सेवा द्यायच्या असतील तर प्रत्येक उप्भोक्त्याशी इंटरनेट द्वारा कनेक्ट होणे शक्य होईलच ससे नाही. त्यावेळी हे एक मोठे आव्हानच असते.
3. रेंज प्रोब्लेम : भारतामध्ये अनेक लोक जे ग्रंथालयाचे उपभोक्ते आहेत,अनेक विद्यार्थी आहेत जे ग्रामीण भागा मध्ये राहतात, जिथे नेटवर्क आणि मोबाईल रेंज चा मोठा प्रश्न आज हि आहे, तिथपर्यंत ऑनलाईन सेवा महत प्रयासाने द्याव्या लागतात.
4. सलग विद्युत पुरवठा : हा देखील असा मोठा प्रश्न ग्रामीण विद्यार्थासाठी वांरवार येते आणि ज्याठिकाणी UPS किवा Battery Backup मिळत नाही त्याठिकाणी ऑनलाईन सेवा देताना अनेक अडचणी निर्माण होतात.
5. निष्कर्ष : कोव्हीड 19 च्या काळातील ऑनलाईन सेवा देताना ग्रंथालयांनी काळाची गरज ओळखून आपपल्या ग्रंथालयांचे संगणकीकरण करून त्यापुढे जाऊन डीझीटायझेशन देखील करून आपले ग्रंथालय सुसज्ज आणि आधुनिक करून घेणे हि काळाची गरज बनली आहे. येणाऱ्या अडचणींवर वेळोवेळी तोडगे काढून इंटरनेटच्या अति उच्च दर्जाच्या सेवेशी जोडले जाऊन त्या माध्यमातून आपल्या उपभोक्त्यांपर्यंत ऑनलाईन जोडले जाणे हीच एक अति आवश्यक आणि अति महत्वाची सेवा आहे. आणि सदरची आव्हाने पेलता यावीत अश्या दृष्टीने ग्रन्थपाल आणि ग्रंथालयीन कर्मचारी हे देखील माहिती तंत्रज्ञानाची संपूर्ण माहिती असणारे असले पाहिजेत.

**संदर्भ :**

१. https://lokmat.news18.com/national/corona-virus-india
२. https://www.passionineducation.com/types-of-education-formal-informal-non-formal/
३. https://libguides.ala.org/library-definition
1. https://mr.wikipedia.org/wiki
2. https://mr.continuousdev.com/17352-web-portal-5553

# चिरकाल भूजल विकासात भूजल संचयन, पुनर्भरण आणि व्यवस्थापनाची भूमिका

**प्रा. डॉ. अनिल निवृत्ती शिंदे**
भूगोल विभाग प्रमुख, डॉ.सी.डी.देशमुख कॉलेज रोहा, ता.रोहा, जि.रायगड
ईमेल – anilshinde.geo@gmail.com

**सारांश**

संस्कृतमध्ये पाण्यास जीवन असे म्हणतात पाणी निसर्गाने दिलेली एक अनमोल भेट आहे. पाण्याशिवाय कोणत्याही ग्रहावर जीवनाची कल्पना केली जाऊ शकत नाही. आपल्याला माहीतच आहे की संपूर्ण विश्वामध्ये पृथ्वी हा एकमेव असा ग्रह आहे की जिथे जीवन आणि पाणी दोन्ही गोष्टी अस्तित्वात आहे. म्हणूनच आपण आपल्या जीवनात पाण्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि पाणी वाचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. आज, शुद्ध पाण्याची उपलब्धता ही जगातील सर्वात मोठी समस्या आहे. आपण केलेल्या अंदाजांची मर्यादा तोडत पाण्याचे संकट दिवसेंदिवस एक भयंकर रूप धारण करीत आहे, यामुळे देशातील बऱ्याच भागात राहणे खूप कठीण झाले आहे. निसर्गाने दिलेली ही समस्या नसून ती मानवी कृतींमुळे निर्माण झालेली एक समस्या आहे. गेल्या दोन दशकांत भूगर्भातील पाण्याचा अत्यधिक शोषण केल्यामुळे भारताच्या बऱ्याच भागांत पाण्याची पातळी झपाट्याने खालावली आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीतील घटीचा थेट परिणाम नैसर्गिक संपत्ती, पर्यावरण, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, कृषी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र इत्यादींवर होत आहे.यामुळेच भूजल संचयन,भूजल पुनर्भरण आणि भूजल व्यवस्थापन करून चिरकाल जल विकास साध्य करणे शक्य होणार आहे.

**संशोधनातील कूट शब्द :** भूजल संचयन, भूजल पुनर्भरण, भूजल व्यवस्थापन.

**प्रस्तावना :**

जागतिक जलसंपदा तज्ञ आणि कौन्सिल ऑफ कॅनडाच्या सदस्या मौधी बार्लो यांनी ब्लूकविनन्ट या आपल्या पुस्तकात लिहिले आहे की 20 व्या शतकात जागतिक लोकसंख्या तिप्पट झाली, परंतु पाण्याचा वापर सातपट वाढला. सन 2050 पर्यंत आपल्या लोकसंख्येमध्ये 3 अब्ज लोक जोडले जातील. ज्यासाठी पाणीपुरवठ्यात 80 टक्के वाढ आवश्यक आहे. हे पाणी कुठून येईल हे कोणालाच माहिती नाही. शुद्ध पाण्याची मागणी वेगाने वाढत आहे, परंतु त्याचे स्रोत केवळ मर्यादितच नाहीत तर कमी देखील होत आहेत.

जगात उपलब्ध असलेल्या जल स्रोतांपैकी पृथ्वीवर सध्या अस्तित्त्वात असलेले सुमारे 97.2% पाणी समुद्रातील खाऱ्या पाण्याच्या स्वरूपात आहे आणि उर्वरित 2.8% गोडेपाणी इतर स्रोतांच्या रूपात उपलब्ध आहे. पृथ्वीवरील उपलब्ध गोड्या पाण्यापैकी 68.7 % पाणी हिमनद्या आणि हिमखंड यातील बर्फाच्या रूपात उपस्थित आहे. 30.1% पाणी पृथ्वीच्या अंतर्गत भूगर्भात आहे. 0.3% पाणी पृष्ठभागावर आणि 0.9 % पाणी इतर स्वरूपात पृथ्वीवर उपलब्ध आहे. पृष्ठभागावरील उपलब्ध पाण्यापैकी 87 % पाणी तलाव, सरोवरे इत्यादींमध्ये आहे. तर 11% पाणी मातीतील ओलावा, वातावरणीय आर्द्रता इत्यादी स्वरूपात आहे आणि उर्वरित 2 % पाणी नद्यांमध्ये आहे.म्हणजेच पृथ्वीवर उपलब्ध पाण्यापैकी अतिशय अल्प पाणी जीवसृष्टीसाठी प्राप्त होते म्हणूनच पाण्याचा वापर नियोजनाने करणे गरजेचे आहे.ज्यामुळे पाण्याचे स्रोत चिरकाळ टिकून राहतील.

**विषय विवेचन :**

**चिरंतन किंवा चिरकाल जल विकासाचे उपाय**

**1. भूजल संचयन :**

भारतातील पाणी साठवण आणि व्यवस्थापनाचा इतिहास अनेक शतकांपूर्वीचा आहे. याचा पुरावा सिंधू खोऱ्यात प्रथम सापडला. तेव्हापासून आजपर्यंत देशाच्या विभिन्न क्षेत्रात गरजेनुसार जल संचयन आणि व्यवस्थापन यांचा वापर झालेला आहे.उदा. राजस्थानातील खड़ीन, कुंड आणि नाडी, महाराष्ट्रातील बंधारा आणि तलाव, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमधील बांधी, बिहारमधील आहर आणि पइन, हिमाचल मधील कुहल, तामिळनाडूमधील एरी, केरळमधील सुरंगम, जम्मू विभागातील कांडी भागातील पोखर, कर्नाटकमधील कट्टा ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाण्याचे जतन आणि जाण्याचे काही प्राचीन साधने होती जे आजही प्रत्यक्षात आहेत. आजही. या

पारंपारिक प्रणाली एकीकडे पाण्याची त्वरित गरजा भागवतात तर दुसरीकडे ती भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण करण्यास देखील मदत करते त्यामुळे भूजल शोषण आणि भूजल पुनर्भरण दरम्यान संतुलन राखण्यास मदत होते.

पारंपारिक प्रणाली ही त्या त्या परिसरातील पर्यावरणीय आणि संस्कृतीची देणगी आहे. यामध्ये त्या क्षेत्राच्या गरजेनुसार त्यांचा विकास होतो. या पारंपारिक प्रणालींनी केवळ काळाची कसोटी सहन केली नाही,तर पर्यावरणाशी सुसंगत राहून स्थानिक गरजादेखील पूर्ण केल्या आहेत. पर्यावरणाचे शोषण करणाऱ्या आधुनिक प्रणालींच्या उलट या प्राचीन प्रणाली पर्यावरणीय संवर्धनावर भर देतात. भूगर्भातील पाणी पुनर्भरण करण्याच्या सुलभ, उपयुक्त आणि स्वस्त तंत्रज्ञानाविषयी देशातील शेतकरी अज्ञानी नाहीत परंतु त्यांना प्रोत्साहनाची आवश्यकता आहे.शेतकऱ्यांना सांगितले पाहिजे की जिथे पाऊस जमिनीवर पडतो शक्यतो तेथेच त्यास अडवावे.उताराच्या काटकोनात नांगरणी व शेतास बांध बांधणे यामुळे पाणी साचले जाते. शेताच्या कडेला फळझाडे लावावीत. छोट्या-मोठ्या सर्व शेती क्षेत्रातील क्षेत्रानुसार तलाव तयार करणे आवश्यक आहे. गावपातळीवर मोठे तलाव बांधल्यामुळे गावाला पाणी मिळते, तसेच भूजल पातळीतही वाढ होते. देशातील मान्सूनचा सुमारे 75 टक्के पाऊस भूजल पुनर्भरणासाठी उपलब्ध आहे. देशातील वेगवेगळया पर्यावरणीय क्षेत्रांनुसार सुमारे 3 कोटी हेक्टोमीटर पाणी साठवता येते. तसेच रासायनिक शेतीऐवजी सेंद्रिय शेतीचा अवलंब करुन शेतीतील पाण्याचे नुकसान रोखता येऊ शकते.

**2. भूजल पुनर्भरण :**

पृथ्वीवर सतत पाण्याचे वाष्पीकरण होत असते आणि हे पाणी पावसाच्या स्वरूपात पुन्हा पृथ्वीवर पडते. ही संपूर्ण क्रिया जलचक्र म्हणून ओळखली जाते. पावसाच्या स्वरुपात पृथ्वीवर पडणारे पाणी अनेक माध्यमांमधून जमिनीत शोषून भूगर्भातील पाण्याच्या पातळीपर्यंत पोहोचते आणि भूजल पातळीचे प्रमाण वाढवते. यास आपण भूजल पुनर्भरण म्हणतो. आपण भूजल पुनर्भरण दोन प्रकारात विभागू शकतो.

**(अ) नैसर्गिक भूजल पुनर्भरण:** पावसाचे पाणी हा एकमेव स्त्रोत आहे जो पृथ्वीवरील पाण्याची उपलब्धता, जमिनीतील ओलावा, भूजल पुनर्भरण इत्यादीसाठी मुख्य स्त्रोत आहे. पावसाचे पाणी आणि नद्या, नाले, जलाशय, तलाव आणि शेती सिंचनासारख्या अन्य स्त्रोतांद्वारे भूगर्भातील पाणी आणि मातीचा ओलावा नैसर्गिकरित्या वाढतो. पावसाचे पाणी झरे,ओहाळ,नाले इत्यादीतून नद्यांपर्यंत पोहोचते आणि हे पाणी पृष्ठभागाच्या झिरपण्याच्या क्रियेनुसार नैसर्गिकरित्या त्यात शोषून घेते आणि भूजल पातळी वाढवते. ज्या खडकांमध्ये भूगर्भात पाणी साचले जाते त्यांना जलयुक्त खडक म्हणतात. सर्वसाधारणपणे जलयुक्त खडक रेती, वाळू, वाळूचा खडक किंवा चुनखडीचा बनलेला असतो. या खडकांमधून पाणी खाली उतरते ज्या ठिकाणी हे पाणी खाली जाणे थांबते त्या भागास भूगर्भातील पाण्याची पातळी म्हणतात.

**(ब) कृत्रिम भूजल पुनर्भरण:** पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या जमिन शोषून घेते आणि भूजल पातळीवर पोहोचते आणि त्याचे पुनर्भरण होते परंतु कालांतराने पाण्याची मागणी वाढल्यामुळे भूगर्भातील पाण्याचे शोषण वाढते ज्यामुळे भूजल पातळी आणि पुनर्भरण पातळीमधील अंतर वाढू लागते. या समस्येवर तोडगा म्हणून कृत्रिम पुनर्भरण तंत्र वापरून भूजल पातळी आणि पुनर्भरण पातळीमधील फरक कमी करता येऊ शकतो किंवा पूर्णपणे दूर केला जाऊ शकतो. कृत्रिम पुनर्भरण तंत्रांचा अवलंब करून, आवश्यकतेनुसार देशातील बऱ्याच भागांची भूजल पातळी वाढली आणि सकारात्मक परिणाम प्राप्त झाले आहे . त्या क्षेत्राचे भौगोलिक स्थान, त्या भागात पावसाच्या पाण्याची उपलब्धता आणि उपलब्ध स्त्रोतांच्या आधारे कृत्रिम भूजल पुनर्भरण तंत्राची निवड केली जाते. कृत्रिम भूजल पुनर्भरण तंत्रातील काही प्रमुख तंत्रे पुढील प्रमाणे आहेत.

1) लहान बंधारे बांधणी तंत्र

2) प्रवाह पसरवण्याचे तंत्र

3) पाझर तलाव तंत्र

4) विहिरी व तलाव पुनर्भरण संरचनेच्या स्वरूपात सुधारणा तंत्र

5) विहिरी आणि हातपंपांचे पुनर्भरण तंत्र

6) पुनर्भरण नलिका तंत्र

7) विस्तारित खोऱ्याव्दारे पुनर्भरण तंत्र

**3. भूजल व्यवस्थापन:**

कालांतराने, पाण्याची वाढती मागणी आणि त्याचा अंदाधुंद वापर पूर्ण करण्यासाठी भूगर्भातील पाण्यावरील वाढते अवलंबित्व यामुळे भूजल पातळी आणि भूजल पुनर्भरण यांच्यात दरी निर्माण झाली. भूजल शोषण आणि भूजल पुनर्भरण यांच्या दरम्यान संतुलन राखण्यासाठी भूजल शोषण आणि पुनर्भरण यांचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.
आपल्या देशातील जलसंपत्तीच्या व्यवस्थापनास बराच मोठा इतिहास आहे. प्राचीन काळापासून भारतीय भगीरथांनी, सभ्यता आणि संस्कृतीच्या विकासासह पावसाचे पाणी, नद्या, नाले आणि भूमिगत जल स्त्रोत विकास आणि महत्त्वपूर्ण प्रगती विचारात घेऊन भारताचे हवामान, मातीचे स्वरूप आणि इतर भिन्नता विचारात घेऊन व्यवस्थापन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले गेले होते.

सिंधू खोऱ्यात उत्खनना दरम्यान पाणी व्यवस्थापनाचा पहिला पुरावा सापडला. धौरविरमध्येही अनेक जलसंधारणाचे पुरावे सापडले आहेत. या भागातील पुराच्या पाण्याचा निचरा होण्याची फार चांगली व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे हडप्पाच्या काळात विहिरी बनवण्याची कलाही विकसित झाली होती .

**(अ) शेतीमधील जल व्यवस्थापन:**

पाणी व्यवस्थापन कृषी क्षेत्रापासून सुरू केले पाहिजे कारण शेतीत जास्तीत जास्त पाण्याचा वापर केला जातो आणि सिंचनामध्ये पाण्याचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. लोकांमध्ये असा विश्वास आहे की जास्त पाणी जास्त उत्पन्न मिळते मात्र ते चुकीचे आहे. पिकांच्या उत्पादनात सिंचनाचा वाटा 15 - 16 टक्के आहे. पिकासाठी भरपूर पाणी म्हणजे जमिनीत पुरेसा ओलावा होय . परंतु सध्याच्या शेती पद्धतीत सिंचनाचा वापर अंधाधुंधपणे केला जात आहे. पृथ्वीच्या गर्भाशयातून पाण्याचा शेवटचा थेंबही काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. सिंचनातील पाण्याचा गैरवापर ठिबक सिंचन, पाणी फवारणी तंत्रज्ञान आणि शेत समतल करून पाण्याचा दुरुपयोग रोखता येतो. पिकांना पूरक सिंचन करून उत्पन्न दुप्पट करता येते. पाणी किंवा सिंचन वापरताना हे लक्षात घेतले पाहिजे की जमिनीत नाही तर रोप किंवा रोपट्यात सिंचन केले जात आहे. या विकसित सिंचनाच्या सूक्ष्म सिंचन पद्धती वापरल्या जाऊ शकतात. जवळजवळ तीन दशकांत सूक्ष्म सिंचन प्रणालीसह फळ उत्पादनाच्या प्रक्रियेत असे आढळले आहे की इतर पारंपारिक सिंचन पद्धतींच्या तुलनेत सरासरी सरासरी 50 ते 60 टक्के पाणी वाचवले जाऊ शकते. शेतात सिंचनासाठी आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक तंत्रांचा वापर करून उत्पादनही वाढवता येते. पारंपारिक सिंचन तंत्राच्या जागी, आवश्यकतेनुसार काही सोप्या बदलांसह आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर करून सिंचन क्षेत्र वाढविण्यासह उत्पादन वाढविले जाऊ शकते.

**(ब ) निवासी क्षेत्रात जल व्यवस्थापन:**

देशात लोकसंख्या वाढत असताना, शुद्ध पाण्याची मागणीही वाढत आहे आणि ही गरज भागवणे ही खूप मोठी समस्या आहे. सध्या केवळ शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागातही पाण्याची समस्या भयंकर रूप धारण करीत आहे. या समस्येवर उपाय म्हणून शासकीय आणि स्वयंसेवी संस्था कित्येक कामे केली जात आहेत, परंतु ती अपुरी असल्याचे सिद्ध होत आहेत. निवासी भागात पाण्याच्या व्यवस्थापनासाठी काही साध्या उपाययोजना अवलंबल्या पाहिजेत.

(१) घरे, वसाहती किंवा कोणत्याही प्रकारच्या निवासी इमारती बांधताना निवासी जागेत पावसाच्या पाण्याची साठवण करण्यासाठी तरतूद करण्यासाठी विशेष काळजी घेतली पाहिजे.

(२) रहिवासी आवारात लोकांनी वापरलेले पाणी एक पद्धतशीर पद्धतीने गोळा केले जाऊ शकते आणि वनस्पती, बाग इत्यादींमध्ये पुन्हा पुन्हा वापरता येऊ शकते, आजकाल हे तंत्रज्ञान देशातील बऱ्याच निवासी वसाहतींमध्ये अवलंबले जात आहे.

(3) शहरी परिस्थितीत, हॉटेल्स आणि निवासी जागांमधील सांडपाणी स्वच्छ केले पाहिजे आणि ते पुन्हा वापरासाठी आणि भूमिगत पुनर्भरणासाठी वापरावे.

(4) जनतेला पाण्याची उपयुक्तता आणि वाढत्या समस्येबद्दल जागृत करण्याची आणि त्यांना पाण्याचा वापर सुयोग्य करण्यास प्रवृत्त करण्याची गरज आहे.

**( क ) औद्योगिक क्षेत्रात पाणी व्यवस्थापन:**

आधुनिक युगात कोणत्याही देशाच्या विकासासाठी उद्योगांचा विस्तार खूप महत्वाचा आहे. उद्योगांच्या योग्य विस्तार आणि विकासामुळे कोणत्याही राष्ट्राची आर्थिक स्थिती केवळ राष्ट्रीय पातळीवरच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही बळकट होते आणि लोकांना सामाजिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते. बहुतेक उद्योगांना पाण्याची गरज भासते म्हणूनच आधुनिकीकरणाच्या युगात बहुतेक उद्योग नद्या, तलाव व समुद्र किनाऱ्यावर पाण्याच्या उपलब्धतेमुळे उभे आहेत. उद्योगांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणे ही मोठी समस्या नाही परंतु या उद्योगांमधून विविध रसायने असलेले प्रदूषित पाणी त्यांच्यावर प्रक्रिया न करता सोडणे ही एक मोठी समस्या आहे. आज देशातील बऱ्याच भागांमध्ये उद्योगांद्वारे वापरल्या जाणाऱ्या पाण्यापेक्षा अनेक पटीने जास्त पाणी वाया जात आहे कारण त्याच्यात दूषित पाणी सोडण्यात येत आहे. देशातील बऱ्याच भागात शुद्ध पाण्याचे स्त्रोत मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत, परंतु उद्योगांद्वारे प्रदूषित पाणी सोडल्यामुळे या स्त्रोतांचे पाणी वापरासाठी योग्य नसते. सध्या या भागातील पाण्याचे स्रोत स्वच्छ व वापरण्यायोग्य होण्यासाठी शासकीय व गैरसरकारी पातळीवरील संघटनांकडून सर्व प्रयत्न केले जात आहेत ज्याचे फार चांगले परिणाम प्राप्त होत आहेत परंतु अद्याप पाणी व्यवस्थापनासाठी अजून बरेच काम बाकी आहे.

**निष्कर्ष :**

या समस्येचा सामना करण्यासाठी, पाणी व्यवस्थापनासह भूजल साठवण आणि पुनर्भरण यावर देखील विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. भूजल साठवण आणि पुनर्भारासाठी, त्या क्षेत्रानुसार नैसर्गिक किंवा कृत्रिम तंत्र अवलंबले जाऊ शकतात. कृषी क्षेत्र, निवासी क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्रातील आणि जेथे पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वाधिक शोषण केले जाते तेथे पाण्याच्या व्यवस्थापनासाठीही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. भूजल साठवण आणि व्यवस्थापनासाठी लहान बंधारे किंवा नाला बंधारे, विहिरी, तलाव व हातपंप पुनर्भरण करणे, प्रवाह पसरवण्याचे तंत्र, पाझर तलाव इत्यादी तंत्रांचा अवलंब करुन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भूगर्भातील पाण्याची साठवण आणि व्यवस्थापन यासाठी बरेच प्रयत्न केले जात असले तरी अलीकडेच भारत सरकारने या समस्येचे निराकरण करण्यासाठी जलशक्ती अभियानाच्या नावाखाली 2024 पर्यंत प्रत्येक गावात आणि प्रत्येक घरात पाणी देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या मोहिमेअंतर्गत देशातील सर्वाधिक बाधित जिल्ह्यांची निवड प्रादेशिक, राज्य व केंद्रीय अधिकारी व वैज्ञानिक यांच्यासमवेत करून काम सुरू केले आहे.तसेच यापूर्वीच या समस्येचे निराकरण करण्यासाठी शासकीय आणि स्वयंसेवी संस्था आणि तेथील मूळ रहिवाशांच्या सहकार्याने बरेच प्रयत्न केले जात आहे आणि बऱ्याच भागात सकारात्मक परिणाम देखील प्राप्त झाले आहे, परंतु अद्याप भूजल साठवण, पुनर्भरण आणि भूजल व्यवस्थापनाच्या क्षेत्रात युद्धपातळीवर काम करण्याची गरज आहे.

**संदर्भ :**

1. Milind Sohani "Lecture Note on water resources "(**www.cse.iitb.ac.in**) 2010 (5) Vedavati R Pujari,V. V. Diwan and V. V. Diwan Artificial Groundwater Recharging In India, Proceeding of International Conference SWRDM-2012
2. Gupta N. K., (1994). Needs and Possibilities of Artificial Recharge of Groundwater in North-Eastern Parts of
3. Haryana..Proceedings of Workshop on Environmental Aspects of Groundwater Development, Kurukshetra,
4. India, 4: 59
5. Gupta N. K., (1994). Needs and Possibilities of Artificial Recharge of Groundwater in North-Eastern Parts of
6. Haryana..Proceedings of Workshop on Environmental Aspects of Groundwater Development, Kurukshetra,
7. India, 4: 59
8. Bouwer, H. (2002): Artificial Recharge of Groundwater: hydrogeology and engineering. Hydrogeology Journal, 10 (1): 121-142
9. Jha B.M.. (2007) , Management of Ground water resources for Ensuring Food Security in India, National Ground Water Congress, New Delhi
10. Central Ground Water Board (2002), Master Plan for Artificial Recharge to Groundwater in India. New Delhi.
11. Central Ground Water Board (2006), Dynamic Ground Water Resources of India . New Delhi.

# वैद्यकिय व्यवसायातील अनैतिकता : एक विवेचन

**डॉ. अतुल म. महाजन**
तत्वज्ञान विभाग, रेणुका कॉलेज, नागपूर
ई—मेल: mahajan.atul79@gmail.com

**प्रस्तावना**

मानव समाजाचा उद्‌भव आणि विकासाचा इतिहास व नैतिक मूल्य आणि त्याविषयीच्या चिंतनाचा म्हणजेच नैतिक तत्वज्ञानाचा इतिहास हा एक जरी नसला तरी समान काळाचा आणि समानंतर तसचे एकमेकात गुरफटलेला आहे. याचे कारण असे की नैतिकतेच्या संकल्पनेशिवाय समाजाची संकल्पना उदयास येवू षकणार नाही. त्याचप्रमाणे नैतिकतेच्या संकल्पनेला सामाजिक पार्श्वभूमिची नीतांत आवश्यकता आहे. नीतिमत्तेशिवाय समाज नाही तर नैतिक तत्वांची अमलबजावणी समाजाशिवाय शक्य नाही.

परंतू काही तत्कालीन बाबींमुळे व्यक्ति हीतच महत्वाचे वाटायला लागते. व्यक्ती आणि सामाजीक हितांमध्ये घडून येणा—या परस्पर संघर्षातून किंवा वयक्तीचा एक गट आणि दुसरा गट किंवा एक व्यक्ती आणि दुसरी व्यक्ती यामधील संघर्षातून अनेक नीतिविषयक समस्या निर्माण होतात. या समस्यांचे समाधान जर यथोचितपणे झाले नाही तर समाजाचा विकास खुंटू शकतो किंवा तो मंदावतो तरी. ह्या समस्या सोडविण्यासाठी जे चिंतन पुढे आले ते चिंतन म्हणजे नीतिशास्त्र होय.

मानव भटक्या व विस्कळीत जीवनापासून मुक्त होऊन स्थिर व एकसंघ अशा स्वरूपाचे जीवन जगू लागला तेव्हा 'समाज' निर्माण झाला. स्वाभाविकच त्याने सर्वांना समान रीतीने लागू असणारे काही सामाजिक नियम तयार केले. या नियमांचे पालन सर्वांसाठी बंधनकारक केले. समाजाच्या प्राथमिक अवस्थेत हे नियम सर्वजण निमूटपणे पाडत असत. परंतु हे नियम का पाळायचे? असा साधा विचारही कोणी करत नसेल. समाज जसजसा प्रगत होत गेला तसतसा त्या समाजात स्वत:च्या बुध्दीने विचार करणाऱ्या व्यक्ती निर्माण होऊ लागल्या. परंपरेने रूढ केलेले नियम आपण जसेच्या तसे का पाळावेत? त्यात काही कालबाह्य झालेले नियम आहेत का? काही विवेकी नियम आहेत का? असा विचार या अनुषंगाने होऊ लागला आणि त्यातूनच नीतिशास्त्राचा जन्म झाला. नीतिशास्त्रच्या एकूण तीन शाखा मान्य आहेत.

१. आदर्शनीतिशास्त्र
२. आधिनीतिशास्त्र
३. उपयोजित नीतिशास्त्र

यापैकी आपण सदर लेखात उपयोजित नीतिशास्त्राची शाखा वैद्यकिय नीतिशास्त्रात असणा—या अनीतिंचे अध्ययन करणार आहोत. हे स्पष्ट व्हावे.

**उपयोजित नीतिशास्त्र**

उपरोक्त तीन शाखांपैकी उपयोजित नीतिशास्त्र ही शाखा अगदी अलीकडील काळात उदयास आली असे समजण्यात येते, पण असे समजणे गैर होईल कारण उपयोजित नीतिशास्त्र के विभिन्न प्रांत उपशाखा म्हणून समाविष्ट करण्यात आलेत आणि समाविष्ट करण्यात येत आहेत त्यापैकी अनेक उपशाखा यां विषयीचे अध्ययन विषय प्राचीन काळापासून चिंतनाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. उपयोजित नीतिशास्त्र एक उपशाखा म्हणून जरी आदर्श नीतिशास्त्र एवढे प्राचीन नसले तरी ते अगदी अलीकडील काळातले आहे, असे म्हणणे बरोबर होणार नाही. खरेतर एकूणच नीतिशास्त्र हे सामाजिक व्यवहार यांचे विषयी दिशादिग्दर्शन करणारे असल्याने ते व्यावहारिक आणि उपयोजित आहे असे म्हणणे रास्त ठरावे.

मनुष्य आपल्या जीवनात वेगवेगळ्या भूमिका पार पाडतो. त्याच्या जीवनातील असणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण अंगाचा विशेष विचार करण्यात येत नाही. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की व्यक्तीच्या व्यवसायाचा आणि अनेकवेळी नव्याने उद्‌भवणार्या परिस्थितीचे संदर्भ आदर्श नीतिशास्त्र विचारात घेतला जात नाही. मानवाचे जीवन वेगवेगळ्या कक्षांमध्ये विभागलेले असते एकच व्यक्ती स्वत:च्या घरी कुटुंब प्रमुखाची भूमिका निभावतो तर जीवनआपण करण्यासाठी रोजगाराच्या दृष्टीकोनातून तो कारखानदार, मजूर, डॉक्टर, वकील, अभियांत्रिक, शिक्षक, व्यापारी, राजकीय नेता, कारकून इत्यादी भूमिका वढवितांना दिसतो. मानवाला त्याच्या जीवनात अनेक चित्रविचित्र परिस्थितीला तोंड द्यावे लागते. इतकेच नव्हे तर ज्या वातावरणात तो राहतो त्या वातावरणाशी सुद्धा त्याला देणे लागते. अशा अनेक भूमिकेच्या संदर्भात आणि समस्येच्या प्रकाशात त्याला मार्गदर्शनाची गरज वाटणे स्वाभाविक आहे. कारण भूमिकांप्रमाणे वेगवेगळे आचरण आणि भिन्न भिन्न कर्तव्य असणारच. जीवनातील विशेषीकृत भागात कसे वागावे, काय करावे आणि काय करू नये या विषयी आदर्श नीतिशास्त्र अप्रत्यक्षपणे काहीही सांगत नाही

उपयोजित नीतिशास्त्र मात्र आदर्श नीतीशास्त्रातील आकारिक तत्त्वांच्या अनुरोधाने आचारसंहिता आणि मूल्यमापनाचे निकष पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

**उपयोजित नीतिशास्त्राच्या पुढीलप्रमाणे शाखा आहेत.**

१) पर्यावरणीय नीतिशास्त्र २) जैव–वैद्यकीय नीतिशास्त्र ३) व्यावसायिक नीतिशास्त्र. ४) क्रीडा नीतिशास्त्र ५) उद्योगांचे नीतिशास्त्र ६) प्रसारमाध्यमांचे नीतिशास्त्र, ७) कायद्याचे नीतिशास्त्र.

**वैद्यकिय नीतिशास्त्र**

माणूस आणि विविध प्रकारचे अतिसुक्ष्म ते महाकाय पशुपक्ष्यांचा नैतिक मूल्यांच्या दृष्टिकोनातून विचार करणारी उपयोजित नीतिशास्त्राची शाखा म्हणजे जीव नीतिशास्त्र. पृथ्वीवर जीवन कसे सुरु झाले, जीवनाचा अंत कसा होतो, वैद्यकीय संशोधनाची मूल्ये कोणती याचा अभ्यास हे जीव नीतिशास्त्राचे मुख्य विषय आहेत. जीव नितीशास्त्रातून वैद्यकीय नीती शास्त्राचा उगम होतो.

सार्वजनिक आरोग्य विषयक धोरण, जीवनाचा अंत करण्याची नीती, साथीचे रोग, सजीवांचे प्रजनन, प्राण्यांवरील प्रयोग, वैद्यकीय प्रशिक्षणात रोग्यावर प्रयोग करण्याचे नीतिशास्त्र, क्लोनिंग जीवन तंत्रज्ञान हे जीव नीतिशास्त्र आणि वैद्यकीय नीतिशास्त्र यांचे समान विषय आहेत.

वैद्यक व्यवसाय हा एक उदात्त व्यवसाय आहे या उदात्त व्यवसायात नीतिचा प्रश्न हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा या व्यवसायाचे स्थान सर्वश्रेष्ठ मानले जाते. या व्यवसायाचे मूलभूत ध्येय व्यक्तीच्या तसेच समाजाच्या आरोग्याचे रक्षण करणे हे आहे. याला जर आपण दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास शारीरिक आरोग्य सुधारून समाजाच्या कल्याणासाठी हातभार लावणे, हे वैद्यकीय व्यवसायाचे प्रमुख ध्येय आहे. म्हणूनच वैद्यकास 'भूतलावरील ईश्वर' असे म्हणतात. या कारणामुळे सर्वसामान्य लोक या व्यवसायाकडून फार मोठ्या प्रमाणात नैतिकतेची अपेक्षा करतात.

**वैद्यकाची कर्तव्ये**

वैद्यकिय व्यवसायात काम करणा–या व्यक्तींसाठी मानवी मूल्य शिकविणे हे वैद्यकिय नीतिशास्त्राचे कार्य आहे. आणि या व्यवसायात वैद्याची काय कर्तव्य आहेत, याचे विवेचन आपण करू.

१. वैद्याने उच्च प्रकारचे आदशात्मक आचरण करावे.

२. रूग्णाच्या दृष्टिने विचार करून कोणताही निर्णय घ्यावा, अधिक पैसा मिळविण्याचा हेतू ठेवू नये.

३. मानवाबद्दल आदर दाखवुन वैद्याने वैद्यकिय सेवा ही सेवाभावाने द्यावी.

४. रूग्णाशी व आपल्या सहका–यांशी वैद्याने प्रामाणीकपणे वागावे.

**वैद्यकीय नीतिशास्त्राची तत्वे**

प्रिन्सिपल्स ऑफ बायोमेडिकल एथिक्स या ग्रंथात वैद्यकीय नीतिशास्त्राची चार तत्वे दिलेली आहेत.

**१. रुग्णाची स्वायतत्ता :–** उपचार घेण्याचा अथवा नाकारण्याचा रुग्णाला पूर्ण अधिकार आहे यालाच रुग्णाची स्वायतत्ता असे म्हणतात.

**२. परोपकार भाव :–** डॉक्टरांनी केवळ रुग्णाचे हित पहावे म्हणजेच आर्थिक लोभ टाळावा.

**३. साधकता :–** अर्थात डॉक्टरने रुग्ण विषयी केवळ शुध्द व निखळ हितचिंतक वृत्ती बेळगावी. अर्थात रुग्णाला कोणत्याही परिस्थितीत इजा न पोचविणे हे या तत्त्वा मागचे उद्दिष्ट आहे. एकवेळ उपचार होऊ शकले नाहीत तरी चालेल पण रुग्णाची परिस्थिती आणखी वाईट होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**४. न्यायाचे तत्त्व :–** औषधांचा तुटवडा असताना उपलब्ध औषधांचे योग्य वाटप करणे आणि उपचार करत असताना कोणास कसे किती प्राधान्य द्यावयाचे याचे तारतम्य बाळगणे म्हणजे म्हणजे रुग्ण बाबत न्यायबुध्दी, रास्तपणा आणि समता बाळगणे होय.

वैद्यकिय नीतिशास्त्राची उपरोक्त तत्वे पाळली गेली नाही तर वैद्यकिय अनैतिकता किंवा अनीति जन्माला येते. आधुनिक काळात अनेक गोष्टींचा समावेश वैद्यकिय नीतिशास्त्रात झालेला दिसून येतो त्यामुळे अनेक प्रकारच्या नैतिक समस्या या क्षेत्रात निर्माण झालेल्या दिसून येतात. या नैतिक समस्या कोणत्या आहेत याचा थोडक्यात आढावा आपण येथे घेऊ.

**वैद्यकीय क्षेत्रातील अनैतिकता**

**१. वैद्यकिय क्षेत्रातील विरोधीकरण** :– ज्ञान व तंत्रविद्येचा विकास झाल्यामुळे आज वैद्यकीय क्षेत्रातील उपचार पध्दती ही पूर्वीसारखी राहिली नाही. पूर्वी एकच डॉक्टर विविध प्रकारच्या रोगांवर उपचार करीत असे. परंतु मात्र आज डॉक्टरांचे रोगानुसार वेगळेपण झालेले दिसून येते. आज डॉक्टर समूहाकडून उपचार होतांना दिसून येतो. तसेच डॉक्टर रग्गड फीज आज आकारू लागले आहेत. या व्यवसायातील सेवाभाव कमी होऊन सर्वत्र पैसा हेच ध्येय झालेले दिसते.

**२. जाहिरातबाजी :—** आज वैदिक वैद्यकीय व्यवसायातील अनेक डॉक्टर्स आपल्या व्यवसायाची जाहिरात करताना दिसतात. डॉक्टरने अशी जाहिरात करणे अनैतिक आहे. जर डॉक्टरांना जाहिरात करावयाची असेल तर कोणत्या उपचारासाठी किती खर्च अपेक्षित आहे आणि डॉक्टराचे शुल्क किती आहे, याचाही उल्लेख जाहिरातीमध्ये व्हायला पाहिजे. अन्यथा उपचारा दरम्यान अवाढव्य खर्च सांगितल्यास रुग्णाची व त्याच्या कुटुंबीयांची अवस्था वाईट होऊ शकते. जर जाहिरातीतच सर्व बाबींचा उल्लेख असेल तर वैद्य किंवा रुग्णालयावर कायदेशीर बंधन करता येते.

**३. पेटेंट/कॉपीराइट :—** एखादे औषध, वैद्यकीय उपकरण डॉक्टर तयार करतात तेव्हा त्याचे पेटंट त्यांनी घेतलेले असते अशा पेटेटंचा त्या डॉक्टरला न विचारता जर इतर डॉक्टर्स वापर करीत असतील तर ते अनैतिक समजायला हवे.

**४. मानव प्रयोग :—** आधुनिक काळात वैद्यकीय क्षेत्रात संशोधन करण्यासाठी मानवावर प्रयोग केले जातात. पण हा प्रश्न वैद्यकीय नीतिशास्त्राचा आहे. मानवावर प्रयोग करणे वैद्यकीय नीतिशास्त्राला मंजूर नाही. तसेच प्रयोग करताना अनेक अडचणी येतात खासकरून लहान मुलांच्या संदर्भात. मानव प्रयोग करत असताना त्या व्यक्तीची संमती असणे फार गरजेचे आहे. लहान मुलांच्या संदर्भात संमती कोण देणार मातापिता मुलांच्या संमतीशिवाय परवानगी देतील का? असे प्रश्न निर्माण होतात म्हणून यासंदर्भात मुख्य प्रश्न असा आहे की कोणत्या मर्यादिपर्यंत आणि कोणत्या परिस्थितीत मानवाच्या प्रयोगासाठी वापर केला पाहिजे? त्याचे काही विशिष्ट निकष असावयास पाहीजे.

**५. स्त्रीभृणहत्या :—** अलीकडच्या काळात निर्माण झालेली व माणुसकीला काळिमा फासणारी भयावह समस्या म्हणजे स्त्रीभृणहत्या होय. ही बाब वैद्यकीय क्षेत्रा पुरतीच मर्यादित नसून संपूर्ण मानव जातीला गांभीर्याने विचार करायला लावणारी आहे. युनिसेफच्या एका अहवालावरून आपणास असे दिसून येते की सुनियोजित पध्दतीने स्त्रीभृणहत्या केल्यामुळे भारतात पाच कोटी मुली नष्ट होऊ लागल्या आहेत. स्त्रीभृणहत्या मागचे प्रमुख कारण गर्भजल परीक्षण हे असले तरी अर्ध गर्भजल परीक्षण करून सरास मुलीच्या जन्म नाकारला जातो. वैद्यकीय क्षेत्राने दिलेल्या योगदानाने डॉक्टरांनी पैशासाठी सोनोग्राफी मशीनचा गैरवापर चालविलेला दिसून येतो. अशा अनेक कृत्यांसाठी डॉक्टरांनी नकार द्यायला हवा. परंतु त्यांना फक्त पैशाचा विचार असतो. एका आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी ९० लाख गर्भपात होतात. ही एक गंभीर समस्या आहे.

**६. सरोगेट मदर किंवा भाडोत्री माता :—** आधुनिक युग हे विज्ञानाचे युग म्हणून संबोधले जाते. विज्ञानाचा परिपाक म्हणून आज सरागेट मदर ही संकल्पना पुढे आलेली आहे. अपत्यहीन जोडप्यांना हा अधिकार एक आशेचा किरण ठरलेला आहे. परंतु या अविष्काराचा उपयोग करण्याऐवजी त्याला मोठ्या प्रमाणात पैसा कमवण्याचे साधन काही डॉक्टरांनी बनविलेले दिसून येते. उदाहरण द्यावयाचे झाले तर उत्तर भारतात या आविष्काराला डॉक्टरांनी पैसा कमविण्याचे साधन बनविले. ग्रामीण भागातील गरजू, गरीब महिलांना यासाठी तयार केले जाते आणि मोठ्या शहरातील दंपत्याकडून लाखो रुपये घेतले जातात. त्यातील थोडे फार पैसे गरीब स्त्रियांना द्यायचे व सर्व रक्कम डॉक्टर स्वत:कडे ठेवतात. यावरून असे दिसून येते की नीतिमूल्यांचा —हास होत आहे, तो थांबला पाहिजे.

**७. मानवी अवयवांची तस्करी :—** आज अनेक डॉक्टर वेगवेगळ्या रोगावर उपचार करत असताना किंवा गुंतागुंतीच्या रोगावर शस्त्रक्रिया करत असताना रुग्णाचे अवयव काढून घेतात. किडनी, लिव्हर, हृदय आणि अन्य अवयव काढून घेणे व ती लाख रुपयांना गरजूंना विकणे. अशा अनेक घटना आपल्याला वैद्यकिय क्षेत्रात घडतांना दिसून येतात. जे अनैतिक आणि बेकायदेशिर आहे.

**८. वैद्यकीय उपकरणांचा पुनर्वापर :—** अलीकडच्या काळात उपचारासाठी उपयोगात येणाऱ्या उपकरणांचा पुनर्वापर काही ठिकाणी होत आहे. जसे सलाईनसाठी वापरली जाणारी सुई, प्लास्टिक नळी, तापमापी इत्यादी उपकरणांचा पुनर्वापर करून आर्थिक नफा मिळवला जातो आहे.

**९. जन्मजात मुलांचे अपहरण :—** वैद्यकीय व्यवसायाला कलंक लावणारा धंदा म्हणजे हॉस्पिटलमधून जन्माला आलेल्या मुलांचे अपहरण करून विक्री करणे. अर्भकाच्या अशा बेकायदेशीर व्यापारात डॉक्टर प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे सहभागी झालेले असतात.

**१०. आवश्यक नसतानाही सिझेरियन करणे :—** एखाद्या महिलेची नॉर्मल प्रसुती होत असताना सुध्दा पैशाच्या हव्यासापायी डॉक्टर जबरदस्तीने सिजर करतात. त्याची फी रुग्णाला किंवा त्याच्या नातेवाईकाला भरायला लावतात. ही सुध्दा एक महत्वपूर्ण समस्या आज आपल्याला वैद्यकीय क्षेत्रात दिसून येत आहे.

**११. पिशाच्च शैल्य चिकित्सा :—** एखादा रुग्ण हा उपचारासाठी किंवा शस्त्रक्रियेसाठी एखाद्या नामांकित डॉक्टरकडे जातो परंतु अशावेळी तो नामांकित डॉक्टर स्वत: त्या रुग्णावर उपचार किंवा शस्त्रक्रिया न करता आपल्याच हाताखाली काम करणा—या नवशिक्या डॉक्टरकडून करून घेतो. या उपचारातून मिळणाऱ्या पैशाचा अगदी थोडा भाग त्या नवीन डॉक्टरला मिळतो. या उलट त्या नामांकित डॉक्टरला

काही न करता त्या शुल्कातील बराच मोठा हिस्सा तर मिळत असतो बरोबर प्रतिष्ठाही मिळते. या प्रकाराला पिशाच्य शैल्यचिकित्सा असे म्ह.तात. तसेच गभीर आजार नसूनही तो गंभीर स्वरूपाचा आहे असे भासवून शस्त्रक्रिया करावयास लावणे, चुकीच्या पध्दतीने शस्त्रक्रिया करणे या सगळ्या समस्या वैद्यकीय क्षेत्रात दिसून येतात.

**१२. बोगस अप्रशिक्षित डॉक्टरांची समस्या :—** वैद्यकीय व्यवसायाचे आकर्षण व बाजारू जाहिराती मधून मिळणाऱ्या भरपूर पैशामुळे अकुशल, अप्रशिक्षित व नकली वैद्यकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ते वैद्यक रुग्णाच्या जीवाशी खेळत असतात. स्पर्धा मोठ्यप्रमाणावर वाढल्यामुळे या डॉक्टरकडे कोणतेही वैद्य प्रमाणपत्र आणि शासनाची मान्यता असलेले प्रमाणपत्र नसतानाही, व्यवसाय करण्याचे परवाने नसतानाही ते आपले कार्य करत असल्याचे दिसून येत आहे.

**१३. अवयव प्रत्यारोपण :—** आज ज्याप्रमाणे सायकल किंवा यंत्राचे सुटे भाग बदलले जातात, त्याचप्रमाणे मानवी अवयवांचे प्रत्यारोपण करण्याचे तंत्र विकसित झाले आहे. मानव शरीरात असणाऱ्या प्रत्येक अवयवांचे आज प्रत्यारोपण होणे शक्य आहे. कित्येकदा तरी या नादुरुस्त अवयवांच्या ऐवजी प्राण्यांच्या अवयवांचे प्रत्यारोपण करण्याचे तंत्र आज विकसित आहे. असे जरी असले तरी एक जीव वाचविण्याकरिता दुसरा जीव घेणे योग्य आहे का? असा प्रश्न निर्माण होतो आणि समजा या प्रश्नास अनुमोदन दिले तर अनेक पशुंचे जीव धोक्यात येते. ही एक समस्या वैद्यकीय क्षेत्रात दिसून येते.

**१४. इच्छामरण किंवा दयामरण :—** मानवाला मरण्याचा अधिकार दिला जात नाही. पण मानवी जीवन हे सुखी, समाधानी व शांत असावे व मानवी जीवनाचा शेवट ही शांत, सुखी व समाधानकारक व्हावा या कल्पनेतून विसाव्या शतकात इच्छामरणाची संकल्पना पुढे आली. अनेक देशात विशिष्ट अपवादात्मक परिस्थितीत व्यक्तीला इच्छामरणाचा कायदेशीर अधिकार असावा अशी चळवळ उभी राहिली आहे. परंतु मानवाला इच्छामरणचा अधिकार द्यावा की नाही ही एक मोठी समस्या बनलेली दिसून येत आहे.

वैद्यकिय व्यवसाय एक उदात्त व्यवसाय आहे. मानवाची सेवा करण्याचे एकमेव साधन म्हणजे वैद्यकिय व्यवसाय आहे. असे असेले तरी पैशच्या हव्याश्यापोटी या व्यवसायात उपरोक्त प्रमाणे अनैतिकता असल्याचे दिसून येते. वैद्याकिय व्यवसायात दिसून येणारी जी अनैतिकता आहे ती नष्ट व्हायला पाहीजे. यातच मावतेचे आणि समाजाचे कल्याण असल्याचे म्हणता येईल. ही अनैतिकता दूर करण्याकरीता एक मनुष्य आणि एक डॉक्टर म्हणून काय करायला पाहीजे याचा थोडक्यात आढावा आपण घेवू.

**निष्कर्ष**

- वैद्यकीय क्षेत्र हा व्यवसाय किंवा व्यापार नाही तर ती एक सेवा आहे हे लक्षात ठेवायला पाहीजे.
- वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करतेवेळी प्रत्येक माणसाचे हे नैतिक कर्तव्य बनते की त्यांने संपूर्ण आयुष्यभर या क्षेत्राचा मान राखावा व या क्षेत्रातील जी संबंधित कर्तव्य आहेत ती कर्तव्यनिष्ठ बुध्दीने पार पाडावीत.
- पूर्वी आपल्याला फॅमिली डॉक्टरची संकल्पना दिसून येत होती. या फॅमिली डॉक्टर वर आपला पूर्ण विश्वास असायचा आणि त्या विश्वासामुळेच व्यक्ती अर्धा बरा होत असे. हा फॅमिली डॉक्टर फक्त आपल्या आजाराविषयी आपल्याशी चर्चा करत नव्हता तर आपल्या सुख आणि दु:ख यातही तो सहभागी असायचा. असा फॅमिली डॉक्टर असणे आजच्या काळात तरी अतिशय महत्त्वाचे आहे.
- तसेच डॉक्टराने आपल्या पेशंटला भरपूर वेळ द्यायला पाहिजे. परंतु आज मात्र हे घडताना दिसत नाही. तसेच पेशंट जेव्हा काही सांगतो तेव्हा त्याचे मुख्य मुद्दे डॉक्टरांनी नमूद करायला पाहिजे, तेव्हा रुग्णाला असे वाटेल की डॉक्टर माझ्याकडे लक्ष देत आहे. तसेच रुग्णाच्या प्रत्येक प्रश्नाला समाधानकारक उत्तर द्यायला पाहिजे आणि त्याला असलेल्या रोगावर काय उपचार आहेत याची त्याला माहिती द्यायला पाहिजे. तसेच डॉक्टरांनी पेशंट सोबत योग्य संभाषण करायला पाहिजे.
- जे डॉक्टर वैद्यकीय क्षेत्रात अनैतिकता निर्माण करण्यास जबाबदार आहेत, त्यांच्यावर वैद्यकीय असोसिएशनने आणि सरकारने गुन्हे दाखल करून योग्य ती शिक्षा द्यायला पाहिजे.
- डॉक्टर अभय बंग, डॉक्टर प्रकाश आमटे यासारखी उदाहरणे नवीन डॉक्टरांपुढे ठेवणे गरजेचे आहे.
- डॉक्टरांनी तळमळीने, सेवाभावी वृत्तीने जनसामान्यांची सेवा करायला पाहिजे. तसेच डॉक्टरने वैद्यकीय व्यवसाय सेवा हा धर्म मानून करायला पाहिजे
- डॉक्टरांना रुग्णाचा विश्वास संपादन करणे खूप महत्त्वाचे आहे. तसेच मी माझ्या सर्व रुग्णाला बघेन, सर्वांना समान वागणूक देईल, त्यांच्याशी बोलेन, माझे सर्व शिक्षण पणाला लावून त्यांच्या रोगाचे निदान करीन, निदान करायला ज्या टेस्ट आहेत तेवढ्याच टेस्ट करीन, जे माझ्या समजण्याच्या

पलीकडे आहे त्याकरिता दुसऱ्या डॉक्टरला रेफर करेल, एखाद्या व्यक्तीला एखादा रोग असेल तर तो गोपणीय ठेवीन, जाहीर करणार नाही. या सर्व गोष्टी डॉक्टरांना करणे बंधनकारक आहे. या सर्व गोष्टी डॉक्टरांना लादल्या जात नाही परंतु डॉक्टरांची ही नैतिक जबाबदारी आहे की त्यांनी या गोष्टीचे बंधन पाळायला पाहिजे.

शेवटी, 'वैद्य नारायण हरी' डॉक्टर परमेश्वराचे रूप आहे. जन्म आणि मृत्यू हे परमेश्वराच्या हातात असले तरी या जन्म आणि मृत्यूच्या मध्ये जो उभा असतो तो डॉक्टर. डॉक्टर आपल्या ज्ञानाने आणि कौशल्याने रूग्णाला मृत्यूच्या दारातून खेचून आणत असतो. म्हणूनच डॉक्टराला भूतलावरील ईश्वर समजण्यात येते. आणि वैद्यकिय व्यवसायाला सेवा. या व्यवसायाचे, सेवेचे पावित्र नष्ट होणार नाही याची खबरदारी घेणे, जबाबदारी घेणे आपले सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१. मिश्र, हृदय नारायण, एवं अवस्थी, जमना प्रसाद — नीतिशास्त्र की भूमिका, हरियाणा साहित्य अकादमी, चंण्डीगढ.
२. वर्मा, अशोक कुमार — नीतिशास्त्र की रूपरेखा, मोजीलाल बनारसीदास, दिल्ली.
३. पाठक, डॉ. दिवाकर — भारतीय नीतिशास्त्र, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटना.
४. हेमाडे, श्रीनीवास — उपयाजित नीतिशास्त्र आणि पर्यावरण नीतिशास्त्र आणि वैद्यकिय नीतिशास्त्र.
५. साळुंके, डॉ. सुनिल — उपयाजित नीतिशास्त्र समस्या व उपाय, मैत्री प्रकाशन लातुर.
६. कवि, प्रा. माधवी — उपयोजित नीतिशास्त्र (व्यावहारिक नीतिशास्त्र), विद्या प्रकाशन, नागपूर.
७. साळुंके, डॉ. सुनिल — उपयाजित नीतिशास्त्र, मैत्री प्रकाशन लातुर.

# विशिष्ट कालखंडाचा अभ्यास : संज्ञा व १९८० नंतरचा कालखंड (ग्रामीण भाग)

**डॉ. प्रज्ञा नागेश लामतुरे**
कला महाविद्यालय, भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे.

विशिष्ट कालखंडाचा अभ्यास ही एक महत्त्वाची संज्ञा आहे. कारण प्रत्येक कालखंड हा अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक व वैज्ञानिक घडामोडींनी भरलेला असतो व या घडामोडीचा तत्कालीन समाज, व्यक्ती, सामाजिक संस्थांवर व इतर घटकांवर त्याचा परिणाम होत असतो. म्हणून प्रत्येक कालखंडाची स्वत:ची काही वैशिष्टये असतात. स्वत:चा गुणधर्म असतो.

विशिष्ट काळाचा आणि वाङ्मयाचा अन्योन्य संबंध अतिशय दृढ असतो. कोणत्याही देशातील किंवा समाजातील वातावरणाला वंश, भोवतालची परिस्थिती आणि विशिष्ट कालखंड या तीन गोष्टी कारणीभूत असतात. एखादी विशिष्ट साहित्यकृती जेव्हा जन्माला येते तेव्हा त्या प्रदेशातील मानव—मानवीवृत्ती, रुढी—परंपरा, जीवनशैली यांचा प्रभाव पडतो. तसेच ज्या काळात संस्कृतीची जडणघडण होते. त्या काळातील तत्कालीन परिस्थितीही साहित्य निर्मितीवर परिणाम करीत असते. म्हणून या अंगाने अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले. म्हणून त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधातून केलेला आहे.

विशिष्ट कालखंडाचा अभ्यास करताना सर्वप्रथम 'कालखंड' या संज्ञेचा विचार होणे आवश्यक आहे. या संज्ञेच्या संदर्भात उषा देशमुख म्हणतात, '' 'काल' आणि 'कालखंड' या संज्ञा तत्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, खगोल शास्त्रांतर्गत गणित, इतिहास इ. निरनिराळया अभ्यास शाखांमध्ये वापरले जातात. प्रत्येक ठिकाणचे त्यांचे अर्थ व धर्म वेगवेगळे आहेत. तत्वज्ञानामध्ये कालही संज्ञा शाश्वततेच्या संदर्भात येते. ज्योतिषशास्त्रामध्ये ग्रह नक्षत्राच्या गतिविधिनुसार ही संज्ञा निश्चित होते. खगोलशास्त्रांतर्गत गणितामध्ये काल ही संज्ञा अवकाशाचे व्यापकत्व व एकत्व नाहीसे करते आणि प्रवाहित्व तेवढे स्वीकारते. इतिहासशास्त्रात मानवसमूहांच्या विकासाचे मूल्यमापन करण्याच्या संदर्भात कालखंड ही संज्ञा एक गणनपध्दती म्हणून वापरली जाताना दिसते. वाङ्मय विद्येच्या संदर्भात 'कालखंड' ही संज्ञा इतिहासशास्त्रातल्या प्रमाणेच एक गणनपध्दती म्हणून वापरली जाताना दिसते.''[१]

काल ही अखंड, सतत चालणारी प्रवाही अशी नैसर्गिक प्रक्रिया असली तरी कालगणनेमुळे 'काल'चे खंड कल्पिता येणे शक्य झाले. कालखंडाची आणखी एक व्याख्या सांगताना त्या म्हणतात, ''निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित एका घटनेपासून कोणत्याही दुसऱ्या घटनेपर्यंतचा कालप्रवाह म्हणजे कालखंड.''[२] प्राचीन काळापासूनचा मराठी साहित्याचा अभ्यास करताना या व्याख्येची प्रचिती येते. काल सतत प्रवाही असतो. अनेक प्रकारचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक स्थित्यंतरे सतत होत असतात. कोणत्याही साहित्यात स्थित्यंतराची व बदलाची पाऊले उमटलेली असतात. म्हणून कोणत्याही साहित्यामध्ये स्थित्यंतर दिग्दर्शित करणाऱ्या महत्त्वपूर्ण वाङ्मयीन टप्प्यावर कालखंड कल्पणे योग्य मानले जाते. 'एखादी वाङ्मयीन परंपरा स्थिरप्राय होत असतानाच नवतेला जागा देते, तर कधी ती लवचिक होऊन नवतेला आपल्या प्रवाहात सामील करुन घेते. अशा टप्प्यांवर वाङ्मयीन स्थित्यंतर दृग्गोचर होते. हे स्थित्यंतर वाङ्मयाची निर्मिती, रचनाप्रकार, आशयशैली, प्रसूती कल्पिता येतो.[३] उदा. १९४५ नंतरच्या कालखंडाला नवसाहित्याचा कालखंड म्हणून ओळखले जाते. कारण अरविंद गोखले, गंगाधार गाडगीळ यांनी कथेला व बा.सी. मर्ढेकर यांनी कवितेला वेगळे वळण लावले. नुकतेच दुसरे महायुध्द संपले होते. या युध्दाचा अटळ असा परिणाम या कालखंडावर झाला. वरील तिन्ही लेखकांच्या साहित्यात त्याचे प्रतिबिंब स्पष्टपणे पडलेले दिसते.

''कथेतही इतर वाङ्मय प्रकारांसारखे ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, मनोविश्लेषणात्मक असे प्रवाह शोधता येतील. पण त्यापलीकडे जाऊन या कथेतून जी प्रेरणा दिसते ती आहे मानसिक पातळीवर आंतरिक वास्तवाचे दर्शन घडविण्याची. मग ते आंतरिक वास्तव सुशिक्षिताचे असेल, कर्णाचे असेल, क्रांतिकारकाचे असेल वा एखाद्या ग्रामजीवनात जगणाऱ्या सामान्य शेतमजुराचे असेल''[४] भा.ल. कुलकर्णीच्या या वक्तव्याची प्रचिती १९६० नंतरच्या ग्रामीण कथेतून येते.

अभ्यासाच्या सोयीसाठी, साहित्यकृतीच्या समग्र आकलनासाठी म्हणून कालखंड कसे मानावेत याचाही विचार येथे करता येतो. म्हणून तो खालील तीन मुद्यांव्दारे मांडला आहे.

१. वाङ्मयाची एकूण प्रवृत्ती पाहून साहित्याचे कालखंड कल्पिता येतात.
२. राजकीय, सामाजिक स्थित्यंतरानुसार कालखंड कल्पिता येतो.
३. लेखकांनुसार किंवा वाङ्मयप्रकारानुसार कालखंड कल्पिणे.

या तिन्ही प्रवृत्तीनुसार कालखंड कल्पून वाङ्मयाचा किंवा साहित्याचा अभ्यास केल्यास तो जास्त फलदायी ठरतो. उदाहरण म्हणून आपल्याला घेता येईल १८०० ते १९०० या कालखंडात ह.ना. आपटे, गोपाळ गणेश आगरकर, शि.म. परांजपे, श्री.व्यं केतकर, गोपाळ हरी, देशमुख, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, माधव ज्यूलीयन, कवी यशवंत, रविकिरण मंडळातील सर्वच कवी, ना.सी. फडके वगैरे कवी, कादंबरीकार, निबंधकार, नाटककार या सर्वांच्या साहित्याचा अभ्यास केल्यावर आपणास असे दिसून येते की, ही सारीच मंडळी काही नवे, वेगळेपण बहुतांशी समान असे जीवनमान आपापल्या लेखनकृतीमधून मांडत होती. पुन्हा आपण काही वेगळे मांडत आहोत याचे भान यापैकी बहुतेक जणांना होते. त्यामुळे त्यांनी जी साहित्यरुपे स्वीकारली होती त्यात म्हणजे त्यांच्या रुपात, घाटात काही नवे करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. म्हणजेच वाङ्मयीन प्रवृत्तींचा शोध घेऊन वाङ्मय प्रवाहाचे कालखंड करणे अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे ठरते.

विशिष्ट कालखंडातील साहित्याचा अभ्यास करताना काही दक्षता, काळजी घेणेही आवश्यकच ठरते. वास्तविक अशा अटी नि पथ्ये जे साहित्य अभ्यासायचे त्याच्या स्वरुपावर निर्भर असतात. तरीही कालखंडाची म्हणून काही मागणी असते. म्हणून ती दक्षता खालील बाबींव्दारे सांगता येईल.

१.यथायोग्य संशोधन ही कालखंडातल्या अभ्यासाची पूर्वअट होय.

२.राजकीय, सामाजिक, वैचारिक घटितांचा साहित्यनिर्मिती व एकूण वाङ्मयव्यापार यावर परिणाम होतो. त्यामुळे अशा घटितांचा अभ्यास हा कालखंडाच्या अभ्यासाकरिता आवश्यक असतो.

३.कालखंडाच्या अभ्यासात वाङ्मयीन साहित्यिक स्थित्यंतरांचा, वाङ्मयीन परंपरा व नवता यांच्या क्रिया—प्रतिक्रियांचा वाङ्मयसापेक्ष वेध घेता येणे महत्वाचे असते.

४.विवक्षित कालखंडाचा अभ्यास करताना तो विशिष्ट कालखंड हा एक स्वायत्य घटक असतो. त्या विवक्षित कालखंडाचे स्वत:चे काही गुणविशेष, काही धर्म असतात. त्या कालखंडाला स्वत:चे असे स्वरुप असते. त्याच्या अवकाशत त्या विशिष्ट कालखंडातील साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते. साहित्य आणि समाज यांच्या संबंधाचे अभ्यासक वेलेक आणि वॉरेन 'विशिष्ट कालखंड' या संज्ञेबद्दल म्हणतात, “The discussion of the period will at least raise all kinds of questions of literary history of the term and the critical programs as well as the actual stylistic changes the relationships of the period to all the other activities.”[5] विवक्षित कालखंडावरचे हे भाष्य अभ्यास विषयाच्या वरील प्रतिपादनाला पूरक आहे.

५.विशिष्ट कालखंडात साहित्य निर्मितीची व एकूण साहित्य व्यापाराची काही विशिष्ट केंद्रे कार्यरत असतात. कालखंड बदलला की ही केंद्रे बदलतात. उदा. ११व्या शतकात म्हणजे मराठीच्या मध्यआरंभ काळात पैठण, ऋध्दिपूर, १८०० ते १८७५ म्हणजे या कालखंडात मुंबई तर १८७५ नंतर पुणे हे केंद्र कार्यरत असल्याचे दिसते. १९८० नंतर मराठवाडा, विदर्भ हे ही वाङ्मय निर्मितीची केंद्रे बनू लागलेली दिसतात. कालखंडाच्या अभ्यासात साहित्याच्या संदर्भात कार्यरत असणारी अशी केंद्रे निश्‍चित करण्यास महत्त्व असते. ग्रामीण भागही साहित्यनिर्मितीची केंद्रे बनू लागला. साहित्यनिर्मिती, प्रकाशन व्यवहार, भाषाअभ्यासाची केंद्रे, वेगवेगळी नियतकालिक, मासिक यांची केंद्रे वाढू लागली.या कालखंडात ग्रामीण साहित्यात एखाद्या साहित्य प्रकाराने वा लेखकाने या काळावर आपले अधिराज्य गाजवलेले किंवा इतर सर्व प्रवृत्ती प्रवाहांना त्याने झाकोळून टाकले असे होत नाही. १९८० नंतर ग्रामीण भागात सकारात्मक व नकारात्मक असे असंख्य बदल झाले. १९७२ च्या दुष्काळाचा खेडयावर, शेती, शेतकऱ्यावर, शेतमजुरावर आणि पर्यायाने ग्रामीण समाजजीवनावर मूलगामी परिणाम झाला. शेतीवर भरवसा राहिला नाही. ग्रामीण सुशिक्षित तरुणाला नोकरी ही चरितार्थाची गरज वाटू लागली. खेडूत कुटुंब केवळ शेतीवर तग धरेनासे झाले. शेतीला जोडधंद्याची गरज भासू लागली. शेतीविषयी प्रेम, आपुलकी, श्रध्दा राहिली नाही. शहराचे नवे आकर्षण निर्माण झाले. १९७२ चा दुष्काळ, घडलेल्या राजकीय उलथापालथी यांचा परिणाम ग्रामीण सामाजिक, गट तट उदयास आले. खेडयातले सहकारी साखर कारखाने, ग्रामपंचायती, पतसंस्था, सहकारी बॅंका यातून गरजेचे, वजाबाकीचे, सत्तासंघर्षाचे राजकारण सुरु झाले. त्यातूनच भ्रष्टाचारास ऊत आला. राजकीय नितिमत्ता संपली. आदर्श राहिले नाहीत आणि सामाजिक परिवर्तनास खीळ बसली. सामान्य शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, दलित आणि ग्रामीण समाजच या खेळीचे भक्ष बनले. म. गांधीजींनी खरा भारत खेडयात आहे असे संगितले होते. परंतु १९८० नंतर मात्र भारतऐवजी 'इंडिया' खेडयात निर्माण झाला आणि गांधीच्या ग्रामराज्याचे स्वप्न धुळीस मिळाले.

१९८० नंतर शिक्षणाच्या 'विनाअनुदानित' या धोरणाने गोरगरिबांना शिक्षण दुरापास्त झाले. विनाअनुदान या प्रयोगातून शिक्षणाचा व्यापार करणारे नवे शिक्षण सम्राट उदयास आले. गुणात्मक शिक्षणाविषयी प्रश्‍नचिन्हं निर्माण झाले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे यातून पुढे शिक्षण महाग होण्याच्या प्रक्रियेस चालना मिळाली. परिणामी कुटुंबाच्या चरितार्थास शेती हातभार लावीत नाही म्हणून शिक्षणाकडे वळलेल्या ग्रामीण तरुणाला दिशाच राहिली नाही. तो एका भविष्यहीन दिशेने भरकटत गेला. वाचन, लेखन व श्रवण संस्कृती खेडयातही दूरदर्शनने पळवून लावली आहे. कौटुंबिक नातेसंबंध ताणले गेले आहेत. नात्यानात्यात सुप्त संघर्ष चाललेला दिसून येतो. एकूण ग्रामीण जीवन सत्यहीन, मूल्यहीन बनत चालले आहे. शासनाचे भांडवलदार धार्जिणे व शेतीविपरीत धोरण, आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी आणलेली बी—बीयाणे, औषधे व इतर पर्याय नसल्याने त्याला बळी पडलेला शेतकरी, खेडयात रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून मोठया प्रमाणात शहराकडे येणाऱ्या खेडयातल्या माणसाचे विस्थापितासारखे जगणे, शेतीच्या भांडवली खर्च व उत्पन्न यातील वाढती दरी यामुळे आत्महत्येला प्रवृत्त होणारा शेतकरी, सहकारी साखर कारखान्यांचे श्रीमंताचे हित साधण्याचे धोरण यामुळे सामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्याची दोलायमाय अवस्था हे वास्तव १९८० नंतरच्या कालखंडाचे वास्तव आहे. या वास्तवाचे लेखन कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता यांच्या माध्यमातून अनेक साहित्यिकांनी केलेले दिसून येते.

१९८० नंतरच्या कालखंडाचे वैशिष्टय सांगताना रा.र.बोराडे म्हणतात, ''१९७७ पासून ग्रामीण साहित्याची चळवळ मूळ धरु लागली. मध्यवर्ती साहित्याचे उपांग म्हणून वाढणाऱ्या ग्रामीण साहित्याला ही चळवळ एक नवी अस्मिता आणि दृष्टी देणारी ठरली. त्यामुळे भाषा, सामाजिक दर्जा, साहित्य परंपरा इत्यादीविषयी १९५० पूर्वी न्यूनगंड बाळगणारे ग्रामीण साहित्य १९८० नंतर एका अभिनिवेशाने वाटचाल करु लागलेले दिसते. आपल्या सामाजिक जीवनातील तळाच्या वर्गाचे, भटक्यांचे आणि व्यावसायिकांचे अज्ञान भाग उजेडात आणणारे अनिल

अवचटांचे ललित लेखन नागर, ग्रामीण आणि दलित अशा सर्वांनाच आपलेसे वाटले. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, अरुण साधू यांनी सामाजिक कादंबरीचा सामर्थ्यपूर्ण आविष्कार घडविला. एकूणच मराठी समीक्षेचा लंबक मर्ढेकरी आकृतिवादाकडून जीवनवादाकडे झुकू लागला. दलित साहित्य चळवळीप्रमाणे ग्रामीण साहित्य चळवळीलाही तात्विक अधिष्ठान देण्याचे प्रयत्न झाले. 'गोतावळा', पाचोळाचा कादंबऱ्यांची कलात्मकता अधोरेखीत करण्याचा प्रयत्न करणारी समीक्षा ऐंशीनंतर मात्र त्यांच्या घडणीत गौण स्थानी असणाऱ्या सामाजिकतेचा उठाव देणारी नवी आकलने मांडू लागली.''[६]

सारांशरित्या विशिष्ट कालखंडाची संकल्पना स्वीकारुन साहित्याचा नेमका अभ्यास करता येवू शकतो. बऱ्याचवेळा व्यापक कालखंडात न दिसणारा, लक्षात न येणारा भाग हा छोटयाशा कालखंडात दिसू शकतो. किंबहुना विशिष्ट कालखंडाचा अभ्यास करण्यामागे हाच हेतू असतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संदर्भग्रंथ :**

१.वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, उषा देशमुख, 'वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मराठीचे अध्यासन आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९४, पान. ६७.

२.तत्रैव, पान नं. ७

३.तत्रैव, पान नं. ९

४.भाषा आणि संस्कृती, ना.गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८२, पान नं. ६४.

५.वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, उषा देशमुख, 'वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मराठीचे अध्यासन आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९४, पान नं. ६७.

६.ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, पान नं. ९७, प्रथम आवृत्ती २०१३.

# ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास

**प्रा. मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ[1] डॉ.के.बी कणकुरे[2]**

[1]संशोधक, विभाग प्रमुख, भूगोल विभाग, एस. एन. डी. टी. कला आणि एस.सी.बी.वाणिज्य व विज्ञान, महिला महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई.२०

[2]मार्गदर्शक, माजी प्राचार्य व भूगोल विभाग प्रमुख, पदव्युत्तर अध्ययन व संशोधन विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

**प्रस्तावना:**

भारतात साक्षरता, शिक्षण आणि सामाजिक जाणीवा असलेला समाज लोकशाही विकासात महत्वाची भूमिका बजावू शकतो हे लक्षात घेऊन साक्षरतेचा प्रसार केला जात आहे. कोणत्याही भाषेत एखादा मनुष्य जर वाचू किंवा लिहू शकत असेल तर त्याला साक्षर समजले जाते.साक्षरता आत्मसात करण्याचे प्रमुख साधन शिक्षण आहे. सात वर्षा वरील  किती व्यक्तींना वाचता व लिहिता येते यावरून साक्षरतेची टक्केवारी काढली जाते.सामजिक विकासात साक्षतेला खूप महत्त्व आहे.साक्षरते मधील बदल हे संस्कृती मधील बदलासी संबधित असते. भारतातील आदिवासी समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते. मुख्य शहरापासून दूर दुर्गम प्रदेशात आदिवासी समाज राहत असल्यामुळे त्यांच्या विकासात मोठ्या अडचणी आहेत.  त्याचा परिणाम साक्षरतेच्या प्रमाणावर देखील झालेला दिसतो. पुरुषा पेक्षा स्त्रियांच्या साक्षरतेची स्थिती अतिशय दयनीय आहे. तसेच ग्रामीण भागातील आदिवासी लोकांतील साक्षरतेचे प्रमाण आजही कमीच आढळते. त्यामुळे ठाणे-पालघर जिल्ह्यांत साक्षरतेची काय स्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनात ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा भौगोलोक अभ्यास अरण्यात आलेला आहे.

**ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी -**

आदिवासी हा शब्द Aboriginal  या इंग्रजी शब्दावरून आला आहे. “आदिवासी” म्हणजे नागरी संस्कृतीपासून अलिप्त असलेल्या; पण आपल्या स्वत:च्या अशा पारंपारिक वैशिट्यांनी निसर्गाच्या सहवासात फार पूर्वीपासून राहत आलेल्या आणि स्वतंत्र जीवन जगणारा लोकसमूह म्हणजे आदिवासी होय (व्यवहारे २००२). आदिवासी म्हणजे मूळ निवासी, विशिष्ट भौगोलिक प्रदेशात प्राचीन काळापासून राहणारे लोक (त्या-त्या प्रदेशातील मूळ निवासी) म्हणजे आदिवासी होय. ( गारे, २००१)

इ.स. १९६२ साली शिलॉग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासी ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, “एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या , एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव करणाऱ्या , तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या , अशिक्षित असलेल्या व रक्तसंबधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला ‘आदिवासी’ समाज म्हणतात.”

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवसी जमाती आहेत व त्यातील २५ आदिवासी जमातींची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे वितरण असमान आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने महादेव कोळी,ठाकर,कातकरी,वारली,कोकणा व मल्हार कोळी या जमातींचे लोक वास्तव्य करतात. याशिवाय आंध, बैगा, बारदा, बावचा, भैना, भारिया भूमिया, भात्रा, भिल्ल, भुन्जिया, बिन्झवर, बिर्हूल, चोधरा, धानका, धनवार, धोंडिया, दुबळा, गावित, गोंड, राजगोंड, हलबा, कमार, काठोडी, कवर, खैरवार, खारिया, कोकना, कोल, कोलम, कोळी ढोर , कोळी महादेव, कोळी मल्हार, कोंढ, कोरकू, कोया, नागेसिया, नैकडा, ओराओन, परधान, पारधी, परजा, पाटेलिया, पोम्ला, राठवा, सवर, ठाकूर, वारली, विटोलिया इ. आदिवासी जमातीचे लोक ठाणे – पालघर जिल्ह्यात राहतात.

ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातींचे सामाजिक , आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, रूढी,परंपरा यांच्यात विविधता आढळते. प्रत्येक जमातींची वेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातींचे सामाजिक जीवन हे त्यांच्या सभोतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत आलेल्या व रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य ‘आदिवासींचे’ जीवन त्यांची मुल्य आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. शेती बरोबरच पशुपालन व दूग्ध व्यवसाय करतात. तसेच लहान- मोठे जंगलावर आधारित व्यवसाय जसे फुले, फळे, मध, डिंक विकणे, बांबू पासून विविध वस्तू बनविणे,शेतमजुरी, नोकरी यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो.

**अभ्यास क्षेत्राचे स्थान आणि विस्तार –**

प्रस्तुत संशोधन ठाणे -पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास करताना अभ्यास क्षेत्र मर्यादित करताना ठाणे जिल्ह्याच्या विभाजन पूर्व क्षेत्राची निवड केली आहे. सद्यस्थितीत अभ्यास क्षेत्रात ठाणे आणि पालघर जिल्हे येतात .अभ्यास क्षेत्राचे अक्षवृत्तीय स्थान १८° ४२' उत्तर ते २०° २०' उत्तर असून रेखावृत्तीय स्थान ७२° ४५' पूर्व ते ७३° ४८' पूर्व आहे .अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ९५५८ चौ.कि.मी .आहे. अभ्यास क्षेत्राची दक्षिणोत्तर लांबी १४० कि.मी .व पूर्व-पश्चिम लांबी १०१ कि.मी. आहे .अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ९५५८ चौ.कि.मी. आहे. अभ्यास क्षेत्रात १५ तालुके येतात .२०११ च्या जनगणनेनुसार अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या १,१०,६०,१४८ एवढी असून महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.८४ %लोकसंख्या आहे . लोकसंख्येची घनता ११०६ इतकी आहे .आदिवासींच्या लोकसंख्येचा विचार केला तर २०११ च्या जनगणनेनुसार एकूण आदिवासींची लोकसंख्या १५,४२,४५१ असून एकूण लोकसंख्येपैकी १३.९५ %आदिवासी जमातींची लोकसंख्या आहे.




**नकाशा क्र. १ - ठाणे - पालघर जिल्ह्यांचे भौगोलिक स्थान, विस्तार, सीमा**

ठाणे जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला उत्तर कोकणातील सर्वात मोठा जिल्हा होता .१ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर हा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. या जिल्ह्यात ७ तालुके आहेत .ठाणे जिल्ह्याचे अक्षवृत्तीय स्थान १८° ४२' उ .ते २०° २०' उ .व रेखावृत्तीय स्थान ७२° ४५' पू .ते ७३° ४८' पू .असून एकूण क्षेत्रफळ ४,२१४ चौ.कि.मी .आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ८०,७०,०३२ आहे .तर लोकसंख्या घनता १९०० इतकी आहे.

पालघर जिल्ह्यात ८ तालुके असून पालघर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५,३४४ चौ.कि.मी .आहे .२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३०,१४,४३४ असून लोकसंख्येची घनता ५६४ एवढी आहे.

**अभ्यास क्षेत्राच्या सीमा** –अभ्यास क्षेत्राचा आकार साधारणतः त्रिकोणी आकाराचा आहे . याच्या पूर्वेला पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याच्या सीमा आहे. पूर्व आणि ईशान्येला नाशिक जिल्ह्याची सीमा आहे .उत्तरेला गुजरात आणि दादरा, नगर, हवेली हा केंद्र शाषित प्रदेश आहे .वाव्येयला अरबी समुद्र असून दक्षिणेला मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या सीमा आहेत.

**संशोधनाच्या मर्यादा –**

प्रस्तुत 'ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास' या संशोधनासाठी ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांचे भौगोलिक क्षेत्र घेतले आहे. या जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.यासाठी १९९१ पासून २०११ पर्यंतच्या २० वर्षाचा कालखंड संशोधनासाठी घेतला आहे. तसेच आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरता या वैशिष्ट्याच्या अभ्यास केला जाणार आहे.

**उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठीच्या उपाय योजना सुचविणे आहे त्यासाठी खालील उद्दिष्टे ठेवली आहेत.

१) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या स्त्री – पुरुष लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण अभ्यासणे.

२) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे ग्रामीण व नागरी भागातील प्रमाण अभ्यासणे.

३) अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेमध्ये १९९१ ते २०११ या कालखंडात झालेली वाढ अभ्यासणे.

**गृहीतके :**

ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोसंख्येतील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास करताना वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील गृहीतके मांडली आहेत.

१) ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेमध्ये प्रादेशिक भिन्नता आढळते.

२) ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात जास्त आढळते.

३) ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण स्त्री लोकसंख्येपेक्षा पुरुष लोकसंख्येत जास्त आढळते.

**अभ्यास पद्धती व माहितीचे स्त्रौत :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरुपाच्या माहितीचे स्त्रौत वापरले आहेत. द्वितीयक माहितीच्या स्त्रौतामध्ये ठाणे जिल्ह्याचे सांख्यिकीय हस्तपुस्तिका, जिल्हा जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, आदिवासी विकास विभागाचे अहवाल, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे अहवाल, भारतीय जनगणना विभागाचे अहवाल यांचा संशोधनासाठी उपयोग केला आहे.

माहिती व आकडेवारी संकलित केल्यानंतर त्याचे सांख्यिकीय पृथक्करण आणि वर्गीकरण करण्यासाठी तक्ते, आकृत्या, आलेख व नकाशे आवश्यक तेथे काढण्यात आलेली आहेत. सांख्यिकीय विश्लेषण व नकाशाशास्त्रीय तंत्राच्या वापरातून निष्कर्ष काढलेली आहेत.

**अभ्यास विषयाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनामध्ये ठाणे- पालघर जिल्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षतेचा आणि साक्षरतेच्या प्रादेशिक वितरणाचा, त्यावर परिणाम करणारे घटक या लोकसंख्याशास्त्रीय घटकाचा अभ्यास केल्यामुळे या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न सोडवण्यास मदत होईल.

**ठाणे -पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येची वैशिष्ट्ये –**

ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १५,४२,४५१ इतकी आहे. यात ७,६९,१९१ पुरुष लोकसंख्या व ७,७३,२६१ स्त्रियांची लोकसंख्या आहे. अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येची घनता १६१ प्रती चौ.कि.मी. आहे. २००१ ते २०११ या दशकातील आदिवासी लोकसंख्येची वाढ २७.४३% झालेली आहे. याच दशकात या जिल्ह्यांतील सर्वसाधारण लोकसंख्या वाढ ३६.०१% झालेली आहे याचा अर्थ आदिवासी लोकसंख्येच्या वाढीचा दर कमी आहे. या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या १३.९४% लोकसंख्या आदिवासी जमातींची आहे. येथील आदिवासी लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर १,००५ इतके आहे. आदिवासी लोकसंख्येमध्ये शिक्षणाचे एकूण प्रमाण ५८.८७% असून पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६८.५२% तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ४९.३२% इतके आहे.

**ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण –**

ठाणे-पालघर जिल्ह्यांच्या विभाजनापूर्वी २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या या जिल्ह्यात राहत होती. तसेच महाराष्ट्रातील सर्वाधिक नागरीकरण देखील याच झालेले असताना देखील याच जिल्ह्यांत आदिवासी लोकसंख्या देखील मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असलेली दिसून येते.या आदिवासी लोकसंख्येतील साक्षतेचे प्रमाण अतिशय कमी दिसून येते. त्याच बरोबर साक्षरतेच्या बाबतीत प्रादेशिक भिन्नता देखील मोठ्या प्रमाणात दिसून येते.इ.सन.२०११ च्या जनगणनेनुसार ठाणे –पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्ये मधील साक्षरतेचे प्रमाण पुढील प्रमाणे दिसून येते.

सारणी क्र.१ ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण २०११

| **अ.क्र.** | तालुके | | **साक्षरता टक्केवारी** | | | **पुरुष व स्त्री साक्षरता तफावत** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **एकून** | **पुरुष** | **स्त्री** | |
| १ | तलासरी | एकून | **५४.८४** | **६७.३६** | **४२.८७** | **२४.४९** |
| | | ग्रामीण | **५४.८४** | **६७.३६** | **४२.८७** | **२४.४९** |
| | | नागरी | **-** | **-** | **-** | **-** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | डहाणू | एकून | ४७.४१ | ५८.७० | ३६.७४ | २१.९६ |
| | | ग्रामीण | ४६.३९ | ५७.८२ | ३५.५८ | २२.२४ |
| | | नागरी | ६८.२७ | ७६.०१ | ६०.३३ | १५.५८ |
| ३ | विक्रमगड | एकून | ६१.४५ | ७०.९६ | ५२.१८ | १८.७८ |
| | | ग्रामीण | ६१.०५ | ७०.६५ | ५१.७० | १८.९५ |
| | | नागरी | ७६.१२ | ८२.५० | ६९.९७ | १२.५३ |
| ४ | जव्हार | एकून | ५४.८३ | ५३.१८ | ४६.७७ | ६.४१ |
| | | ग्रामीण | ५३.८४ | ६२.२९ | ४५.६९ | १६.६ |
| | | नागरी | ८२.४४ | ८८.१९ | ७६.१९ | १२.०० |
| ५ | मोखाडा | एकून | ५४.०८ | ६३.२१ | ४५.१५ | १८.०६ |
| | | ग्रामीण | ५४.०८ | ६३.२१ | ४५.१५ | १८.०६ |
| | | नागरी | - | - | - | - |
| ६ | वाडा | एकून | ६०.९१ | ७०.७७ | ५०.९७ | १९.०८ |
| | | ग्रामीण | ६०.५४ | ७०.५४ | ५०.४४ | १९.९६ |
| | | नागरी | ६७.७३ | ७५.०१ | ६०.४९ | १४.५२ |
| ७ | पालघर | एकून | ६१.८२ | ७२.०९ | ५१.९७ | २०.८७ |
| | | ग्रामीण | ५९.८५ | ७०.४० | ४९.५३ | २०.१२ |
| | | नागरी | ७४.४७ | ८२.३२ | ६६.७६ | १५.५६ |
| ८ | वसई | एकून | ६४.५९ | ७२.४४ | ५६.८४ | १५.६ |
| | | ग्रामीण | ५८.५१ | ६७.६३ | ४९.६१ | १८.०२ |
| | | नागरी | ६८.६३ | ७५.६० | ६१.७० | १३.९ |
| ९ | ठाणे | एकून | ८१.९८ | ८७.०८ | ७६.४५ | १०.६३ |
| | | ग्रामीण | ४६.४६ | ५३.५४ | ३९.०१ | १४.५३ |
| | | नागरी | ८२.३० | ८७.३८ | ७६.७९ | १०.५९ |
| १० | भिवंडी | एकून | ५७.०० | ६५.५५ | ४७.८० | १७.७५ |
| | | ग्रामीण | ५३.७२ | ६२.५९ | ४४.९२ | १७.६७ |
| | | नागरी | ७०.५५ | ७६.७१ | ६२.८४ | १३.८७ |
| ११ | शहापूर | एकून | ५८.१९ | ६८.४० | ४७.८० | २०.६ |
| | | ग्रामीण | ५५.६० | ६६.१२ | ४४.९२ | २१.३२ |
| | | नागरी | ७४.९९ | ८३.१६ | ६६.६१ | १६.५५ |
| १२ | कल्याण | एकून | ७७.९६ | ८२.५९ | ७३.०२ | ९.५७ |
| | | ग्रामीण | ५७.४७ | ६५.२५ | ४९.१६ | १६.०९ |
| | | नागरी | ८५.२२ | ८८.७४ | ८१.४७ | ७.२७ |
| १३ | उल्हासनगर | एकून | ८२.५५ | ८७.८८ | ७६.४६ | ११.४२ |
| | | ग्रामीण | - | - | - | - |
| | | नागरी | ८२.५५ | ८७.८८ | ७६.४६ | ११.४२ |
| १४ | अंबरनाथ | एकून | ६८.९३ | ७१.३० | ५६.२९ | १५.०१ |
| | | ग्रामीण | ५४.१९ | ६३.५८ | ४४.४६ | १९.१२ |
| | | नागरी | ७३.९९ | ७९.२८ | ६८.५१ | १०.७७ |
| १५ | मुरबाड | एकून | ५८.२० | ६९.१६ | ४७.३७ | २१.७९ |
| | | ग्रामीण | ५७.६४ | ६८.६१ | ४६.८४ | २१.७७ |
| | | नागरी | ७९.८२ | ८९.४७ | ६९.३३ | २०.१४ |
| | जिल्हा | एकून | ५८.८७ | ६८.५२ | ४९.३२ | १९.२ |
| | | ग्रामीण | ५४.८० | ६५.१७ | ४४.६७ | २०.५ |
| | | नागरी | ७६.६४ | ८२.६५ | ७०.३४ | १२.३१ |

**(स्रौत- ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २०१२, जनगणना अहवाल २०११ )**

वरील सारणी वरून २०११ साली ठाणे- पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील एकून साक्षरतेचे प्रमाण ५८.८७% आढळते. त्यातही ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण ५४.८०% आणि शहरी भागातील आदिवासी लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण ७६.६४% आहे. जिल्ह्यांतील पुरुष आणि स्त्रियांच्या साक्षतेमध्ये देखील विषमता आढळते. एकून पुरुष साक्षरता ६८.५२% आढळते तर एकून ४९.३२% स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण आढळते.

**ठाणे –पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरतेचे तालुक्यानुसार वितरण -**

२०११ च्या जनगणनेनुसार ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे तालुक्यानुसार प्रमाण पहिले असता त्यातही मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते उल्हासनगर तालुक्यात आदिवासी साक्षरता सर्वाधिक म्हणजे ८२.५५% आढळते. त्याखालोखाल ठाणे तालुक्यात ८१.९८% आदिवासी साक्षरता दिसून येते. हे दोन्ही तालुके शहरी तालुके आहेत. त्यानंतर कल्याण तालुक्यात ७७.९६%, अंबरनाथ ६८.९३%, ६४.५९%, पालघर ६१.८२% आदिवासी साक्षरता आढळते. सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण डहाणू तालुक्यात असून ते ४७.४१% आहे. मोखाडा ५४.०८%,आणि जव्हार ५४.८३ % आणि तलासरी ५४.८४% हे आदिवासी बहुल लोकसंख्या असलेले तालुके आहेत. त्यामुळे आदिवासी पट्ट्यातील साक्षरता इतर भागापेक्षा कमी असलेली दिसून येते. इतर तालुक्यातील भिवंडी तालुक्यात ५७.००%,शहापूर तालुक्यात ५८.२९% व मुरबाड तालुक्यात ५८.२०% साक्षरतेचे प्रमाण आढळते. याशिवाय वाडा तालुका ६०.९१% आणि विक्रमगड तालुक्यात ६१.४५% साक्षरता आढळते.




आलेख क्र.१ ठाणे-पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे साक्षरता प्रमाण २०११

**ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे साक्षरतेचे ग्रामीण व नागरी भागातील प्रमाण :**

ठाणे पालघर जिल्ह्यात २०११ च्या जणगणनेनुसार आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेत ग्रामीण भागातील प्रमाण ५४.८०% आढळते. तर नागरी भागातील प्रमाण ७६.६४% इतके आढळते. तालुक्यानुसार यात भिन्नता आढळते. ग्रामीण भागात सर्वात कमी आदिवासी साक्षरता डहाणू तालुक्यात असून ती ४६.३९% येथील नागरी साक्षरतेचे प्रमाण ६८.२७% आहे. त्यानंतर ठाणे तालुक्यात ४६.४६% तसेच भिवंडी तालुक्याचे ग्रामीण आदिवासीतील साक्षरतेचे प्रमाण ५३.७२% आहे. जव्हार ५३.८४ % तलासरी  तालुक्यातील आदिवासी साक्षरता प्रमाण ५४.०८%, अंबरनाथ ५४.१९  आणि तलासरी ५४.८४% तसेच शहापूर ५५.६०%, मुरबाड ५७.६४% असे साक्षरतेचे कमी प्रमाण आढळते. आदिवासी लोकसंख्येतील ग्रामीण भागात सर्वात अधिक साक्षरता विक्रमगड तालुक्यात असून टी ६१.४५% आहे यानंतर वाडा तालुक्यात ६०.९१% ग्रामीण भागातील आदिवासी साक्षर आहेत. यावरून ठाणे पालघर जिल्ह्यातील ग्रामीण आदिवासी लोकसंख्येत साक्षरतेचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो.

नागरी भागातील आदिवासी मधील साक्षरतेचे प्रमाण अभ्यासल्यास सर्वाधिक नागरी साक्षरता आपल्याला कल्याण तालुक्यात ८५.२२% आढळते त्यानंतर जव्हार तालुक्यात ८२.४४% तर  उल्हासनगर तालुक्यात ८२.५५% आणि ठाणे ८२.३०%, मुरबाड ७९.८२% आदिवासी साक्षर आढळतात. सर्वात कमी नागरी आदिवासी

साक्षरता वाडा तालुक्यात ६७.७३% आणि डहाणू ६८.२७% लोक साक्षर आहेत. याशिवाय वसई ६८.६३%, विक्रमगड ७६.१२%, अंबरनाथ ७३.९९%, मुरबाड ७९.८२%, भिवंडी ७०.५५%, शहापूर ७४.९९% लोकसंख्या साक्षर आढळते. यावरून ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात आदिवासी लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

**ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी स्त्री व पुरुष लोकसंख्येतील साक्षतेचे प्रमाण:**

ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या स्त्री व पुरुषातील साक्षरतेमध्ये मोठी तफावत दिसून येते. त्याच बरोबर ग्रामीण व नागरी भागातील आदिवासी स्त्री - पुरुष साक्षरता प्रमाण देखील विषम दिसून येते. जिल्ह्यात एकून पुरुष साक्षरता ६८.५२% तर एकून स्त्री साक्षरता प्रमाण फक्त ४९.३२% एवढे आहे. ग्रामीण भागातील एकून ६५.१७% आदिवासी पुरुष साक्षर आहेत तर स्त्रियांचे साक्षरता प्रमाण केवळ ४४.६७% इतके आढळते.त्यामानाने नागरी भागात साक्षरतेचे प्रमाण अधिक आढळते. ८२.६५% आदिवासी पुरुष तर ७०.३०% स्त्री लोकसंख्या साक्षर आढळते.

तालुक्यानुसार आदिवासी स्त्री व पुरुष लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण असमान आढळते. ग्रामीण भागात स्त्री व पुरुषांच्या साक्षरतेत मोठी तफावत आढळते. सर्वात अधिक फरक आपल्याला तलासरी ग्रामीण साक्षरतेत दिसतो येथे पुरुष साक्षरता ६७.३६% आहे तर स्त्री साक्षरता ४२.८७% आहे. दोन्हीत जवळपास २४.४९% टक्के साक्षरतेचा फरक आहे. त्यानंतर डहाणू तालुक्यात ग्रामीण आदिवासी लोकसंख्येत पुरुषात ५७.८२ साक्षरता आहे तर स्त्री साक्षरता ३५.५८% साक्षरता आढळते. आणि यात २२.२४% फरक दिसून येतो. याच तालुक्यात नागरी भागात ७६.०१% साक्षरता आहे तर स्त्री साक्षरता ६०.३३% आहे. येथील स्त्री – पुरुष साक्षरते मधील फरक १५.५८% आहे. शहापूर तालुक्यात ग्रामीण पुरुष आदिवासी साक्षरता ६६.१२% आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ४४.९२% आहे. यातील फरक २१.३२% आढळतो.तसेच मुरबाड ग्रामीण मध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६८.६१% आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ४६.८४% आहे. येथील स्त्री- पुरुष साक्षरते मधील फरक २१.७७% आहे. मुरबाड नागरी साक्षरतेमध्ये देखील पुरुष ८९.४७% तर स्त्री साक्षरता ६९.३३% आहे. दोन्हीतील फरक २०.१४% दिसून येते. विक्रमगड ग्रामीण मध्ये पुरुष साक्षरता ७०.६५% आहे तर स्त्री साक्षरता ५१.७०% असून दोन्हीतील फरक १८.९५% आहे. मोखाडा या आदिवासी बहुल तालुक्यात देखील स्त्री व पुरुष साक्षतेत मोठा फरक आहे. येथे पुरुष साक्षरता ६३.२१% तर स्त्री साक्षरता ४५.१५% आहे. दोन्हीतील फरक १८.०६% दिसून येतो. वाडा तालुक्यात ग्रामीण आदिवासी पुरुष साक्षरता ७०.५४% आहे तर स्त्रियांतील साक्षरता ५०.४४% आहे. दोन्हीतील फरक १९.९६% दिसून येतो.अंबरनाथ ग्रामीण भागात आदिवासी पुरुष साक्षरता ६३.५८% आहे तर स्त्री साक्षरता ४४.४६% दिसून येते. स्त्री- पुरुष साक्षरते मधील फरक १९.१२% दिसून येतो.

नागरी भागातील आदिवासी स्त्री पुरुष साक्षरते मध्ये सर्वाधिक तफावत मुरबाड तालुक्यात असून तेथे पुरुष साक्षरता ८९.४७% तर स्त्री साक्षरता ६९.३३% आहे.यातील फरक २०.१४% एवढा आहे. त्यानंतर शहापूर नागरी आदिवासी पुरुष साक्षरता ८३.१६% असून स्त्री साक्षरता ६६.६१% आहे. दोन्हीतील फरक १६.५५% असलेले दिसते. तर सर्वात कमी तफावत जव्हार तालुक्यात एकून असून साक्षरतेत पुरुष साक्षरता ५३.१८% तर स्त्री साक्षरता ४६.७७% आहे यात केवळ ६.४१% फरक आढळतो. यानंतर कल्याण नागरी साक्षरतेत पुरुष साक्षरता प्रमाण ८८.७४% तर स्त्री साक्षरता ८१.४७% आहे. यातील फरक ७.२७% दिसून येतो.

वरील सर्व विश्लेषणातून ठाणे पालघर जिल्ह्यांतील ग्रामीण भागात स्त्री व पुरुष साक्षरतेमध्ये मोठी तफावत दिसून येते त्यामानाने नागरी भागात स्त्री पुरुष साक्षरतेमध्ये कमी तफावत आढळून येते.

**ठाणे- पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरते मधील वाढ (१९९१ ते २०११)-**

ठाणे पालघर जिल्ह्यांतील साक्षरते मधील १९९१ ते २०११ या कालावधीत झालेली वाढ किंवा साक्षरतेतील परिवर्तनांचा आढावा येथे घेणार आहोत. या कालावधीत झालेल्या तीन जनगणना अहवालांचा संदर्भ म्हणून अभ्यास अर्णार आहोत.

सारणी क्र. २: ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेमध्ये झालेली वाढ १९९१ - २०११

| अ.क्र. | तालुके | | १९९१ | | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकून | पुरुष | स्त्री | एकून | पुरुष | स्त्री | एकून | पुरुष | स्त्री |
| १ | तलासरी | एकून | १९.४१ | ३२.१५ | ६.८९ | ४३.९७ | ६०.४१ | २८.३० | ५४.८४ | ६७.३६ | ४२.८७ |
| | | ग्रामीण | १९.४१ | ३२.१५ | ६.८९ | ४३.९७ | ६०.४१ | २८.३० | ५४.८४ | ६७.३६ | ४२.८७ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | डहाणू | एकून | १८.११ | २८.१७ | ८.१० | ४०.१३ | ५४.०८ | २६.७४ | ४७.४१ | ५८.७० | ३६.७४ |
| | | ग्रामीण | १७.१४ | २७.०७ | ७.२८ | ३९.६८ | ५३.७० | २६.२३ | ४६.३९ | ५७.८२ | ३५.५८ |
| | | नागरी | ३७.९७ | ५०.१३ | २५.२५ | ७२.९० | ८१.७० | ६४.३१ | ६८.२७ | ७६.०१ | ६०.३३ |
| ३ | विक्रमगड | एकून | | | | ४१.७५ | ५६.४७ | २७.८६ | ६१.४५ | ७०.९६ | ५२.१८ |
| | | ग्रामीण | | | | ४१.७५ | ५६.४७ | २७.८६ | ६१.०५ | ७०.६५ | ५१.७० |
| | | नागरी | | | | - | - | - | ७६.१२ | ८२.५० | ६९.९७ |
| ४ | जव्हार | एकून | २१.३३ | ३१.८५ | १०.८८ | ४१.८१ | ५०.७१ | ३०.६८ | ५४.८३ | ५३.१८ | ४६.७७ |
| | | ग्रामीण | २०.५१ | ३०.९५ | १०.१८ | ३९.२९ | ४९.४४ | २९.४४ | ५३.८४ | ६२.२९ | ४५.६९ |
| | | नागरी | ५४.८४ | ६८.०८ | ४०.५६ | ७२.८८ | ८२.६३ | ६३.०१ | ८२.४४ | ८८.१९ | ७६.१९ |
| ५ | मोखाडा | एकून | २२.३३ | ३१.७९ | १२.७० | ४८.५५ | ५९.८० | ३७.१६ | ५४.०८ | ६३.२१ | ४५.१५ |
| | | ग्रामीण | २२.३३ | ३१.७९ | १२.७० | ४८.५५ | ५९.८० | ३७.१६ | ५४.०८ | ६३.२१ | ४५.१५ |
| | | नागरी | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | वाडा | एकून | ३०.६३ | ४३.६५ | १७.१४ | ४९.६५ | ६२.५४ | ३६.५३ | ६०.९१ | ७०.७७ | ५०.९७ |
| | | ग्रामीण | २९.९१ | ४२.७८ | १६.५७ | ४९.२३ | ६२.१४ | ३६.१४ | ६०.५४ | ७०.५४ | ५०.४४ |
| | | नागरी | ४४.९८ | ६०.७८ | २८.४८ | ५६.९० | ६९.३१ | ४३.४९ | ६७.७३ | ७५.०१ | ६०.४९ |
| ७ | पालघर | एकून | २५.११ | ३६.६७ | १३.१२ | ४७.२० | ५९.७७ | ३४.२४ | ६१.८२ | ७२.०९ | ५१.९७ |
| | | ग्रामीण | २४.६७ | ३६.२० | १२.७५ | ४६.६३ | ५९.२५ | ३३.६० | ५९.८५ | ७०.४० | ४९.५३ |
| | | नागरी | ४५.४४ | ५८.३३ | ३१.२५ | ५८.४१ | ७०.२३ | ४६.६४ | ७४.४७ | ८२.३२ | ६६.७६ |
| ८ | वसई | एकून | ३३.१५ | ४४.१७ | २२.०६ | ५५.६१ | ६५.५१ | ४५.७० | ६४.५९ | ७२.४४ | ५६.८४ |
| | | ग्रामीण | ३१.४६ | ४२.७२ | १४.७१ | ५५.६७ | ६५.५२ | ४५.७९ | ५८.५१ | ६७.६३ | ४९.६१ |
| | | नागरी | ४०.९६ | ५०.८३ | ४९.८१ | ५४.८० | ६५.२५ | ४४.५५ | ६८.६३ | ७५.६० | ६१.७० |
| ९ | ठाणे | एकून | ६२.४४ | ७३.७५ | ४९.०२ | ७१.०३ | ७९.५४ | ६१.७४ | ८१.९८ | ८७.०८ | ७६.४५ |
| | | ग्रामीण | १८.४६ | २१.९७ | १४.७१ | - | - | - | ४६.४६ | ५३.५४ | ३९.०१ |
| | | नागरी | ६३.४० | ७४.८२ | ४९.८१ | ७१.०३ | ७९.५४ | ६१.७४ | ८२.३० | ८७.३८ | ७६.७९ |
| १० | भिवंडी | एकून | २५.७१ | ३५.२९ | १५.३८ | ४१.४१ | ५१.८७ | ३०.६४ | ५७.०० | ६५.५५ | ४७.८० |
| | | ग्रामीण | २४.०१ | ३३.२६ | १४.२६ | ४०.८८ | ५१.३५ | ३०.१३ | ५३.७२ | ६२.५९ | ४४.९२ |
| | | नागरी | ४१.७० | ५२.२१ | २७.३९ | ५२.६६ | ६२.५७ | ४१.८७ | ७०.५५ | ७६.७१ | ६२.८४ |
| ११ | शहापूर | एकून | २४.०३ | ३५.०३ | १२.२५ | ४५.५८ | ५८.२१ | ३२.५९ | ५८.१९ | ६८.४० | ४७.८० |
| | | ग्रामीण | २३.७८ | ३४.७४ | ११.९९ | ४३.७९ | ५६.३८ | ३०.८३ | ५५.६० | ६६.१२ | ४४.९२ |
| | | नागरी | ४३.८० | ५५.९० | ३१.३९ | ६३.०९ | ७६.१० | ४९.७४ | ७४.९९ | ८३.१६ | ६६.६१ |
| १२ | कल्याण | एकून | ४४.३४ | ५१.९९ | ३५.७७ | ३४.३४ | ७२.५१ | ५७.६२ | ७७.९६ | ८२.५९ | ७३.०२ |
| | | ग्रामीण | १२.७० | १८.७० | ६.४० | ३८.१३ | ४७.२४ | ३०.४६ | ५७.४७ | ६५.२५ | ४९.१६ |
| | | नागरी | ५१.६९ | ५९.४३ | ४२.८९ | ७५.८० | ८२.१४ | ६८.८१ | ८५.२२ | ८८.७४ | ८१.४७ |
| १३ | उल्हासनगर | एकून | २९.३५ | ३७.५७ | २०.५९ | ८०.१६ | ६६.७० | ७०.३९ | ८२.५५ | ८७.८८ | ७६.४६ |
| | | ग्रामीण | १६.९४ | २४.१० | ९.५० | - | - | - | - | - | - |
| | | नागरी | ६९.७५ | ७९.४१ | ५८.८६ | ८०.१६ | ६६.७० | ७०.३९ | ८२.५५ | ८७.८८ | ७६.४६ |
| १४ | अंबरनाथ | एकून | | | | ४५.५३ | ५५.०४ | ३५.७८ | ६८.९३ | ७१.३० | ५६.२९ |
| | | ग्रामीण | | | | ३७.६२ | ४८.२९ | २६.६२ | ५४.१९ | ६३.५८ | ४४.४६ |
| | | नागरी | | | | ५३.८२ | ६१.७३ | ४५.४७ | ७३.९९ | ७९.२८ | ६८.५१ |
| १५ | मुरबाड | एकून | २७.१२ | ३९.३२ | १४.१८ | ४६.५८ | ६०.१० | ३२.६६ | ५८.२० | ६९.१६ | ४७.३७ |
| | | ग्रामीण | २६.२५ | ३८.४४ | १३.३४ | ४६.०७ | ५९.६६ | ३२.०७ | ५७.६४ | ६८.६१ | ४६.८४ |
| | | नागरी | ५५.७९ | ६७.९५ | ४२.४८ | ६९.८८ | ७९.५५ | ५९.६४ | ७९.८२ | ८९.४७ | ६९.३३ |
| | जिल्हा | एकून | २५.८४ | ३६.८२ | १४.५३ | ४६.९१ | ५९.३३ | ३४.४८ | ५८.८७ | ६८.५२ | ४९.३२ |
| | | ग्रामीण | २२.३६ | ३३.२० | ११.३५ | ४३.९६ | ५६.८२ | ३१.२२ | ५४.८० | ६५.१७ | ४४.६७ |
| | | नागरी | ५३.७५ | ६४.३८ | ४१.६१ | ६६.४५ | ७५.४९ | ५६.८५ | ७६.६४ | ८२.६५ | ७०.३४ |

(स्रौत- ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २००४ व २०१२, भारतीय जनगणना अहवाल १९९१,२००१ व २०११ )

**ठाणे-पालघर जिल्ह्यांतील ग्रामीण व नागरी भागातील साक्षरतेमध्ये झालेली वाढ (१९९१-२०११):**

ठाणे व पालघर जिल्ह्यांत १९९१ साली एकूण आदिवासी साक्षरता प्रमाण २५.८४% होते ते वाढून २००१ साली ४६.९१% आणि २०११ साली ५८.८७% झालेले दिसून येते म्हणजे या २० वर्षाच्या काळात आदिवासी साक्षरते मध्ये ३३.०३% वाढ झालेली दिसते. याच काळात ग्रामीण भागातील आदिवासी साक्षरता १९९१ साली २२.३६% होती त्यात वाढ होऊन २००१ साली ती ४३.९६% आणि २०११ साली ५४.८०% झाली. म्हणजे या काळात ग्रामीण आदिवासी लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण ३२.४४% वाढलेले दिसून येते. नागरी भागातील आदिवासी साक्षरतेमध्ये देखील या काळात १९९१ साली ५३.७५% असलेली साक्षरता २००१ साली ६६.४५% आणि २०११ साली ७६.६४% झालेली दिसते. म्हणजे या २० वर्ष्यात २२.८९% साक्षरता वाढलेली दिसते.




आलेख क्र.२ ठाणे- पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरते मधील वाढ (१९९१ ते २०११)

तालुक्यानुसार ग्रामीण साक्षरतेत सर्वाधिक वाढ कल्याण तालुक्यात १९९१ साली १२.७०% असलेली साक्षरता २०११ साली ५७.४७ झाली आहे म्हणजे यात ४४.७७% वाढ झालेली दिसून येते. तसेच जव्हार तालुक्यात १९९१ साली ग्रामीण भागातील आदिवासी साक्षरता २०.५१% होती ती २०११ साली ६२.२९% वाढली असून या काळात साक्षरते मध्ये ४१.७८% वाढ झालेली दिसून येते. यानंतर डहाणू तालुक्यात १९९१ साली १७.१४% असलेली साक्षरता प्रमाण वाढून २०११ साली ४६.३९% झालेली दिसून येते.म्हणजे यात २९.२५% वाढ झालेली दिसते. यानंतर मुरबाड ग्रामीण साक्षरता प्रमाण १९९१ साली २६.२५% होती ती वाढून २०११ साली ५७.६४% झालेली आहे. या काळात साक्षरता ३१.३९% वाढलेली दिसून येते. अशाच प्रकारे प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण आदिवासी साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

तालुक्यानुसार नागरी भागातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण देखील वाढले आहे. सर्वाधिक वाढ भिवंडी तालुक्यात १९९१ साली नागरी साक्षरता प्रमाण ४१.७०% ते वाढून २०११ साली ७०.७५% झाले आहे म्हणजेच नागरी आदिवासी साक्षतेत २९.०५% वाढ झालेली दिसून येते. तसेच पालघर तालुक्यात १९९१ साली ४५.४४% असलेली साक्षरता २०११ साली ७४.४७% इतकी वाढलेली दिसते. या काळात येथील साक्षरतेत २९.०३% वाढ झालेली दिसते. यानंतर वसई तालुक्यात १९९१ साली असलेली ४०.९६% नागरी आदिवासी साक्षरता वाढून २०११ मध्ये ती ६८.६३% झाली म्हणजेच या काळात साक्षरतेत २७.६७% वाढ झालेली दिसते. अशाच प्रकारे सर्व नागरी भागातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसते.

**ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी स्त्री व पुरुष लोकसंख्येतील साक्षरते मधील वाढ (१९९१-२०११) :**

ठाणे -पालघर जिल्ह्यांत १९९१ साली पुरुष साक्षरतेचे प्रमाण ३६.८२% होते तर स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण १४.५३% होते. २००१ मध्ये आदिवासी पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ५९.३३% व स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ३४.४८% एवढे वाढलेले दिसते. २०११ साली त्यात वाढ होऊन पुरुषांचे साक्षरता प्रमाण ६८.५२% व स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ४९.३२% एवढे वाढलेले आहे.

**ग्रामीण भागातील आदिवासी स्त्री व पुरुष साक्षरतेमध्ये झालेली वाढ :** ठाणे पालघर जिल्ह्यांतील ग्रामीण भागातील आदिवासी साक्षतेत १९९१ साली पुरुष साक्षरता ३३.२०% आणि स्त्रियांची साक्षरता ११.३५% होती. त्यात वाढ

होऊन २००१ साली पुरुष साक्षरता ५६.८२% आणि स्त्री साक्षरता ३१.२२% इतकी वाढ झाली.२०११ साली पुरुष साक्षरतेचे ग्रामीण भागातील प्रमाण ६५.१७% तर स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ४४.६७% इतके आहे. या २० वर्षाच्या काळात आदिवासी पुरुष साक्षरता ३१.९७% वाढलेली आहे. तर स्त्रीयांची साक्षरता ३३.३२% वाढलेली आहे.

तालुक्यानुसार ग्रामीण स्त्री- पुरुष आदिवासी साक्षरतेत तलासरी तालुक्यातील ग्रामीण पुरुष साक्षरतेचे प्रमाण १९९१ साली ३२.१५% होते व स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ६.८९% होते ते वाढून २०११ साली पुरुष साक्षरता ६७.३६ तर स्त्री साक्षरता ४२.८७% वाढलेली आहे. या काळात पुरुष साक्षरतेत ३५.२१% तर स्त्री साक्षरता ३५.९८%इतकी वाढ झालेली दिसुन येते. त्यानंतर डहाणू तालुक्यात ग्रामीण पुरुष आदिवासी साक्षरता १९९१ साली २७.०७% तर स्त्री साक्षरता ७.२८% होती. त्यात वाढ होऊन २०११ साली ५७.८२% तर स्त्री साक्षरता ३५.५८% झालेली आहे. म्हणजे पुरुष साक्षरता ३०.७५% वाढली तर स्त्री साक्षरता २३.४७% वाढलेली दिसून येते. जव्हार तालुक्यात ग्रामीण पुरुष साक्षरता १९९१ साली ३०.९५% होती तर स्त्री साक्षरता १०.१८% होती. ती वाढून २०११ साली ग्रामीण आदिवासी पुरुष साक्षरता ६२.२९% तर स्त्री साक्षरता ४५.६९% इतकी वाढलेली आहे. म्हणजे २० वर्षात पुरुष साक्षरता ३१.९५% वाढली तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ३५.५१% वाढलेली दिसते. अशाच प्रकारे ग्रामीण भागातील साक्षरतेचे स्त्री व पुरुषांचे साक्षरता प्रमाण २० वर्षात वाढलेले दिसते पण स्त्री साक्षरतेपेक्षा पुरुष साक्षरतेच्या वाढीचा दर जास्त आढळतो.

**नागरी भागातील आदिवासी स्त्री व पुरुषांच्या साक्षरतेमध्ये झालेली वाढ-** ठाणे –पालघर जिल्ह्यातील नागरी भागातील आदिवासी लोकसंख्येचे एकून साक्षरतेचे प्रमाण १९९१ साली ५३.७५% होते. तसेच पुरुष साक्षरतेचे प्रमाण होते ६४.३८% स्त्री साक्षरतेचे प्रमाण होते ४१.६१% त्यात वाढ होऊन २०११ साली एकून नागरी आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ७६.६४% झाले आणि पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८२.६५% झाले आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७०.३४% झालेले आहे. म्हणजेच एकून नागरी भागातील आदिवासी साक्षरतेत २२.८९% वाढ झालेली आहे . त्यात पुरुष साक्षरतेच्या दरात १८.२७% वाढ झालेली आहे तर स्त्री साक्षरतेत २८.७३% वाढ झालेली दिसून येते.

तालुक्यानुसार नागरी भागातील स्त्री व पुरुष साक्षरतेचे प्रमाण पाहिल्यास पालघर तालुक्यात १९९१ साली पुरुष साक्षरता ५८.३३% होती तर स्त्री साक्षरता ३१.२५% होती.२०११ साली पुरुष साक्षरता ८२.३२ % आहे तर स्त्री साक्षरता ६६.७६% आहे. २० वर्षात पुरुष साक्षरता २३.९९% वाढलेली दिसते तर स्त्री साक्षरता ३५.५१% वाढलेली आहे. त्यानंतर वसई तालुक्यात नागरी भागातील आदिवासी साक्षरता १९९१ साली ४०.९६% होती. ती २०११ साली ६८.६३% वाढलेली दिसून येते. येथील आदिवासी पुरुष साक्षरता १९९१ साली ५०.८३% होती तर स्त्री साक्षरता ४९.८१% होती. ती वाढून २०११ साली पुरुष साक्षरता ७५.६०% वाढली तर स्त्री साक्षरता ६१.७०% वाढलेली दिसते. २० वर्ष्यातील वाढ पुरुष साक्षरता २४.७७% वाढली तर स्त्री साक्षरता ११.८९% वाढलेली दिसून येते. ठाणे तालुक्यात नागरी आदिवासी साक्षरता १९९१ साली ६३.४०% होती तर २०११ साली ८२.३०% वाढलेली आहे. आदिवासी पुरुष साक्षरता १९९१ साली ७४.८२% तर स्त्री साक्षरता ४९.०२% होती. त्यात वाढ होऊन २०११ साली पुरुष साक्षरता ८७.३८% वाढलेली आहे तर स्त्री साक्षरता ७६.७९% वाढलेली आहे. म्हणजेच पुरुष साक्षतेत १२.५८% वाढ झालेली आहे तर स्त्री साक्षरतेत २७.७७% वाढ झालेली दिसून येते. मुरबाड तालुक्यात नागरी आदिवासी साक्षरता १९९१ साली ५५.७९% होती तर २०११ साली ७९.८२% असलेली दिसते. आदिवासी पुरुष साक्षरता १९९१ साली ६७.९५% होते तर स्त्री साक्षरता ४२.४८% अशी होती २०११ साली त्यात वाढ होऊन पुरुष साक्षरता ८९.४७% तर स्त्री साक्षरता ६९.३३% असलेली दिसते. यावरून पुरुष साक्षरता २७.५२% वाढली आहे तर स्त्री साक्षरता २६.८५ वाढलेली दिसून येते. अशाच प्रकारे नागरी भागातील स्त्री – पुरुष साक्षरतेत मोठे बदल झालेले दिसून येतात.

**निष्कर्ष :** ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा, साक्षरतेच्या जील्यांतील वितरणाचा आणि स्त्री व पुरुष लोकसंख्येतील साक्षरतेचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला खालील कांही निष्कर्ष काढता येतात.

१) ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ५८.८७% म्हणजे अजूनही खूपच कमी आहे.

२) ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे तालुक्यानुसार वितरण देखील खूपच असमान आहे. आदिवासी बहुल तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

३) ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेच्या ग्रामीण व नागरी भागातील प्रमाणात देखील खूपच तफावत आढळली आहे. ग्रामीण भागात साक्षतेचे प्रमाण नागरी भागाच्या मानाने खूपच कमी आढळते.

४) ठाणे पालघर जिल्ह्यांतील आदिवासी स्त्री – पुरुष लोकसंख्येतील साक्षरते मध्ये खूपच तफावत आढळून आली आहे. आदिवासी पुरुष साक्षरतेपेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आढळले आहे. त्याचबरोबर
५) तालुक्यानुसार आदिवासी स्त्री-पुरुष साक्षतेमध्ये तफावत दिसून येत आहे.
६) ग्रामीण भागातील स्त्री पुरुष साक्षरते मधील फरक जास्त तर नागरी भागात स्त्री पुरुष साक्षरते मधील फरक कमी आहे.
७) १९९१ ते २०११ या २० वर्षाच्या कालखंडात आदिवासी साक्षरतेमध्ये साक्षरतेमध्ये वाढ झालेली आहे पण सर्वत्र सारखी नाही. नागरी भागात साक्षरता वाढीचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा अधिक आहे. या काळात स्त्रीयांचा साक्षरते मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

**संदर्भ :**

१) अहिरराव व अलीझाड (२००१) : " लोकसंख्या भूगोल ", निराळी प्रकाशन, पुणे.
२) डॉ. घारपुरे विठ्ठल ( २००५) : "लोकसंख्या भूगोल", पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३) कुलकर्णी शौनक (२००९) : "महाराष्ट्रातील आदिवासी", डायमंड प्रकाशन, पुणे.
४) Thane District Gazetteer
५) District Census Handbook Thane 1991
६) District Census Handbook Thane 2001
७) District Census Handbook Thane 2011
८) Thane district Statistical Handbook 2012
९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१३ -ठाणे जिल्हा
१०)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००४ -ठाणे जिल्हा
११)http://www.thanezp.mahapanchayat.gov.in/home/
१२) http://indikosh.com/subd/582845/thane
१३) https://data.gov.in/catalog/villagetown-wise-primary-census-abstract-2011-maharashtra
१४)https://data.gov.in/search/site/census

# जबाबदार पर्यटन: शाश्वत विकासासाठी सर्वोत्कृष्ट पद्धती

**प्रा. सुनील दशरथ साळवे[1] डॉ. सुहास आव्हाड[2]**

[1]सहायक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजा, जिल्हा - रत्नागिरी.

[2]सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान आणि वाणिज्य_महाविद्यालय संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा – अहमदनगर.

**सारांश :**

जबाबदार पर्यटनाचा (Responsible Tourism) सध्या अनेक महत्वाच्या पर्यटन स्थळांनी आणि पर्यटन व्यवसायांनी औपचारिकपणे स्वीकार केला आहे. आंतरराष्ट्रीय जबाबदार पर्यटन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय परिषदां मधून यासारख्या जबाबदार पर्यटनास शैक्षणिक केंद्रांद्वारे या योजनेस सक्रियपणे प्रोत्साहन दिले जात आहे. जबाबदार पर्यटनाची कल्पना नंतर शाश्वत पर्यटन, नैतिक पर्यटन, आणि एकात्मिक पर्यटन आदी कल्पनांसह बऱ्यापैकी जोडली गेली आहे. जबाबदार पर्यटन म्हणजे लोकांबद्दल पर्यटनाद्वारे शाश्वत विकास करण्याची जबाबदारी स्वीकारणे. समाज आणि पर्यावरणासाठी सकारात्मक परिणामपर्यंत पोचण्याच्या उद्देशाने विचार करण्याचा आणि वागण्याची ही एक प्रक्रिया आहे

पर्यटन स्थळांवरती पर्यटकांना चांगले जीवन जगण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी चांगली पर्यटन स्थळे तयार करणे, तसेच स्थानिक लोकांशी संपर्क साधून पर्यटकांना अधिकाधिक आनंददायक आणि बोलका अनुभव प्रदान करणे हे पर्यटन स्थळे बनविण्याचे उद्दीष्ट आहे.स्थानिक अर्थव्यवस्था आणि स्थानिक उपजीविकेस आधार देण्यासाठी आर्थिक शाश्वत विकास महत्तवाचा असतो. पर्यटनाची मुख्य आर्थिक समस्या ही गळतीची आहे, ज्याद्वारे कमाईचा मिळालेला जास्तीत जास्त भाग हा येणाऱ्या पर्यटकावरच जास्त खर्च होतो.

या अभ्यासात शाश्वत विकासासोबत जबाबदार पर्यटन याविषयावर विशेष लक्षं केन्द्रित केले आहे.

**प्रस्तावना:**

पर्यटन हा जागतिक अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख घटक आहे. पर्यटन हा उद्योग विशेषतः अर्थव्यवस्थेला चालना देणारा असा हा उद्योग आहे. तरीही १९९३ पासून पर्यटन महसुलात होणारी वाढ ही जागतिक स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीपेक्षा कमी आहे. १९९७ पासून पर्यटन सेवांचा सर्व सेवांमधील वाटा हा ३३% वरुण २६.५१% पर्यंत कमी झाला. तरीसुद्धा पर्यटन हे विशेषता: आनंदी असते. ज्या ठिकाणी पर्यटन विकास केला गेला आहे, तेथे पर्यटनाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे.

विकसनशील देशांचा आर्थिक विकास आणि वृद्धी करण्यासाठी पर्यटन उयोग महत्वाची भूमिका बजावतो. तरीही स्थानिक समुदाय आणि तेथील वातावरणाच्या बाबतीत पर्यटनाची नकारात्मक प्रवृत्ती दिसून येते. देशाची सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा पर्यटनाच्या शाश्वत विकासासाठी आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे.
पर्यटन उद्योग सर्व प्रकारच्या पर्यटन उद्योगातून पर्यटन ठिकाणची संपत्ती वाढवून त्यातून सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारी घेते. त्याचबरोबर हस्तकला व्यापार, अन्न प्रक्रिया उद्योग आणि सेवा उद्योग असे पर्यटनाशी संबंधित उद्योगांचे उत्पादन आणि त्यांची सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारी सुधारण्यासाठी प्रयत्न करतात. तर स्थानिक पातळीवर महिला ,तरुण वर्ग ,अल्पसंख्याक यासारख्या लोंकांची उत्पादन क्षम रचना आणि मूलभूत सुविधा ,सामाजिक प्रगती, पदोन्नती आणि मूर्त आणि अमूर्त सांस्कृतिक मालमत्ता आणि पर्यावरणीय समस्यांचा विकासाचा विचार केला जातो. राष्ट्रीय स्तरावर समन्वय साधण्यासाठी भागीदार देश आणि इतर देश प्रादेशिक पातळीवर बाजार एकीकरण वाढवणे. आणि त्याप्रमाणात अर्थव्यवस्था सुरळीत करतात.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1. 'जबाबदार पर्यटन संकल्पना अभ्यासणे.
२. शाश्वत विकास संकल्पना अभ्यासणे.
३. 'जबाबदार पर्यटन आणि शाश्वत विकास यातील सबंध अभ्यासणे.
४.जबाबदार प्रवासामध्ये प्रभावी पर्यटनाची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

सदर अभ्यास करण्यासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे आहे दुय्यम माहिती स्रोतांमध्ये पर्यटन विषयक विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ इंटरनेटवरील विविध वेबसाइट्स, वर्तमानपत्र, मासिके त्याचबरोबर अनेक प्रकाशित शोध निबंध इत्यादी माहितीचा आधार घेतला आहे.

**जबाबदार पर्यटनाचा अर्थ आणि व्याख्या :**

जबाबदार पर्यटन म्हणजे वाढीव सामाजिक-आर्थिक फायदे आणि सुधारित नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून अतिथींसाठी सुट्टीचा चांगला अनुभव आणि चांगल्या गुणवत्तेचा जीवनातील आनंद घेण्यासाठी चांगल्या व्यवसाय संधी प्रदान करणे होय .

(स्पेन्स्ले, २००२)

**जबाबदार पर्यटनाची आवश्यकता**

जगातील नेत्यानी जबाबदार पर्यटन पद्धती सुरू करण्याच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आवाहनाला एकमताने प्रतिसाद देऊन विचारसरणीतील बदल, विचारसरणीतील अनियमित वर्तन, दारिद्र्य, बेरोजगारी आणि असमानतेचा सामना करण्यासाठी हा एक व्यावहारिक उपाय म्हणून जबाददार पर्यटनाचा स्वीकार केला. जेव्हापासून पर्यटन हे आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन बनले आहे, तेव्हा पर्यटन कंपन्या आणि सरकारच्या नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक वातावरणातील पर्यटनावरील परिणामांचे मूल्यांकन आणि देखरेख करण्यासाठी त्यांची भूमिका वाढलेली दिसून येते. अनेक नफा मिळवणाऱ्या पर्यटन ग्राहकांच्या समाधानासाठी काहीही करण्यासाठी तयार असतात. अशा प्रवृत्तीमुळे सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिकदृष्ट्या जबाबदार उत्पादनांची मागणी वाढलेली दिसून येते.

**<u>जबाबदार पर्यटनाचे उद्दीष्ट:</u>**

• स्थानिक लोकांसाठी अधिकाधिक आर्थिक फायदे निर्माण करणे आणि यजमान समुदायाचे कल्याण वाढविण्याचा प्रयत्न करणे.

• कामाची गती सुधारणे आणि उद्योगास प्रवेश करणे, उद्योग सुरू करणे.

• स्थानिक लोकांना त्यांच्या जीवनावर आणि जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयामध्ये त्यांना सामील करून घेणे.

• जगातील विविधता टिकवून ठेवण्यासाठी, नैसर्गिक आणि सांस्कृतिक परंपरा संवर्धन करणे आणि त्यातील सकारात्मक वृत्ती वाढवणे.

• स्थानिक लोकांशी अधिक मैत्रीपूर्ण संपर्क साधण्यासाठी आणि स्थानिक सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यांविषयी अधिक समजून घेण्यासाठी पर्यटकांना अधिक आनंददायक अनुभव प्रदान करणे.

• आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक नकारात्मक परिणाम कमी करणे.

• पर्यटक आणि यजमान यांच्यात सुसंवाद आणि जिव्हाळयाचे संबंध वाढविणे.

•स्थानिक स्वाभिमान आणि आत्मविश्वास वाढविणे.

पर्यटन विकासाच्या परिणामाचे मूल्यमापण आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत असते. जागतिक पर्यटन संघटना (UNWTO ) ही संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे जी जबाबदार, शाश्वत विकास आणि जगभरात प्रवेश करण्यायोग्य पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी तयार असते.

संयुक्त राष्ट्रांची जागतिक पर्यटन संघटन पुढाकाराने पर्यटन आणि टूर ऑपरेटर साठी जागतिक आचारसंहिता ,नीतीमूल्ये स्वीकारल्याणे जबाबदार पर्यटनास बळकटी मिळाली.

पर्यटक व्यवस्थापन करण्यासाठी संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP), संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (यूनेस्को) आणि संयुक्त राष्ट्रांची जागतिक पर्यटन संघटना (UNWTO ) यांचे नेहमीच सहकार्य असते. उर्जा, आणि पाण्याची बिले कमी करणे, सांडपाणी प्रक्रिया आणि कचरा विल्हेवाट लावण्याचे खर्च कमी करून जबाबदार पर्यावरणीय अभ्यासाचे इतर फायदे घेऊ शकतो.

जबाबदार पर्यटन चांगले पर्यावरण व्यवस्थापन पर्यटनाच्या सभोवतालची गुणवत्ता देखील सुधारित करते, आणि त्यातून अतिथींसाठी एकूण अनुभव वाढवते.

**<u>शाश्वत विकास :</u>**

"जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो अशा विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात. जो विकास मानवाच्या सदयाच्या व भविष्यातील गरजांची पूर्तता करतो ,तोच शाश्वत विकास होय".

जागतिक पर्यावरण व विकास आयोगाने असे म्हटले आहे की "शाश्वत विकास हा असा विकास आहे जो भविष्यातील पिढ्यांना त्यांच्या स्वतःच्या गरजा भागविण्याची क्षमता समाविष्ट न करता वर्तमानातील गरजा भागवते" (ब्रुंडलँड)

जबाबदार पर्यटन ही स्थानिक चळवळ आहे आणि ते शाश्वत विकासासाठी पर्यटन स्थळावरील स्थानिक सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करते. जबाबदार पर्यटन म्हणजे 'लोकांसाठी राहण्यासाठी अधिक चांगली जागा आणि लोकांना भेट देण्यासाठी उत्तम ठिकाणे होत.' (केपटाऊन घोषणापत्र)

"जबाबदार" या शब्दाचा अर्थ आहे सर्व पर्यटनावर परिणाम होतो या गोष्टीबद्दल सत्य असण्याचा एक मार्ग, ज्याचे मोजमाप करणे  बहुतेक वेळा कठीण असते. जबाबदार पर्यटनाची व्याख्या देखील मूलभूत घटकांच्या संकल्पनेस स्पष्ट करते,

"जबाबदार पर्यटन सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करते आणि पर्यावरण आणि त्यातील संस्कृतींचा  पूर्ण अवलोकन करते".

शाश्वत विकास  आणि जबाबदार पर्यटन विकसित करण्यासाठी मुख्य पात्र म्हणून काम करण्याचा त्याचा अधिकार आहे. यांना  स्थानिक यजमान समुदायाने  मान्यता दिली आहे. पर्यटन उद्योग, स्थानिक समुदाय आणि प्रवासी यांच्यात सकारात्मक संवाद वाढविण्यासाठी जबाबदार पर्यटन घडवून आणते". (मिरयाला आणि गाडे २०१६).

आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामाच्या माध्यमातून देशातील लोकांचे कल्याण वाढविणे आणि त्यांच्या जीवनावरील  निर्णय घेताना स्थानिक लोकांचा सहभाग यावर लक्ष केंद्रित केले आहे. शिवाय, पर्यटकांच्या अनुभवाची आणि नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन यातून होते.

जगातील अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासास आणि समृद्धीसाठी हरीत  अर्थव्यवस्थेच्या (Green Economy) कडे जाण्यासाठी आवश्यक असलेली पर्यटन ही सर्वात आशादायक असा हा उद्योग आहे.

विकसनशील देशांना आवश्यक असणारी सर्वसमावेशक आर्थिक वाढ करण्यासाठी आणि कल्याण सुधारण्यासाठी दारिद्र्य कमी करून  आणि भविष्यातील पिढीच्या उन्नतीसाठी संसाधन टंचाई दूर करून आणि वातावरणातील बदलांवर मात करण्यासाठी आवश्यक पर्यावरणीय व्यवस्थापन करणे. .

'हरित वृद्धी ' प्रतिमानानुसार, पर्यटन उद्योग आणि शाश्वत विकासाच्या पद्धतींचा विस्तार करण्यास वाव आहे की जो, नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरणीय प्रभावांच्या व्यवस्थापनावर जोर देतो. (जेकोब २०१२).

भारतीय वित्त आयोगाने हरित वृद्धीत "पर्यावरणीय शाश्वत विकास आणि  गरीब आणि असुरक्षित गटांना उपलब्ध असलेल्या पर्यावरण संसाधनांवर होणाऱ्या त्यांच्या प्रभावांविषयी वाढीच्या धोरणांवर पुनर्विचार यात समावेश केला.(तेरावा वित्त आयोग )

**<u>शाश्वत विकासाची उद्दिष्टे:</u>**

- विकासाचे पुनरुज्जीवन करणे .
- विकासाचा दर्जा सुधारणे.
- रोजगार अन्न ऊर्जा पानी आणि स्वच्छता याबवाबतील गरजा पूर्ण करणे.
- संसाधनाचे रक्षण आणि संवर्धन करणे.
- तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- निर्णयप्रक्रियेत पर्यावरण आणि अर्थशात्र याचा समावेश करून घेणे.

**<u>जबाबदार पर्यटन आणि शास्वत विकास :</u>**

शाश्वत  विकासासाठी  विकास दीर्घ काळापर्यंत टिकवून ठेवण्यासाठी जबाबदार हा एक अतिशय योग्य मार्ग आहे.

शाश्वत पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि इतर सामाजिक-सांस्कृतिक संबंधित पर्यटन अशा अनेक संकल्पनाचा समावेश जबाबदार पर्यटनात होतो.
(कॅरुआना एट अल.,२०१४)

सामान्यपणे , जबाबदार पर्यटन आणि शाश्वत पर्यटनाचे घटक भिन्न आहेत. परंतु जबाबदार पर्यटन ही वारंवार वापरली जाणारी संकल्पना ती पर्यटन व्यवसायात नियमितपणे वापरली जाते. जबाबदार पर्यटनामागील मूळ दृष्टीकोण म्हणजे अधिक काळजी घेणारे पर्यटन उद्योग, व्यवसाय सुरू करणे, जबाबदार सुट्टीसाठी बाजारपेठ तयार करणे आणि, सरकार, प्रादेशिक नागरिक आणि पर्यटकांना मार्गदर्शन करून अधिक शाश्वत बनण्याचे साधन म्हणून जबाबदार पर्यटन स्वीकारण्याची आवश्यकता आहे. लोंकासाठी राहण्याचे क्षेत्र सुधारणे आणि भेट देण्यासाठी आलेल्या पर्यटकांसाठी पर्यटन स्थळात सुधारणा करणे हा जबाबदार पर्यटनामागील मुख्य हेतू आहे. सध्या जबाबदार पर्यटनाचे महत्त्व शाश्वत विकास हे आहे. शाश्वत ही संकल्पना काहींसाठी जादूची कांडी किंवा आकर्षण म्हणून काम करते जी अधिक शाश्वत, पर्यावरणीय आणि सामाजिकदृष्ट्या अनुकूल पर्यटन विकासाचे प्रतिमान आणि स्वरूप दर्शवते.
तर दुसरीकडे ही संकल्पना सदोष आणि अपुरी असल्याची सारखी टीकाही या संकल्पनेवर केली जाते. आपण असे म्हणू शकतो की जबाबदार - शाश्वत पर्यटना मागील प्रमुख हेतु म्हणजे आर्थिक पार्श्वभूमी सक्षम बनविणे. आणि समुदायाचा विकास आणि पर्यावरणीय समतोल राखणे आणि, निसर्ग, शेजारचे लोक आणि प्रवासी पर्यटक याचा विचार करून पर्यटन विकास केला जाऊ शकतो.

**<u>जबाबदार प्रवासामध्ये प्रभावी पर्यटनाची भूमिका</u>**

१५ वर्षांहून अधिक काळ प्रवाशांच्या कल्याणासाठी संशोधन आणि अंमलबजावणीसाठी एक प्रमुख, जबाबदार प्रवास केंद्र (CREST) म्हणून यांनी २०१९ मध्ये प्रभावी पर्यटन या नावाने कार्यक्रमाचा विस्तार व पुनर्बांधणी केली आहे.
यातून असे वाटते की पर्यटन क्षेत्रात सध्या प्रतिनिधित्त्व असणाऱ्या अनेक कार्यक्रमांचा आणि प्रतिमानाचा समावेश करण्यासाठी ही संकल्पना कशी विस्तारत गेली याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे असे दिसून येते. जबाबदार पर्यटनात दुर्गम प्रदेशातील , भागातील छोट्या पर्यावरणीय केलेल्या प्रयोगांमधून वाढता प्रभाव पर्यटनामध्ये आज सामुदायिक आणि तेथील व्याप्ती कार्यक्रम, स्वयंसेवा, सोशल मीडिया मोहिमा, सार्वजनिक-खाजगी आघाड्या, गुंतवणूकीवर परिणाम आणि इतरही काही बाबींचा यात समाविष्ट होतो. जबाबदार पर्यटनात हे आंतरराष्ट्रीय विकास सहाय्यासाठी एक तुलनेने नवीन प्रकारचे प्रतिनिधित्व करते जे पर्यटन उद्योगातून थेट आपणास मिळते.

**<u>समारोप :</u>**

जबाबदार पर्यटन विकासाबद्दल समारोप करताना असे दिसून येते की पर्यटन स्थळावरील रहिवाशी यांच्या जीवनावर पर्यटन विकासाचा तेथील अर्थव्यवस्था , पर्यावरण आणि सामाजिक परिणाम होतो. अनेक पर्यटन अभ्यासानुसार पर्यटन विकासामुळे स्थानिक समाजात सकारात्मक हस्तक्षेप झालेला दिसून आला आहे . यात प्रामुख्याने रोजगार, स्थानिक वस्तू आणि सेवा यांचा वापर आणि स्थानिक शिक्षण, आरोग्य आणि संवर्धन उपक्रमांना फायदे प्रदान करणे देणे शक्य होते.शिवाय लोंकांचा असा विश्वास आहे की पर्यटन विकासाच्या दुष्परिणामांचा सामना करण्यासाठी जबाबदार पर्यटन सराव (Responsible Tourism Practice ) हा योग्य तोडगा आहे.

युरोपियन आणि आफ्रिकन देशांचे यश जबाबदार विकासाचा माध्यमातून झालेल्या कार्यक्रमतून दिसून येते. आणि म्हणूनच मलेशिया पर्यटन उद्योगात जबाबदार पर्यटन धोरण धोरण राबविण्यास तयार असेल तर पर्यटन हितधारकांकडून मोठ्या प्रमाणात काम केले जाईल. धोरणात जबाबदार पर्यटन स्थळाचे नियोजन आणि जबाबदार पर्यावरणीय कृतीचा समावेश केला जातो. या समरोपात असे दिसून येते की जबाबदार पर्यटन धोरण रहिवाशांच्या जीवनमानावर परिणाम करते. म्हणूनच रहिवाशांनी, अधिकाऱ्यानी आणि इतर पर्यटन कार्यात सहभागी असणाऱ्या सर्व भागधारकानी त्यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील राष्ट्रीय पर्यटन विकासाच्या भविष्यकालीन आराखडा ब्ल्यू प्रिंटमध्ये जबाबदार पर्यटन धोरण ला चालना देण्यासाठी सक्रिय प्रयत्न केले पाहिजेत.

जबाबदार पर्यटनास प्रोत्साहन देण्यासाठी निसर्ग पर्यटन,कृषी पर्यटन, वन पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, असे काही महत्वाचे मार्ग आहेत .यातून आपण वन्यजीव, जंगले आणि आदिवासीं नैसर्गिक निसर्गरम्य ठिकाणी यांचे चांगले संवर्धन केले जाऊ शकते.

जबाबदार पर्यटन संसाधनांच्या न्याय्य वापराबाबत शिक्षित करते आणि हरित ऊर्जा, पुनप्रकिया , घनकचरा व्यवस्थापन, स्थानिक वस्तूंचा आणि सेवांचा वापर, स्थानिक हस्तकलांची विक्री, गरीबी निर्मूलन आणि बेरोजगारी यावर जोर देते.

अशा प्रकारे, गतिशील आर्थिक संबंधांकरिता स्थानिक समुदायांमध्ये शाश्वत संबंध प्रस्थापित करण्यासाठी जबाबदार पर्यटन हा एक महत्वाचा दृष्टीकोन आहे.या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास, अधिकाधिक रोजगाराच्या संधी, व्यवसायविषयक क्रियाकल्पनांना उत्तेजन, संस्कृती आणि इतिहासाची चिंता, ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण आणि पर्यावरणशास्त्र, महिला सक्षमीकरण इत्यादी नवीन आणि नाविन्यपूर्ण पर्यटन अभ्यासामुळे मिळणारे फायदे हे अभ्यासानुसार देखील दिसून आले आहे.

भारतासारख्या विकसनशील देशाचा जबाबदार पर्यटन म्हणून केला गेलेला अभ्यास अतिशय मर्यादित आहे, या विषयाचा सविस्तर अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणजे पुढील अभ्यासासाठी विस्तृत संधी उपलब्ध आहे. वाढत्या पर्यटन मागण्यांच्या गरजेच्या संदर्भात शासकीय धोरणे, उपाययोजना, नियोजन आणि पर्यटन स्थळांच्या विकासाचा अभ्यास जबाबदार पर्यटन धोरणाच्या माध्यमातून करता येईल .

**संदर्भसूची :**

1. Anne Torn –Laapio (ED)(2019) , Special Issues in Responsible Tourism , Publication of JAMK University .
2. Blanke, J., & Chiesa, T. (2013). The travel & tourism competitiveness report 2013. Paper presented at the The World Economic Forum.
3. Ford, A.E.S. and Acott, T. (Eds) (2015) Responsible Tourism: a guide for tourism and sustainability in small-scale fisheries and agri-food,
4. George, Anu, "Impacts of Responsible Tourism in Environmental sustainability issues: A Case Study in Kerala, India" (2019).
5. *Travel and Tourism Research Association: Advancing Tourism Research Globally*.
6. Jacobs, M. (2012). Green growth: economic theory and political discourse. Centre for climate change economics and policy working paper,
7. Katrin Gebhard, Michael Meyer, Stephanie Roth (2009): Ecological Tourism in Europe (ETE)
8. Lipman, G., & Vorster, S. (2011). Green Growth, Travelism, and the Pursuit of Happiness. Blanke, J. & Chiesa, T.(eds.).
9. Miryala, R. K., & Gade, J. N. (2016). Responsible Tourism & Human Accountability for Sustainable
10. Ministry of Tourism, Government of India, www.incredibleindia.org
11. Business: Zenon Academic Publishing.
12. Sathaye, J., Shukla, P., & Ravindranath, N. (2006). Climate change, sustainable development and India: Global and national concerns. CURRENT SCIENCE-BANGALORE-,
13. Responsible Tourism Territorial Development: Strategic guideline document for French public Aid for Development.
14. UNEP. (2011). Towards a Green Economy: Pathways to Sustainable Development and Poverty
15. http://www.unep.org/greeneconomy/greeneconomyreport/tabid/29846/default.aspx
16. www.keralatourism.org
17. www.responsibletravel.org

# स्वास्थ्य पर कोविड-19 महामारी का प्रभाव

**डॉ. प्रीति बैश्य**
सहकारी प्राध्यापक, हिन्दी विभाग, प्रागज्योतिष महाविद्यालय, गुवाहाटी (असम)
ई-मेल: pritibaishya@gmail.com

**सार-संक्षेप**

कोविड-19 वैश्विक महामारी ने स्वास्थ्य, शिक्षा, साहित्य, सामाजिक विज्ञान, अर्थव्यवस्था आदि सभी क्षेत्रों को बुरी तरह से प्रभावित किया है। स्वास्थ्य क्षेत्र में इसका बहुत अधिक प्रभाव परिलक्षित होता है। कोविड-19 महामारी के कारण लाखों लोगों की मृत्यु हुई और करोड़ों लोग इससे संक्रमित हैं। इसकी रोकथाम के लिए सरकार ने कुछ दृढ़ कदम उठाये हैं। इस वायरस से बचने के लिए सरकार ने अपने-अपने राज्यों में 'लॉकडाउन' तथा 'कर्फ़्यु' लागू कर दी हैं। कोरोना के बढ़ते मामलों को देखकर तमाम राज्य सरकारों ने अलग- अलग दिशा-निर्देश जारी कर दिये हैं। यद्यपि प्रशासन, स्वास्थ्य कर्मियों के सहयोग, जन-मानस में सजगता, टीकाकरण आदि के कारण कोरोना के नए मामलों में गिरावट आयी है लेकिन अब भी बहु-संख्यक लोग इससे संक्रमित हैं और मृत्यु का सिलसिला अब भी जारी है। कोविड-19 के दु:प्रभाव से कोविड संक्रमित व्यक्तियों के शरीर तो प्रभावित होता ही है, मानसिक स्वास्थ्य भी प्रभावित होता है। कभी-कभी वह प्रभाव घातक होता है तो कभी-कभी उसके प्रभाव जीवन-भर रहने की संभावना बनी रहती है।

**बीज-शब्द** : कोविड-19, शरीर, मानसिक स्वास्थ्य, मनोविज्ञानिक प्रभाव

## 1 प्रस्तावना :

कोविड-19 एक महामारी है जिसकी उत्पत्ति 2019 ई. को हुई थी। देखते ही देखते इस वायरस से चीन तथा विश्व के दूसरे देश भी ग्रसित हुए। चाहे स्वास्थ्य हो या शिक्षा, साहित्य हो या सामाजिक विज्ञान सब पर इसका बुरा प्रभाव पड़ रहा है। अर्थव्यवस्था पर भी इसका बुरा असर देखा गया है। आज पूरी दुनिया में मंदावस्था है। इससे उभरने के लिए आज हर संभव प्रयास किए जा रहे हैं। इसकी रोकथाम के लिए सरकार की ओर से भी कुछ ठोस कदम उठाए गए हैं।

## 2 विषय :

कोविड-19 वैश्विक महामारी से आज पूरी दुनिया लड़ रही है। स्वास्थ्य, शिक्षा, साहित्य, सामाजिक विज्ञान, अर्थ-व्यवस्था सभी में इसका प्रभाव परिलक्षित होता है। इन क्षेत्रों में जितनी क्षति हुई हैं, उनकी पूर्ति के लिए कुछ कदम उठाए गए हैं। अभी भी इन बातों पर चर्चा, विचार-विमर्श हो रहे हैं। विविध सुझाव भी सुझाए गए हैं।

स्वास्थ्य क्षेत्र पर कोविड-19 का अत्याधिक प्रभाव देखा गया है। इसके कारण 18 जून, 2021:13.01GMT तक पूरे विश्व में 38,59,612 लोगों की मृत्यु हुई हैं। 17,82,79,776 लोग इससे संक्रमित हो चुके हैं तथा 16,27,83,096 लोग इससे स्वस्थ हो चुके हैं। अभी भी 1,16,37,068 सक्रिय या एक्टिव मामले हैं, जिनमें से 1,15,54,389 (99.3%) मरीजों के लक्षण हल्के (mild condition) हैं और 82,679 (0.7%) मरीजों की हालत गंभीर हैं[1]। केन्द्रीय स्वास्थ्य मंत्रणालय के अनुसार भारत में 17 जून, 2021, प्रात: 8 बजे तक कोविड-19 के वजह से 3,81,903 लोगों की मृत्यु हुई हैं, 8,26,740 सक्रिय मामले हैं, हैं , नए मामले 67,208 हैं , डिस्चार्ज मामले 2,84, 91,670 हैं[2]।

लोगों में कोविड-19 की जांच के लिए हरदिन लाखों की तादाद में कोविड टेस्ट हो रहे हैं। कोई व्यक्ति पहले कोविड-19 महामारी से संक्रमित हुए थे कि नहीं, इस बात का पता भी लगाया जा रहा है।

कोरोना की जांच के लिए आज तरह-तरह के टेस्ट किए जा रहे हैं, जिनमें प्रमुख हैं – रैट या रैपिड एंटीजन टेस्ट, आरटी-पीसीआर (रिवर्स ट्रांसक्रिप्शन पॉलिमार चेन रिएक्शन) टेस्ट आदि । लेकिन कभी-कभी यह देखा जाता है कि दोनों टेस्टों का परिणाम एक ही नहीं निकलता है । रैपिड एंटीजन टेस्ट में किसी व्यक्ति की रिपोर्ट निगेटिव आने पर भी आरटी-पीसीआर टेस्ट में उसी व्यक्ति की रिपोर्ट पॉजिटिव आ सकती है । इसलिए कभी-कभी दोनों ही टेस्ट करना जरूरी हो जाता है । रैपिड एंटीजन टेस्ट में अगर किसी की रिपोर्ट पॉजिटिव आती है तो उस व्यक्ति को संक्रमित मान लिया जाता है । रैपिड एंटीजन टेस्ट की अपेक्षा आरटी-पीसीआर टेस्ट अधिक भरोसेमंद है । कभी-कभी तो यह भी देखा गया है कि कोई व्यक्ति कोविड-19 से संक्रमित होने पर भी दोनों टेस्टों में नकारात्मक परिणाम निकलता है । ऐसी स्थिति में फेफड़ों की सीटी स्कैन (कंप्यूटेड टोमोग्राफी) से इस वायरस की मौजूदगी का पता चलता है ।

ऑक्सीजन लेने में दिक्कत या ऑक्सीजन लेवल में कमी (94 mm Hg से कम ), सीने में दर्द, खाँसी आदि कोविड-19 के कुछ ऐसे लक्षण हैं, जिनके होने पर डाक्टरों ने मरीजों को अस्पताल में भर्ती करने की सलाह दी है । नहीं तो उसकी जान को ख़तरा भी हो सकता है । जो लोग अधिक रूप में इससे संक्रमित हैं, उनमें कई गंभीर समस्याएँ देखी जाती हैं । यहाँ तक कि संक्रमित मरीज निगेटिव होने के परवर्ती समय में भी बहुत दिनों तक उसके दुष्प्रभाव से अपने आप को मुक्त करने के लिए लड़ते रहते हैं । कई मरीजों को तो ठीक होने में कई महीनों की जरूरत होती है । यह वायरस फेफड़ों को प्रभावित करने के अलावा हृदय, लिवर, किडनी, रक्त वाहिका, दिमाग आदि को भी प्रभावित कर सकता है । कोविड से ठीक होने के बाद मरीजों में देखे गए कुछ लक्षण इसप्रकार हैं- साँसों का फूलना, छाती में दर्द, खाँसी, घबराहट, पल्स रेट ज्यादा रहना ( वयस्क लोगों में अगर पल्स रेट 60-100/मिनट से अधिक रहे), नींद न आना, भूलने की बीमारी, सिरदर्द, कमजोरी, अधिक समय तक किसी विषय पर ध्यान केन्द्रित न कर पाना, जोड़ों में दर्द, थकावट, नसों में शिथिलता आदि । इसप्रकार के लक्षण यदि कोविड ठीक होने के बाद भी लगातार कई दिनों तक दिखाई देता है तो मरीज को जल्द से जल्द किसी डाक्टर की सलाह लेनी चाहिए । सांस लेने में दिक्कत, फेफड़ों, हृदय, दिमाग आदि पर असर पड़े मरीजों को जरूरत पड़ने पर किसी पोस्ट कोविड क्लीनिक या पुनर्सुधार केंद्र में ले जाकर उसका इलाज करना चाहिए । ऐसे मरीजों को इन समस्याओं से मुक्त करने के लिए योग, ध्यान, शारीरिक व्यायाम, पोषणयुक्त खाना तथा खोए हुए आत्म-विश्वास जगाना आदि पर विशेष ध्यान देने की जरूरत होती है ।

कोविड का मानसिक स्वास्थ्य पर भी प्रभाव पड़ता है । कोविड के मरीजों के मानसिक स्वस्थ्य पर पड़नेवाले प्रभाव अल्पकालिक भी हो सकता है तथा दीर्घकालिक भी हो सकता है । दीर्घकालिक प्रभाव कई महीनों तक या कई सालों तक या पूरी जिंदगी तक पड़ सकता है । कोरोना संक्रामण के समय मरीजों के मन में डर बैठ जाता है और इसलिए वे सोना नहीं चाहते हैं । उनकी मानसिक स्थिति यह हो जाती है कि अगर उसे नींद आएगी तो वह नींद से उठेगी ही नहीं । निद्राहीनता पोस्ट कोविड की एक गंभीर समस्या है । निद्राहीनता के कारण वह मरीज अवसाद या डिप्रेशन की स्थिति में भी पहुँच सकता है । कभी-कभार कोरोना के मरीज डर या डिप्रेशन से आत्महत्या करने की घटना भी सामने आती है । कभी-कभी यह भी देखा जाता है कि अगर किसी बच्चे या व्यक्ति ने कोविड में अपने माँ-बाप या किसी परिजन को हमेशा के लिए खो दिया है तो उस घटना के प्रभाव से वह जल्दी बाहर नहीं निकल पाता । कोरोना के वजह से तो एक ही घर के कई सदस्यों की मृत्यु भी हुई हैं । इस स्थिति में वह बच्चा या व्यक्ति डिप्रेशन में जाने की संभावना बनी रहती है । ऐसी स्थिति से उभरने के लिए उसे परामर्श या कॉउंसलिंग की आवश्यकता होती है । कोरोना के कारण बच्चे से लेकर बुजुर्ग व्यक्ति सभी घर में कैद हैं । बच्चे न विद्यालय जा सकते हैं, न घर से बाहर खेलने के लिए जा सकते हैं, न घूमने-फिरने के किए, न अपने दोस्त, सगे-संबंधियों से मिलने जा

सकते हैं । यहाँ तक कि परीक्षाएँ भी नहीं हो रही हैं । इन सबका असर बच्चे के शारीरिक और मानसिक स्वास्थ्य पर बहुत अधिक पड़ रहा है । बच्चे की दुनिया मानो मोबाइल और दूरदर्शन में सिमटकर रह गया हो । ऐसा ही अगर चलता रहा तो वे धीरे-धीरे निष्क्रिय होते जाएंगे और ऐसे में वे अंतर्मुखी होने की संभावना भी बनी रहती है । कोविड संक्रमण के समय जो लोग घर से दूर कार्यरत थे, बहुतों ने वहाँ की नौकरी छोड़ दी । वे अपने जीवन की सुरक्षा के लिए घर वापस आ गए । वहाँ से यहाँ तक आने में उनको बहुत सारी कठिनाइओं का सामना करना पड़ा । बहुत लोग तो रास्ते में ही कोरोना से संक्रमित हो गए । उन्हें अस्पतालों में भर्ती किया गया या होम क्वॉरेंटाइन में रखा गया । फिर रोजगार के अभाव की समस्या खड़ी हुई । इन सबका बुरा असर उनलोगों की मानसिक अवस्था पर पड़ रहा है । कुछ संक्रमित लोग तो अपने साथ भेद-भाव होता हुआ महसूस करते हैं । वे धीरे-धीरे अपना आत्म-विश्वास खोते जा रहे हैं । हम सब को मिलकर उन लोगों के खोए हुए आत्म-विश्वास को जागाना होगा ।

सिर्फ मनुष्य में ही नहीं, पशु-पक्षियों में भी कोविड-19 का प्रभाव देखा गया है । मनुष्य से पशु-पक्षियों तक यह वायरस फैल सकता है और उनकी मृत्यु हो सकती है । कोविड के मौजूदा हालात के कारण लोगों का पर्यटन स्थल, मंदिर या दूसरे जगहों में आना-जाना बंद हो चुका है । इसलिए पशु-पक्षियाँ निडर होकर खुले आम इधर-उधर विचरण कर रहे हैं । लेकिन खाद्य के अभाव में उसे भुखमरी का सामना करना पड़ रहा है ।

कोविड-19 के संक्रमण को कम करने के लिए स्वास्थ्य कर्मी रात दिन एक करके लागातार कई दिनों तक मरीजों को स्वस्थ्य करने में लगे हुए हैं । वे अपने परिजनों से दूर रहकर अपनी जान को जोखिम में डालकर कोविड मरीजों की सेवा में लगे हैं, पीपीई किट (पर्सनल प्रोटेक्टिव इक्विपमेंट) पहनकर बिना खाये-पिये कई घंटों तक काम करके डाक्टर, नर्स आदि ने जो मानवीय सेवा की हैं, वे अत्यंत सराहनीय हैं । इन स्वास्थ्य कर्मियों ने अपना दायित्व बखूबी निभाया ।

केंन्द्र तथा राज्य सरकार की ओर से कोविड-19 के रोकथाम के लिए कछ महत्वपूर्ण कदम उठाए गए हैं । सरकार ने सरकारी अस्पतालों में बिस्तरों की संख्या में बढ़ोत्तरी की है, ताकि ज्यादा-से-ज्यादा कोविड-19 के मरीजों का इलाज हो सके । साथ ही नए-नए कोविड अस्पताल भी खोल रही है । लोगों को नि:शुल्क टीकाकरण करा रही है, जिससे कोविड के संक्रमण घटते गुए दिखाई दे रहे हैं । दवाई से लेकर पोषण से भरपूर खाने का भी जितना हो सके ध्यान रखा गया है । इसके संक्रमण को कम करने के लिए जनहित को ध्यान में रखकर राज्य सरकार की ओर से कोविड परिस्थिति को मद्दे नजर रखते हुए अलग-अलग और नए-नए दिशा निर्देश जारी किये जा रहे हैं । प्रशासन से जुड़े कर्मी कोविड संक्रमण को कम करने के लिए जी-जान एक करके प्रतिदिन लगे हुए हैं । विश्व के विविध हिस्सों की सीमाओं में रोक लगा दी गयी हैं । समय-समय पर अंतर्राष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यिक तथा विविध जिलों में यातायात करने में भी रोक लगाई है । कोविड परिस्थिति के अनुसार विश्व के विविध देशों में सम्पूर्ण लॉकडाउन घोषित किया गया था और अब भी सरकार ने अपने-अपने राज्यों में पूर्ण लॉकडाउन या मिनी लॉकडाउन घोषित किया है । इसके अलावा विश्व के विविध प्रान्तों में 'कर्फ़्यु' लागू कर दी गयी है । भारत के विविध जिलों में भी भारतीय दंड संहिता की धारा 144 लागू की गयी है । जिला प्रशासन जन-साधारण की सुरक्षा का दायित्व अच्छे से निभा रहा है । नियमों के उल्लंघन करनेवालों के साथ वे सख्ती से पेश आते हैं, ताकि कोरोना वायरस के संक्रमण पर अंकुश लगाया जा सके ।

कोविड-19 महामारी से संबन्धित सूचनाएँ जनसंसार माध्यम से प्राप्त होती हैं । मास्क पहनना, सामाजिक दूरिया बनाए रखना, सैनिटाइजर का इस्तेमाल करना आदि पर विविध विज्ञापनों के द्वारा जनसंसार माध्यमों से लोगों को सरकार सचेत करती आयी है । दूरदर्शन, रेडियो आदि के माध्यम से स्टुडियो से डाक्टर तथा विविध विषयों के जानकार व्यक्तियों के स्वास्थ्य संबंधी विविध कार्यक्रम का सीधा

प्रचार भी होता है । इन्टरनेट में तो कोविड से संबन्धित विविध स्वास्थ्य संबंधी सूचनाएँ, वीडियो आदि उपलब्ध हैं, जो अत्यंत ही महत्वपूर्ण एवं उपयोगी हैं । लेकिन जनसंसार माध्यमों में प्रचारित समाचार, वीडियो आदि में लगातार कोरोना के क़हर को देख लोगों के मन में एक डर भी बैठ जाता है । कभी-कभी इनमें प्रचारित तथ्य फ़रजी होने के कारण लोगों पर इसका नकारात्मक प्रभाव भी पड़ता है ।

निष्कर्ष : कोरोना वायरस से संक्रमित लोग न सिर्फ शारीरिक रूप से कमजोर हो रहा है , मानसिक तौर पर भी इसके नकारात्मक प्रभाव पड़ रहे हैं । मानसिक स्वास्थ्य काफी समय तक सुधार न होने पर मस्तिष्क को प्रभावित करता है । कोरोना वायरस से जो लोग संक्रमित हैं और जो संक्रमित नहीं हैं, सब पर इसका मनोविज्ञानिक प्रभाव पड़ रहा है । कोरोना महामारी के इस भयावह समय में हमें अपने शरीर का ध्यान तो रखना ही है, साथ ही मानसिक स्वास्थ्य पर भी ध्यान देने की आवश्यकता है ।

संदर्भ :

1. 18 जून, 2021:13.01GMT.< https://www.worldometers.info>cor

2. द असम ट्रिब्यून,18 जून, 2021, पृ. 1

# स्त्रियांच्या सामाजिक समस्या व स्त्रियांच्या सबलीकरणासाठी केलेले उपाय व कायदे

**डॉ.गजानन बापुराव ठाकरे**
पदवीधर शिक्षक, जि.प.व प्राथ. शाळा काळी कारंजा, पं.स.कारंजा जि.प.वाशिम
E Mail – gajananthakare2012@gmail.com

## ABSTRACT

प्राचीन काळापासून भारतीय समाजाने स्त्रियांना 'चूल आणि मूल' या मर्यादेच्या कक्षेत जखडून ठेवले आहे. प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृतीचा अंगिकार केलेल्या समाजसुधारकांनी स्त्रियांवर गुलामी लादण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. समाजाने स्त्रियांच्या तुलनेत श्रेष्ठ दर्जा दिलेल्या पुरुष वर्गाने स्त्रियांवर सातत्याने मानसिक गुलामी लादली आहे. पतीची सेवा करण्यात स्त्रीची धन्यता आहे असे संस्कार लहानपणापासून मुलींवर तथा स्त्रियांवर केल्या गेल्याने त्यांना पुरुषांची चाकरी करण्याची जणू काही सवयच लागलीआहे. समाजात स्त्रियांना विवाहासाठी निवडीचे देखील स्वातंत्र्य नव्हते. तद्वतच काही वर्षांपूर्वी बालविवाह होत असल्याने तसेच अनेकदा वयोवृद्ध व्यक्तीसोबत लहान मुलींचे लग्न लावून दिले जात असल्याने बाल विधवांची समस्या निर्माण झाली. एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रीला सती जाण्याची प्रथा होती. त्याचप्रमाणे अनेकदा पतिनिधनानंतर स्त्रियांचे केशकर्तन करून त्यांना विद्रुप केले जायचे. विधवा स्त्री कितीही श्रीमंत घराण्यातील असली तरी तिला शिळे, वाया गेलेले, निकृष्ट दर्जाचा आहार दिला जायचा. विधवा स्त्री श्रीमंत असली तरी तिचे वास्तव्य झोपडीतच असायचे. एकंदरीत मागील शतकापर्यंत स्वातंत्र्य मिळाल्या अगोदर स्त्रियांना हिन दर्जाची वागणूक दिली जात असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून अनेक समाज सुधारकांच्या लक्षात स्त्रियांच्या हालअपेष्टा आल्याने त्यांनी स्त्रियांच्या सामाजिक सुधारणा करण्यासाठी लढा दिला . त्यामुळे स्त्री संरक्षणार्थ अनेक कायदे व उपाययोजना करण्यात आल्या.

समाजातील अनिष्ट चाली, रूढी, परंपरेमुळे स्त्रियांना अनेक वाईट प्रथांना त्यांना सामोरे जावे लागले. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना मान सन्मान दिला जात नसल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात दुःख व दास्यत्व भोगावे लागले. कित्येक शतकापासून शिक्षणाची संधी नाकारल्याने स्त्रियांना अज्ञानामुळे समाजात दुय्यम दर्जाचे स्थान स्वीकारावे लागले. पुरुषांनी नेहमीच स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा फायदा घेतला. कुटुंबातील प्रत्येक महत्त्वाचा निर्णय घेण्याचा अधिकार पुरुष वर्गाला होता. स्त्रीला जन्माला आल्यापासून मुलांच्या तुलनेत वेगळी वागणूक दिली जायची. मुलींनी विशिष्ट कपडे घालावे, वर्तन करावे, हळू बोलावे , मोठयाने हसू नये अशी विविध बंधने लादली जायची. पण स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत आमूलाग्र बदल झाला. स्त्रियांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाल्याने तथा स्त्रियांसाठी शासनाद्वारे अनेक कायदे तथा तरतुदी केल्या गेल्याने स्त्रियांच्या सामाजिक दर्जात फार मोठी सुधारणा झाली आहे.

### स्त्रियांची सामाजिक स्थिती :-

प्राचीन काळापासून स्त्रियांवर अन्याय व अत्याचार केले जात होते. त्यांना नेहमीच अपमानास्पद वागणूक दिली जायची. प्राचीन काळापासून स्त्रियांवर जाचक बंधने लादली गेली. प्राचीन काळी प्रत्येक हिंदू नवरीने इंद्राग्नी इत्यादी पाच देवतांशी प्रथम लग्न करावे व नंतर खऱ्या नवऱ्याशी लग्न करावे अशी प्रथा होती. दमयंती ने याच प्रथेचे पालन केले असे म्हणतात.[१] एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना विवाहाचा स्वतंत्र्य अधिकार नव्हता. बाळशास्त्री जांभेकर यांच्या मते या देशातील मुला मुलींचे लग्न हे त्यांच्या स्वभाव, आवडीनिवडी व समज न पाहता केले जातात. त्यामुळे सृष्टी धर्माविरुद्ध त्यांची अवस्था होते. जन या नात्याने स्त्रियांचे वजन हे कोणत्याही कामात पुरुषाप्रमाणे आहे. प्रत्यक्षात स्त्रियांना योग्य सन्मान देऊनच सर्व देश प्रगत झाले आहेत. स्वामी विवेकानंदांच्या मते ज्या देशात, जातीत स्त्रियांच्या योग्य सन्मान होत नाही, तो देश, ती जात कधीही उन्नताव्यवस्थेत व्यवस्थित पोहचू शकत नाही.[२]

### स्त्रियांच्या सामाजिक समस्या:-

समाजाने काही अनिष्ट प्रथांचे पालन केल्याने स्त्रियांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. बालविवाह , बालविधवा , विधवा पुनर्विवाह, बहुपत्नीत्व, सतीप्रथा , केशवपन, स्त्री शिक्षण, हुंडा, बालविवाह, रूढी परंपरा अशा अनेक सामाजिक समस्यांना स्त्रियांना सामोरे जावे लागले.

**१) बालविवाहत :-**

बालविवाह मुलींचे वय फारच कमी असल्याने नवरा म्हणजे काय हे सुद्धा मुलींना समजत नाही. बालविवाहामुळे त्यांना आवश्यक शिक्षण दिले जात नाही. त्यामुळे मुलींचे उपजत गुण व सुचणारे सुविचार जागीच थिजतात.३ एकोणिसाव्या शतकात साधारण ६ ते ९ वर्षाच्या काळापर्यंत मुलींचा विवाह झाला पाहिजे असा संकेत होता. सन १८४१ मध्ये हरी केशवजी यांनी त्यांच्या 'हिंदू स्त्रियांची परिस्थिती' या निबंधात म्हटले होते की, कोणताही सन्माननीय हिंदू माणूस आपल्या मुलीला बारा वर्षाच्या वर लग्नाशिवाय ठेवत नाही. वर वधू यांच्यातील अंतर कमी नसावे. जेव्हा मुलींचा विवाह होतो, तेव्हा त्या दोघांच्या वयातल्या अंतर कधी कधी मुलींच्या वयांच्या चौपट पाचपट जास्त असते.४ महात्मा गांधीजींच्या मते बालविवाह समाजाला मिळाला एक शापच आहे. या प्रथेमुळे निर्माण झालेली मुलेही निरोगी नसत. मुलींचे विवाह योग्य वय २० असावे असे त्यांचे मत होते. गांधीजी बालविवाह विरुद्ध जागृती करण्यासाठी त्यांच्या स्वयंसेवकांना खेड्यात पाठवीत. गांधीजी बालविवाहाला शारीरिक व नैतिक दृष्टिकोनातून पार्श्वी प्रथा मानत असत.५

**२) बाला-जरठ विवाह म्हणजे :-**

लहान मुलींचा प्रौढ पुरुषांशी विवाह बाला-जठर विवाह. जुन्या काळात असे विवाह फार होत असत. मुलींच्या आई-वडिलांना व समाजाला यात काहीच गैर वाटत नसे. आनंदीबाई यांचे वडील व आई यांच्यात २५ वर्षाचे अंतर होते. बाल जरठ विवाहामुळे स्त्रिया मन मारून संसार करीत होत्या. जसा नवरा असेल, तसा स्विकारीत होत्या. गरिबीमुळे कधीकधी ८५ वर्षाच्या माणसांचे लग्न १२ वर्षाच्या मुलींबरोबर होत असे. पुरुषांना कितीही लग्न करण्यास परवानगी होती. बाल- जरठ विवाहामुळे मुली लहान वयात विधवा होत असत. ६

**३) वैधव्य :-**

बाल विवाहामुळे आणि मुली लहानपणीच विधवा होत असत. त्यांचे पुन्हा लग्न न होणे हा अन्याय होय.७ काळानुसार विवाह पद्धतीत बराच बदल झाला असला तरी, विधवेच्या बाबतीत समाजाची भूमिका परंपरावादीच आहे. मंगलप्रसंगांना विधवांना येऊ देत नाहीत. बालविवाहामुळे मुलींना अकाली वैधत्व येणे अपरिहार्य होते. विसाव्या शतकापर्यंत बालविवाह आणि रोगराई यामुळे पुरुषांचा मृत्यू झाला की पत्नी विधवा व्हायची. विधवा स्त्रीला काहीही अपराध नसताना समाजाची जाचक बंधने सहन करावी लागत होती. या विधवा स्त्रियांना पशूपेक्षाही वाईट वागणूक दिली जात होती. वैधत्वाचा शाप लागलेल्या स्त्रीला जिवंतपणी मरणयातना भोगाव्या लागत. अशा विधवा मुलींना आयुष्यभर नको त्या प्रसंगांना तोंड द्यावे लागेल.८

**४) व्दिभार्या :-**

पुरुषाने पहिली स्त्री जिवंत असताना दुसरे लग्न करणे म्हणजे व्दिभार्या पद्धत होय. वैवाहिक जीवनात एक पुरुष एक स्त्री, एक पुरुष व अनेक स्त्रिया, एक स्त्री व अनेक पुरुष अशा वेगवेगळया प्रकारची कुटुंब व्यवस्था असू शकते. समाजसुधारकांच्या मध्ये व्दिभार्या पद्धतीत प्रथम पत्नीवर अन्याय होतो, म्हणून असे विवाह कायद्याने बंद करावे. जेव्हा कुटुंबात तणावाचे वातावरण असते, पती-पत्नीमधील जिव्हाळा संपुष्टात येतो, अशा परिस्थितीत पुरुष दुसऱ्या लग्नाचा विचार करतात. पण कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होऊ न देण्याची काळजी कायद्याने घेतली पाहिजे. अशा स्त्रियांना पोटगी, मुलांचा ताबा व नवऱ्यापासून फारकत मिळाली पाहिजे.९

**५) बहुपत्नीत्वः-**

बहुपत्नीत्व मुळे स्त्रीयांना दुय्यम दर्जा प्राप्त होतो. द्रविड संस्कृती पितृसत्ताक कुटुंबपद्धती असूनही मातेला सन्मानाने वागवले जात होते. एकपत्नीत्व हा सार्वत्रिक असा प्रकार होता.१० पण काही पुनर्विवाह मनाविरुद्ध होत नसत. काही शेतकरी वर्गात बहुपत्नीत्वाची चाल दिसून येते. पुरुषाला जितक्या बायका जास्त, तितकी कामात मदत जास्त मिळवून मिळकत जास्त असे त्यांचे मत असते.११ पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी बहुपत्नीत्वाच्या चालीविरुद्ध लढा दिला. त्यांनी ब्रिटिश सरकारला बहुपत्नीत्वाच्या चलीविरुद्ध २५०० सह्यांचे निवेदन दिले. बहुपत्नीत्वाचा चालीला बंदी घातल्याशिवाय सामाजिक क्रांती होणार नाही असे त्यांचे मत होते. पंडित ईश्वरचंद्र यांनी १८७१ व १८७३ साली या बद्दल दोन पुस्तके लिहिली. १२

**६) केशवपन :-**

ब्राह्मण स्त्रियांना विधवा झाल्यावर केशवपन करणे या दिव्यातून जावे लागे. केशवपन करणे म्हणजे डोक्यावरचे पूर्ण केस काढणे. या पद्धतीचा हेतू स्त्रियांना विद्रूप करणे हा होता. विधवा स्त्रीकडे कोणी आकर्षित होऊ नये हा हेतू त्यामागे होता. विधवा स्त्रिया जोपर्यंत केशवपन करीत नाहीत तोपर्यंत त्यांच्या कोणतीही गोष्ट घरात कोणालाच चालत नसत. विधवेने केशवपन केले तर तिच्या सासरच्या लोकांचा उद्धार, नवऱ्याची यमदंडापासून सुटका, तिला मृत्यू नंतर उत्तम गती मिळते असे म्हटले जायचे.[१३] महात्मा फुलेनी केशवपनाच्या विरोधात न्हाव्ह्यांचे प्रबोधन करून त्यांना ह्या नीच कामापासून परावृत्त करून ब्राह्मण विधवांचे केशवपन थांबविले.[१४]

**७) सतीप्रथा :-**

बाल विवाहामुळे स्त्रियांना वैधत्व प्राप्त होऊन त्यांना सती जावे लागे. राजा राममोहन रॉय हे स्त्रियांच्या हक्काचे पहिले पुरस्कर्ते होते. सतीच्या चालीला त्यांनी सर्वप्रथम विरोध केला. पती निधनानंतर स्त्रियांनी सती जाण्याची पाशवी चाल पाहून त्यांचे अंतकरण द्रवले. राजा राम मोहन रॉय यांनी स्त्रियांनी सती जाण्याची चाल कायद्याने बंद करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे १८२९ साली सरकारने सतीबंदीचा कायदा केला.[१५]

**८) स्त्रीशिक्षण:-.**

वैदिक काळात स्त्रियांना शिक्षण दिले जायचे. पण कालांतराने स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. तत्कालीन परिस्थितीत स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे पाप, धर्म बुडणे असा समज होता. महात्मा फुले यांनी १ जानेवारी १९४८ रोजी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्रियांना शिक्षणाचे दालन उघडे करून दिले.[१६]

**९) हुंडा :-**

महात्मा गांधीच्या मते हुंडा हा समाज व्यवस्थेला लागलेला एक कलंक आहे. तो सामाजिक अभिशाप आहे. संपूर्ण मानव जातीच्या मातेचा आणि स्त्रीत्वाचा अपमान म्हणजे हुंडा होय. जो तरुण हुंडा घेतो, तो तरुण आपल्या शिक्षणाला कलंकित करतो, आपल्या देशाला कलंकित करतो व स्त्री जातीचा अपमान करतो . आजही हुंडा पद्धती मुळे अनेक स्त्रियांचा बळी जात आहे.[१७]

**स्त्रियांच्या सबलीकरणासाठी केलेले उपाय व कायदे :-**

ज्याप्रमाणे महिला घराबाहेर असुरक्षित असतात व घराबाहेर त्यांच्यावर अत्याचार होतात, त्याचप्रमाणे घरात सुद्धा महिला सुरक्षित असतात असे नाही. विवाहित स्त्रीला घरात मिळणारी दुय्यम वागणूक, पुरुषाद्वारे होणारे मानहानी या गोष्टी नेहमीच सहन कराव्या लागतात. काही वर्षापासून शासन, महिला संघटना यांच्या प्रयत्नाने महिलांच्या स्थितीत हळूहळू सुधारणा होत आहे.पिडीत व शोषित स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी स्त्री संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तित्वात आले आहे.

**स्त्रियांचा छळ :-**

आकडेवारीनुसार भारतात ७० टक्के महिलांना कौटुंबिक छळाला सामोरे जावे लागते. दर २७ मिनिटांनी एक बलात्कार होतो, दर ७७ मिनिटांनी एक हुंडाबळीची घटना घडते. दर ६ मिनिटांनी एक महिला आत्महत्या करते. तसेच कायद्याची माहिती नसल्याने तथा भीतीमुळे अनेक घटना प्रकाशात सुद्धा येत नाही. लैंगिक अत्याचारांमध्ये सुशिक्षित आणि उच्चभ्रू महिलांचे प्रमाण जास्त आहे. जागतिक चाचणीतील निष्कर्षानुसार पूर्ण अशिक्षित असलेले ३२ टक्के, एक ते पाच टक्के शैक्षणिक वय असलेले पुरुष ४२ टक्के तर दहावी किंवा उच्चशिक्षित असलेले ५७ टक्के पुरुष महिलांवर अत्याचार करतात.[१८]

**स्त्रीसंरक्षणार्थ असलेले विविध कायदे :-**

हिंदू स्त्रीला स्वातंत्र्या आधी काही कायद्याने संरक्षण दिले होते. तरी योग्य असे कायदेशीर स्थान प्राप्त करून घेण्यासाठी स्वातंत्र्य मिळेपर्यंत थांबावे लागले. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने स्त्रीला समान कायदेशीर दर्जा दिला. स्त्री स्वतंत्र भारताची नागरिक म्हणून तिला मतदानाचा अधिकार लाभला.[१९] स्वातंत्र मिळण्याआधी राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नाने इ.स १८२९ चाली ब्रिटिश सरकारने सती जाण्यावर बंदी घालण्याचा कायदा केला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नाने इ. स. १८९० साली संमती वयाचे विधेयक आले.[२०] त्याचप्रमाणे स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी १८१९ मध्ये सतीबंदीचा कायदा, १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा, सन १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा, १९२९ मध्ये बाल विवाह विरुद्ध कायदा, सन १९३७ मध्ये स्त्रियांना प्रॉपर्टी हक्काचा कायदा हे कायदे

अस्तित्वात आले.[२१] डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या रूपाने स्त्री जीवनात आमूलाग्र परिवर्तन करण्याचे कार्य केले. हिंदू कोड बिलात चार नवीन गोष्टींची भर घातली गेली.

१) जन्माने मिळणाऱ्या अधिकाराचे तत्व नाहीसे करणे .

२) स्त्रियांना मालमत्तेत निरंकुश अधिकार.

३) मुलीला संपत्तीत वाटा.

४) घटस्फोटाची तरतूद.

नवीन विद्यमान हिंदू कायद्यात समाज विरोधी व धर्म विरोधी काहीच नव्हते. या हिंदू कोड बिलामुळे स्त्रीधन, घटस्फोट इत्यादी दृष्टीने स्त्रियांना कायदेशीर अधिकार प्राप्त झाले.[२२] हिंदू कोड बिल १९५५ - ५६ मध्ये पास झाले. स्त्रियांना या नवीन कायद्याने विवाह , दत्तक वारसा व पालकत्व आदी क्षेत्रात हक्क-अधिकार लाभलेत.[२३]

कुटुंबात होणाऱ्या महिला हिंसाचाराला आळा घालण्यासाठी ४९८ अ सारखे कलम आणि अन्य कायदे अस्तित्वात आले. २००५ मध्ये कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला. २६ ऑक्टोंबर २००६ पासून हा कायदा अमलात आणण्याची सूचना दिली. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला रोखण्यासाठी कायद्यात १०६ आणि ११० ही कलमे उपलब्ध आहेत. कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५, या कायद्यामुळे महिलांच्या हातात खूप अधिकार आले आहेत. कोणत्याही महिलेला घरातून शारीरिक दुखापत झाल्यास सन १८६० पासून त्या गुन्हेगार व्यक्तीला शिक्षेची तरतूद केली आहे. ४९८ अ हे कलम जामीन पात्र असून कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा २००५ चा कायदा अजामीनपात्र आहे.[२४] विविध कायद्यांमुळे स्त्री जीवनाला सुरक्षितता लाभून स्त्रियांच्या आत्मसन्मानात वाढ झाली आहे.

**निष्कर्ष :-**

रूढी , परंपरा, धार्मिक चालीरीती यांचा आधार घेत समाजातील पुरुष वर्गाने स्त्रियांवर नेहमीच वर्चस्व गाजवले आहे. अंधश्रद्धा तथा जुनाट अनिष्ट परंपरांनी स्त्रियांवर दास्यत्व लावण्याचे कार्य केले आहे. लहानपणापासूनच घरातील पुरुषांचे प्रत्येक कार्य करण्याचे व त्यांच्या विरोधात न बोलण्याचे शिक्षण मिळालेल्या स्त्रियांनी शतकानुशतके पुरुषांची मानसिक गुलामी मान्य केली आहे. रुढी, चालीरीती यांच्या बेड्यात अडकलेल्या स्त्रियांना सतीप्रथा, बालविवाह, विधवा विवाह, आंतरजातीय विवाह, बाला जरठ विवाह , केशवपन, हुंडाबळी, व्दिभार्या , बहुपत्नीत्व, वैधत्व, अज्ञान अशा अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. स्त्रियांची शोचनीय व दयनीय स्थिती पाहून अनेक समाजसुधारकांचे अंतकरण द्रवून राहून त्यांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी तथा स्त्रियांना मान सन्मान मिळवून देण्यासाठी सामाजिक चळवळी उभारण्याचे कार्य केले. राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे , आगरकर आदी समाज सुधारकांच्या प्रयत्नाने स्त्री संरक्षणार्थ अनेक कायदे अस्तित्वात आले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर सतीबंदी कायदा, संमती वयाचा कायदा , विधवा विवाह कायदा, प्रॉपर्टी हक्काचा कायदा असे अनेक कायदे अस्तित्वात आले. तद्वतच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने विभिन्न कायद्यांच्या द्वारे स्त्रियांना संरक्षण प्राप्त करून दिले. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल कायद्याद्वारे स्त्रियांना स्त्रीधन, घटस्पोट, विवाह दत्तक वारसा, पालकत्व अशा क्षेत्रात स्त्रियांना हक्क व अधिकार मिळवून दिलेत. अशा अनेक कायद्याचे संरक्षण प्राप्त होऊन समाजातील स्त्रिया पूर्णपणे सुरक्षित नाहीत. आजही अनेक स्त्रिया ' हुंडाबळी' या समस्येने जीवन गमावत आहेत. स्त्रियांवर केवळ समाजातच अत्याचार होतात असे नाही तर घरात देखील स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागत आहे. अशा स्त्रियांसाठी कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा २००५ हा अस्तित्वात आला आहे. कायद्याचे पाठबळ लाभल्याने निश्चितपणे स्त्रियांना सुरक्षितता लाभली आहे.

**संदर्भसूची:-**

१) खेडेकर पुरुषोत्तम – ' बहुजनांचा सांस्कृतिक इतिहास', जिजाई प्रकाशन पुणे, २००४ पृ. क्र. ६३.

२) प्रा. कवि. माधवी – 'स्त्री – विचारधन', उन्मेष प्रकाशन, पुणे, २०००, पृ. क्र. १५, ५२.

३) डॉ. कर्वे, स्वाती संपादक – 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे, २००३ पृ. क्र. १०८.

४) वडगबाळकर, सौ. श्रुती श्री. – 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००६, पृ. क्रं ११९.

५) प्रा. कवि. माधवी – 'स्त्री – विचारधन', अन्मेष प्रकाशन, पुणे, २००० पृ. क्र. १०३.

६) उपरोक्त पृ. क्रं. १२३.

७) उपरोक्त पृ. क्रं. २४.

८) वडगबाळकर, सौ. श्रुती श्री. – 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००६, पृ. क्रं १२५.

९) डॉ. कर्वे, स्वाती संपादक – 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', प्रतिमा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे, २००३ पृ. क्र. २५९, २६० .

१०) हुसेन, एस. अबीद- 'भारताची राष्ट्रीय संस्कृती', नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली , १९९२, पृ. क्र. २७.

११) उपरोक्त पृ. क्र. २५८.

१२)प्रा. कवि. माधवी – 'स्त्री – विचारधन', उन्मेष प्रकाशन, पुणे, २००० पृ. क्र. २०.

१३)वडगबाळकर, सौ. श्रुती श्री. – 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००६, पृ. क्रं १२८.

१४)महाले, शिवश्री अशोक सदाशिवराव – 'क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले स्मृती विशेषांक', मराठा सेवा संघ जिल्हा शाखा वाशिम प्रकाशन, २००४, पृ. क्रं. ११.

१५)प्रा. कवि. माधवी – 'स्त्री – विचारधन', अन्मेष प्रकाशन, पुणे, २०००, पृ. क्र. ७.

१६)उपरोक्त पृ. क्रं. ७.

१७)उपरोक्त पृ. क्रं. १०३.

१८)डॉ. गोऱ्हे , नीलम – 'कौटुंबिक हिंसा विरोधी कायदा', स्त्री आधार केंद्र, गणेश नगर, पुणे २००७, पृ. क्र. ३, ७.

१९)वडगबाळकर, सौ. श्रुती श्री. – 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००६, पृ. क्रं ३७.

२०)प्रा. कवि. माधवी – 'स्त्री – विचारधन', अन्मेष प्रकाशन, पुणे, २०००, पृ. क्र. ७, २१.

२१)उपरोक्त पृ. क्रं. ३७.

२२)उपरोक्त पृ. क्रं. ८९, ९०.

२३)वडगबाळकर, सौ. श्रुती श्री. – 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००६, पृ. क्रं ३७.

२४)डॉ. गोऱ्हे , नीलम – 'कौटुंबिक हिंसा', ' विरोधी कायदा', स्त्री आधार केंद्र, गणेश नगर, पुणे २००७ पृ. क्र. ११, ४१, ४३, ४४, ४७, ४९.

# कोव्हीड - 19 महामारीचे भारतातील सामाजिक जिवनावरील परिणाम

**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा**

इतिहास विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड

ई-मेल : kshivaji1418@gmail.com

**प्रस्तावना :**

कोव्हिड - 19 च्या विषाणूने जगामध्ये थैमान घालून मानवी समुहामध्ये भितीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण केले आहे. इतिहासात मागे वळून पाहिल्यानंतर लक्षात येते की, मागे भारतामध्ये अनेक वेळा साथीचे रोग येऊन गेलेले आहेत. 19 व्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजे 1817-1824 या कालावधीत कॉल-याची पहिली साथ येऊन गेली होती. त्यावेळेस ब्रिटिश सत्तेने साम्राज्यविस्तार करण्यासाठी अस्पर्शीत असलेल्या सुंदरबनच्या अंतर्गत भागात प्रवास केला. त्यामुळे दलदलीच्या भागातून कॉल-याच्या नवीन स्ट्रेनने मानवी शरीरात प्रवेश केला होता. हळूहळू ही साथ संपूर्ण भारतीय उपखंडात पसरत गेली होती. नेपाळ, अफगणिस्तान, इंडोनेशिया, श्रीलंका, जपान आणि आफ्रिका या देशापर्यंत कॉल-याच्या साथीचा प्रसार झाला होता. रशियातील कडक थंडीमुळे या जीवाणूचा टिकाव न लागल्यामुळे ती साथ तिथेच थांबली. या साथीच्या रोगाने भारतातील लक्षावधी लोकांचा बळी घेतलेला होता. त्यानंतर 1824 ते 1832, 1846 ते 1863 , 1863 ते 1875 , 1881 ते 1896, 1899 ते 1923 आणि 1961 साली कॉल-याची साथ आली होती. पण या सर्व साथीच्या महामारीमध्ये 21 व्या शतकात आलेल्या कोरोनाच्या महामारीने जगात हाहाकार उडवून दिला आहे. सर्वच क्षेत्रावर अतिशय वाईट परिणाम करणारी ही साथ ठरली आहे.

कोव्हिड 19 च्या विषाणूचा वेगवेगळया मागोने अतिशय जलदगतीने प्रसार होत जावून अनेक राष्ट्रांना आपल्या विळख्यात घेतले आहे. या महामारीचा उद्योगधंदे आणि इतर छोट्या व्यवसायावर परिणाम झाल्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडून पडली. बुडालेल्या रोजगाराचा आणि कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेचा सामाजिक क्षेत्रावर फार मोठा परिणाम झाला. अनेकांना नोक-या गमवाव्या लागल्यामुळे त्याचा कुटूंब व्यवस्थेवर परिणाम होवून कुटूंब व्यवस्था विस्कळीत झाली. उदरनिर्वाहचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. कोरोनामुळे 2020 या वर्षात जागतिक महामंदीकडे वाटचाल करीत आहोत असे जागतिक नाणेनिधीने स्पष्ट केले आहे. इ.स. 1930 च्या जागतिक महामंदीनंतर कोरोनामुळे असे होण्याची जगावर वेळ आली आहे. कोरोनामुळे कोलमडलेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी अनेक राष्ट्रांनी प्रयत्न केलेला केलेत पण त्यात ते पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाहीत. कारण मानवी चुकीमुळे कोरोनाच्या लाटी वरचेवर येतच गेल्या. आतापर्यंत आलेल्या महामारीच्या साथीमध्ये कोव्हिड - 19 च्या महामारीने सामाजिक क्षेत्रावर व्यापक प्रमाणात परिणाम केलेले आहे.

**संशोधन पेपर लिहिण्याची उद्दिष्टे :**

1) कोव्हीड - 19 च्या विषाणूची निर्मिती कुठे झाली याचा आढावा घेणे.

2) कोव्हीड - 19 च्या विषाणूचा प्रसार कशा प्रकारे झाला याचा अभ्यास करणे.

3)कोव्हीड -19 विषाणूच्या प्रसाराला कोण जबाबदार आहे याचा आढावा घेणे.

4)कोव्हीड 19 च्या विषाणमुळे आलेल्या महामारीने सामाजिक क्षेत्रावर कोणते परिणाम केले याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

1)कोव्हीड - 19 चा विषाणू चीन देशातील प्रयोगशाळेत तयार करण्यात आला आहे.

2)चिनने जाणून बुजून कोव्हीड 19 चा विषाणू तयार केला.

3)वटवाघूळ व साप यांच्यापासून कोव्हीड 19 विषाणू तयार झाला.

4)अतिउष्ण प्रदेशात कोव्हीड -19 चा विषाणू टिकू शकत नाही.

5)कोरोना हा रोग नाहीच असा दावा काही लोकांनी केला.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन पेपर लिहिण्यासाठी कोव्हीड -19 महामारीविषयी माहिती असणा-या प्रथम आणि दुय्यम तथ्य सामुग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके व मासिके यांचा आधार घेण्यात आला आहे.

**कोव्हीड -19 चा विषाणू आणि महामारी :**

कोरोना व्हायरस हा विषाणूचा एक गट आहे. कोरोना व्हायरस हा सजिव आणि निर्जिव अशा दोन्ही गुणधर्मानी नटलेला असून तो सजिवही नसतो आणि निर्जीवही नसतो. तो त्याच्या सीमारेषेवर असतो. व्हायरस म्हणजे प्रोटिनच्या आत काही जिन्स असलेला एक अतिसुक्ष्म जंतू असतो. कोव्हीड -19 विषाणूच्या अवरणावर काट्यासारखी दिसणारी काही प्रथनं असतात. ही प्रथनं वरच्या तेलकट अवरणातून बाहेर आलेली असतात. त्यामुळे कोरोना विषाणू एखाद्या काटेरी चेंडूसारखा दिसतो. कोरोना म्हणजे मुकूट म्हणूनच त्याला कोरोना विषाणू म्हणतात. जेव्हा एखाद्या आजाराची साथ अनेक देशांना, भूभागांना, खंडाना व्यापून टाकते, त्यावेळेस त्या साथीला पॅन्डेमिक किंवा महामारी म्हणतात. कोरोना व्हायरसने अनेक देशांना व्यापून टाकले आहे. म्हणून कोरोनाच्या साथीला महामारी म्हटले जाते.

**भारतात कोरोना महामारीचा प्रसार :**

चीनमधील वुहानच्या सी फूड मार्केटमध्ये सार्स कोव्ह – 2 विषाणू जन्माला आल्यापासून जागतिक स्तरावर खूप चर्चा चालू आहे. चीनमध्ये डिसेंबर 2019 च्या मध्यावर बुहानमध्ये काही अज्ञात प्रकारच्या निमिनियाचे कोणत्याही औषधाला दाद न देणारे रुग्ण आढळून आले होते. या रुग्णांना कुठल्यशही अगोदर न पाहिलेल्या नव्या विषाणूचा संसर्ग झाल्याचं वुहानमधल्या मेडिकल या खाजगी प्रयोग शाळेने 27 डिसेंबर 2019 रोजी सांगितलं. या नंतर समाजमाध्यमावर ही बातमी पसरली. डब्ल्यूएचओला कुठल्यातरी संकेतस्थळावर या विषाणूची माहिी समजल्यानंतर चीनकडे आणखी माहिती मागितली. या विषाणूमुळे 44 लोकांना संसर्ग झाला आहे पण कुणाचाही जीव गेला नाही अशी माहिती चिनने दिली. कोरोना विषाणू बद्दल सर्वत्र माहिती झाल्यानंतर सर्वत्र भितीचे वातावरण निर्माण झाले. वुहान प्रांतात डिसेंबर 2019 मध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण सापडल्यानंतर कोरोनाचा व्हायरस हा वुहानमधून युरोप खंडातील इटली आणि तिथून इराणमार्गे संपूर्ण जगात वेगाने पसरत गेला. कोरोना व्हायरसचा वुहानमध्ये उगम कसा झाला हे अजून पूर्णपणे स्पष्ट झाले नाही. सुरुवातीला चिनने कोरोना व्हायरसची माहिती लपवून ठेवली. त्यामुळे हा विषाणू जगभर पसरत गेला असा आरोप अमेकिरेने चिनवर केला. जागतिक आरोग्य संघटनेने चीनवर दबाव टाकल्यानंतरही कोरोना व्हायरसचा उगम वुहानमध्ये झाला हे मानायला चीन तयार नाही. भारतासह अमेरिकेसारखी महासत्ता असलेली राष्ट्र कोरोनाच्या चक्रव्युहात अडकली. भारतात कोरोनाचा पहिला रुग्न जानेवारी 2020 च्या अखेरीस केरळमध्ये आढळून आला. हा रुग्ण चीनच्या वुहानमधून आला होता. केरळ सरकारने सतर्क राहून कोरोनाच्या विरुध्द नियोजनबध्दपणे उपाययोजना केल्या. केरळ राज्य सरकारच्या आरोग्यमंत्री के.के. शैलजा ज्यांना शैलजा टिचर असं केरळ राज्य म्हणते. त्यांनी कोरोनाच्या अगोदर निपाह विषाणूविरुध्द उपाययोजना केल्या होत्या. इ.स. 2018 साली केरळमध्ये महाभयंकर अशा निपाह विषाणूचा उद्रेक झाला होता. केरळ सरकारने या रोगाच्या उद्रेकाला वेळीच व आळा घालून जास्त हानी होऊ दिली नाही. केरळमध्ये जो निपाह विषाणूचा उद्रेक झाला होता ते एक प्रकारे केरळच्या

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या डोळयात घातलेलं अंजन होते. केरळ सरकारने निपाह विषाणूच्या उद्रेकापासून धडा घेवून कोव्हीड विषाणूच्या महमारीचा कसा बंदोबस्त करायाचा हे शिकले. सुरुवातीला कोरोना विषाणूबद्दल फारसे गांभिर्याने न घेतल्यामुळे या महामारीचा प्रादूर्भाव वेगाने वाढत गेला. भारतात केवळ प्रदेश प्रवासाची पार्श्वभूमी असलेल्या आणि कोव्हीड सदृश्य रोगांची लक्षणं असलेल्या रुग्णांचीच चाचणी करण्यात आली. त्यामुळे अत्यंत कमी चाचण्या होत असताना कोरोनाचा विषाणू भारतभर वेगाने पसरत गेला. कोव्हीडीची साथ पसरण्याचे चार टप्पे दिसतील. पहिल्या टप्प्यात कोरोना विषाणूचा संसर्ग हा परदेश प्रवासाची पार्श्वभूमी असलेल्या माणसात पसरला. चिन आणि इतर देशात ज्या देशात कोरोनाचा प्रादुर्भाव होता अशा देशात प्रवास करुन जे लोक भारतात परत आले त्यांच्यात कोरोनाचा विषाणू आढळून आला. अशा विषाणूग्रस्त लोकांमुळे भारतात कोरोना महामारीचा प्रसार झाला. दुस-या टप्प्यात भारतातील स्थानिक लोकांमध्ये या साथीचा संसर्ग झाला. तिस-या टप्प्यात मात्र कोरोना विषाणूचा सामुदायिक प्रसार झाला. चौथ्या टप्प्यात मात्र कोरोना महामारी वा-याच्या वेगाने भारतभर पसरत गेली. महामारीचा वेग जास्त असल्यामुळे तिला आळा घालने अवघड झाले. विषाणूचा होणारा वा-याच्या वेगाने प्रसार आणि भारतीयांचा निष्काळजीपणा यामुळे पुणे, मुंबई सारख्या लोकसंख्येची जास्त घ्रता असलेल्या शहरांना कोरोना महामारीने वेढून टाकले भारताची राजधानी दिल्ली ही कोरोनाच्या चक्रव्युहात अडकून पडली.

**कोव्हीड - 19 चे सामाजिक क्षेत्रावरील परिणाम :**

भारतातील लोक बेसावध असताना कोरोनाचा विषाणू मात्र जलद गतिने जास्तीत जास्त क्षेत्र व्यापून टाकत होता. कोरोना महामारीला आळा घालण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 22 मार्च 2020 हा दिवस जनता कर्फ्यु म्हणून पालन करण्याची घोषणा केली. जनता कर्फ्युचे पालन केले गेले असले तरी कोरोना महामारीचा पसरण्याचा वेग कमी झाला नाही. अनेकांचा बळी या महामारीने घेतला. दवाखान्यात बेड न मिळाल्यामुळे दवाखान्याच्या बाहेरच अनेकांना आपला जीव गमवावा लागला. कोरोना विषाणूची चैन तोडण्यासाठी लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. लॉकडाऊनचे भारतातीलच नाही तर जगातील सामाजिक क्षेत्रावर परिणाम झाले. लॉकडाऊनमुळे रोजगार गेल्यामुळे अशा व्यक्तीच्या कुटूुबावर वाईट परिणाम झाले. अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. एकाकीपणा, गृहकलक, चिंता, घटस्फोट, नैराश्य, आत्महत्या या बाबी वाढत गेल्या. कोरोना महामारीने अर्थ व्यवस्थाच कोलमडून टाकली. कोरोनाच्या महामारीने भारताच्याच नाही तर जागतिक आर्थिक क्षेत्राला हादरे दिले. या महामारीमुळे असंघटीत क्षेत्रातील कामगार, हातगाडीवाले, रिक्षावाले, रस्त्यावर खेळणी व इतर साहित्य विकणारे, वेटर, गॅरेजवाले, इत्यादी क्षेत्रात काम करणा-यावर बेकारीची पाळी आली. या बेकारीचा परिणाम संबंधीतांच्या कुटुंबातील सदस्यांच्या मानसिकतेवर झाला. त्यातून अनेक समस्या उद्धवल्या. आरोग्याची समस्या निर्माण झाली. कोरोनाच्या प्रसाराला विशिष्ट धर्माच्या लोकांना जबाबदार धरुन धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाजकंटकांनी केला. कोरोना महामारीने नवीन प्रकारची अस्पृश्यता निर्माण केली. कोरोनामुळे हाताला काम धंदा नाही तसेच शिल्लकचा पैसा नसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. शैक्षणिक क्षेत्रावरही कोरोना महामारीने परिणाम केले. ऑनलाईन शिक्षणासाठी साधने उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांच्या मानसिकतेवर परिणाम झाला. शाळा महाविद्यालये बंद असल्यामुळे विद्यार्थ्यासमोर अने समस्या निर्माण झाल्या. डॉक्टरांवर हल्ले होऊन वैद्यकिय क्षेत्रामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या.

**निष्कर्ष :**

पृथ्वीची उत्पत्ती झाल्यापासून कोरोनाची महामारी येईपर्यंत ज्वालामुखीच्या उद्रेक, भूकंप, प्रलंयकारी वणवे, चक्रीवादळ, प्लेगची साथ इत्यादी संकटे आली आणि गेली. परंतु कोरोना ही महामारी पृथ्वीतलावरील मानवावरील सर्वात मोठे संकट ठरले. कोव्हीड - 19 च्या विषाणूने अनेक राष्ट्रांना आपल्या विळख्यात घेवून सामाजिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम केले. अर्थात कोरोनाचा विळखा वाढण्यासाठी माणसाची चूकही कारणभूत ठरली. चिनने कोरोना विषणाूबद्दल लवकर माहिती दिली असती तर वेळीच उपाय करुन कोरोनाची महामारी रोखता आली असती. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय इत्यादी क्षेत्रावर या महामारीने दुष्परीणाम केले. कोव्हीड - 19 च्या महामारीने सामाजिक क्षेत्रात एका प्रकारची नविन अस्पृश्यता निर्माण केली. माणसाला माणसापासून दूर केले. कोरोना महामारीमुळे सामाजिक क्षेत्रात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. एकमेकाकडे संशयाने पाहण्याचा दृष्टीकोन निर्माण झाला. प्रसारमाध्यमानी कोरोना महारीचा प्रसार करण्यात अतिरेक केल्यामुळे सामाजिक क्षेत्रात भयावह वातावरण निर्माण झाले. लॉकडाऊनच्या काळात पुण्या - मुंबईहून गावाकडे आलेल्या लोकांकडे अतिरेक्याकडे पहावे तसे पाहण्यात आले. कोरोनाच्या संसर्गामुळे सरकारी दवाखान्यात दाखल झालेला माणूस परत येत नाही असा जो प्रचार करण्यात आला तो अत्यंत चुकिचा आहे. गैरसमजुतीमुळे कोरोनाची लक्षणे दिसत असतानाही अनेक लोक तपासून घ्यायला लवकर तयार झाले नाहीत. कोरोनाची लागण झाल्यानंतरही अनेकांनी बरेच दिवस ते लपवून ठेवले. अशा लोकांना जीव गमवावा लागला. कोरोनाची चैन तोडण्यासाठी सरकारने लॉकडाऊन घोषित केल्यानंतर सर्वसामान्य जनतेचे अतोनात हाल झाले. कोरोनाचा विषाणू नेमकं कुठे तयार झाला हे अजून स्पष्टपणे सांगता आले नाही. तसेच कोव्हीड -19 विषाणूचा प्रसार वटवाघळापासून झाला का ? हेही निश्चित झाले नाही. उष्ण प्रदेशात तो विषाणू टिकाव धरु शकत नाही. हा तर्क खोटा ठरला. कोरोना हा आजारच नाही असा दावा करणो खोटे ठरले.

संकटात माणसाला बरेचसे शिकायला मिळते. सामाजिक आणि इतर क्षेत्रावर परिणाम करणा-या या महामारीने माणसास बरेच काही शिकविले. स्वच्छतेबाबत भारतात फारशी काळजी घेतली जात नाही. परंतु या महामारीने माणसाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. सॅनिटायजरचा वापर करायला पाहिजे हे लक्षात आले. तसेच नविन तंत्रज्ञानाची माहिती करुन घेण्यास कोरोना महामारीने भाग पाडले. शैक्षणिक क्षेत्रारील महामारीच्या परिणामामुळे झूमअॅप, गुगलमेट इत्यादी तंत्रज्ञानाची माहिती करुन घ्यावी लागली. कोरोनाच्या महामारीमुळे माणसाला तंत्रज्ञानाच्या बाबतीत अपडेड व्हावे लागले.

**संदर्भ ग्रंथ :**

1. मृदुला बेळे – कोरोनाच्या कृष्ण छायेत- राजहंस प्रकाशन, प्रा. लि. 1025, सदाशिव पेठ, पुणे – 411030, जुलै 2020.

2. अविनाश भोंडवे – कोरोनाचा चक्रव्यूह – दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. 251, शनिवार पेठ, पुणे 411030,15 ऑगस्ट, 2020.

3. WHO Timeline– Covid – 19 – world Health organization.

4.The coronavirus crisis, regime for re entry, Atual Gavande, The New yorker, may 13, 2020.

# 'कोविड–१९' चा जनजीवनावरील प्रभाव आणि परिणाम.

**प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी**

दौंड, जि. पुणे.

कोरोना – १९ च्या प्रादुर्भावामुळे ( मार्च २३ - २०२०) वेळोवेळी करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या आव्हानात्मक, तरीही गुंतागुंतीच्या परिस्थितीची चर्चा येथे अपेक्षित आहे. ह्या कालावधीत कोरोनाबाधित क्षेत्रात लॉकडॉऊन करताना व त्याविषयी खबरदारी घेताना, कायदेकानू – निर्बंध – यांचे संदर्भ देताना किराणामाल व भाजीपाल्याच्या दुकानांसह, अत्यावश्यक सेवा यांना सवलत दिली गेली, मात्र सरकारी – खाजगी कार्यालये, हॉटेल्स, मंडई, मॉल्स, विविध दुकाने बंद ठेवण्यात आली, किंवा विशिष्ट वेळेत नियमांचे पालन करीत सुरु होती. सर्वत्र ऑनलाईन सेवा यांना प्राधान्य दिले गेले. 'वर्क फ्रॉम होम' ची सुविधा देण्यात आली. असेही चित्र दिसत होते. कोरोना बाधित रुग्ण संख्या वाढल्याने व पुन्हा लॉकडॉऊन होताना कामगारांची अवस्था बिकट झाली. हातावर पोट असलेले बांधकाम व्यवसायातील श्रमिक मजूर, कामगार, हॉटेल कामगार वर्ग, घरगुती कामे करणारा वर्ग, असे असंघटित कामगार वर्गाचे फार हाल झाले. 'मिशन बिगिन अगेन' च्या घोषणेनंतर ठिकठिकाणी परतलेल्या श्रमिकांच्या सहकार्याने कामकाज काही प्रमाणात सुरु झाले होते. केंद्र आणि राज्य सरकारने वेळोवेळी केलेल्या लॉकडॉऊन मध्ये नागरिकांनी जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करुन ठेवली होती. परंतु पुन्हा पुन्हा लॉकडाऊनच्या परिस्थितीमुळे अडचणीच निर्माण होत गेल्या. दरम्यानच्या काळात करोनाच्या भीतीमुळे सर्व नागरिकांनी मास्क लावले होते. बाजारपेठेतही सुरक्षिततेसाठी दक्षता घेतली जात होतीय ! तरीही काही ठिकाणी ग्राहक आणि विक्रेत्यांच्या गर्दीमुळे सुरक्षित वावराचा फज्जा उडाल्याचे दिसून आले. परिणामी संसर्ग वाढल्याची चिन्हे दिसून येताना प्रशासनाला पुन्हा पुन्हा लॉकडॉऊनचे निर्णय घ्यावे लागल्याची वस्तुस्थिती आहे. संसर्ग रोखण्याचे विविध उपाय योजनाना रस्त्यांवर कर्फ्युसदृश परिस्थिती, बाजारपेठेत शुकशुकाट. सर्व सामान्य नागरिकांना सोसायटी ( घराघरातून) बाहेर पडण्यास बंदी, सोसायटीच्या 'कृष्ण हाऊस' मध्ये अत्यावश्यक सेवेसाठी सुविधा उपलब्धी. संपूर्ण सोसायटीत जंतुनाशकांची फवारणी. यासह सरकारी कायदेकानू व सूचनांची अंमलबजावणी करण्यात येत राहिली. 'लॉकडॉऊन' परिस्थिती असताना उद्योगांना काही प्रमाणात परवानगी देण्यात प्रशासन अनुकूल होते. 'करोना' वर प्रशासनाच्यावतीने योग्य ती काळजी घेण्यासह, उपाय योजना करण्यासह अर्थव्यवस्था सांभाळण्यासाठी विविध त-हेने प्रयत्न करण्यात आले. महत्वाची विकास कामे यांसाठी निश्चिती उपलब्ध करुन देण्यात येत राहिला. यामध्येही सरकारची परीक्षा होताना कर्मचा-यांचे पगार, सरकारी उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ राखण्यासाठी काटकसरीचे धोरण राबविण्यात आले. मात्र आर्थिक पातळीवर समाज जीवनात दूरगामी परिणाम होत राहिल्याचे निश्चितपणे जाणवले. जीवन शैली बदलणारे संकट म्हणून 'कोरोना – १९' कडे बघितले जाते. लॉकडॉऊन, एकांतवास, घरी राहा. सुरक्षित राहा, 'मास्क वापरा' यासह सोशल डिस्टंन्सिंग आणि आरोग्य - प्रकृती विषयक काळजी घेण्याचा सूचना सर्वच प्रसारित झाल्या....

'कोरोना – १९' मुळे कराव्या लागलेल्या लॉकडॉऊनंमुळे लाखो श्रमिकांचा रोजगार बुडाला. विविध राज्यांमध्ये 'सुरक्षितवावर' ही संकल्पना राबवताना श्रमिकांच्या पुरवठ्यावर सुद्धा परिणाम झाला. वाहतूक व्यवस्था ठप्प झाली. श्रमिक – कामगारांसाठी त्यांच्या त्यांच्या गावी जाण्यासाठी 'श्रमिक रेल्वे' व इतर वाहतुकीची साधने, 'उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच त्यांचेसाठी आणि इतर गरीब, गरजू, लोकांसाठी रेशन, किरणामाल, व इतर जीवनावश्यक वस्तूंचा आणि आरोग्यविषयक साधनांचा पुरवठा' करण्यास स्वंयसेवी संस्थांनी सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून प्रयत्न केले आणि सामाजिक बांधिलकी जपली. सरकारी, खाजगी आरोग्य व्यवस्थेवर खूपच ताण पडला. तसेच उत्सव, गणोशोत्सव साजरा करण्यात, धार्मिक कार्यक्रम, लग्न समारंभ, तसेच सामाजिक –

राजकीय – सांस्कृतिक कार्यक्रमांवर कठोर निर्बंध लादण्यात आले. व त्याचीही अंमलबजावणी कडकपणे होत राहिली. कोरोनाबाधित व्यक्तींवर उपचार होण्यासह होम क्वारंटाईन, संस्थात्मक पातळीवर विलगीकरण, स्थलांतरास बंदी, परिसरात – रस्त्यारस्त्यांवर अडथळे उभे करुन प्रवेश बंदी असेही चित्र दिसून आले. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेकडून वैयक्तिक स्वच्छता आणि सुरक्षित वावर विषयक सूचना प्रसारित होत राहिल्या. मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांचेकडूनही करोनामुळे उद्भवलेलया स्थिती गतीचा आणि त्यावर मात करण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात येत होता. 'करोना' निवारण्यासाठी आरोग्य मंत्र्यामार्फत डॉक्टर्स, कर्मचारी भरती करण्यासह पोलीस – प्रशासन यांचेवतीने अत्यावश्यक सेवा सुरळीत राहण्यासाठी प्राधान्य मिळाले.

'करोना'च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठांच्या व बोर्डाच्या (शालान्त परीक्षा मंडळ) विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षाबांबत वेळोवेळी सुचना प्रसारित होत राहिल्या. त्यामध्ये झालेल्या परीक्षा व राहिलेला परीक्षा घेणेबाबत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या. त्यामध्येही एकवाक्यता दिसून आली नाही. शिक्षण संस्था आणि विद्यार्थी – पालक वर्गामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याच्या वृतांकने प्रसिद्ध झाली. मात्र अशाही परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य मिळाले. व परीक्षा रद्द होण्यासंबंधी अनुकूल – प्रतिकूल मतप्रवाह दिसून आले. एवढेच नव्हे तर. 'कोविड – १९' च्या साथीमुळे, 'ऑनलाईन' शैक्षणिक प्रक्रिया राबवण्याचे धोरण ठरवताना त्यातही अडचणी येत होत्या. इंटरनेट सेवा उपलब्ध नसणे, पालक – विद्यार्थी प्रशिक्षीत नसणे. त्याचबरोबर, माध्यान्ह भोजनाची समस्या (ही शाळेत उपलब्ध होती) याकडेही ग्रामीण भागात निर्माण झाली. 'करोना' चा फैलाव रोखण्यासाठी शैक्षिणिक संस्था, कोचिंग क्लासेस, ग्रंथालय, वाचनालय, वृत्तपत्र छप्पाई – वितरण, स्टेशनरी दुकाने संबंधित आस्थापना बंदच होत्या. टाळेबंदीचे वातावरण दिसून येत राहिले. 'करोना'च्या पार्श्वभूमीवर प्रवास न करण्याच्या सूचना जारी करण्यात आल्या. त्या दृष्टीने वाहतूकव्यवस्थाही बंदच होती, मात्र सरकारी नियमातील अत्यावश्यक सेवा सुविधा पुरवणा-या आस्थापना यांना सवलती देण्यात आल्या. जगभरातील क्रिडा स्पर्धा, स्पर्धा चाचण्या, आयपीएल क्रिकेट सारख्या स्पर्धा, तसेच टोकियो ऑलिम्पिक स्पर्धा यांचे आयोजन लांबणीवर टाकण्यात आल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. अद्यापपावेतो (जुलै २०२०) त्यावर ठोस निर्णय झाल्याचे दिसून येत नव्हते, सराव आणि सराव सामने, विविध खेळांचे स्पर्धा सामने यांवर देखील सरकारने निर्बंध लादल्याचे बातम्यांवरुन समजले.

करोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अनेक कंपन्यांनी कर्मचा-यांना विविध कार्यालय – आस्थापनेतील कर्मचा-यांसह 'वर्क फ्रॉम होम' चे आदेश दिले. परिणामी कंप्युटर व्यावसायिक यांनी डेस्कटॉप, लॅपटॉप भाड्याने देणारा व्यवसायात वाढ केली व भरपूर उत्पन्न (नफा) मिळवले. त्याचबरोबर ग्राहाकांनीही घरगुती कामासाठी, खरेदीसाठी ऑनलाईन सेवेचा लाभ घेतला. शिवाय घरात कार्यरत राहताना निरोगी आणि आनंदी राहण्याचा फॉर्म्युला देखील फिटनेस आणि व्यायामप्रेमी मंडळींनी माहिती करुन घेतला. त्यामुळे त्यांना कंटाळवाण्या जीवनापासून मुक्ती मिळविली. 'लॉकडॉऊन' ची सामाजिक – आर्थिक किंमतीचा लेखाजोगा येथे समजून घेता येतो. अर्थव्यवस्थेचे चक्र फिरत असताना व गेलेले रोजगार पुन्हा निर्माण होत असताना तिस-यांदा लॉकडॉऊन लादले गेले. त्यामुळे कष्टाकरी – श्रमजीवी, हातावर पोट असणा-यांची पंचाईत झाली. शिवाय जुलै २०२० च्या लॉकडॉऊनला व्यापारी महासंघाने विरोध दर्शवितांना त्यांच्या अडचणीही लक्षात आणून दिल्या. त्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे वस्तुस्थिती वरुन समजते. अर्थव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी आणि त्यावरच नागरिक आणि व्यापारी वर्गाचे स्वास्थ अवलंबून आहे. हेही लक्षात आणून देण्यात आले. व्यवहार हळहळू पूर्वपदावर येत असताना पुन्हा लॉकडॉऊन जाहीर केल्याने नागरिक व सर्व सामान्य वर्गही हवालदिल झाले, त्यांच्या मुलाखतीही वृतपत्रात वाचायला मिळाला. मात्र नियम न पाळल्यानेच कठोर निर्णय

घ्यावे लागले असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आल्याचे बातम्याही प्रसिद्ध झाल्या. लॉकडॉऊन च्या काळात 'कुरिअर सेवा' यांना चांगले दिवस येताना ' डिलिव्हरी बॉय' यांनाही रोजगार उपलब्ध झाला हेही तितकेच खरे आहे.

'करोना' साथीचा फैलाव जगभरात निर्माण होताना देशादेशांत वेगवेगळया औषधांची निर्मिती होत राहिली. शिवाय घरगुती, आयुर्वेदिक औषधांची माहिती सोशल मीडियात प्रसारित होऊन सल्लेही देण्यात आले. आपल्याला हा आजार झाला तर नाही, किंवा होणार तर नाही. अशी अनामिक भीतीही प्रत्येकाच्या मनात सतत डोकावत राहिली. टी.व्ही च्या बातम्यांतून करोना विषयक बातम्यांना प्राधान्य मिळताना कित्येकांनी तर ह्या बातम्या पाहणेच सोडून दिले, व टीव्हीही बंद ठेवले! दुसरीकडे विविध माध्यमांतून प्रतिकारशक्तीच्या औषधांच्या जाहिराती, स्वच्छताविषयक, पदार्थ – साबण, सॅनिटायझेशन वस्तुंच्या जाहिराती देखील मोठ्या प्रमाणात प्रसारित होत राहिल्या. त्यातून लोकांना 'करोना'चे गांभीर्य समजल्यामुळे ह्या वस्तु व पदर्थांच्या खरेदीस प्राधान्य मिळाले आणि स्वच्छता व आरोग्यविषयी लोक सतर्क – सजग झालृ बदलती आरोग्यशैली आणि जीवनपद्धती समाजात रुळू लागली. याचे प्रतिबिंब बाजारपेठेत दिसून आले. दुकानासमोर विशिष्ट अंतर, तसेच हस्तांदोलनास बंदी, थुंकीला मनाई, खोकला, शिंकरणे यासाठी घ्यावयाची काळजी सर्वच दिसून आली. आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड ची सुविधा प्रवास करताना बाळगण्यात आली. आणखी एका विशेष गोष्टीकडे लक्ष वेधताना लॉकडॉऊन मध्ये मनोरंजनाची साधने बंद असताना सर्वच माध्यमांतले कलाकार सोशल मीडियातून व्यक्त झाले. ऑनलाईन कार्यक्रम घेत अनेकांनी चाहत्यांशी संपर्क ठेवला. मात्र या व्यवसायाशी संबंधित असणारे तंत्रज्ञ व बॅकस्टेजचे कलाकार यांचा रोजगार बुडाला, त्यांच्या हाताला काम राहिले नाही. चित्रपटगृहे, नाट्यगृहे बंदच राहिली. सरकारचा महसूलही बुडाला, रसिक प्रेक्षकही मनोरंजन तथा करमणुकीच्या कार्यक्रमापासून दुरावले, वंचित राहिले. कोव्हिड – १९ विरोधातील खबरदारीच्या उपायांची ही एक नियमावली होती.

'कोरोना – १९' ह्या महासाथीने मुख्यत: व्यक्तिगत आणि सार्वजनिक आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यास प्राधान्य दिले आहे. खाजगी आरोग्य यंत्रणेने उपचारांचा बाजार मांडताना त्यावर नियंत्रण आणण्यासाठी सरकारकडून नियमावली करण्यात आली आहे. 'करोना' संसर्गाची लक्षणे याबद्दल लोकांमध्ये कमालीची जागरुकता निर्माण होताना सोशल मीडियातून सावधानता बाळगण्याच्या सूचना व विविध उपाय योजनांचा अवलंब प्रशासनाने केले असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या संसर्गजन्य आजारांबद्दल माहितीची देवाण घेवाण – करण्यात येऊन काळजी घेण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात आले. वृतपत्रीय सारख्या प्रसिद्धि माध्यमातून, अनेकविध टी.व्ही वाहिन्यां मधून वेळोवेळी 'करोना अपडेट' प्रसिद्ध होत राहिले. तसेच उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेत. त्यावर उपाययोजना देखील कार्यान्वित करण्यात प्रशासनाने आघाडी घेतली. समाज माध्यमांतून जनजागृती होत राहिली, तशाच अफवादेखील व्हायरल झाल्या ! वेगाने पसरणा-या करोना व्हायरसचा फटका उद्योग क्षेत्र – कॉर्पोरेट कंपन्या – व्यापार – व्यवसाय क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, मनोरंजन क्षेत्र या सर्वांना मोठ्या प्रमाणात बसला. सर्वच जणू काही अघोषित संचारबंदीची परिस्थितीच उद्भवली. मात्र जीवनावश्यक वस्तु सुरळीत मिळतील यासाठी प्रशासनाने वेळोवेळी सवलती जाहीर करताना त्यामुळे का होईना लोकांना थोडाफार दिलासा मिळाला. दुस-या बाजूने 'करोना' मुळे नागरिक घरातच अडकून पडल्याने सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात 'मेसेज' व्हायरल होत राहिले. विनोदी चुटके, किस्से, सल्ले, काव्यपंक्ती, छायचित्रे यांची देवाण घेवाण होत राहिले. त्याशिवाय घरबसल्या सवडीने वेबसिरीज आणि चित्रपटांचा आस्वाद घेण्यास पंसती मिळाली. कांहींनी आपापले छंदही जोपासले, वाढविले, वेळ सत्कारणी लावला.

'करोना - १९' साथीमुळे जगाची एकूण अर्थव्यवस्था मंदावल्याच्या, आर्थिक वृद्धि आकसला असल्याचे अंदाज व्यक्त करण्यात आले. करोनाचा प्रादुर्भवामुळे निर्माण झालेही अस्थिरता याकडेही लक्ष वेधण्यात आले. एवढेच नव्हे तर कोरोनाच्या प्रादुर्भवामुळे जगभरातील अर्थव्यवस्था संघर्षमय परिस्थितीशी सामना करीत असल्याचे दिसून आले. जागतिक करोना साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनजीवन सुरळीत होण्यासाठी आणखी बराच काळ जाईल असे एकुण परिस्थितीवरुन समजते. जागतिक मंदी, बेकारी, आर्थिक चणचण यावर मात करण्यासाठी विविध उपाय योजण्यात येत आहेत. उद्योगधंदे वाढीस चालना. गुंतवणुकदारांना प्रोत्साहन देताना अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता दूर करण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

करोना विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून लागू करण्यात आलेले लॉकडॉऊन टप्याटप्याने 'अनलॉक' केले जात आहे. मात्र करोनाच्या रुग्णांची संख्या वाढताना त्यामुळे संसर्ग होऊ नये म्हणून 'न्यु नॉर्मल' आयुष्य जगताना लोक आतापूर्वी पेक्षा अधिक काळजी घेऊ लागले. व तशी नवी जीवनशैली – जीवन पद्धती अस्तित्वात येऊ लागल्याचे परिस्थितीवरुन दिसून येते. 'सुरक्षित वावर' या नियमाचे पालन करण्यात प्रशासनाकडून प्राधान्य मिळताना, वैद्यकीय डॉक्टर्स, पोलीस व प्रशासकीय कर्मचारी वर्ग यांना 'कोरोना योद्धे' अशा बहुमानाने सन्मानित करण्यात व त्यांचे सत्कार समारंभ देखील होऊ लागले आहेत. 'वेबिनार' ला प्राधान्य मिळताना गर्दी टाळण्याचे, मोठ्या प्रमाणात लोक एकत्र येण्यास मज्जाव होत असल्याचे चित्र पाहयला मिळते.

**Referanc**

1. https://maharashtratimes.com/business/business-news/explainer-impact-of-corona-pandemic-on-indian-economy/articleshow/79964954.cms
2. https://www.bbc.com/marathi/india-52097708

# कोव्हीड-१९: विषाणू संसर्ग, प्रादुर्भाव आणि परिणाम, वर्षे २०२०

**प्रा .डॉ . दिगंबर बिरादार**
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, कला , विज्ञान आणि वाणिज्य, महाविद्यालय, इंदापूर

**प्रास्तावना**

आज जगातील सर्वच म्हणजे जवळ -जवळ 188 पेक्षा जास्त देशात कोरोना , अर्थात covid-19 या जागतिक महामारीने विळखा घातलेला दिसून येतो ,17 नोव्हेंबर 2020 पासून चीन मध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होण्यास सुरुवात झाली, तेव्हाच या महाभयंकर विषाणू संसर्गाची जाणीव जगाला झाली, म्हणून पुढील काळात जागतिक आरोग्य संघटनेला 11 मार्च 2020 रोजी covid-19 जागतिक महामारी म्हणून घोषित करण्यात आली, म्हणूनच संपूर्ण जगावर सामाजिक ,राजकीय आर्थिक, घडामोडीवर याचा भारीचा मोठा फटका बसला व प्रती घातक परिणाम झालेला दिसून येतो. आर्थिक तसेच जीवित हानी मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते, त्याच्या अभ्यास करणे हे मला महत्त्वाचे वाटले म्हणून या संशोधन लेखनामध्ये वर्ष 2020 या वर्षातील मामारीचा परिणाम याचा चिकित्सक थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

Origin of the research work:-

covid-19 विषाणूचा संसर्ग प्रादूर्भाव आणि परिणाम जगातील सर्वच खंडातील वेगवेगळया देशातील लोकांच्या जन जीवनावर आर्थिक, व्यवहारावर व जीवीतावर अर्थात जीवनावर कोणता परिणाम झाला यांचा भारतातील नागरी जीवनावर तसेच आर्थिक क्षेत्रावर कोण कोणता परिणाम यामुळे झाला, तसेच या covid-19 संसर्ग प्रादुर्भावामुळे वातावरणात जीवनात झालेले बदल उपलब्ध माहितीच्या आधारे संकलन करून त्याचे विश्लेषण पद्धतीने चिकित्सकपणे, विश्लेषण करण्यात आलेले आहे

* interdisciplinary relevance :

या संशोधनाचा परिणाम हा जीवनातील इतर वेगवेगळया विषयावर तसेच क्षेत्रावर झाले आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रावर झालेला तर दिसून येतो पण यांच्या अभ्यास आरोग्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, संख्याशास्त्र, मानसशास्त्र समाजशास्त्र ,आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण अर्थात राज्यशास्त्र इत्यादी विषय अभ्यासकांना यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होईल म्हणून मानवी, समाजाला मार्गदर्शक म्हणून उपायात्मक दृष्टिकोनातून आधार प्राप्त होईल

* review of research and development in the subject National status : -

हे शोध पेपर जागतिक माहामारी covid-19 या संसर्ग माहामारीच्या परिणामाचा अभ्यास करणारा आहे. या जागतिक माहामारीचा विविध कार्यावर तसेच आर्थिक अनुषंगाने सांस्कृतिक दृष्टीने कसा परिणाम होतो . आणि त्यातून देशाच्या विकासावर कसा परिणाम झालेला आहे . जागतिक पातळीवर, देश पातळीवर ,स्थानिक पातळीवर ही बिमारी एक नवीन मार्ग दाखवते याचा अभ्यास आपल्याला होतो. तसेच जागतिक प्रशासन unsco तसेच who प्रशासनाला कोणती खबरदारी घेतली पाहिजे, याचा आणि कोण कोणत्या दृष्टिकोनातून पावले उचलली पाहिजेत आणि पुढील खबरदारी घेण्यासाठी जागतिक आरोग्य समिती डब्ल्यू .एच. ओ प्रतिबंधात्मक पावले उचलण्यासाठी याचा उपयोग होईल . तसेच सामाजिक अर्थात सार्वजनिक जीवनात कोण कोणत्या खबरदाऱ्या घेतल्या पाहिजेत, प्रत्येक देशाच्या अंतर्गत व बाह्य राष्ट्र राज्याशी कोणते संबंध असावेत त्यासंबंधी त्याबद्दल आरोग्याच्या दृष्टिकोनातून घ्यावयाची काळजी यासाठी या संशोधन पेपराचा उपयोग होईल, त्याचा अभ्यास करण्यात उपयोग होईल या अनुषंगाने चिकित्सकपणे संशोधन मांडण्यात आलेला आहे .

signifieance of studay :

वरील अभ्यासाची आवश्यकता अथवा महत्त्व विचारात घेत असताना तसेच covid-19 संसर्ग विषाणूचा परिणाम किती मोठ्या प्रमाणात झालेला आहे .जगात जीवित हानी किती प्रमाणात झाली व्यक्तींना म्हणजेच समाजाला कोण कोणत्या खबरदाऱ्या घ्याव्या लागणार आहेत . एखाद्या विषाणूच्या संसर्गाचा परिणाम संपूर्ण मानव जातीला कशा पद्धतीने नष्ट करू शकतो ,आणि त्यातून डब्ल्यू . एच . ओ . ला कोणती भूमिका घ्यावी यासंदर्भात उपायोजना अर्थात सतर्कतेचा इशारा घेऊन काम करता येते, संपूर्ण जगात किती लोकांना covid-19 चा बादा झाला आहे . किती जणांचा मृत्यू झाला कुठल्याही अशा व्हायरल विषाणूचा परिणाम रोखण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयोगशाळांच्या मर्यादा यातून लक्षात येईल इंटरनेट तसेच तंत्रज्ञान यांच्या मुळे जग छोटे झाले कोणत्याही देशाला संसर्ग अथवा आर्थिक फटका बसल्यास त्याच्या फटका संपूर्ण जगाला बसतो,म्हणून मानवाने आपले सामाजिक जीवन जगत असताना, आपली भूमिका खूप जबाबदारीची असली पाहिजे याची जाणीव होण्यासाठी महत्त्व आहे. आर्थिक जीवनात याचा परीणाम किती मोठ्या प्रमाणात झाला आहे . आणि ही माहारामारी कशा पद्धतीची होती . त्यावर कशा पद्धतीने उपाययोजना करता येईल, या संदर्भात कोणतीही खबरदारी घेता येईल याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. म्हणून अभ्यासाची आवश्यकता आहे.

objective of research :-

covid-19 या संसर्गजन्य विषाणूची पार्श्वभूमी ,उगम ,स्वरूप ,प्रसार याचा अभ्यास करणे.

covid-19 या संसर्गजन्य विषाणूच्या परिणामाची स्वरूप आर्थिक व जीवित हानी अभ्यासणे,व्यवसायावर झालेला परिणाम जाणून घेणे.

जागतिक अर्थव्यवस्थेला बसलेला फटका अभ्यासणे.

जीवित हानी मानवी जीवनावर झालेला परिणाम अभ्यासने .

covid-19 विषाणू संसर्ग प्रादुर्भावाचे स्वरूप अभ्यासणे.

डब्ल्यू. एच .ओ .ची भूमिका अभ्यासणे .

जागतिक देशाच्या राजकीय नेतृत्व आणि घेतलेल्या भूमिकेचा अभ्यास करणे.

ovid-19 या संसर्ग आजारावर वॅक्सिंग तयार करण्याच्या संदर्भात जागतिक प्रयोगशाळेचा केलेला प्रयत्न अभ्यासणे ,त्यातून विविध देशात तयार केलेल्या व्यक्तींचा आढावा घेणे.

व्यक्तीने निसर्गासोबत राहून जगले पाहिजे, निसर्गाच्या विरोधात गेल्यानंतर त्याचा काय? परिणाम होतो याचा अभ्यास करणे

Research methodology :-

*Research methodology :-

प्रस्तुत संशोधन पेपर हे वस्तुनिष्ठ उपलब्ध माहितीच्या आधारे चिकित्सक ,ऐतिहासिक वर्णनात्मक ,विश्लेषणात्मक स्वरूपाचा असून माहितीचे स्रोत दुय्यम साधणे हाच राहिलेला आहे .या कालखंडात घडलेल्या घटना, डब्ल्यू. एच. ओ .या विषयांना स्पर्श करणाऱ्या घटना, घडामोडी परिस्थिती , जागतिक पातळीवरील नियोजन, राष्ट्र पातळीवरील नियोजन ,जिल्हा पातळीवरील नियोजन यांचा अहवाल, युनेस्कोचा अभ्यासाचा अहवाल ,विविध प्रकाशित करण्यात आलेले स्वरनिका, नियतकालिके, ग्रंथ ,राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सचिवालय प्रकाशित पुस्तके, डब्ल्यू. एच. ओ .चा अहवाल ,इत्यादी दुय्यम साधनाचा अभ्यास करून हे संशोधन पर पेपर मांडण्यात आलेला आहे.

प्रस्तावना ,(introduction)

आर्थिक वर्ष 2020 हे जागतिक मनुष्याच्या जीवनावर आलेले एक जैविक विषाणूजन्य अर्थात नैसर्गिक कठोर संकटाचे वर्ष म्हणून उगवलेले दिसते, कारण या वर्षात जागतिक मानवी जीवनात अनेक प्रकारचे संकटे आली संपूर्ण

खंडामध्ये महापूरचक्रीवादळ ,टोळधाड, अमेझॉन चा वनवा लेबनान युद्ध ,अनुबॉम ,बेरोजगारी आणि covid-19 अर्थात कोरोना सारख्या संकटाला सामना करण्यासाठी जगात अनेक ठिकाणी वेगवेगळे प्रयत्न झालेले दिसून येतात, कारण हा आजार जागतिक महामारी म्हणून जागतिक आरोग्य संघटनेला 11 मार्च 2020 रोजी घोषित करावी लागली, म्हणून आज ह्या आरोग्य शत्रू विरोधात प्रत्येक जण उभे राहिलेला दिसून येतो, तरी या बिमारी तूनअनेक लोक मृत्युमुखी पडले ,लाखोंची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाली, दैनंदिन जीवन विस्कळीत झाले, नागरिक बेरोजगार झाले. म्हणून या covid-19 अर्थात कोरोना सारख्या विषाणूचा प्रसार कसा झाला, त्याचे स्वरूप काय त्यांच्या प्रॉब्लेम म्हणजेच परिणामाची व्याप्ती क्षेत्र आणि संपूर्ण मानव जातीला त्याचा चांगला विशेषता वाईट परिणामाचा आढावा घेण्यात येणार आहे. तो पुढीलप्रमाणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

covid-19 या संसर्ग विषाणू चे स्वरूप आणि प्रसार:

covid-19 अर्थात कोरोना या महाभयंकर असा जिवघेण्या विषाणूजन्य वायरचा उगम हा चीनमधील वुहान शहरातील एक विज्ञान प्रयोग शाळेतून प्रयोग करीत असताना व्हायरस निर्माण होऊन मानवी शरीरात प्रवेश केलेला दिसून येतो ,साधारणता डिसेंबर जानेवारी 2019 -20 या आर्थिक वर्षामध्ये निर्माण झालेला दिसून येतो, सुरुवातीच्या काळात चीन मधील वटवाघळाच्या माध्यमातून मनुष्याच्या शरीरात प्रवेश झाला . आणि अनुमानित निष्कर्ष काढण्यात आला होता, तेव्हा तैवान 19 मार्च 2020 ला जागतिक आरोग्य परिषद सहभागी होणारा ,होणार नसल्याने तैवाने जाहीर केले कारण अमेरिका आणि चीनमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता आहे . परिषदेत सहभाग घेणार नसलो तरी जगभरात वैद्यकीय साधनाचा पुरवठा करणार असल्याचे तैवाने स्पष्ट केले,

जिनिव्हा कोरोनाच्या संकट विरोधात जागतिक पातळीवर नीपक्ष प्रयत्न स्वतंत्र यंत्रणा मूल्यंमापन करण्याची 60 पेक्षा अधिक देशांनी मत व्यक्त केले, तसेच जागतिक आरोग्य परिषदेच्या म्हणजेच डब्ल्यू. एच .ओ या 73 व्या सत्रात या बाबतचा मसुदा सादर झाला, असून यामध्ये कोरोनाविषाणूचा उगम आणि स्वरूप प्रसार याचा शोध घेण्याचीही मागणी करण्यात आली, केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ.हर्षवर्धन हे व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून या परिषदेला उपस्थित राहिले.

कोरोनाच्या उगमा बाबत चीन .कडे सगळेच देश बोट दाखवतात, आणि त्याची स्वतंत्र चौकशी करावी याला जवळजवळ सर्व देश पाठिंबा दिलेला दिसून येतो, तसेच या सर्वसमावेशक चौकशीला चीन तयार आहे. असे चीनचे अध्यक्ष शी जिंपिंग यांनी कॉन्फरन्स घेऊन सांगितले उलट तपास करण्यासाठी चिनने संयुक्त राष्ट्रांना दोन अब्ज डॉलरची मदतही जाहीर केलेली दिसून येते या बाबतीत कोरूनाचा उगम हा कोठे झाला हे आजतागायत जगभरातील शास्त्रज्ञांना सांगता आलेले नाही ,हा विषय खुप संदिग्ध असा राहिलेला आहे.

या कोरोना वायरस चे स्वरूप नाव( covid -19-, 12480019)

कोरोना व्हायरस चे प्रकार एकूण सात प्रकार
कोरोना व्हायरस आहेत . ते पुढील प्रमाणे

* पहिला प्रकार :human coronavirus(Hcov- 229-E ) यात सर्दी ताप जुखाम होते,

* दुसरा प्रकार: human coronavirus (NL63204
यात छोटे बच्चे वयस्कर और श्वसन संबंधी बिमारी रहती है

* तिसरा प्रकार : coronavirus Oc43 यात सर्दी ताप असी लक्षणे दिसून येतात

* चौथा प्रकार :human coronavirus Hkul यात
71 वर्षाच्या व्यक्तीला होऊ शकतोशिवसेना चा त्रास मोठ्या प्रमाणात होतो

* पाचवा प्रकार :सार्स :कोरोनाव्हायरस :पशु यातून मानवात प्रवेश प्रसार

* सहावा प्रकार: मर्स :कोरोना वायरस :यात ताप निमोनिया किडनी खराब लक्षणे वाढतात

* सातवा प्रकार :नावेल कोरोना वायरस :हा सर्वात घातक आहे ताप सर्दी खोकला कसा इत्यादी लक्षणे दिसून येतात

*** covid-19 कोरोना ची प्रमुख लक्षणे**

खालील प्रकारचे कोरोना व्हायरसचे संक्रमण झाल्या नंतर पुढील लक्षणे दिसून येतात,

* सर्दी होणे , हुडहुडी भरणे, मसल दुखणे, डोके दुखणे, वास न येणे,घसा खवखवणे, खोकल्या सोबत रक्त येणे,नाकातून पाणी येणे, शिंका येणे, उलटी येणे, थकवा येणे, पोट दुखणे कधी लक्षणे दिसून येतात ही लक्षणे कमीत कमी एक ते चौदा दिवसात दिसतात आणि सात दिवसात ते वाढतात किंवा कमी होतात covid-19 ची लागण झाल्यावर आपल्याला प्रथमतः covid-19 सेंटरला जाऊन चेक करावे लागतील स्वतःला दुसऱ्या पासून दूर ठेवावे लागते इत्यादी .

* कोरोनाव्हायरस पासून सुरक्षित राहण्यासाठी पुढील प्रकारची खबरदारी आपल्या रोजच्या जिवनात ध्यावे लागते .

* स्वच्छ हात कमीत कमी 20 सेकंद धुणे,जास्तीत जास्त शानीटॉयझर वापर करणे, टीसू पेपरचा वापर करणे, हात स्वच्छ ठेवले,दोघांमध्ये योग्य अंतर ठेवा विशेषता, आजारी व्यक्ती जवळ जाऊ नका ,मास्क वापरावेत तोंडाला नाकाला,हातात हात देऊ नये, गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये, सामाजिक अंतर ठेवून कमीत कमी एक मीटर इतरांची व्यवहार करावा इत्यादी प्रकारची खबरदारी कोरोना पासून बचाव करण्यासाठी घ्यावी, असे डब्ल्यू.एच.ओ ने जाहीर केलेले दिसून येते .

*** covid-19 संसर्ग प्रादुर्भावाची व्याप्ती ,क्षेत्र :**

जागतिक दृष्टिकोनातून : डब्ल्यू .एच. ओ ने दिलेल्या माहितीनुसार याचा संसर्ग जगातील 188 देशांमध्ये झालेल्या दिसून येतो, यातून एकूण 10,49,56,439 लोकांना कोरोना बाधित झालेला आहे त्यापैकी 22,90,488 लोकांचा मृत्यू झालेला आहे सध्या 4,60, 906 नवीन केस आज देशात आहेत. जगातील विविध सात वेगवेगळया खंडातील कोरोना बाधित आकडेवारी पुढीलप्रमाणे आहेत.

*अमेरिका खंड :शहर 4 6, 675, 418

*युरोप खंड : 35, 340, 896

*आशिया (पूर्व दक्षिण खंड):13, 00 81 106

*आफ्रिका खंड :2 6,44, 887

*पश्चिम पॅसिफिक खंड: 14,73,409

*Eastern Mediterranean : 58,06,978

अशाप्रकारे एकूण सात खंडांमध्ये वेगवेगळया देशांमध्ये कोरोनाचा संसर्ग झालेला दिसून येतो, पण काही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात संसर्ग झाल्याचा दिसून येतो, दिलेल्या माहितीनुसार विविध देशपातळीवरील आकडेवारी खालील प्रकारे आहे.

*United State of America: 2,6 4,18, 016, *India: 10,8,14, 30 6, *Brazil : 93, 96 ,293, * Russian federation: 39,51,233, * the United Kingdom: 3 9, 11,5 77, * France: 3 2, 41, 9 19, * spain : 29 ,13 ,425, * Italy : tu 26, 11,6 59, *Turkey : 25 ,16 ,889, * Germany: 22,7 5,394, * Columbia: 21,35, 412, * Argentina: 1 9, 6 1,6 35

अशा पद्धतीने World health organisation अद्ययावत माहितीवरून covid-19 ची संसर्ग झालेल्या जगातील देशाची माहिती वरील प्रमाणे दिसून येते, तरी दिवसेंदिवस ही आकडेवारी कमी जास्त होत चाललेली दिसून येते, याच्यावरून या माहामारीचे गांभीर्य लक्षात घेता येते .

* भारताच्या दृष्टीकोनातून : कोरोनाचा संसर्ग झाल्याचा विचार केला तर असे निदर्शनास येते की डब्ल्यू .एच ओ . ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार एकूण भारतात कोरोनाची लागण झालेली लोकांची संख्या 10,81,4,304 आहे . त्यापैकी 15 ,4, 918 लोकांची संसर्ग होऊन मृत्यू झालेले दिसून येते ,नवीन संसर्ग झालेले लोक 11,713 लोकांना संसर्ग झालेला दिसून येतो . सर्वाधिक जून 2020 ते डिसेंबर 2020 पर्यंत लोक कोरूना बाधित झालेलेआहेत ,आणि त्याच महिन्यात सर्वाधिक मृत्यूची नोंद झालेली संख्या आपल्याला दिसून येते.

*महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून : महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास आपल्याला असे निदर्शनात येते की जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार एकूण महाराष्ट्रात कोरणाची लागण झालेली लोकांची संख्या एकूण 20,44,071 एवढे लोक होते ,त्यातून बरे झालेले लोक 19,55,0 48 झाले होते, सध्या महाराष्ट्रात 35,948+ एवढी आहेत आणि मृत्यू पावलेल्यांची संख्या51,310 आहे. महाराष्ट्रात सुद्धा जून 2020 ते डिसेंबर 2020 पर्यंत सर्वाधिक लोक कोरोनाच्या संसर्ग झाल्याचे दिसून येते .

***covid-19संसर्ग प्रादुर्भावाचा परिणामाचे स्वरूप:**

कोरोना संसर्गाचा परिणाम संपूर्ण देशाच्या आरोग्य जीवनावर तर पडलेला आहेच . पण सामाजिक, आर्थिक ,व्यवसायिक, शैक्षणिक, उत्पादनावर, एकंदर नागरी जीवनावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो, आणि आर्थिक जीवनावर सुद्धा मोठा परिणाम झालेला दिसून येतो, धोरणाचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर ते स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात दिसून येतो, जवळजवळ जागतिक अर्थव्यवस्थेला पन्नास अब्ज डॉलरचा फटका बसलेला दिसून येतो ,यापुढेही वाढतच जाईल(OPEC) तेल उत्पादक देशातील उत्पादित तेल आन्य देशाला मिळेल की नाही, ग्राहका पर्यंत पोहोचेल की नाही, हा प्रश्न मात्र आज तागायत उतरली आहे. म्हणून आज पेट्रोलच्या कि मंती मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते . इंटरनेट व तंत्र ज्ञानामुळे व्यावसायिक दृष्ट्या जग हे खूप छोटे झाले आहे. त्यातून जगातील कोणत्याही देशाला आर्थिक फटका बसला की त्याचा परिणाम हा संपूर्ण जगाला भोगावा लागतो, चीन मधून येणारे वाहन, औषधा साठी लागणाऱ्या कच्चामाल उपलब्ध होत नसल्यामुळे त्याचा परिणाम औषध ,वाहन उद्योगावर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो, आपल्या देशातील पर्यटन व वाहतूक क्षेत्र मंदीच्या सावटाखाली आहे. तीर्थक्षेत्र, हॉटेल्स ,शॉपिंग ,मॉल पडलेले आहेत कृषी क्षेत्रालाही मोठा फटका बसला कांदा, फळे, पालेभाज्या इत्यादी ची मागणी घट लेली दिसून येते , परिणामी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढला गुन्हेगारीचे प्रमाणही वाढलेले दिसून येते, सर्वात मोठा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसला अफवांमुळे व्यवसायाला शंभर कोटी रुपयाचा दर महा फटका बसलेला दिसून येतो, चिकनचा भाव दहा रुपये प्रति किलो पर्यंत खाली आला, पूरक व्यवसाय घाट्यात आले ,म्हणजेच संपूर्ण जगात आज आर्थिक आणीबाणी निर्माण झाली, आणि जागतिक मंदी निर्माण होण्याची परिस्थिती दिसून येते ,तसेच क्षेत्राला याचा मोठा फटका बसलेला दिसून येतो ,रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले रस्त्यावरचे विक्रेते, गॅरेज वाला , तरुण - तरुणी मॉलमधील तरुण, भंगार जमा करणारे ,बांधकाम मजूर ,अर्धकुशल कामगार, अशा अनेक हातावर पोट घेऊन फिरणाऱ्या लोकांवर कोरोनामुळे मोठी संक्रांत आली असेच आपल्याला दिसून येते .

वाहतूक बंदी : काही लोकांनी बँकांकडून कर्ज घेऊन हस्यावर वाहने घेतले पण वाहतूक बंदी मुळे त्याला हप्ता भरण्याचा फटका बसला आणि बँकाचे वाढणार आहे बेकारी : जगातील अनेक देशात आर्थिक कपात आणीबाणी मुळे प्रत्येक देशात कामगार घटू लागले, आणि त्यातून जागतिक बेकारीची लाट निर्माण झाली आहे. विचार करून त्याच्यावर काय उपाय

योजना कराव्यात याचाही विचार यात करण्यात आलेला आहे .म्हणून यातून एक नवीन कार्यपद्धती उदयाला आलेली दिसते, समाजामध्ये जीवन जगत असताना एकमेकांच्या येणाऱ्या जवळच्या संबंधामुळे कोरोनाचा वेगाने प्रसार होतो, म्हणून राज्य सरकार, केंद्र सरकार शाळा, मॉल ,थिएटर ,सार्वजनिक, ठिकाणी बंदी घातली आणि जाहीर केले, त्याचा परिणाम म्हणून ऑनलाईन पद्धती ,वर्क फ्रॉम होम अशा पद्धतीची एक नवीन कार्यपद्धती जन्माला आली.

covid-19 संसर्ग : प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजना : -

covid-19 संसर्ग प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन स्तरापासून ग्रामीण भागातील शेवटच्या प्रशासकीय यंत्रणा पर्यंत ,तसेच सर्वसामान्य नागरिक का पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांना पर्यंत खबरदारी घेणे गरजेचे आहे. तसेच गावपातळीवरील कार्यकर्ते समाज सुधारक, डॉक्टर , तसेच अंगणवाडी तील शिक्षकसेविका पासून ते महाविद्यालयातील प्राध्यापक पर्यंत याची काळजी घेऊन लोकांमध्ये जनजागृती करणे महत्त्वाचे आहे .

* Covid-19 विषयी गैरसमजआणि वास्तविकता :

हा आजार नवीन असल्यामुळे त्याबद्दल अनेक गैरसमज समाजात निर्माण झालेले दिसून येतात, उदा :covid-19 चे संक्रमण झालेला प्रत्येक रुग्ण गंभीर स्वरूपात आजारी होतो, आणि अखेर मरण पावतो, कोरोनाविषाणू डासामुळे संसर्ग होऊ शकतो, अशा विविध प्रकारचे गैरसमज समाजात आहे.

पण वास्तविक विचार केल्यास कोरोना सहा व्यक्तीपैकी एक रुग्ण गंभीर आजारी होऊ शकतो 60 वर्षावरील व्यक्ती किंवा आधीपासून आजारी असलेला लोकांना याचा मोठ्या प्रमाणात धोका असतो, कोरोना आजार हा डासापासून होऊ शकत नाही, फक्त याला लोकांनी मास्क वापरावा ज्यांना ताप, खोकला इत्यादी लक्षण आहेत. त्यांनी आजारी लोकांची काळजी घेणारे ,आरोग्य सेवा कर्मचारी संशयित रुग्ण इत्यादींनी

* covid-19 च्या प्रतिबंधासाठी समुदायांमध्ये द्यावयाचे मुख्य संदेश :

१ ) covid-19 चा प्रतिबंध कसा? करावा आणि त्याचा प्रसार कसा रोखावा?

अ) भौतिक अंतर : social distance

* जत्रा, धार्मिक आणि सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे ,

* सार्वजनिक ठिकाणी असल्यास इतर व्यक्ती पासून कमीत कमी 1 मीटर अंतर ठेवा विशेष स्थान जर त्यांना खोकला ,ताप ,सर्दी इत्यादी लक्षणे दिसत असतील तर

*शक्य तेवढे घरी राहा .

* हस्तांदोलन, हात पकडणे किंवा मिठी मारणे यासारखे शारीरिक संपर्क टाळा

ब ) स्वच्छतेचे पालन करा :

* साबण आणि पाणी वापरून हात वारंवार कमीत कमी व २० सेकंद धुवा खास करून बाहेरून परत आल्यावर इतर लोकांना भेटल्यावर, खोकल्यावर ,शिकल्यावर, आपल्या चेहऱ्यांना हा लावू नये, स्वयंपाक करण्यापूर्वी व नंतर शौचाल यास जाण्यापूर्वी व नंतर आपले हात स्वच्छ धुऊन घ्यावेत

* खोकलताना , शिंकताना रुमाल किंवा टॉवेल आपले तोंड नाक ,कान झाकून घ्यावे रुमाल नसल्यास , हात दुमडून आपल्या हाताच्या कोपऱ्यांचा वापर करावा.

* रोज अनेक ठिकाणी थुंकू नका सार्वजनिक ठीकानी मोठ्याने बोलू नका किंवा ओरडू नका.

क ) स्वता:च्या आरोग्यावर लक्ष ठेवा लक्षणावर स्वतःची देखरेख करा, आणि गरज पडल्यास लगेच आपल्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट द्या.

2 ) गेल्या दोन आठवड्यात तुम्हाला लक्षणे आल्यास किंवा तुम्ही इतर देश किंवा राज्यात प्रवास केल्यास?

* ताप ,खोकला, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे असल्यास गावातील आरोग्य कर्मचाऱ्यांना संपर्क साधा किंवा जवळीक प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट द्या

*डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नका

*खोकताना किंवा शिंकताना अतिरिक्त काळजी बाळगा रुमाल टॉवेल चा वापर करा रुमाल नसल्यास हात दुमडून आपल्या हाताच्या कोपरा चा वापर करा

* आपली जबाबदारी पार पाडताना स्वतःची काळजी कशी घ्यावी?

१ ) प्रतिबंधात्मक काळजी घ्या भौतिक अंतर ठेवणे .

२) पाच पेक्षा जास्त व्यक्तीच्या संपर्कात येणे टाळा.

३) वृद्धांच्या घरी भेट देताना विशेष काळजी घ्या, दुर्लक्षित घटकांकडे विशेष लक्ष द्या.

इत्यादी पद्धतीने आपण खबरदारी घेतली तर कोरोना सारख्या जागतिक महामारी असणाऱ्या विषाणू संसर्ग असणाऱ्या महामारी वर आपण निर्बंध घालू शकतो, आणि त्याचे निवारण करू शकतो.

**निष्कर्ष/ शिफारशी :-**

* कोणत्याही विषाणू संसर्गजन्य महामारी वर आपण एकत्र ,संघटितपणे ,रचनाबद्ध, शिस्तबद्ध, वस्तुनिष्ठ तेच्या पार्श्वभूमीवर परिणाम कारक, व्यावहारिक वैज्ञानिक, पद्धतीने उपाययोजना केल्यास आपण त्यावर विजय मिळू शकतो.

* सार्वजनिक ठिकाणी व वैयक्तिक जीवनात स्वच्छतेचे महत्त्व ओळखून त्याचे दैनंदिन जीवनात आचरण स्वतः करून इतरांमध्ये जनजागृती निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

* शासनाच्या नियमाचे, कायद्याचे पालन करून अथवा इतरांना करायला लावणे महत्त्वाचे आहे.

* कुठलाही आजार चिकित्सक पणे उपाय योजना अस्तित्वात आणून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तर निदान शक्य असते.

उदाः लसिकरण संपूर्ण वर्गतील नागरिकांचे लसिकरण करावे लागेल .

**संदर्भ :-**

1) Ministry of health $ family welfare governance of India in Maharashtra

2) World health organisation

3) 19 Dashboard live

4) डॉ. सुभाष साळुंखे :तांत्रिक सल्लागार राज्य सरकार

5) डॉ. शैलेंद्र कुमार: वरिष्ठ वैज्ञानिक: आंतरराष्ट्रीय लोकसंख्या शास्त्र संस्था मुंबई

6) डॉ. एक .के .बेकर, डॉ. भाताळे : भारतीय प्रशासनाची रूपरेषा

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 25June-2021, Volume-11, Issue-21
Changing Perspectives of Language, Literature, Science and Social Science

# राष्ट्रवादी नेते : छ.राजर्षी शाहू महाराज

**डॉ. विशाल आर. जाधव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख एस.जी. आर. जी. शिंदे महाविद्यालय, परंडा ता. परंडा जि. उस्मानाबाद .

पंधराव्या शतकाच्या अखेरीस पोर्तुगीज खलाशी वास्को-दि-गामा याने भारताकडे येणारा सागरी मार्ग शोधून काढला. इथुन पुढे युरोपियन व्यापाऱ्यांच्या भारतातील आगमनास प्रारंभ झाला. ३१ डिसेंबर १६०० रोजी लंडन येथे 'The Governor and Company of Merchant of London Trading into the East India' या व्यापारी कंपनीची स्थापना झाली आणि इथुनच ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या भारतातील आगमनास सुरुवात झाली. या काळात युरोपने जरी आधुनिक युगात प्रवेश केलेला असला तरी भारतीय समाज मात्र मध्ययुगातच जीवन जगत होता. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक सर्वच क्षेत्रांत मागसलेपण होते. हा दरिद्री, मागसलेला , अशिक्षित, अडाणी भारतीय समाज जसजसा ब्रिटिशांच्या संपर्कात येऊ लागला तसतशी परिवर्तनाला सुरुवात झाली. ब्रिटिश व्यापारी म्हणून इथे आले. संधी मिळाल्यावर त्यांनी राजकीय सत्ता हस्तगत केली. स्वतःच्या सोयीनुसार प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली. प्रशासनातील मोठमोठया पदांवर ब्रिटिशांच्या नेमणूका केल्या. कारकूनांच्या जागांवर मात्र भारतीयांची भरती केली.

राज्यकारभार इंग्रजीतून चालत असे. त्यामुळे कारकुनांच्या जागांवर भरती करण्यात आलेल्या भारतीयांना किमान नेमून दिलेले काम करण्याइतपत इंग्रजी येईल यादृष्टिने इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्यास सुरुवात झाली. हीच गोष्ट भारतीयांच्या दृष्टिने क्रांतिकारी ठरली. काहींनी इंग्रजी भाषेचे ज्ञान प्राप्त केल्यानंतर कारकूनाची नोकरी न स्वीकारता महाविद्यालयीन शिक्षणास प्रवेश घेतला, काहीजण युरोपिय देशांमध्ये जाऊन बॅरिस्टर, डॉक्टर होऊन आले. तिथल्या वातावरणात राहून आले. पाश्चात्य ज्ञान, विद्या संपादन केलेला नवशिक्षितांचा हा वर्ग म्हणजेच भारतातील आधुनिक शिक्षण घेतलेली पहिली पिढी होय. त्यांच्या माध्यमातून भारतात मध्यम वर्गाचा उदय झाला. परंतु या नवशिक्षित भारतीयांची संख्या फार जास्त नव्हती. एक मात्र नक्की की, आधुनिक शिक्षणामुळे हा वर्ग सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टया जागृत झ ाला. व त्यांनीच या क्षेत्रांत भारतात सुधारणा घडवून आणल्या.

एकोणिसावे शतक भारताच्या इतिहासात सुधारणेचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात एका बाजूला भारतात सामाजिक , धार्मिक क्षेत्रांत अनेक सुधारणा घडून येत होत्या. तर त्यावेळी दुसऱ्या बाजूला भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रवादीची भावना निर्माण होत होती. ही राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याच्या कामी ज्या अनेकांनी योगदान दिले, त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज हे सर्वात महत्वाचे नेते होते. हे त्यांनी केलेल्या कार्याचा अभ्यास केल्यावर आपल्या दिसून येते. ते फक्त संस्थानिकच नव्हते, सुधारकच नव्हते तर ते 'प्रारंभीक राष्ट्रवादी नेते ' (Early Nationalist) होते. एखादया विशिष्ट भूप्रदेशामध्ये राहणाऱ्या लाकांना तो भूप्रदेश माझा आहे, त्या भूप्रदेशामध्ये राहणारी माणेस माझी माणसे आहेत, त्या भूप्रदेशाची संस्कृती , इतिहास, माती या सर्वांबद्दल ज्यावेळी आपल्या मनात आदराची, प्रेमाची, आपुलकीची भावना निर्माण होते तेव्हा त्या भूप्रदेशाला "राष्ट्र" व त्याभावनेला "राष्ट्रवाद" असे आपण म्हणू शकतो. राष्ट्रवाद निर्माण झ ाल्याशिवाय राय्ट्र तयार होऊ शकत नाही व राष्ट्र तयार झाल्याशिवाय राष्ट्र बांधणी करता येऊ शकत नाही. युरोपिय जगतात उदयाला आलेल्या या संकल्पना इथे रुजविण्यात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान मोठे राहिले आहे.

भारतीयांच्यात शिक्षणाचा अभाव आहे. हे कारण पुढे करुन ब्रिटिश राज्यकर्ते त्यांना राज्यकारभारत सहभागी करुन घेत नव्हते. मग यावर भारतीयांनी शिक्षणसंस्था सुरु करण्याची मागणी केली तेव्हा त्यासाठी लागणारा भरपूर पैसा उपलब्ध नसल्याचे सांगितले गेले. राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र सुधारण घडवून आणल्या. शिक्षण क्षेत्रातील विशिष्ट समाजाची मक्तेदारी संपुष्टात आणली. शैक्षणिक सोयी सवलती, शिक्षणसंस्थांची निर्मिती, शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य, वसतिगृहांची स्थापना केली. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार घडून आला. औद्योगिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय केली, प्रशिक्षण संस्थांची स्थापना केली. स्त्री शिक्षणाला गती दिली. त्यांनी प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले. कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा आदेश त्यांनी काढला. २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथे भरलेल्या अकराव्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष म्हून राजर्षी शाहू महाराज उपस्थित राहिले होते. या ठिकाणी आपल्या अध्यक्षिय भाषणात ते म्हणाले होते की, शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्यात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा वाटा मोठा आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी, निरनिराळया समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पध्दत मी काळजीपुर्वक अनुसरली आहे आणि माझ्या आयुष्याच्या पुढील काळात तीच पध्दत सुरु ठेवण्याची माझी इच्छा आहे, असे प्रतिपादन खामगाव येथे केले होते हा स्वातंत्र्य आंदोलनाचा काळ होता. राजर्षी शाहू महाराजांनी केलेली भाषणे व केलेले संस्थात्मक कार्य करण्यास प्रेरक ठरले. ब्रिटिशांकडे स्वराज्याची मागणी करण्यापुर्वी स्वराज्य म्हणजे काय ? हे या जनतेला समजले पाहिजे व त्या मागणी करिताही जनता सक्षम बनली पाहिजे . स्वराज्याचा अर्थच कळत नसेल तर स्वराज्य मागण्यात काय अर्थ ? असे शाहू महाराजांना वाटत होते. जर स्वराज्य हेच भारतीयांचे ध्येय असेल तर त्या ध्येयापर्यत जाण्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. याकरिता आपल्या समाजाल सुशिक्षित करण्याचे व त्यादृष्टीने त्यांची मने तयार करण्याचे बनविण्याच्या प्रक्रियेत त्यांनी महत्वाच भूमिका पार पाडली.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या १९२० नंतरच्या टप्प्यात भारतीय राष्ट्रीय सभेचे नेतृत्व महात्मा गांधीजीनी केले. १९२० नंतरचा हा काळ गांधीयुग म्हणून ओळखला जातो. गांधीजींनी या काळात जनआंदोलने उभारली. परंतु आपण हे इथे ध्यानात घेतले पाहिजे की, सर्वसामान्य जनता संघटित होऊन आंदोलनात सहभागी होण्याइतपत तिची मानसिकता तयार करण्याचे काम ज्या अनेकांनी केले त्यात राजर्षी शाहू छत्रपतींचा वरचा क्रमांक लागतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१) जाधव एस.जी.., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय, नांदेड, डिसेंबर २००५.

२) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, एप्रिल २०१७.

३) संपा. पवार जयसिंगराव , पवार मंजूश्री, राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, जानेवारी २०१९.

४) गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद जुलै २०१८.

५) गाठाळ एस.एस. आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, फेब्रुवारी २०१७.

# 'श्रीमान योगी' कादंबरी व तिची 'गरूडझेप' व 'श्रीमान योगी' ही नाट्यरूपांतरे

**प्रा.डॉ. गेजगे देविदास साधू**
**प्र.प्राचार्य/मराठी विभागप्रमुख, समीर गांधी महाविद्यालय, माळशिरस, जि. सोलापूर**
**ईमेल- dev.gejage@gamail.com**

## ● प्रस्तावना :-

रूपांतराची प्रक्रिया गेली अनेक दशके मराठी साहित्याच्या प्रांतात अविरतपणे सुरू आहे. मराठी सौंदर्यशास्त्रामध्ये इंग्रजी फॉर्म या शब्दास पर्याय म्हणून रूप या संज्ञेबरोबरच आकृतीबंध, घाट असेही शब्द योजले जातात. रूप या संज्ञेचा सर्वसमावेशक अर्थ वाङ्मयप्रकार किंवा साहित्यप्रकार असाही स्पष्ट होतो. विशिष्ट वाङ्मयप्रकारांचे रूप, स्वरूप लक्षात घेऊन पाश्चात्य कल्पनेने आपल्याकडील साहित्याला कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, कविता वगैरे वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांच्या चौकटीत बद्ध करुन ठेवले. साहित्याला अशा विशिष्ट सीमारेषांमध्ये बद्ध करून ठेवणे ब-याचदा अशक्य असते. कारण साहित्यातील अनोख्या अनुभवविश्वामुळे, वेगळेपणामुळे, बहुआयामीत्वामुळे विशिष्ट अनुभव कोणत्याही चौकटीच्या बंधनात अडकून राहू शकत नाही. त्यामुळे एकच विषय वेगळी तंत्रशैली घेऊन वेगवेगळ्या साहित्यप्रकारांमध्ये रूपांतरीत होताना दिसतो

'रूपांतर ही आपोआप घडणारी क्रिया नसून ती जाणीवपूर्वक घडवून आणलेली प्रक्रिया असते.' कथा, कादंबरीमध्ये निवेदनाच्या बळावर मानवाच्या जीवनातील चढ-उतार, भाव-भावनांचे हेलकावे, सुख-दुःख यांचा परिपोष अत्यंत खुबीने लेखकाने मांडलेला असतो. तो लेखकाचा अनुभव वाचकांच्या जीवनांगांशी निगडीत असल्याने त्यातील कलात्मकता वाचकांच्या पसंतीस उतरते आणि वाचकाला आनंद प्राप्त करून देते. त्या कथा-कादंबरीमध्ये आलेला अनोखा विषय नाटककार नाटकाच्या चौकटीत बसवून निवेदनाला दृश्यरूप प्राप्त करून देतात व रूपांतर घडवून आणतात.

काही नाटककार स्वतःच्या कथा कादंब-यांना नाट्यरूप देऊन रंगभूमीवर आणतात. (जयवंत दळवी, शं. ना. नवरे, रणजित देसाई वगैरे) तर काही नाटककार दुस-याच्या कथा-कादंब-यांमधील बहारदार अनुभव नाटकाच्या रूपाने रंगभूमीवर आणतात. (वसंत कानेटकर, शं. ना. नवरे वगैरे) तसेच काही कादंबरीकार तर एखाद्या नाटकाचे देखील कथा, कादंबरी मध्ये यशस्वी रूपांतर करतात. त्यामुळे रूपांतर ही जाणीवपूर्वक घडवून आणलेली प्रक्रिया अव्याहतपणे साहित्याच्या प्रांतात सुरूच आहे.

## ● रूपांतर म्हणजे काय?

मराठी भाषेमध्ये रूप ही संज्ञा वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. भौतिक जीवनामध्ये रूप हा शब्द सौंदर्य या अर्थाने वापरला जातो. राजाची आवडती राणी रूपवान होती. या वाक्यामधील रूपवान हा शब्द सौंदर्यवती या अर्थाने योजलेला आहे. परंतु आधुनिक सोयी-सुविधांमुळे खेड्याचे रूप पालटून गेले आहे. या वाक्यात मात्र रूप हा शब्द स्वरूप किंवा अवस्था या अर्थाने वापरलेला दिसतो. असे वेगवेगळे अर्थ एखाद्या शब्दाला किंवा संज्ञेला प्राप्त होत असतात.

साहित्यकृतीच्या सौंदर्यमीमांसेत मात्र रूप ही संज्ञा इंग्रजीतील फॉर्म या शब्दाला पर्याय म्हणून योजलेली आहे. तसेच कथेचे रूप कादंबरीपेक्षा वेगळे आहे. असे म्हणताना या शब्दाला आकृतीबंध, घाट असेही पर्यायी शब्द उपलब्ध होतात. परंतु रूपांतर या संकल्पनेमधील रूप ही संज्ञा साहित्यप्रकाराचे किंवा वाङ्मयप्रकाराचे स्वरूप या अर्थाने वापरलेला आहे. त्यामुळे काही अभ्यासक रूपांतर या संज्ञेसाठी प्रकारांतर किंवा कलांतर अशीही संकल्पना वापरतात.

## ● श्रीमान योगी (कादंबरी-१९६८) - रणजित देसाई

सन १९६८ साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जीवनकहाणी रणजित देसाई यांनी या कादंबरीच्या दोन खंडात रेखाटलेली आहे. या कादंबरीत

शिवाजीच्या जन्मापासून मरणापर्यंतचा संपूर्ण कथाभाग सविस्तर आलेला आहे. चरित्रातील घटना, प्रसंग, व्यक्ती, अख्यायिका, दंतकथा यांच्या आधारे शिवाजी यांना केंद्रबिंदू मानून लेखन झालेले आहे. इतिहासातील वा शिवचरित्रातील प्रसंग आहे तसे न रेखाटता त्यात स्वतःच्या कल्पनेचे रंग मिसळून शिवाजीच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे. लढाई, तह, विजय, पराजय, भेटी, मुजरे, दगा, संकट, आजारपण या घटनांचे वर्णन करताना 'शिवाजी' या मध्यवर्ती व्यक्तिरेखेभोवती कथानकाचा आवाका मर्यादित ठेवलेला आहे. शिवाजीसारख्या आदरणीय व्यक्तिमत्त्वाविषयी त्यांच्या जन्मतिथीपासून रामदासांच्या भेटीपर्यंतचे अनेक वाद आहेत; पण अभ्यासकांच्या मतांचा सारासार विचार करून प्रत्येक घटनेची संगत लावण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. काही वेळा ऐतिहासिक घटनेला फाटा देऊन आपल्या कल्पनाविलासाच्या सहाय्याने प्रसंग रंगविले आहेत. शिवाजीचा जन्मकाळ, शहाजी महाराज आणि तुकाबाईचा विवाह, संभाजी आणि शिवाजी यांच्या वयातील अंतर इत्यादींविषयी स्वतःच्या चिंतनातून योग्य वाटलेले निर्णायक मत त्यांनी नोंदविलेले आहे.

शिवाजीच्या जन्मानंतर शहाजीराजे व जिजाबाई यांना झालेला आनंद, सर्वत्र पसरलेले चैतन्याचे वातावरण, भटजींनी सांगितलेली भाकीते, शिवाजीचे बालमित्र, सहकारी, मार्गदर्शक, नातेवाईक या सर्वांवर प्रकाश टाकत-टाकत कथानक वेगवेगळ्या घटनांमधून पुढे सरकत जाते. शिवाजीच्या कर्तृत्वशाली व न्यायनिष्ठूर व्यक्तिमत्त्वाची सलामीलाच ओळख व्हावी म्हणून रंगवलेला रांझेकर पाटलांचा प्रसंग, रोहिडेश्वरी येथे घेतलेली शपथ, एकेक किल्ला सर करून स्वयंभू कर्तृत्वाचे घडविलेले दर्शन, अफझलखान, शाहिस्तेखान, औरंगजेब इत्यादींशी केलेला मुकाबला. सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई वगैरे आठ बायका. मुलगा, मोरोपंत पिंगळे, बाजीप्रभु देशपांडे यांच्यासारखे सहकारी. 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा।।' असा मंत्र देणारे समर्थ रामदास. शहाजी, जिजाई, सई, दादोजी, बंधू संभाजी इत्यादींच्या मृत्युप्रसंगाने शिवाजीला बसलेला धक्का, आग्र्याहून सुटका, संभाजीची कैद, राज्याभिषेक व त्यानिमित्ताने घडलेले वादळ आणि शेवटी महाराजांचा झालेला मृत्यु यासारख्या घटनाक्रमांनी हे कथानक गुंफले गेले आहे.

अनेकांच्या सहवासात वावरत असताना शिवाजीला जाणवणारा विलक्षण एकाकीपणा चित्रित करण्याकडे लेखकाचा अधिक ओढा दिसून येतो. या कादंबरीविषयी डॉ. जी. पी. माळी म्हणतात, "'स्वामी' च्याच वाटेवरून 'श्रीमान योगी' चा प्रवास झालेला असला तरी 'स्वामी' ही निखळ कादंबरी आहे; पण 'श्रीमान योगी' ही बखर, इतिहास, चरित्र आणि कादंबरी या विविध वाङ्मयप्रकारांचे मिश्रण असल्यामुळे लेखक तिला 'चरित कहाणी' म्हणून संबोधतो..."[१] यावरून कादंबरीच्या वेगळेपणाची कल्पना येते.

**● गरूडझेप (नाटक-१९७४) - वसंत कानेटकर व रणजित देसाई**

'श्रीमान योगी' या कादंबरीतील 'आग्र्याहून सुटका' या प्रकरणावर वसंत कानेटकर आणि रणजित देसाई या दोघांनी 'गरूडझेप' हे नाटक लिहले.

'...महाराजांनी निरोप घेतला, दंडवत घातला भवानीला,
तसाच आई जिजाईला, वखुत ह्यो वंगाळ जी कसला,
पाणी आलं आईच्या डोळ्याला, सरदार लागलं रडायला,
असा बेहुदा वखूत आला,
दुश्मनाच्या गोटात चालला, मराठ्यांचा राजा..."(पृ.१)

या पिराजीच्या पोवाड्याने नाटकास सुरूवात होते; परंतु शिवाजीराजे पोवाडा मध्येच थांबवतात, कारण मिर्झाराजासारखा प्रबळ शत्रू स्वराज्याच्या छातीवर पाय देऊन उभा असताना कवने ऐकत बसण्याची ही वेळ त्यांना वाटत नाही. मिर्झाराजाच्या बळाची आणि बुद्धीची जाणीव शिवाजीराजांना असते. जनतेवर अन्याय होऊ नये म्हणून ते मिर्झाराजाच्या तळावर तहासाठी जायचे ठरवितात.

निःशस्त्र शिवाजीराजांना तहासाठी आलेले पाहून मिर्झाराजा शिवाजीच्या दुशेल्यात तलवार अडकवून त्यांचे कौतुक करतो. परंतु तहाच्या जाचक अटी ऐकून शिवाजीराजे विचारमग्न होतात. मिर्झाराजाबरोबर

'पुरंदरचा तह' करून आलेले महाराज अस्वस्थ होतात. तहाने संभाजीराजे मोघलांचे सहाहजारी मनसबदार बनलेले असतात. ही गोष्ट शिवाजीराजांना सतावत राहते. औरंगजेबाच्या भेटीला निघालेले महाराज आणि युवराज एकमेकांशी चर्चा करून निर्भिड बनतात.

आग्र्यातील भेटीत औरंगजेबासमोर जोपासलेल्या कणखर बाण्यामुळे शिवाजीला कैद करून ठेवले जाते. औरंगजेब शिवाजीविरूद्ध कट-कारस्थाने करून त्यांना संपविण्याच्या विचारात आहे; हे समजल्यानंतर राजे कैदेतून सुटण्यासाठी गहन विचार करतात व शिवाजीच्या पहा-याची जबाबदारी असणा-या पोलादखाँच्या हातावर तुरी देऊन मिठाईच्या पेटा-यात संभाजीला बसवून व स्वतः भोई बनून आग्र्याच्या कैदेतून बाहेर पडतात. शिवाजीच्या जाण्याने औरंगजेबाला धक्का बसतो व स्वतःची अब्रु वाचविण्यासाठी शिवाजीला 'राजा' ही खिलाफत पाठवितो.

राजगडावर बैराग्याच्या वेशात आलेल्या शिवाजीला पाहून जिजाईसह सर्वांनाच खूप आनंद होतो. युवराजांच्या सुखरूपतेसाठी राजे, 'मथुरेत युवराजांचा काळ झाला.' अशी अफवा पसरवतात. परंतु या अफवेने जिजाईंच्या हृदयाचा ठोका चुकतो. राजांच्या या राजकारणाने त्या आश्चर्यचकीत होतात व त्यांना सह्याद्रीचा गरूड संबोधून 'गरूडझेप' घेण्यासाठी आशीर्वाद देतात.

वसंत कानेटकर व रणजित देसाई या दोन लेखकांनी मिळून एक नाटक लिहिणे ही रसिक वाचक व प्रेक्षकांच्या दृष्टीने कुतूहलाची बाब होती. हे कुतूहल जागृत होऊन प्र. ना. परांजपे यांनी विचारणा केली असता, कानेटकर कथानकाविषयी सांगतात, "...आम्ही प्रवेशाची व अंकांची विभागणी करून लेखन करीत नाही. 'गरूडझेप'चा कथाभाग 'श्रीमान योगी' या कादंबरीत येऊन गेलेला आहे. त्याच्या आधारे रणजित व मी एकत्र चर्चा करून नाट्यरचनेचा एकत्र आराखडा तयार केला. त्या आराखड्याच्या आधारे रणजित हे नाटक लिहित आहेत. त्यांचे लिहिणे आटोपल्यावर त्याचा आधार घेऊन मी काही लिहिणार आहे आणि अखेर दोघे एकत्र बसून चर्चा करूनच शेवटची संहिता तयार करणार आहोत."[२] यावरून गरूडझेपच्या निर्मितीप्रक्रियेची व लेखनपद्धतीची कल्पना येते.

● **श्रीमान योगी (नाटक-१९९७) - रणजित देसाई**

'श्रीमान योगी' या कादंबरीवरच आधारित असलेल्या या नाटकाच्या सुरूवातीलाच राज्याभिषेकानंतर जिजाईंच्या निर्वाणाने शिवाजी महाराज पूर्णपणे खचून गेल्याचे दिसतात. त्या भावनिक असंतोषामुळे त्यांचे राजकारणात लक्ष लागत नाही. त्यावेळी त्यांना पुतळा धीर देण्याचा प्रयत्न करतात. त्याचदरम्यान गृहकलहाला सुरूवात होते. सोयरा राज्याभिक्षित राणी असल्याने संभाजीला दिले जाणारे युवराजपद त्यांना खपत नाही.

तरुण युवराजांच्या तडकाफडकी वागण्याने महाराजांना दुःख होते. अनाजीच्या नात्यातील एक मुलगी पळवून नेऊन लिंगाण्यावर ठेवल्याचा आरोप युवराजांवर असतो. यात सत्यता असेल तर राजे संभाजीला कडक शिक्षा देण्याचा निर्णय घेतात. 'गैरसमजाने जीवरक्षणासाठी त्या मुलीने कड्यावरून स्वतःला झोकून देऊन जीव दिला.' हे ऐकून राजांना अतिशय दुःख होते.

युवराजांच्या वागण्याने हतबल झालेले महाराज साता-याला गेल्यानंतर आजारी पडतात. घरभेद्यांमुळे ही बातमी युवराजांपर्यंत पोहोचत नाही. समजल्यानंतर मात्र लगेच युवराज साता-याला महाराजांच्या भेटीला जातात. आपल्या हातून घडलेल्या चुकीची माफी मागून रायगडावर आपल्याला कसे दुय्यम स्थान दिले जाते, याची खंत महाराजांसमोर व्यक्त करतात.

आजारपणातून उठल्यानंतर राजे 'दक्षिण दिग्विजया'साठी जातात. पण ती मोहिम अर्ध्यावर सोडून त्यांना परत यावे लागते, कारण युवराज मोगलांशी काहीतरी हितगूज करत आहेत, ही बातमी त्यांना कळालेली असते. संभाजीच्या या कृत्यामुळे महाराज आणि पुतळा अस्वस्थ होतात. त्यामुळे युवराजांना जखडून ठेवण्यासाठी महाराज येसूला प्रोत्साहन देतात.

फिरंगोजी नर्साळाने युवराजांच्या प्रेमापोटी 'भूपाळगड' युवराजांच्या ताब्यात दिल्यानंतर दिलेरखान गडावरील सातशे मावळ्यांचे हात तोडतो. औरंगजेबाने दिलेरखानाकडे संभाजीची मागणी केल्यानंतर मात्र युवराज स्वराज्यात पळून येतात. तेव्हा राजे त्यांना नजरकैदेची शिक्षा सुनावतात.

आजारपणाच्या त्रासापेक्षा शिवाजी महाराज घरातील कुरघोड्यांमुळे मानसिकदृष्ट्या खचत जातात, ते म्हणतात, 'आम्ही ना तो राजे, ना छत्रपती, आम्ही तर जगदंबेचे भोपे...' या नाटकात नाटककारांनी शिवाजी महाराजांची मानसिक अस्वस्थता, युवराजांचे स्वराज्यात होणारे खच्चीकरण आणि सोयराबाईसारख्या व्यक्तींमध्ये निर्माण झालेली राजकीय लालसा; यामुळे स्वराज्यात निर्माण झालेली असंतुलनीयता याचे दर्शन घडते. या नाटकासंदर्भात डॉ. जी. पी. माळी म्हणतात, "'श्रीमान योगी' या कादंबरीचे कथानक, व्यक्तिचित्रण, भाषाशैली, संवादलेखन, वातावरणनिर्मिती, संघर्षचित्रण इत्यादींच्या संदर्भात नाट्यरूपांतरात काहीही वेगळेपणा जाणवत नाही. वाङ्मयप्रकारांतर करताना नाटकाच्या प्रकृतीला अनुसरून करावे लागणारे बदल लेखक समाधानकारकरित्या करू शकला नाही. विशेषतः कादंबरीतील शिवाजीची प्रभावी आणि परिणामकारक व्यक्तिरेखा नाटकात उभी करणे रणजित देसाईंना शक्य झाल्याचे दिसत नाही."[३]

● **भाषाशैली :-**

'श्रीमान योगी' ही ऐतिहासिक कादंबरी असली तरीही 'स्वामी' कादंबरीप्रमाणेच वर्तमानकालीन भाषेचा वापर करुन भूतकाळ व वर्तमानकाळ यांची सांगड घालण्याची 'स्वामी' मधील भूमिका लेखकाने या ही कादंबरीत अनुसरलेली आहे. याविषयी स्वतः रणजित देसाई म्हणतात, "मी जे लिहतो ते वाचकांपर्यंत पोहचावं असं मला वाटतं. शिवाय बखरीची भाषा वापरणं मला कृत्रिमपणाचं वाटतं. ती त्यावेळची दप्तरी भाषा होती, व्यवहारातील नव्हे..."[४] निवेदनासाठी नागर भाषेचा वापर केला असला तरी जुन्या काळातील किंवा बखरीतील विशिष्ट शब्दयोजनेतून ऐतिहासिक वातावरण निर्माण करण्याची खबरदारी घेतली आहे. मतलब, तकलीफ, अर्ज, बेअदबी, चूपचाप, खामोश इत्यादी शब्दांमधून ऐतिहासिक वातावरण निर्माण केले आहे. लेखकाने संवाद, घटना व थोड्या प्रमाणात निवेदन या पद्धतीने श्रीमान योगीची रचना केली आहे. त्यातही संवादावर अधिक भर आहे. कोणाच्या मनात काय चालले आहे, याची तपशिलवार माहिती न देता संवादाच्या सूत्रातून ती सूचित करण्याची रणजित देसाईंची खासियत पानोपानी पहायला मिळते. त्यांची भाषा पात्रानुरूप बदलते. भीमा लोहार आणि शिवाजीराजांच्या भेटीचे वर्णन करताना भीमाची ग्रामीण सातारा ढंगाची भाषा आणि शिवाजीची नागर भाषा यातील वेगळेपणा प्रकर्षाने जाणवतो. शिवाजीच्या भाषेतील जरब, करारीपणा, जोरकसपणा आणि भीमाची भांबावलेली विनम्र मनोवृत्ती याचे चित्रण त्यांच्या संवादातून दिसते. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी एखादे वाक्य लिहून परिणामकारकता साधणे हे रणजित देसाईंचे वैशिष्ट्य येथेही दिसून येते. उदाहरणार्थ श्लोक, अभंग, पोवाडा, वाक्प्रचार, म्हणी, हिंदी-उर्दुमिश्रीत मराठी भाषेच्या माध्यमातून कादंबरीचे कथानक पुढे सरकत राहते. जिजाबाई, सोयराबाई, पुतळाबाई यांच्या बोलण्यातील स्त्री-सुलभ संकोच आणि शिवाजी, संभाजी यांच्या भाषेतील जरब लेखक चातुर्याने रंगवितात. अर्थात लेखकाच्या मर्यादाही काही वेळा स्पष्ट झालेल्या आहेत. उदाहरणार्थ फिरंगोजी नरसाळाच्या तोंडी त्यांनी वापरलेली भाषा सर्वत्र समान नाही. काही ठिकाणी तो प्रमाणभाषेत बोलतो; तर काही वेळा बोली भाषेत बोलतो.

'गरुडझेप' या नाटकाची भाषाशैली देखील कादंबरीशी मिळती-जुळती आहे. नाटकाचा विषय ऐतिहासिक असला तरी आणि हे नाटक वसंत कानेटकर व रणजित देसाई यांनी मिळून लिहिलेले असले तरीही कादंबरीप्रमाणेच भूतकाळ आणि वर्तमानकाळाची सांगड या नाटकातील भाषेत घातलेली आहे. संवादासाठी नागर भाषेचा वापर केलेला असला, तरीही शिवकालीन किंवा बखरीतील विशिष्ट शब्दयोजनेतून ऐतिहासिक वातावरण निर्माण केले आहे.

कोणाच्या मनात काय चालले आहे, याची माहिती देण्यासाठी वेळ न घेता संवादाच्या सूत्रातून ती सूचित करण्याची 'श्रीमान योगी', 'स्वामी' कादंब-यांसारखीच पद्धत या नाटकात पहायला मिळते. नाटकातील

स्वगतातून राजांना हिंदवी स्वराजाबद्दल असणारी तीव्र तळमळ त्यांच्या भाषेतून व्यक्त होते. उदाहरणार्थ, "...एकलिंगजीचे कडवे उपासक. या भूमीचे पराक्रमी पुत्र. दुस-या एका शिवभक्ताची पूजा उधळून टाकू बघतात! ती ही एका यवनधमाना सुप्रसन्न करण्यासाठी!..."(गरुडझेप, पृ.३१) औरंगजेबाच्या स्वगतातून शिवाजीचा मोठेपणा व्यक्त होतो. उदाहरणार्थ, "आपल्या मुलखापासून दूर आमच्या पंजात पुरा सापडलेल्या शिवाजीला सोडविण्यासाठी जीवाला जीव देणा-या शेकडो माणसांची पैदास करता आली, पण या औरंगजेबाला एक सच्चा माणूस मिळवता आला नाही, हाच औरंगजेबाचा पराभव आहे..."(गरुडझेप, पृ.३१,३२)

औरंगजेबाच्या भाषेतील अहंकार, मोठेपणाची अदब, बादशाही थाट, विकारी दृष्टीकोन रंगविण्यात लेखद्वय यशस्वी झालेले आहेत. त्याचबरोबर रणजित देसाई यांच्या 'श्रीमान योगी' नाटकातील भाषा, 'श्रीमान योगी' कादंबरी व 'गरुडझेप' नाटक यांच्यातील भाषा यामध्ये फारसा फरक नाही.

● **परस्परसंबंध :-**

'श्रीमान योगी' ही कादंबरी 'स्वामी' कादंबरीच्या अपूर्व यशानंतर रणजित देसाई यांनी लिहिली. शिवशाहीचा इतिहास, तो काळ, शिवाजी महाराजांचे जीवन, सुरूवातीचा वैभवकाळ आणि नंतरचे चढउतार या सर्वांचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास करण्यामध्ये देसाईंची तीन-चार वर्षे गेली. शेवटी अथक परिश्रमानंतर १९६८ मध्ये ही द्विखंडात्मक कादंबरी वाचकांसमोर आली. 'स्वामी' पासून ऐतिहासिक कादंबरीचा जो दुसरा टप्पा सुरू झाला त्या टप्प्यातील एक महत्त्वाकांक्षी टप्पा 'श्रीमान योगी'ने गाठला. "ऐतिहासिक ग्रंथ व साधनांचे उत्तम परिशिलन करून इतिहासातील व्यक्तींकडे केवळ श्रद्धास्थान म्हणून न पाहता माणूस म्हणून पाहण्याचा त्यांचा हा आणखी नाविन्यपूर्ण प्रयत्न होता."[५] हा प्रयत्न वाचकांना आवडला. समीक्षकांच्या चिंतनाचा विषय ठरला. पण हे आव्हान सोपे नव्हते, शिवाजी महाराजांसारख्या एका महामानवाचे कादंबरीच्या माध्यमातून दर्शन घडविलेले आहे.

'श्रीमान योगी' कादंबरीमध्ये शिवाजीचा संपूर्ण जीवनपट, त्यांची व्यथा, त्यांची स्वप्ने, त्यांना मिळालेली प्रेरणा, मदत, मार्गदर्शन, सहकार्य, कर्तृत्व, धोरण, उदारता, धार्मिक सहिष्णूता इत्यादींचे उभे-आडवे धागे विणून एक पूर्णाकृती चरित्र सादर करण्याची लेखकाची भूमिका या कलाकृतीत दिसून येत असली तरी हा मनःपट घटनाप्रधानच राहिल्याने शिवाजीच्या अंतर्मनातील अवस्था चित्रित करण्याचे सामर्थ्य अपेक्षा पूर्ण होण्याइतपत आढळत नाही. चरित्र व वास्तवाचे बारकाईने केलेले वर्णन खूपच विस्कळीत व पाल्हाळीक झाल्याने कथानकाची गतिमानता कमी झालेली आहे. परिणामी त्यात बांधेसूदपणा राहिलेला नाही. शिवाजीसारख्या कर्तृत्वसंपन्न महापुरूषाचे जीवन द्विखंडात रेखाटून लेखकाने आपल्या परिने हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाजी महाराजांची एक राष्ट्रपुरूष, वीर, योद्धा, राजकारण धुरंधर म्हणून शोध घेण्याचा प्रयत्न रणजित देसाईंनी 'श्रीमान योगी'च्या कथानकाद्वारे केलेला आहे.

'गरूडझेप' या नाटकाचे कथाबीज हे देखील शिवाजी महाराजांच्या जीवनातील 'आग्र्याहून सुटका' या ऐतिहासिक घटनेवर आधारलेले आहे. या विषयावरच औंधकरांनी 'आग्र्याहून सुटका' हे नाटक लिहिलेले आहे, परंतु रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'श्रीमान योगी' या कादंबरीत छत्रपती शिवाजी महाराजांची एक आगळीच थोरवी, प्रचंड पराभव आणि दारूण अपमान यांच्या वेदनेतून उसळणारी थोरवी त्या कहाणीत आहे. म्हणूनच प्रा. वसंत कानेटकर आणि रणजित देसाई यांनी मिळून हे नाटक लिहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे हिंदवी राज्य घडविले. त्या गोवर्धन पर्वताला अनेक थोरा-मोठ्यांचे हात लागले. म्हणून ते अवतरले, अशी खुद्द छत्रपतींची भावना होती.

त्या शिवचरित्रातले सोनेरी पान या दोन शिवभक्तांनी भक्तीभावाने एकत्र येऊन लिहिले. या नाटकातील कथानकाचा कोणता भाग वसंत कानेटकर यांनी लिहिला व कोणता भाग रणजित देसाई यांनी लिहिला याची पुसटशी कल्पनाही येत नाही. या नाटकामध्ये त्यांनी मर्यादीत व्यक्तिरेखा, भारदस्त भाषाशैली, संघर्ष, ताण-तणाव उपाययोजना, संवादलेखन यांचे कौशल्याने रेखाटन केलेले आहे. त्यामुळे श्रीमान योगी

कादंबरीतील 'आग्ऱ्याहून सुटका' हे प्रकरण 'गरूडझेप' या नाटकामध्ये वेगळा आशय घेऊन अवतरलेले आहे. त्यामुळे नाटकातील कथानक भारदस्त वाटते. पण नाटक या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये पाहता त्याला मर्यादा पडलेल्या दिसतात.

'श्रीमान योगी' या नाटकातील कथानक हे कादंबरीच्या पूर्ण आशयावर आधारित असल्यासारखे दिसते. 'श्रीमान योगी' या नाटकाचे कथाबीज हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनामध्ये निर्माण झालेला गृहकलह आणि युवराज संभाजीच्या उमेदवारीच्या काळात सोयराबाई, अष्टप्रधान मंडळ यांनी दाखविलेला अविश्वास तसेच महाराजांना युवराजांबद्दल पिता म्हणून वाटणारी काळजी, प्रेम, विश्वास त्यातून निर्माण होत गेलेली मानसिक व्यथा यावर आधारलेली आहे.

याच विषयावर वसंत कानेटकर यांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक लिहून छत्रपती शिवाजी महाराजांच्या चाणाक्ष व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवून महाराजांच्या अतिउच्च मानसिक पातळीचे दर्शन घडविलेले आहे. परंतु 'श्रीमान योगी' या नाटकात मात्र नाटककारांनी छत्रपती शिवाजी महाराजांना भावनिक, अगतिक बनवून टाकलेले आहे, हे महाराजांचे रूप वाचक आणि प्रेक्षक यांना अपेक्षित नव्हते, त्यामुळेच 'श्रीमान योगी' या द्विखंडात्मक बहुचर्चित कादंबरीवर आधारित या नाटकाचे कथानक असले तरीही वाचक-प्रेक्षकांनी या नाटकाला मात्र कमी प्रमाणात दाद दिली.

● **यशापयश :-**

'श्रीमान योगी' च्या विषयावर वसंत कानेटकर यांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक लिहून छत्रपती शिवाजी महाराजांच्या चाणाक्ष व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवून महाराजांच्या अतिउच्च मानसिक पातळीचे दर्शन घडविलेले आहे. परंतु 'श्रीमान योगी' या नाटकात मात्र नाटककारांनी छत्रपती शिवाजी महाराजांना भावनिक, अगतिक बनवून टाकलेले आहे, हे महाराजांचे रूप वाचक आणि प्रेक्षक यांना अपेक्षित नव्हते, त्यामुळेच 'श्रीमान योगी' या द्विखंडात्मक बहुचर्चित कादंबरीवर आधारित या नाटकाचे कथानक असले तरीही वाचक-प्रेक्षकांनी या नाटकाला मात्र कमी प्रमाणात दाद दिली.

● **निष्कर्ष :-**

'श्रीमान योगी' कादंबरीच्या निवेदनासाठी नागर भाषेचा वापर केलेला आहे; तर जुन्या काळातील किंवा बखरीतील विशिष्ट शब्दयोजनेतून ऐतिहासिक वातावरण निर्माण केलेले आहे. भूतकाळ व वर्तमानकाळातील भाषेची सांगड या कादंबरीमध्ये देखील घातलेली आहे. 'गरुडझेप' व 'श्रीमान योगी' या नाटकांची भाषाशैली सुद्धा कादंबरीशी मिळती-जुळती आहे, कादंबरी या वाङ्यमप्रकाराच्या विशिष्ट रूपामुळे बंदिस्थ राहिलेला घटक लेखकाला बेचैन करीत राहतो. तो समुदयासमोर आल्याशिवाय त्याला पुर्णत्त्वा प्राप्त होणार नाही, या कादंबरीकाराच्या कल्पनेतून कादंबरीतील बंदिस्थतेला मोकळे केले जावे, या उदात्त हेतूने कादंबरीचे नाटकात रूपांतर झाल्याचे दिसते. वाचकांनी कादंबरीतील घेतलेला वाचकनिष्ठ अनुभव नाट्यरूपांतरांमधून तोलला जाऊ शकतो किंवा नाही, यावर त्या नाट्यरूपांतराचे यशापयश अवलंबून असते.

● **संदर्भ टीपा :-**

१) माळी जी. पी., 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य', शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर.
२) परांजपे प्र. ना., 'ललित', ऑक्टोंबर १९७२. (पृ.१८)
३) माळी जी. पी., 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य' उनि. (पृ.१९०, १९१)
४) देसाई रणजित, 'ललित', जून, १९७२. (पृ.१४)
५) माळी जी. पी., 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य' उनि. (पृ.१३१)

# आधुनिक कुक्कुटपालन व्यवसायाचा अभ्यास

**डॉ. शकुंतला माने**
बाबूरावजी घोलप महाविद्यालय,पुणे
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)

**प्रस्तावना:**

कुक्कुटपालन व्यवसाय पूर्ण भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात एक महत्त्वाचा व्यवसाय व जोडधंदा म्हणून वाढू लागला आहे. या व्यवसायात कोंबड्यांचे रोग येऊन तोटे उद्धभवतात.कुक्कुटपालन व्यवसायामुळे अनेक लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. उत्कृष्ट जातीच्या कोंबड्यांची पैदास होत आहे. लेगहोर्ण, ऱ्हीड आयलंड रेड, असिल, वेलसमर, बुरसा, साफ मानी, काळी पंजाबी, लेमोनस, मोर कोंबडी इ. प्रकारच्या कोंबड्याच्या जाती आहेत. या व्यवसायाचे महत्व अनेक दृष्टीने आहे. प्राणिज प्रथिने, अधिक प्रोटीन, कमी चरबी, ड जीवनसत्व, थेट रोजगार, उत्पन्नाचे साधन, शाश्वत बाजारपेठ, शेतीसाठी उत्कृष्ट खत अशा विविध बाजूने हा व्यवसाय फायदेशीर आहे.पक्षांची वाढ झपाट्याने होते. २.५ ते २.८ किलो खाद्यापासून एक किलो मांस मिळते. ३५ ते ४० दिवसात १.५ किलो ग्राम वजन वाढ होते. एक कोंबडी वर्षाला २४० अंडी देते. सरासरीने २४० ते ३०० अंडी देते. बाजारपेठेत ब्रोयलर चिकनसाठी ५६.१ दशलक्ष मागणी आहे. अंड्यासाठी ७१४.६ दशलक्ष मागणी आहे. २,५०० पेक्षा जास्त पोल्ट्री फार्म भारतात आहेत. १६ अब्ज गुंतवणूक पोल्ट्री फार्ममध्ये केली आहे.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

- कुक्कुटपालन व्यवसायाच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
- कुक्कुटपालन व्यवसायात मिळणारी किंमत आणि फायदा तोट्याचा अभ्यास करणे.
- कोंबड्यांचे आजारांचा अभ्यास करणे.

**कुक्कुटपालन व्यवसायाचे व्यवस्थापन**

कुक्कुटपालन व्यवसायाचे यश मुख्यत: व्यवस्थापन कौशल्यावर अवलंबुन असते. यासाठी व्यवस्थापन प्रगत तंत्रज्ञान, बाजारपेठ यांचा अभ्यास करून योग्य नियोजन करणे आवश्यक असते

शिशु पिल्लांचे व्यवस्थापन,किशोर पक्ष्यांचे व्यवस्थापन, मोठ्या पक्ष्यांचे व्यवस्थापन, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा पक्ष्यांचे व्यवस्थापन, गादी पक्ष्याचे व्यवस्थापन

**पिल्लांचे व्यवस्थापन:**

उबवणी केंद्रावरुन पिल्ले घेऊन येण्याआधी पक्षिगृह निर्जतुक केलेले असावे.

**किशोर पक्ष्याचे व्यवस्थापन :**

वातावरण तापमान ६५ ते ७५ अंशापर्यत ठेवावे.पक्षीगृह रोज साफ करावे.ग्रोवर मश सकाळ-संध्याकाळ दिवसातून दोनदा योग्य प्रमाणात द्यावा.गादी नेहमी कोरडी ठेवावी.शंख भुकटीचे एक भांडे ठेवावे.पाणी स्वच्छ असावे.पक्षिगृह रोज साफ ठेवावे.

**मोठ्या पक्ष्याचे व्यवस्थापन**

कोंबड्याकडून अंडी उत्पादन त्यांच्या वयाच्या १८ ते २० व्या आठवड्यात सुरु होते. १६व्या आठवड्यात स्थलांतर केल्याने तोपर्यत पक्षि नव्या वातावरणाशी समरस होतात. पिंजरा पद्धतीत पक्षि किशोर वयातच आल्याने हा प्रश्न येत नाही पण आकारात वाढ झाल्याने दाटी होऊ नये.

**गादी पक्ष्याचे व्यवस्थापन:**

पक्ष्यांसाठी सुकलेले गवत, तांदळाची साले भुईमुगाची टरपलेयांचा वापर करून गादी केली मृत्यूचे प्रमाण कमी झाले. या अनुभवाने संशोधन करता आले असे ल्क्षत आले की गादीत पक्ष्यांची विष्ठा मिसळते त्यामुळे गादीच्या खालच्या थरात उष्णता निर्माण होते. त्यामुळे गादी व विष्ठा यांच्या मिश्रणातील रासायनिक क्रियेने जीवनसत्त्व ब तयार होते ते पुन: पक्ष्यांच्या खाण्यात येऊन त्यांची वाढ चांगली होते.

**उन्हाळा, पावसाळा, हिवाळा पक्ष्याचे व्यवस्थापन:**

पिल्लांसाठी ९५ ते ८० अंश Fh किशोर पक्ष्यांसाठी ७० ते ८० Fh. व वरून ६५ ते ४७Fh. असे उष्ण तापमान आवश्यक असते. उष्माघाताने पक्षी पटापट मरतात म्हणून पक्षी गृहात थंडावा येण्यासाठी आतुन बाहेरून पांढरा रंग द्यावा. छतावर आच्छादन टाकुन ते ओले ठेवावे. स्प्रिंकलर्सनी छतावर पाणी मारावे. पक्षी गृहात सतत पंखे फिरत ठेवावेत.खादय पहाटे व रात्री द्यावे.दिवसातून चार –पाच वेळा थंड पाणी द्यावे.कोरड्या हवेत कुलर्स वापरावा.प्रथम दिला जाणारा आहार समतोल असल्याची खात्री करून घ्यावी.

सर्वसाधारण व्यवस्था:

फिनाईलचे पाण्यात व नंतर चुन्याचे फक्कीत पाय बुडवून यावे. खाद्याची भांडीही पहावीत खाद्य जरा हलवून स्वच्छ करावे. आजारी तसेच मेलेले पक्षी कळपापासून बाजूला करावेत. पाण्याची भांडी स्वच्छ विसळून घ्यावीत. पक्षी जसे खाद्य खातील तसे खाद्य घालावे. पाणी व खाद्य पक्षांचे समोर सतत राहील याची खबरदारी घ्यावी. दिवसातून ४-५ वेळा अंडी गोळा करावीत. त्यामुळे अंडी खराब होणार नाहीत. जास्त काळ टिकतील गोळा केलेली अंडी थंड व कोरड्या ठिकाणी ठेवावी. अंडी जंतुनाशक द्रव्याचे पाण्यात कापसाचा बोळा बुडवून साफ करावीत.

पिलांचे अंड्यावर येईपर्यंत पहावयाचे व्यवस्थापन:

पिले खरेदी करताना त्यांचा दर्जा पहावा. २० आठवड्यांनी पक्षी उत्पादनास सुरुवात करतात. या काळात थंडीची बाधा, खाद्यात कमतरता, गर्दी, रक्ति हगवन सारखे रोग आल्यास याचा परिणाम पक्ष्यांच्या उत्पादनावर होतो यामुळे पिलांची जोपासना उत्तम प्रकारे डोळयात तेल घालून केली पाहिजे.

अंड्यावरील पक्षांचे व्यवस्थापन :

तलंगाना लस, चोच कापणे. पक्षास २ चौ.फूट (१०८ चौ.सें.मी.)जागा द्यावी. घरे हवेशीर व प्रकाशही भरपूर खेळला पाहिजे. उपकरणे योग्य प्रकारची व योग्य प्रमाणात असावीत. खाद्य वाया जाणार नाही तसेच त्यात सारखा बदल होणार नाही याची काळजी घ्यावी. पक्षांना अंडी उत्पादनासाठी कलशियम क्षांराचीआवश्यकता असते. २-४ भांड्यात भरडलेला शिंपला (आइस्टर शेळ मिट) ठेवावा. कीटकनाशक फवारा अधून मधून मारणे जरूर आहे. त्यामुळे उवा, पिसवा, गोचिडे यापासून पक्षी मुक्त राहतील.

स्वच्छता व व्यवस्था

कोंबड्या निरोगी न ठेवता आल्यामुळे व त्यांची निरोगी पैदास न करता आल्यामुळे हा धंदा सोडावा लागतो. तेव्हा कोंबड्याचे संगोपन आरोग्याच्या विशिष्ट तत्त्वा नुसार केले तर निरनिराळया रोगापासून त्यांचा यशस्वी रीत्या बचाव होईल. ही तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

ज्या कोंबड्याची पैदास निरोगी व सुदृढ असल्याबद्दल खात्री देता येईल त्यांचीच पिले पाळण्यासाठी आणून धंद्यास सुरुवात करावी.राहण्यासाठी जागा स्वच्छ धुवून काढून जंतूरहित करावी. पिलांना हवेशीर जागेत ठेवावे.कोंबड्याना पिण्यासाठी नेहमी ताजे व स्वच्छ पाणी द्यावे.

स्वच्छ व कोरड्या जागी कोंबड्याना ठेवावे.तीन वर्षांनी जागा बदलावी.

रोगापासून संरक्षण

कोंबड्याना लस टोचून त्यांचे काही रोगांपासून संरक्षण करता येते.

निरोगी कोंबड्या

चांगल्या कोंबड्या पाळणे केव्हाही अधिक हिताचे असते. कोंबडीस सुमारे ४ चौरस फूट जागा ठेवावी.कोंबड्या अंडी घालतात त्या जागेवर कोरडे व स्वच्छ गवत घालावे.

**रोगापासून बचाव:**

मोठ्या कोंबड्याना लहान पिलांमध्ये मिसळू देऊ नये.

**तपासणी:**

कोंबड्याना रोगांचा संसर्ग झालेला आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी त्यांची अधूनमधून बारकाईने तपासणी करावी.

गावठी कोंबडीच्या अंड्याचे वजन ३५ ते ३८ gram असते तर सुधारित कोंबडीच्या अंड्याचे वजन ५० ते ६० gram असते. जातीनुसार कवचाचा रंग पांढरा किंवा तपकिरी असतो. सफल अंडी उबवली जातात व त्या अंड्यात पिलाची पूर्ण वाढ व्हायला २१ दिवस लागतात.

अंडी संकलनासाठी प्लास्टीकचे ट्रे वापरावेत त्यामुळे अंडी कमी फुटतात प्रवासात २ते३% उन्हाळयात अंडी फुटणे हे नैसर्गिक मानले जाते. उन्हाळयात अंडी जास्त टिकत नाहीत. नासलेले अंडे खाल्यास शरीरास हमखास बाधते. अंड्याच्या

विश्लेषणात एका अंड्यात ७४% पाणी,१२.४%,प्रथिने चरबी११.७% ०.३ gram कलशिअम, १.६ मिलिग्रॅम, लोह तर ६०० ई.मु.अ ही जीवनसत्त्वे आणि ५० इ.हे जीवनसत्त्व असते. म्हणून शास्त्रज्ञांच्या मते बालके, आजारी व वृद्ध व्यक्तीसाठी अंडे हा उत्तम आहार आहे. मात्र ते कच्चे खाऊ नये कारण त्यातील रसायनांमुळे पोटातले पाचक रस स्त्रवणाऱ्या क्रियेत बाधा निर्माण होते. अंडे उकडल्याने ही रसायने नाहीशी होऊन ते पचण्यास सुलभ होते. उकडलेले अंडे खाल्यानंतर १ते २ तासातच पचतात दोन अंडी खाल्यावर १५४ कलरीज उष्णता मिळते शरीराला आवश्यक असणारी ८८ जीवनसत्त्वे त्यातूनच मिळतात व ७० कलरीज असिड मिळते.

**कुक्कुट विष्ठा , उत्कृष्ट खत :**

१००० कोंबड्यापासून प्रतिदिन १२५ किलो कुक्कुट विष्टा मिळते. हे एक उत्तम खत आहे इतर खतापेक्षा ६ पट नायट्रोजन ४ पट पालाश १० पट स्फुरद यातून जमिनीला मिळते.

कोंबड्याचे रोग आणि लस :

रोग होऊच नयेत म्हणून त्या रोगांवर लस निर्माण करण्यात आली. त्यामुळे पाश्चात्य राष्ट्रात आज या व्यवसायात फार मोठी प्रगती झालेली दिसून येते. रोगांचा संपूर्णतः प्रतिकार करून शाकाहरी पक्ष्यांची जातच निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत या प्रगत ज्ञानाचा उपयोग भारतीयांनाही करून घेतला आहे.त्यामुळेच पक्ष्यांतील मृत्यु प्रमाण ५%च्या आत ठेवणे अंडी उत्पादन ९० ते ९५ % घेणे असे उच्चांक गाठण्यात पुष्कळ भारतीय व्यवसायिक यशस्वी झाले आहेत.

जिवाणूमुळे होणाऱ्या रोगांवर गुणकारी औषध आहे. त्यामुळे कुक्कुटपालकांनी पशुवैद्याची मदत त्वरित घेऊन औषधोपचार केल्यास पक्षी पूर्ण बरा होतो. तथापि रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक औषधाचा वापर करणे अधिक फायद्याचे असते.

**कोंबड्याचे प्रमुख आजार**

रानीखेत, देवी, रक्ती हगवण, विषमज्वर, कोंबड्याचे कर्करोग, गोचीडज्वर, ब्रुडर न्युमोनिया, मेरक्स, परोपजीवी किटाणू, गंबोरा रोग, बर्डफ्लू. मानमोडी इ सांसर्गिक रोग भयंकर आहेत.

प्रसार लक्षणे : कोंबड्याना सपाटून ताप येतो. हिरवट, पिवळसर हगवण लागते.

प्रतिबंधात्मक उपाय :आजारी पक्षी बाजूला काढावेत. मेलेले पक्षी जाळून अथवा चुनखडीत पुरून टाकावेत. खाद्याची भांडी स्वच्छ ठेवावीत.मानमोडी रोग आल्याव नवीन पक्षि घेऊ न

लसीकरण पद्धती :

१.डोळयात अथवा नाकात थेंब टाकणे.

२.इंजेक्शन द्वारा लस टोचणे.

३.लसेटच्या सहाय्याने लस टोचणे.

४.पिण्याच्या पाण्यातून लस देणे.

लसीकरण कार्येक्रम :

१.मरेक्स : पिल्लू जन्माला आल्यावर त्याच दिवशी ह्याची लस देतात.

२.लासोटा : पिल्लू ३ ते ७ दिवसाचे असताना देतात मानमोडीच्या रोगावर ही लस आहे.

३.गंबोरो : पिल्लू ३ आठवड्याचे झाल्यावर देतात.

४.देवी : ६ आठवड्याचे झाल्यावर ही लस देतात.

५.पायपेशयझिम :  पोट व आतड्यात होणाऱ्या जंतावर महिन्यातून एकदा पायपेशयझिम ४५% हे औषध पाण्यातून देतात.

संशोधन आराखडा

व्यवसाय सुरु करताना काही जणांना वित्त सहाय्याची आवश्यकता असते या क्षेत्रात तांत्रिक प्रगत ज्ञान असणाऱ्याना या व्यवसायाकडून रोजगार उपलब्ध होतो. यासाठी सहकारी बँका, ग्रामीण विकास बँक खादी ग्रामउद्योग विकास मंडळ यांचे सहाय्य मिळते तारण – हमीपत्रावर बँक कर्जे देते. वित्त सस्थांकडून सहाय्य मिळण्यासाठी प्रकल्प –प्रस्ताव तयार करणे आवश्यक असतो. त्यात भांडवल खर्च, अस्थायी खर्च मिळणारे उत्पन्न उत्पादन विक्रीद्वारे मिळणारी एकूण रक्कम व अपेक्षित नफा याविषयी माहिती द्यावी लागते. त्याचप्रमाणे घेतलेले कर्जे व्याजासह कसे फेडले जाऊ शकते हेही स्पष्ट करावे लागते. या सर्व बाबीचां विचार करून अभ्यास पूर्ण प्रस्ताव तयार करावा.

**कोंबड्याच्या विविध जाती -**

1) व्हाइट लेग होर्न – रंग पांढरा वजन २.५ किलो जात इटली – लेगहोर्ण वर्षाला २२० ते २५० अंडी देते.
2) ब्राऊन लेग होर्न – रंग तपकिरी, नराचे वजन २.५ किलो, मादीचे १.७ किलो, वर्षाला २८० ते ३०० अंडी देते.
3) ब्लेक लेग होर्न – आकाराने व वजनाने हलक्या, रंग व चोच काळी तुरा लाल व मोठा पाय काळे. वर्षाला १८० ते २१० अंडी देतात. अंड्याचा आकार मोठा असतो.
4) ऱ्होड आर्यलँड रेड आयर्लंड – पक्षी आकाराने मोठे, वजनदार अंडी वर्षाला १७० ते १८० देतात.
5) अंकोना - लेग होर्न सारखी, रंग पांढरा, डोक्यावर तुरा वर्षाला २२० ते २५० अंडी देतात.
6) ब्लक अस्तोलेप - ही जात अंड्याप्रमाणे प्रमाणे मांसासाठी चांगली आहे. वर्षाला १७० ते २०० अंडी घालतात.
7) न्यू हेम्पशायर –आकाराने व वजनाने दणकट व मोठी आहे. नराचे वजन ३.५ ते ४ किलो, मादीचे वजन ३ ते ३.५ किलो कोंबडीची अंडी मोठी वर्षाला १८० ते २०० अंडी देतात.
8) पलाय माऊथ रॉक – दोन प्रकारच्या रंगात आढळतात. १) व्हाइट फ्लाय माऊथ रॉक रंगात २) ब्लेक फ्लाय माऊथ रॉक रंगात.
9) कडकनाथ मध्यप्रदेश, गुजराथ, राजस्थान या ठिकाणी आढळतात.या मांसासाठी उपयोगी, रुचकर व औषधी युक्त आहेत.रंग काळा, त्वचा, मांस काळया रंगाचे असते. अंड्याचा रंग काळा असतो.

**खाद्यातील अन्नघटक :**

खाद्य जाड भरडलेले असे द्यावे. मका पेंड, मासळी कुट, खाद्य पदार्थ, मुलभूत पोषक मूलद्रवे, असावीत, असणारे संतुलित कोंबडी आहारात, पिष्टमय पदार्थ प्रथिने, स्निग्ध पदार्थ स्वच्छ हलके पाणी असावे लागते. अ,ब२, ब६, ब१२, क, ड३, इ, के, रायबोफ्लोबिन, या जीवनसत्वाचा सहभाग असणारे खाद्य द्यावे. याशिवाय केलसीएम, अन्नघटक क्षार, व जीवनसत्वे,ही महत्वाची असतात.

१. पिष्टमय पदार्थ : - यामुळे शरीराची वाढ,ऊर्जा, निर्माण होते. मका, ज्वारी,बाजरी,गहू, गव्हाचा भुसा,तांदळचा,कोंडा, यातून पिष्टमय पदार्थाची गरज पूर्ण होते.
२. प्रथिने : - शरीराची वाढ, ऊर्जा निर्मितीही मांस अंडी उत्पादनासाठी प्रथिनांची गरज असते. सोयाबीन, भुईमुग, शेंग पेंड, तिळ पेंड,सरकी पेंड सूर्यफूल, मोहरी,माशाचा भुगा यामध्ये प्रथिने असतात.
३. स्निग्ध पदार्थ अंडी मांस उत्पादनासाठी स्निग्ध पदार्थाची जास्त बिया व तेल सर्व प्रकारच्या तेल बिया, माशाचे तेल कोंबडी खाद्यात वापर केला जातो.
४. जीवनसत्वे : जीवनसत्वे जीवनदान देतात. कोंबडी आहारात जीवनसत्वाचे महत्व आहे. जीवनसत्वामुळे रोग प्रतिकार शक्ती वाढते. अ, ड३, रायबोफ्लोबिन जीवनसत्वाचा वापर कोंबडी खाद्यात केला जातो. बाजारात जीवनसत्वाची मिश्रणे द्रावण व पावडरी उपलब्ध आहे.
५. खनिज पदार्थ : - हाडे व अंड्यावरील कवच कठीण होण्यासाठी खनिज पदार्थ आवश्यक असतात. खनिज पदार्थाचा कोंबडी खाद्यात वापर केला जातो.

कोंबडी खाद्य : कोंबडी खाद्य तयार करणाऱ्याअनेक कंपन्या आहेत गरजेनुसार घरच्या घरी खाद्य फायद्याचे असते. पशु वैद्काचा अथवा तज्ञाचा सल्ला घेऊन खाद्य तयार केले जावे.

एक हजार पक्षाना रोज लागणारे खाद्य

| वय (आठवडे) लागणारे खाद्य, किलो | | वय (आठवडे), लागणारे खाद्य, किलो | |
|---|---|---|---|
| १ | ९.०९ | ९ | ५९ |
| २ | १८.१८ | १० | ६३.६० |
| ३ | २७.२७ | १२ | ७५.०० |
| ४ | ३१. ८१ | १४ | ८४.०० |
| ५ | ४०.९० | १६ | ९०.९० |
| ६ | ४५.४५ | १८ | ९३.१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ५०.०० | २० | ९५.४० |
| ८ | ५४.५० | 22 | ९६.१० |

**निष्कर्ष:**

कुक्कुटपालन व्यवसायामध्ये भांडवल व्यवस्थापन आणि साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्यासाठी प्रबोधन मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण घेणे आवश्यक आहे.कोंबड्यामधील रोगांचे लक्षनावरून त्वरित निदान करून औषध उपचार होणे आवश्यक आहे.पाणी, वीज, पशुखाद्य माफक दरात उपलब्ध व्हावीत.वित्त सहाय्य कमी व्याज दराने सुलभ हप्त्यांनी उपलब्ध झाले तर

कोंबड्याचा थंडीपासून बचाव करणे, स्वच्छता ठेवणे, भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या जातीची निवड करणे, अनेक रोगांवर लसी उपलब्ध आहे.आंतरराष्ट्रीय औषधे, उपकरणे, पाण्याची व खाद्याची भांडी, औजारे उपलब्ध आहेत.जलद बाजारपेठ, निर्जंतुकीकरण, माशांचा प्रतिरोध, स्वच्छता गरजेची आहे.

## References:

1. *Mohiuddin; S.M.Moulds and mycotoxins in poultry diseases.Pub.International Book Publishing company.*
2. *Louis M.Hurd: Modern Poultry Farming. Greenwood Publisher.*
3. *Shukla RakeshKumar; handbook of poultry diseases. Pub.International Book Publishing company.*
4. *पाटील विवेक ; कोंबड्यापालन व्यवसाय मार्गदर्शन, राजेश प्रकाशन*
5. *रसाळे उद्धव ; आधुनिक कोंबडीपालन, निरज प्रकाशन*
6. *खोसे काकासाहेब ; आधुनिक कोंबडीपालन, गायत्री प्रकाशन*

# नांदेड जिल्ह्यातील भूईमूग पीकाचा भौगोलिक अभ्यास

***प्रा.डॉ.यु.एस.कानवटे***

*संशोधक व मार्गदर्शक, वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड.*

**प्रस्तावना :**

भारताच्या अर्थ् व्यवस्थेत गळित धान्य पिकांचा सर्व पिकांमध्ये महत्वाचा वाटा आजही प्राप्त झालेला आहे. कारण खाद्यतेलाची गरज देशातील उत्पादने भागवली जात नाहीत. त्यामुळे दरवर्षी हजारो कोटी रूपयांचे खाद्यतेल परदेशातून आयात करावे लागते. ही बाबा भारतासारख्या कृषीप्रधान देशात अशोभनीय आहे. कारण सन १९५० पर्यंत जगात खाद्यतेलाची अनेक वर्ष निर्यात करणारा आपला देश, तेलाचा वाढता वापर आणि भरमसाठ वाढत असलेली लोकसंख्या यामुळे आज आयातदार बनला आहे.

तेलबियाच्या उत्पादनात भुईमूग, सोयाबीन, सुर्यफुल, करडाई, जवस, अंबाडी, मोहरी, तीळ, कारळ व इतर गळीत पिकांचा अंतर्भाव होतो. नांदेड जिल्ह्यात तोलबियाचे उत्पादन होते. नांदेड जिल्ह्यात प्रामुख्याने भुईमूग, सोयाबीन, सुर्यफूल, करडाई, जवस, तीळ या तेलबियांचे उत्पादन केले जाते.

प्रस्तुत शोध निबंधात "नांदेड जिल्ह्यातील भुईमूग पिकांचा भौगोलिक अभ्यास" यासाठी सन १९९१ ते २००५ या पंधरा वर्षाच्या कालावधतील भुईमूग पिकाचे क्षेत्र व उत्पादन अभ्यासासाठी निवडलेला आहे. या संशोधन काळात पीक प्रारुपात बदल झालेला असून सन १९९१-९५ या पाच वर्षात भुईमूग पिकाखालील क्षेत्र - ८२१२ हेक्टर एवढे होते, त्यात घट होऊन सन १९९६-२००० मध्ये ते ७६५६ हेक्टर वर असलेले दिसून येते. तर सन २००१ ते २००५ या पाच वर्षात ३०८२ हेक्टर असलेले आढळते म्हणजेच सन १९९१-९५ च्या तुलनेत सन २००१-२००५ या कालावधीत ५२१० हे. कमी झालेले आढळते. यावरून नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्याचा भुईमूग गळित धान्य पीकाऐवजी इतर पीके घेण्याकडे कल वाढलेला आढळतो. भुईमूग पीक उत्पादनात ही अशीच परिस्थिती आढळून येते.

**बीज संज्ञा :** गळीतधान्य, भुईमूग, क्षेत्र, उत्पादन इत्यादी.

**प्रस्तावना :**

भारतात "कृषी व्यवसाय" हा एक प्रमुख व्यवसाय आहे. भारतात विविध प्रकारची कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणात घेतली जातात. बहुतेक उद्योगधंदे कृषी व्यवसायावर आधारीत आहेत. परंतु आजच्या औद्योगिक राष्ट्रात मात्र कृषी उद्योगात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण अल्प आहे. त्यामानाने भारतातील बहुसंख्य लोक हे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत.

नांदेड जिल्हा हा महाराष्ट्रातील एक मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. बहूतांश लोक हे शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. त्या म्हणजे बेरोजगारी, भांडवलाचा आभाव, शिक्षणाचा आभाव, वाहतुक, साठवण व बाजारपेठेचा प्रश्न, जलसिंचानाच्या अपूऱ्या सोयी, नैसर्गिक संकटे, शेत जमिनीचे विभाजन अशा अनेक समस्या आहेत. त्याचबरोबर आपल्या देशात दरवर्षी लाखोच्या संख्येने वाढत चाललेली लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आपल्या देशात गरजेपेक्षा तेलबियांचे उत्पादन आणि तेल प्राप्त होण्याचे इतर मार्ग कमी आहेत. भारत सरकारला दरवर्षी सुमारे १२ ते १४ लाख मेट्रीक टनावर खाद्यतेलाची आयात परदेशातून करावी लागते. त्यासाठी सुमारे ८०० ते १००० कोटी रुपयांच्यावर परकीय चलन गुंतवावे लागते.

अशारितीने अशा तेल टंचाई समस्येवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनीच आपल्या शेतात तेलबियाची जास्तीत जास्त पीके घेवून सोडवले पाहिजे. नांदेड जिल्ह्यात विविध प्रकारची तेलबिया पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जातात. नांदेड जिल्ह्यात तेलबियाच्या पिकांमध्ये भुईमूग, सुर्यफुल, करडाई, सोयाबीन, जवस, तीळ, मोहरी व एरंडी इ. तेलबियांच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते. नांदेड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी ही तेलबियांच्या पिकांसाठी पोषक असून तेलबियांचे उत्पादन घेतले जाते.

भूईमुगाच्या वाढीस आवश्यक हवामान वातावरणाचे तापमान २०° ते ३०° से. असल्यास पिकाची वाढ चांगल्या प्रकारे होते.[१] त्यासोबतच या पिकासाठी वार्षिक पर्जन्यमान ५० ते १२५ से.मी.पाऊस पडल्यास पीकाचे उत्पादन चांगले मिळते. भुईमूगासाठी जमिन उत्तम निचऱ्याची व हलक्या पोताची, फिकट रंगाची, भूसभूशीत मोकळी चांगली असते.[२] या सर्व बाबी लक्षात घेवून नांदेड जिल्ह्याचे हवामान, पर्जन्यमान व जमिनीचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, नांदेड जिल्ह्याचे हवामान हिवाळयात सरासरी १८° से. इतके तर उन्हाळयात सरासरी ४२° से. इतके असते.[३] तसेच नांदेड जिलह्यात सरासरी पर्जन्यमान १०० से.मी. पेक्षा अधिक आहे आणि त्यासोब नांदेड जिल्ह्यात मध्यम काळी व उथळ काळी, तांबडी व करडी मृदा आहेत.[४] या भुईमूग तेलबियांसाठी नांदेड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी पोषक आहे.

**उद्दिष्टे:**

१) संशोधन क्षेत्रातील भुईमूग पीकाचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील एकूण लागवड क्षेत्रातील बदलाचा आढावा घेणे.

३) संशोधन क्षेत्र विकासात भुईमूग पिकाचे योगदान पडताळणे.

**सामग्री संकलन आणि संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी ही व्दितीय स्वरूपाची असून ती माहिती नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्ष १९९१ ते २००५ यामधून संकलीत केलेली आहे. प्राप्त माहितीचे सांख्यिकीय पनन करून कोष्टक दर्शविलेले आहे. सदर संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीची टक्केवारी काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

$$\text{सुत्र : घटकाची टक्केवारी} = \frac{\text{विशिष्ट घटकाची आकडेवारी}}{\text{एकुण घटकाची बेरीज}} \times १००$$

या पध्दतीने सर्व गळितधान्याचे उत्पादन विचारात घेवून टक्केवारी काढण्यात आलेली आहे. (करडाई, जवस, तीळ, सुर्यफुल, सोयाबीन व इतर गळीतधान्ये)

**अभ्यासक्षेत्र :**

नांदेड जिल्हा हा मराठवाड्यातील एकुण ८ जिल्ह्यापैकी एक असून महाराष्ट्राच्या दक्षिण पूर्व दिशेला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. नांदेड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°१५ ते १९°५५ उत्तर अक्षांस व रेखावृत्तीय विस्तार ७६°५६ पूर्व ते ७८°१९ पुर्व रेखांश मध्ये स्थित आहे.[५] नांदेड शहर गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आहे. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस महाराष्ट्राचा यवतमाळ जिल्हा, दक्षिणेस परभणी जिल्हा, दक्षिण-पश्चिमेस लातूर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या दक्षिण पूर्व दिशेला आंध्रप्रदेशातील आदिलाबाद व निजामाबाद हे जिल्हे आहेत. दक्षिण कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्याचे संतापुर तहसिल आहे. प्राकृतिक रचनेच्या बाबतीत उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश, गोदावरी खोऱ्याचा प्रदेश व बालघाट डोंगर रांगाचा प्रदेश असे एकूण तीन स्वाभाविक विभाग पडतात. तर नांदेड जिल्ह्यातून वाहणाऱ्या महत्वाचा नद्या - गोदावरी, मांजरा, मन्याड, सरस्वती, पैनगंगा, आसना, सिता व लेंडी ह्या आहेत. नांदेड जिल्ह्याचे हवामान उन्हाळयात ४२° कमाल से. तर हिवाळयात १८°से. इतके किमान तापमान असते. यामुळे येथील हवामान थोडे विषम आहे.[६]

नांदेड जिल्ह्यात नांदेड, अर्धापूर, मुदखेड, लोहा, कंधार, हदगाव, भोकर, हिमायतनगर या तालुक्यात ७६ से.मी. ते १०० से.मी. दरम्यान पावसाचे वार्षिक प्रमाण आहे. माहूर, किनवट, धर्माबाद, बिलोली, देगलूर, मुखेड, नायगाव व उमरी या तालुक्यात १०० से.मी. ते १५० से.मी. दरम्यान पावसाचे वार्षिक प्रमाण आहे.[७] नांदेड जिल्ह्यात खोल काळी, मध्यम काळी व उथळ काळी तीन प्रकारच्या मृदा आहेत.[८] सर्वसाधारणपणे काळी सुपिक व कसदार, मध्यम काळी, जंगलव्याप्त, मुरमाड, रेतीयुक्त इ.प्रकारच्या मृदा आढळतात.

**नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भुईमूग तेलबियाचे क्षेत्र उत्पादन**

**कोष्टक्र. ०१** (क्षेत्र = हेक्टरमध्ये) (उत्पादन = टक्केवारीमध्ये)

| तालुके | भुईमूग | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९१ ते १९९५ | | १९९६ ते २००० | | २००१ ते २००५ | |
| | क्षेत्र हे. | उत्पादन | क्षेत्र हे. | उत्पादन | क्षेत्र हे. | उत्पादन |
| नांदेड | २४६९ | ४०.६५ | ९५१ | २५.३४ | ९२३ | ४.५० |
| हदगाव | ८५२ | १६.५५ | ६४३ | १६.५९ | ४४८ | ०.४८ |
| किनवट | ७४९ | ३०.४३ | ४४४ | १४.४४ | ३०९ | ३.३७ |
| भोकर | ६२० | ३१.६८ | ८९ | १.९८ | ८१ | ०.१८ |
| बिलोली | २४९० | ३०.१४ | १२७३ | २१.२९ | ६६३ | ४.३६ |
| देगलूर | ९९ | १.८७ | ४०१ | ०.९५ | ७१ | ०.६७ |
| मुखेड | १९३ | ५.०४ | ५५९ | १०.२४ | १४० | १.२९ |
| कंधार | ८२० | १७.७० | ३२९६ | १५.२४ | ४४७ | ५.९२ |
| **एकुण** | **८२१२** | | **७६५६** | | **३०८२** | |

स्त्रोत : संशोधन, एप्रिल-२०१२

नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भुईमूग पिकाचे क्षेत्र सन १९९१-९५ या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्र बिलोली-२४९० हे. व नांदेड-२४६९ हे. असून त्या खालोखाल हदगाव-८५२ हे., कंधार-८२० हे., किनवट-७४९ हे., भोकर- ६२० हे., मुखेड-१९३ हे. तर सर्वात कमी क्षेत्र देगलूर तालुक्यात ९९ हे. इतके आहे. नांदेड जिल्ह्यात एकुण भुईमूग पिकाखालील क्षेत्र-८२१२ हे. इतके आहे.

तसेच नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भुईमूग पिकाच्या उत्पादनाचा सन १९९१ ते १९९५ या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड जिलह्यात सर्वात जास्त उत्पादन नांदेड-४०.६५ टक्के असलेले आढळते. त्याखालोखाल भोकर-३१.६८ टक्के, किनवट-३०.४३ टक्के, बिलोली-३०.१४ टक्के, कंधार-७.७० टक्के, हदगाव-१६.५५ टक्के, मुखेड-५.०४ टक्के तर सर्वात कमी देगलूर-१.८७ टक्के आढळते.

नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भूईमुग पिकांचे क्षेत्र सन १९९६ ते २००० या पाच वर्षाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त भुईमूग पिकाखालील क्षेत्र कंधार-३२९६ हे. असून त्याखालोखाल बिलोली-१२७३ हे., नांदेड-९५१ हे., हदगाव-६४३ हे., मुखेड-५५९ हे., किनवट-४४४ हे., व देगलूर-४०१ हे. तर सर्वात कमी क्षेत्र भोकर तालुक्यात-८९ हे. असलेले दिसून येते. नांदेड जिलह्यात सन १९९६ ते २००० या पाच वर्षाचे एकुण क्षेत्र-७६५६ हे. असलेले आढळून येते. याचाच अर्थ सन १९९१ ते १९९५ पेक्षा ५५६ हे. क्षेत्र कमी झालेले आहे.

तसेच सन १९९६ ते २००० या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भुईमुग पिकाच्या उत्पादनाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त उत्पादन नांदेड तालुक्यात-२५.३४ टक्के असून त्याखालोखाल बिलोली-२१.२९ टक्के, हदगाव-१६.५९ टक्के, कंधार-१५.२४ टक्के, किनवट-१२.२२ टक्के, मुखेड-१०.२४ टक्के, भोकर-१.९८ टक्के, तर सर्वात कमी उत्पादन देगलूर तालुक्यात असलेले आढळते.

सन २००१ ते २००५ या काळातील नांदेड जिलह्यातील तालुकानिहाय भुईमूग पिकाचे क्षेत्राचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक् क्र.०१ नुसार नांदेड जिलह्यात सर्वात जास्त भुईमुगाचे क्षेत्र नांदेड तालुक्यात-९२३ हे. आढळून येते. त्याखालोखाल बिलोली-६६३ हे., हदगाव-४४८ हे., कंधार-४४७ हे., किनवट-३०९ हे., मुखेड-१४० हे. व भोकर-८१ हे., तर सर्वात कमी क्षेत्र देगलूर-७१ हे. असलेले आढळते. नांदेड जिल्ह्यात सन २००१ ते २००५ या कालावधीत एकुण भुईमूग पिकाखालील क्षेत्र ३०८२ हेक्टर इतके आढळते. यावरून असे लक्षात येते की, सन १९९१-९५ व सन १९९६ ते २००० च्या तुलनेत सन २००१ ते २००५ या काळातील अनुक्रमे ५१३० हे. व ४५७४ हे. क्षेत्र कमी झालेले आढळते.

तसेच सन २००१ ते २००५ या काळातील नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भुईमूग पिकाच्या उत्पादनाचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, कोष्टक क्र.०१ नुसार नांदेड जिलह्यात सर्वात जास्त उत्पादन कंधार तालुक्यात-५.९२ टक्के, असून त्याखालोखाल नांदेड- ५.९२ टक्के असलेले दिसून येते, तर त्याखालोखाल नांदेड-४.५० टक्के, बिलोली-४.३६ टक्के, किनवट-३.३७ टक्के, मुखेड-१.२९ टक्के, तर सर्वात कमी भोकर व देगलूर या दोन तालुक्याचा क्रमांक लागतो.

**निष्कर्ष :**

१) संशोधन क्षेत्रातील सन १९९१ ते सन २००५ या काळात भुईमूग पिक क्षेत्रात घट झालेली दिसून येते.

२) नांदेड जिल्ह्यात नांदेड, बिलोली, हदगाव व कंधार या चार तालुक्यात भुईमूग पिकांचे क्षेत्र जास्त आढळते.

३) नांदेड जिल्ह्यातील देगलूर व भोकर तालुक्यात भुईमूग पिकाचे क्षेत्र सर्वात कमी आढळते.

**उपाय :**

१) वाढत्या लोकसंख्येची तेलाची गरज भागवण्यासाठी भुईमूग पिकाचे लागवड क्षेत्र वाढवणे गरजेचे आहे.

२) संशोधन क्षेत्रातील पीक लागवड क्षेत्रातील विषमता कमी करून सम पातळीवर पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना लाभदायी योजना लागू कराव्यात.

३) भुईमूग पिकास पाणी जास्त वेळा द्यावे लागते त्यासाठी सिंचनस्त्रोत वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी वृक्ष लागवड, पाणी आडवा पाणी जिरवा, कोल्हापूरी बंधारे, शेततळे, जलयुक्त शिवार इ. योजना आमलात आणाव्यात.

४) शेतकऱ्यांनी जलसिंचनाच्या नविन तंत्राचा, पाणी देण्याच्या पध्दतीचा व नविन बियाणाच्या वाणाचा उपयोग करावा.

**संदर्भ सूची :**

१) *के.ए.खतिब, "महाराष्ट्राचा भूगोल" सागर प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र.२३८.*

२) *के.ए.खतिब, "महाराष्ट्राचा भूगोल" सागर प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र.२४०.*

३) *रविंद्र कोटोले, "महत्वाच्या तेलबिया" गोडवा कृषी प्रकाशन, पुणे प्र.आ. २००७, पृ.क्र.७१.*

४) *मिलींद भुजबळ, "गळीत धान्य", ओम प्रकाशन पुणे, प्र.आ.२००५, पृ.क्र.९२.*

५) *जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन जिल्हा नांदेड, २००४-०५, पृ.क्र.०३*

६) *सु.प्र.दाते, करमरकर, "सुगम भूविज्ञान" विद्या प्रकाशन नागपूर, २००२, पृ.क्र.१०२.*

७) *नांदेड जिल्हा विकासपर्व, "पूर परिस्थितील नांदेड", वर्ष - २००५, पृ.क्र.४५.*

८) *ए.बी.सवदी, "द मेगा स्टेट महाराष्ट्र", निराली प्रकाशन पुणे, नववी आवृत्ती - २००५, पृ.क्र.५३.*

# *शाश्वत शेती विकासासाठी "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना.*

**डॉ. लहू सिताराम वावरे[1], डॉ. साळवे जगन्नाथ मोतीराम[2], प्रा. प्रताप बाबुराव शिद[3]**

[1]प्राचार्य श्रीमती. रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा

[2]उपप्राचार्य , मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर

[3]श्रीमती. रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा

**गोषवारा**

शेतकऱ्यांचे उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे शासनाचे ध्येय आहे. या ध्येयपुर्तीसाठी राज्य शासनाने "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" हे महत्त्वकांक्षी अभियान सुरु केले आहे. पिकांची उत्पादकता व अनवांषिक उत्पादन क्षमतेतील तफावत दूर करुन शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक मिळवणे, पीक विमा योजने अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेवून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्यां पीक नुकसानीपासून शेतकऱ्यांना संरक्षित करणे हे प्रमुख उद्दिष्ट "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" अभियानाचे आहे. "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत सरकारकडून विविध योजना राबविण्यात येतात.

**प्रस्तावना**

आजच्या घडीला शेती करणे हा एक जुगार झाला आहे. अनेक वेळा पाउस वेळेवर पडत नाही, तर पाण्याची कमतरता, चांगले बियाणे मिळत नाही, आला पाउस चांगला तर पिक चांगले येईल याची शाश्वती नाही आणि पिक चांगले आले तर त्याची विक्री आणि त्याला दर चांगला मिळत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेती अजिबात करावीशी वाटत नाही हे वास्तव आहे. शेती बेभरवश्याची झाल्यामुळे नाइलाज म्हणून शेती करणारे अनेकजन आहेत. पूर्वी शेतीला जो मान आणि प्रतिष्ठा होती ती आता पूर्णपणे लयास गेली आहे. आता जगण्याचे साधन म्हणून पाहणारे अनेक शेतकरी आहेत. नव्हे अनेक शेतकरी केवळ शेतीवर अवलंबून आहेत.

अनेक वेळा शेतकरी आत्महत्या याच्या बातम्या जेंव्हा वाचतो किंवा पाहतो तेंव्हा एकच प्रश्न सतावत राहतो तो म्हणजे यावर काही पर्याय आहे कि नाही? चांगल्या शेतीसाठी किंवा शेतीला चांगले दिवस यावेत तसेच शेतकऱ्यांना शाश्वत शेती आणि उत्पन्नाचे काही पर्याय आहेत कि नाही? खरे तर पुरेशे पाणी तसेच विपणन व्यवस्था चांगली असेल तर शेतकरी काबाड कष्ट करून चांगले उत्पादन नक्कीच घेऊ शकतील. पण मग या सुविधा का उपलब्ध नाहीत आणि नाहीत तर त्यासाठी नेमके काय केले पाहिजे यावर मुक्त विचार आणि कृती होणे गरजेचे आहे. सरकारी योजनाचा नुसता मारा होत असताना शेती क्षेत्रात मात्र बदल होताना तसेच शेतकऱ्यांचे जीवनात बदल होताना का दिसत नाहीत? मग यावर विचार केला असता शाश्वत शेती होण्यासाठी तसेच शेतकरी सक्षम होण्यासाठी नेमक्या काय उपाय योजना किंवा योजना आखल्या पाहिजेत यावर विचार केला तर अनेक पर्याय समोर दिसतात

शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशासह राज्यातील जनता शेती व्यवसायावर अवलंबून आहे. राज्यातील बळीराजा संपन्न व समृद्ध व्हावा यासाठी तसंच शेतीचे उत्पादन वाढून ज्यांची अर्थिक उन्नती व्हावी. यासाठी कृषी विभाग वेगवेगळया योजना राबवत असतो. अभियान, मोहिमांच्या माध्यमातुन व्यापक स्वरुपात जनजागृती करुन संबधित सर्वांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. शेतकऱ्यांचे उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे शासनाचे ध्येय आहे. या ध्येयपुर्तीसाठी राज्य शासनाने "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" हे महत्त्वकांक्षी अभियान सुरु केले आहे.

पिकांची उत्पादकता व अनुवांषिक उत्पादन क्षमतेतील तफावत दूर करुन शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक मिळवणे, पीक विमा योजने अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेवून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्यां पीक नुकसानीपासून शेतकऱ्यांना संरक्षित करणे हे प्रमुख उद्दिष्ट "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" अभियानाचे आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत सुटसुटीतपणा व सुसुत्रता आणुन त्या गतिमान आणि पारदर्षकपणे राबवण्यावर भर देण्यात येत आहे. शेती व्यवसाय म्हणजे आतबट्ट्याचा व्यवहार असे उपहासाने म्हटले जाते. मात्र आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड देऊन नियोजनबद्ध प्रयत्न केले तर शेती व्यवसायात याश निष्चितच मिळते, याची राज्यात अनेक उदाहरणे आहेत. "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" अभियान

यशस्वी होण्यासाठी राज्यातील सुमारे २ लाख शेतकऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. तालुका हा कृषी विकास आणि उत्पादन वाढीसाठी नियोजन घटक म्हणुन निश्चित करण्यात आला.प्रत्येक तालुक्यातील प्रमुख पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाची निश्चिती करुन त्यांच्या प्रचार आणि प्रसिद्धीसाठी एकसुत्रीकरण करण्यात आले. विविध निविष्ठा, औजारे आणि सुक्ष्म सिंचन संच मसेच अन्य पायाभूत सुविधांचे अनुदान शेतकयांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करणे यावर भर देण्यात आला आहे.

**उद्दिष्ट**

- शाश्वत शेती विकासासाठी "उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय अनुदान योजनांचा अभ्यास करणे.

**"उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्यां विविध योजना**

"उन्नत शेती समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत सरकारकडून पुढील विविध योजना राबविण्यात येतात.

**१. पीक प्रात्यक्षिके**

राज्यातील पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या हेतूने तंत्रज्ञान प्रसाराचे साधन म्हणून पीक प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर विभागामार्फत आयोजित करण्यात येतात. पूर्वी पीक प्रात्यक्षिकांसाठी लागणाऱ्यां निविष्ठा शासनामार्फत खरेदी करून लाभार्थ्यास पुरवठा करण्यात येत होत्या. तसेच प्रात्यक्षिकाचे क्षेत्र किमान १०० हेक्टर असल्याने मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या क्षेत्रावर प्रात्यक्षिके घ्यावे लागत होते. विखुरलेल्या स्वरूपात या मोठ्या क्षेत्रावर पोहोचण्यास कृषी सहाय्यकांना शक्य होत नव्हते. परिणामी सर्व शेतकऱ्यांसोबत नियमित संवाद साधने व तंत्रज्ञान प्रसारामध्ये अडचणी येत होत्या. त्यामुळे सन २०१७ - १८ पासून १० हेक्टर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिके घेण्यात येतात. व क्षेत्र शक्यतो सलग असते. प्रत्येक गावात ज्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असेल, त्या योजनेअंतर्गत प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कृषी सहाय्यका कडे असते. एकूण १० हेक्टर क्षेत्र असणाऱ्यां शेतकऱ्यांचे समूह किंवा गटामार्फत प्रात्यक्षिकांचे अंमलबजावणी करण्यात येते. गटांमधील शेतकरी शासनाने ठरवून दिलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यास तयार असतात. अशाच शेतकरी समूहांना लाभार्थी म्हणून निवडण्यात येते. गावातील प्रात्यक्षिकांच्या संख्येपेक्षा अधिक गटांची इच्छुक प्राप्त झाल्यास लाभार्थी गटांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येते. प्रत्येक शेतकरी गटात किमान १० शेतकरयांचा समावेश असणे बंधनकारक असते. व प्रत्येक शेतकऱ्यांला १ एकर क्षेत्र मर्यादेपर्यंत अथवा त्या योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय असणाऱ्यां क्षेत्र मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्यात येतो. पीक प्रात्यक्षिकासाठी निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांना वाटप केलेल्या मृद आरोग्य पत्रिकेच्या आधारे किंवा मृद तपासणी करून त्या अहवालाप्रमाणे लागणाऱ्यां निविष्ठा निश्चित करण्यात येतात. सदर निविष्ठा संबंधित कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ व संबंधित विभागीय कृषी सहसंचालक निश्चित करत असतात. प्रात्यक्षिकासाठी लागणाऱ्यां निविष्ठांचे प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषी विद्यापीठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा या शासकीय संस्थांमार्फत शेतकऱ्यांना खरेदी कराव्या लागतात. या निविष्ठा व्यतिरिक्त निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावयाची असते. त्यानंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात येते. पिक प्रात्यक्षिकांमध्ये वापरलेले तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी नसणाऱ्या राज्यातील इतर सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रात्यक्षिकाचे क्षेत्रावर स्थानिक शेतकऱ्यांच्या भेटीचे आयोजन करण्यात येते. प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरीता शेतकरी गटाचे उपस्थित शास्त्रोक्त पद्धतीने पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. व कृषी आयुक्त हे प्रात्यक्षिकांद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संकलीत करुन शासनास सादर करतात.

**२. कृषी तंत्रज्ञान प्रसार**

कृषी विभागाच्या प्रचलित योजनेचा लाभ न मिळणाऱ्यां शेतकऱ्यांच्या प्रमुख पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने पीक प्रात्यक्षिक आंतर्गत स्थानिक कृषी हवामान पद्धतीनुसार निश्चित केलेल्या कृषी तंत्रज्ञानाचा या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी नसलेल्या राज्यातील इतर सर्व शेतकऱ्यांपर्यंत प्रसार करण्यासाठी विभागीय कृषी सहसंचालक यांनी संबंधित विभागातील किंवा जिल्ह्यातील प्रमुख पिकांसाठी निश्चित केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती आयुक्त कृषी हे कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करतात. व सदर तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न केले जातात. तालुक्यातील प्रमुख लोकांसाठी निश्चित केलेले तंत्रज्ञान इतर सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी चे नियोजन केले जाते. याकरता विविध प्रसारमाध्यमे, वर्तमानपत्र, दूरदर्शन, आकाशवाणी, दृकश्राव्य माध्यमे, समाज माध्यमे, कृषी महोत्सव इत्यादींच्या माध्यमातून सर्व शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचवण्याचे

नियोजन केले जाते. जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येत असलेल्या जिल्हा मासिक चर्चासत्रांमध्ये सध्याच्या निमंत्रित सदस्य बरोबरच कृषी विभागाच्या मंडळ कृषी अधिकारी स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात येते. या चर्चासत्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रमुख लोकांच्या परिस्थितीचा नियमितपणे सखोल आढावा घेऊन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मासिक संदेश तयार करतात. सदर संदेश लिखित स्वरूपात कृषी सहाय्यक यांचेकडे पाठवला जातो. तसेच सदर संदेशास प्रमुख वर्तमानपत्र, आकाशवाणी इत्यादी प्रसार माध्यमातून प्रसिद्धी दिली जाते. कृषी सहाय्यक सदर संदेश त्यांच्या अधिनस्त गावातील कृशी वार्ता फलकावर प्रसिद्ध करतात. आयुक्त (कृषी) हे संचालक विस्तार व प्रशिक्षण व सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांच्या मदतीने प्रत्येक तालुका कृषी अधिकाऱ्यांना त्यांच्या तालुक्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादन वाढीचे उद्दिष्ट निश्चित करून देतात. वर्षाअखेरीस उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करतात. तालुका कृषी अधिकारी प्रत्येक कृषी सहाय्यकाला त्याच्याकडील गावांमध्ये फिरती कार्यक्रम आखून देतात. या कार्यक्रमाप्रमाणे कृषी सहाय्यक त्याच्याकडील प्रत्येक गावात किमान एक दिवस पूर्णवेळ भेट देतात. व भेटीचे दिवसभरची माहिती ग्रामपंचायत कार्यालयातील कृषी वार्ता फलकावर लिहिली जाते. गावभेटीच्या दिवशी कृषी सहाय्यक संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात अथवा गावातील अन्य सोयीच्या ठिकाणी पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य असते. सदर दिवशी कृषी सहाय्यक पीक प्रात्यक्षिक स्थळी भेट देतात. आणि लाभार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत असतात. प्रत्येक गावांमध्ये तयार करून घेतलेल्या कृषी वार्ता फलकामार्फत हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. सदर कृषी वार्ता फलकावर गावांमध्ये राबवण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली जाते. योजना अंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी व पीक प्रात्यक्षिकाचे स्थळ दर्शवले जाते. कृषी व कृषी संलग्न विभागामार्फत रोहिणी नक्षत्राचा कालावधी उन्नत शेती समृद्ध शेतकरी पंधरवडा म्हणून राबवण्यात येतो. या पंधरवड्यात प्रत्येक गावात खरीप हंगाम पूर्वतयारी बैठकांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, संशोधन संस्था, महसूल, पंचायत समिती, पशुसंवर्धन विभाग, बँक अधिकारी इत्यादींचा समावेश असतो. या पंधरवड्यात कृषी व कृषी संलग्न विभागाचे तंत्रज्ञान व योजनांची माहिती शेतकऱ्यांना देऊन खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे मार्गदर्शन करण्यात येते. शेती समृद्ध शेतकरी हा तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार पंधरवडा आयोजनाची जबाबदारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व प्रकल्प संचालक आत्मा ( कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण एजन्सी Agicultural Technology Management Agency ) यांची असते.

**३. शेतकरी प्रशिक्षण व सहली**

सर्व केंद्र व राज्य पुरस्कृत योजना मध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी प्रशिक्षणाचे व सहलींचे आयोजन केल जाते. सन २०१७ – १८ पासून सदर योजना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षणाचा कार्यक्रम प्राधान्याने कृषी विद्यापीठ, कृषी विद्यापीठांतर्गत संशोधन केंद्र केंद्र, शासनाच्या संस्था कृषी विज्ञान केंद्र, शासकीय कृषी महाविद्यालय इत्यादी शासकीय संस्थांमध्ये आयोजित केला जातो. व या संस्थांकडे प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली नाही तर कृषी चिकित्सालयाच्या ठिकाणी देखील प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. प्रकल्प संचालक आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण एजन्सी Agicultural Technology Management Agency ) हे आपल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी सर्व प्रशिक्षण व सहलींचे आयोजन व संनियंत्रण करत असतात. विविध योजना अंतर्गत ज्या शेतकऱ्यांची पिक प्रात्यक्षिकांकरिता निवड झालेली आहे. त्याच शेतकऱ्यांना किंवा शेतकरी गटांना प्राधान्याने प्रशिक्षित करण्याचे नियोजन केले जाते. प्रत्येक प्रशिक्षण गटांमध्ये कमाल १०० शेतकऱ्यांचा समावेश असतो. सदर प्रशिक्षण त्यात्या तालुक्यातील प्रमुख पिकांसाठी संबंधित विषयाचे शास्त्रज्ञ, त्या विषयातील अच्युतम उत्पादकता असलेल्या शेतकरी व पुरस्कार प्राप्त शेतकरी यांच्या सहभागाने आयोजित करण्यात येते. प्रशिक्षण आयोजनाच्या सर्व अनुदान हे उपयुक्त शासकीय संस्थांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा धनादेश किंवा धनाकर्ष द्वारे अदा करण्यात येते. लाभार्थी शेतकऱ्यांना प्रशिक्षण स्थळी घेऊन जाण्याचा व परत आणण्याचा खर्च कृषी विभागामार्फत करण्यात येतो.

**४. सूक्ष्म सिंचन योजना**

शेती व्यवसायाची प्रमुख समस्या म्हणजे सिंचन सुविधा होय. अवर्षणग्रस्त किंवा कमी पाण्याच्या भागात पाणीटंचाईवर मात करून कमीत कमी पाण्यावर जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्याचा उपाय म्हणजे सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर करणे होय. सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापरामुळे पाण्याची बचत होते. उत्पादन खर्चात बचत होते. जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणता येते. रासायनिक खतांची बचत होते. उत्पादनात वाढ होते. म्हनून सध्याच्या काळात सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यक आहे. परंतु शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणि

सूक्ष्म सिंचन संचाच्या किमती पाहता प्रत्येक शेतकऱ्यांला आपल्या शेतात सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर करणे परवडणारे नाही. याचा विचार करून सरकारकडून "उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" मोहिमेअंतर्गत सुक्ष्म सिंचन योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन संच खरेदीसाठी लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा लागतो. लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर स्वयंचलित संगणकीय प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करण्यात येते. तसेच लाभार्थ्यांच्या मोबाईलवर लघुसंदेश देखील पाठवण्यात येतो. लाभार्थी शेतकऱ्यांनी पूर्वसंमती मिळाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत सूक्ष्म सिंचन संच बसवणे आवश्यक असते. अन्यथा त्यांची पूर्वसंमती संगणक प्रणालीद्वारे आपोआप रद्द होते अशा प्रकारच्या शेतकऱ्यांचा अर्ज रद्द होईल त्यांना पुन्हा नव्याने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असते. लाभार्थी शेतकऱ्यांना पूर्वसंमती मिळाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत सूक्ष्म सिंचन संच बसवून आपला प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह मंडळ कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावा लागतो. कृषी पर्यवेक्षक त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत बसवलेल्या संस्थेचे तपासणी करतात. आणि मोका तपासणी अहवाल संगणकीय प्रणालीवर अपलोड करतात. तालुका कृषी अधिकारी त्यांना मंडळ कृषी अधिकाऱ्यां मार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून लाभार्थी शेतकऱ्यांना अनुज्ञेय ठरणाऱ्यां अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करतात.

**५. अन्य पायाभूत व भौतिक सुविधा**

उन्नत शेती समृद्ध शेतकरी मोहिमेअंतर्गत कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना इतर अनेक अन्य पायाभूत व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. किंवा यासाठी अनुदान दिले जाते. कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांनी सामुदायिक शेततळे, मागेल त्याला शेततळे, कांदा चाळ, शेड नेट, ग्रीन हाऊस, प्लॅस्टिक अस्तरीकरण व अन्य पायाभूत किंवा भौतिक सुविधा निर्मिती करता प्रचलित योजनांच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्यात येते. शेतकऱ्यांना हॉर्टनेट प्रणाली द्वारे ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर स्वयंचलित संगणकीय प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध अनुदानाच्या मर्यादित ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करण्यात येते. तसा लघुसंदेश शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पाठवण्यात येतो. एकूण लक्षांकाच्या सुमारे १० टक्के मर्यादेपर्यंत लाभार्थ्यांची प्रतीक्षा यादी ठेवली जाते. पूर्वसंमती मिळाल्यापासून दोन महिन्याच्या कालावधीत शेतकऱ्यांनी मंजूर बाबीची उभारणी किंवा निर्मिती करणे आवश्यक असते. अन्यथा त्यांची पूर्वसंमती संगणकीय प्रणालीद्वारे आपोआप रद्द होऊन प्रतीक्षा यादीतील पुढील पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येतो या शेतकऱ्यांचा अर्ज अशाप्रकारे रद्द होईल. त्यांना पुन्हा नव्याने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असते. मंजूर बाबींकरिता पूर्वसंमती मिळाल्यापासून दोन महिन्याच्या कालावधीत शेतकऱ्यांनी अनुदानाचा प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागतो. मंडळ कृषी अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत संबंधित पायाभूत सुविधा किंवा बाबींची १०० टक्के प्रकरणांची मोका तपासणी करून तपासणी अहवाल संगणकीय प्रणालीवर अपलोड करतात. मोका तपासणी नंतर मंडळ कृषी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची तपासणी करून पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची शिफारस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी करत असतात. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या शिफारशीनुसार प्राप्त लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान ठरणारे अनुदान त्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग केले जाते. याशिवाय फलोत्पादनाच्या प्रचलित योजनेअंतर्गत विविध फळबागांच्या लागवडीसाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान प्रदान करण्यात येते.

**६. कृषी यांत्रिकीकरण**

"उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" मोहिमेचा भाग म्हणुन राज्यात सन २०१४ - १५ पासून कृषी यांत्रिकीकरण उप अभियान ( Sub- Mission on Agricultural Mechanization – SMAM ) राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत सन २०२५ पर्यंत कृषी क्षेत्रातील उर्जेचा वापर ४.० किलो वॅट प्रती हेक्टर करण्याचा केंद्र शासनाचा उद्देश आहे. त्यानुसार कृषी यांत्रिकीकरणाद्वारे राज्यातील कृषी क्षेत्रातील सध्याचा उर्जा वापर १.११ किलो वॅट प्रती हेक्टर वरुन ४.० किलो वॅट प्रती हेक्टरचर्यंत पोहचविण्याचे ध्येय आहे. शेतीत लागणारी प्रति हेक्टर अश्वशक्तीं सन १९७० मध्ये ०.३५ किंलोवॅट होती ती आता १.८४ किंलोवॅटपर्यंत पोचली आहे. उपलब्ध प्रति हेक्टर अश्वशक्ती व पिंकांची उत्पादकता यांचे सकारात्मक समीकरण आहे. पंजाब, हरियाणा, तमिळनाडू, आंध्र प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यांत प्रति हेक्टर अश्वशक्ती १.६ ते ३ किंलोवॅट असून, पिकांची उत्पादकता २ ते ४ टन प्रति हेक्टर आहे. तीच

महाराष्ट्रासहित इतर १७ राज्यांमध्ये प्रति हेक्टर अश्वशक्ती ०.५ ते १.५ किंलोवॅट असून उत्पादकता १.० ते १.४. टन प्रति हेक्टर आहे. याचाच अर्थ, प्रति हेक्टर अश्वशक्तीं वाढविण्याची गरज आहे. भारतीय सरासरी प्रति हेक्टर अश्वशक्ती सन २०२५ पर्यंत ४. ० किलोंवॅटपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने कृषी यांत्रिकीकरण उप अभियान ( Sub- Mission on Agricultural Mechanization – SMAM ) राबविण्यात येत आहे. सध्यस्थितीत त्यातील अनुदानावर कृषी अवजारे पुरवठा व कृषी अवजारे बँक स्थापना या घटकांसाठी केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. या उपअभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१. कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे.

२. कृषी क्षत्रात उर्जा वापराचे प्रमाण वाढविणे.

३. पीक रचनेनुसार कृषी अवजारे उपलब्ध करुन देणे.

४. भाडेतत्वावर कृषी यांत्रिकीकरण सेवा सुविधा केंद्र उभारणे.

५. शेतमजुरांच्या समस्योवर मात करणे.

६. मशागतीचा खर्च कमी करुन उत्पादन खर्चात बचत करणे.

७. शेतीकामाचा वेळ वाचविणे पर्यायाने कृषी उत्पादनात वाढ करणे.

कृषी यांत्रिकीकरण अभियान राज्यातील सर्व ३४ जिल्हयात राबवले जाते. राज्यात पीक रचनेनुसार पिकाच्या पेरणीपासुन काढणीपष्चात प्राथमिक प्रक्रियेपर्यंत शेतकऱ्यांना माफक दराने कृषी यांत्रिकीकरण सेवा भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी अद्ययावत यंत्रसामग्री असलेली कृषी अवजारे बँक स्थापन करण्यास अर्थसहाय्य करणे हा सदर घटकाचा प्रमुख उद्देश आहे. कृषी अवजारे बँक स्थापन करण्याससाठी कृषी अवजारे खरेदी किमतीच्या ४० टक्के अनुदान मर्यादा असुन कृषी अवजारावरील रु.१०.०० लाख, रु. २५.०० लाख, रु.४०.०० लाख, रु.६०.०० लाख भांडवली गुंतवणुकीच्या अनुक्रमे रु. ४.०० लाख, रु. १०.०० लाख, रु. १६.०० लाख, रु. २४.०० लाख अनुदान अनुज्ञेय आहे. आयुक्तालय स्तरावर कृषी संचालक ( निविष्ठा व गुणनियंत्रण) यांचेमार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. जिल्हास्तर, उपविभागीय व तालुकास्तरावर अनुक्रमे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी, यांचेमार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.

**सारांश**

कृषि क्षेत्रातील विसकटलेली घडी व्यवस्थित बसली तरच भविष्यकाळ सुकर आहे. म्हणूनच शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी कमीत कमी उत्पादन खर्च कसा राहिल, याचाही विचार करण्यात येत आहे. दर्जेदार जैविक खते, किटकनाशके यांचा वापर करुन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतीचे उत्पन्न वाढविण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येवून गट शेती करावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. गट शेतीचे फायदे शेतकऱ्यांना पटवून देण्याचेही प्रयत्न करण्यात आले. राज्याच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. केंद्र सरकारने सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली. राज्य शासनानेही त्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली. ठिबक सिंचन, शेडनेट, कांदा चाळ, शेतीचे सपाटीकरण यासाठी खास तरतुद करण्यात आलेली आहे. पंतप्रधान पीक विमा योजना, हवामान आधारित फळबाग विमा योजना यामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, यासाठी खास प्रयत्न करण्यात येत आहेत.

**संदर्भ**

1. *लोकमत न्यूज*
2. *ई सकाळ*
3. *www. Krishi.maharstra.gov.in*
4. *कृषी विभाग महाराष्ट्र शासन*
5. *महाराष्ट्र आर्थिक व सामाजिक समालोचन*
6. *www. krushivikas. zohosites.com*

# लोककला आणि लोकजीवन

**प्रा.शिवाजी वाघमारे**
लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ.मुंबई.
मेल.shiwajirang@gmail.com

**प्रस्तावना**

भारत देश हा सांस्कृतिकदृष्ट्या खूपच समृद्ध आहे. येथे विविध बोली भाषा बोलणारी संस्कृती आहे. भारतात सर्व जाती जमाती धर्माचे लोक एकत्र राहतात. पारंपारिक रीतीरिवाज सण उत्सव एकत्र साजरा करतात. अशा पद्धतीने आपल्या संस्कृतीचं सांस्कृतिक वैभव आपल्याला दिसून येते. आपल्या देशातील विविध राज्य हे सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध आहे. आणि त्यात महाराष्ट्राचा विचार केला तर या मराठी लोक रंगभूमीवर अनेक लोककलांचा जन्म झाला. ही भूमी संत संत पंत विचारवंतांची म्हणून ओळखल्या जाते. विधी नाट्य, भक्ती नाट्य, लोकनाट्य, मुक्तनाट्य, संकीर्तन नाट्य, प्रबोधनपर नाट्य, मनोरंजन नाट्य यांचे विस्तृत वर्णन केले तर लोककला म्हणजे गोंधळ जागरण प्रसिद्ध मनोरंजन करणारा तमाशा, लावणी, भारुड, कीर्तन, कोकणातील प्रसिद्ध कलाप्रकार दशावतार इत्यादी भरमसाठ कला या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रवाहात पहावयास मिळतात. तसेच लोक कला जन्माला आली. तशी त्या लोककलेची जोपासना करणारी मंडळीही जन्माला आली. ती म्हणजे लोककलावंत जमात. त्यांची नावे गोंधळी, वाघ्या मुरळी, पोतराज, नंदीबैलवाले, दरवेशी असे लोक उपास ही आपल्याला दिसतात. यांच जीवण या लोककला सादरीकरणावर अवलंबून असतं. म्हणजे देवादिकांची गीते म्हणून आपल्या कलेवर पोट भरणारे कलावंतांचं जगण्याचं साधन म्हणजे लोककला! आज करण्याच्या महामारी मुळे संपूर्ण देशातील कलावंतावर या कले वर पोट भरणाऱ्या लोकांवर आज उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचं सर्व जीवन हे लोक कलेवर आधारित आहे. त्यासाठी आज त्यांच्यावर मोटर संकट आलेलं आहे. विचार करण्यासारखी गोष्ट आहे. लोककलांचा संबंध लोकांशी लोक जीवनाची येतो. लोक जीवनाचे विविध अविष्कार लोकसंस्कृती म्हणून ओळखल्या जातात. लोककला त्या लोक जीवांचे प्रतिरूप आहे. लोक कलेमधून मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडते. लोककला या प्रामुख्याने दोन विभागात गणल्या जातात. एक दृश्यकला आणि दृकश्राव्य कला लोक सादरीकरणात चा मुख्य हेतू उद्देश आहे. समाजाला लोक शिक्षण देणे, लोकजागृती करणे, नीतिमत्तेची शिकवण देणे, जगण्याचं शहाणपण देणे लोककलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून लोकशिक्षण देत आलेले आहेत. तर लोक कला निर्मिती मागील हेतू त्यांची गुणवैशिष्ट्ये आणि त्यांच्यातील आजचे होणारे बदल याविषयी विवेचन करूया.

**लोक कला म्हणजे काय?**

सादर होणाऱ्या लोककला डोळ्याने पाहु शकतो, ऐकू शकतो. अशा या दृकश्राव्य लोककला म्हणून ओळखल्या जातात. या सर्व कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेले असतात. याचा करता करविता कोण आहे माहित नसते. त्याला पारंपरिक कला म्हणतात. या कलेचा लोक जीवनाची खूप जवळचा संबंध असतो. कारण यांच्या निर्मिती मागील काही प्रेरणा आहेत हेतू आहेत. त्याची काही गुण वैशिष्ट्ये असतात.

**लोककला निर्मितीमागील प्रेरणा**

1) पंचमहाभूतांचे तुष्टीकरण

लोककलांच्या निर्मितीमागील प्रेरणांचा इतिहास काय आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे. निसर्ग आणि लोककला यांचे जवळचे नाते असते. किंबहुना लोककलांची निर्मिती ही निसर्गातूनच झालेली असते. निसर्गाचे रौद्र रूप पाहुन मानवाने पंचमहाभूतांच्या तुष्टीकरणासाठी आत्मशांती साठी विधी यातुक्रिया करू लागला . पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते आहे. या पंचमहाभूतांची प्रतीके मानवाने निर्माण केली. या प्रतिकांची पूजा सुरू केली.

पृथ्वीचे प्रतीक भूमी,  आप म्हणजे पाणी, पाण्याची पूजा, नदी ची पूजा, सागराची पूजा तेज म्हणजे ऊर्जा प्रकाशाची पूजा सूर्याची पूजा होम हवन वायू म्हणजे वारा आकाश म्हणजे आकाशातील चंद्र, तारे, नक्षत्र यांच्या रूपाने आकाशाची पूजा मानव करू लागला. म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांची पुष्टीकरण लोककलेच्या निर्मिती मागील प्रेरणा म्हणून गृहीत धरले जाते

1.**सकामभक्ती**

लोककला यांच्या निर्मितीमागे सकाम भक्ती ही महत्त्वाची प्रेरणा असते. पंचमहाभूतांच्या पत्रिका नंतर काही द्रविड देवतांची निर्मिती झाली. काही काळानंतर यातील देवता क्षेत्रपाल म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. क्षेत्रपाल देवतांचे स्वरूप व कुळातील देवतांचे होते. या देवतांचा मानवाने आपल्या भौतिक सुखाची समृद्धीच्या प्राप्तीसाठी या देवतांचे विधी मानवाने सुरू केले. म्हणजे आपल्याला मुले व्हावी, रोगराई जावी, धनधान्य वाढावे यासाठी अनेक उद्देशा पोटी खंडोबा, बिरोबा, विठोबा, ज्योतिबा, म्हसोबा इत्यादी देवतांचा नवस करू लागले. पशूंचे बळी देखील देऊ लागले . आणि या देवांना समोरून लोककलेचा गोंधळ जागरण भारुड कलाप्रकार सादर करू लागले. सकाम भक्ती करू लागले.

**2) आध्यात्मिक उद्बोधन**

महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगात कर्मकांडांचे आणि विविध प्रकाराच्या बळीचे स्त्रोत माजले होते. धर्माच्या नावाखाली शोषण सुरू झाले होते. अंधश्रद्धा वाढली होती. माणसे कर्मावर नाहीतर दैवावर विश्वास ठेऊ लागले. त्याच काळात संपूर्ण जगात आध्यात्मिक क्रांती सुरू झाली  संपूर्ण विश्वात संत-मंत उदयास आले.  पश्चिम बंगाल मध्ये चैतन्य महाप्रभू, पंजाब मध्ये गुरुनानक, उत्तरेत तुळशीदास आणि दक्षिणेस पुरंदरदास आणि महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, तुकाराम, जनाबाई, मुक्ताबाई, संत एकनाथ इत्यादी संतांची परंपरा नवव्या, दहाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत होती. या सर्व संतांनी नामस्मरण कीर्तनाचा महिमा सांगितला . सर्वांनी सांगितले की सत्य, अहिंसा आपल्या जीवनात आवश्यक असून संकीर्तनाने ईश्वराची प्राप्ती होते. असा संतांचा विचार होता महाराष्ट्रात किर्तन भजन भारुड दशावतार यासारख्या लोककलेच्या माध्यमातून लोकजीवन सुधारण्याचा आध्यात्मिक उद्बोधन करण्याचा संतांनी प्रयत्न केला.

**3) समाज प्रबोधन**

संपूर्ण भारतभर अध्यात्मिक प्रबोधनाची चळवळ निर्माण झाली. त्यातून सामाजिक सलोखा प्रस्थापित होण्यास मदत झाली. कर्मकांड टाळून लोक अधिक सहिष्णू झाले. त्याच काळात यवनांचे आक्रमण झाले. त्यानंतर पोर्तुगीझ बिटिश यांचे भारतावर आक्रमण झाली. स्वदेश, स्वधर्म भावना संकटात सापडली व समाज लोप पावतो की काय अशी भावना निर्माण झाली. भक्ती संप्रदायाच्या प्रभावाखाली आलेला समाजात हा दिवसेंदिवस अधिकाधिक ध्येयवादी होऊ लागला. ध्येयवादी व कर्तव्य शून्य समाजात जागृती करण्याचे काम संतांनी शाहीर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अगेन दास, तुलसीदास नावाचे शाहिद उदयास आले. त्यांनी छत्रपती शिवाजीमहाराजांचे पोवाडे रचले शाहिरांनी हिंदवी स्वराज्याचा संदेश प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवली. अठराशे सत्तावनचा स्वातंत्र्य संग्राम आवड शाहिरांनी पोवाडे रचले स्वातंत्र्यलढा वर चलेजाव जवळी वर देखील शाहिरांनी पोवाडे रचले. जालियनवाला बाग हत्याकांड, हुतात्मा बाबू गेनू, उमाजीनाईक, झाशीची राणी इत्यादींवर पोवाडे रचले गेले. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रमध्ये सांस्कृतिक संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. त्यात शाहीर अमरशेख, अण्णाभाऊ साठे, द ना गव्हाणकर अशा अनेक शाहिरांनी समाज प्रबोधन केले. आजही शाहिरांच्या माध्यमातून ज्यांच्या वेळेस देशात संकटे समस्या निर्माण झाल्या. त्या त्या वेळेस पोवाड्याच्या माध्यमातून समाज प्रबोधन हाती घेतले गेले आहे.

**लोककलांचे गुण गुणवैशिष्ट्ये**

लोककलांचा प्रमुख गुणवैशिष्ट्यांचा विचार केला तर पारंपारिकता हे मुख्य गुणवैशिष्ट्ये आहे. लोककलांचे निर्वहन परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. परंपरा म्हणजे आचरणाचे विशिष्ट संख्येत हे आचरण विधीच्या स्वरूपात धर्माच्या स्वरूपात असते. अनेक रूढी समजुती, रीतीरिवाज त्यांची विशिष्ट परंपरा असते. स्थळ-काळ व्यक्तिपरत्वे समाज परत पे ही परंपरा सुरू राहते . त्यामुळे पारंपारिक तर हे लोक कलेचे गुणवैशिष्ट्ये आहे. तसेच मौखिक ता लवचिकता सहज उत्स्फूर्तता नित्यनूतन ता पारंपारिक काठी परकाया प्रवेश अशी अनेक लोककलांमध्ये गुणवैशिष्ट्य पहावयास मिळतात. खरे म्हणजे भारतीय संस्कृतीमध्ये मौखिक परंपरा खूप मोठी आहे लोककथा लोकगीते लोकनाट्य म्हणी व वाक्प्रचार तंत्रमंत्र यांची शाब्दिक परंपराही विशिष्ट लोककलांमध्ये निर्माण होते. शाब्दिक परंपरा एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे होते त्यालाच मौखिक ता म्हणतात.

**सारांश**

अशाप्रकारे लोककला आणि लोकजीवन यांचे जवळचे संबंध आहेत. कोणत्याही कला प्रकारांची निर्मिती कोणत्या ना कोणत्या हेतूने होते आणि त्यांची महत्त्वाची गुणधर्मही असतात माणूस त्यांचे आचरण करतो. आपल्या सूचीतील मराठी असून व इतर लोकसं उत्सव महत्व जत्रा यात्रा मोठ्या उत्साहाने साजरा करतात. पण त्यात नृत्य गायन वादन यांचा हमखास समावेश असतो. आदिवासी समाजातील लोक आर्थिक दृष्ट्या गरीब असतात. पण सांस्कृतिकदृष्ट्या खूपच समृद्ध असतात प्रत्येक ऋतूमध्ये सामूहिकरीत्या नाच-गाणे सादर करतात. मनसोक्त आनंद व्यक्त करतात. त्यामुळे सर्वात सुखी हे आदिवासी लोक असतात. आपली भूमी ही संतांची संतांची संतांची भूमी आहे. संतांनी आपल्याला भारुडाच्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला लोक शिक्षण देणे शाहिरांचे आपल्या पोवाड्यात देशद्रोहाची शिकवण दिली आहे. आपल्या लोक भूमीवर लोक कलेचे उपासक आपली कला सादर करून उपजीविका भागवतात दारोदारी फिरून आपली कला सादर करतात. पण आज करोना चे महासंकट देशावर आले आणि सकल जग ठप्प झाले. त्यामुळे लोक कलेवर पोट भरणाऱ्या लोककलावंतांची खूप मोठे हाल होत आहे. सर्व सांस्कृतिक कार्यक्रम बंद असल्यामुळे त्यांच्यावर खूप मोठे संकट आले. खरच लोक कला व जीवन जगणाऱ्या उपासकांचे लोक जीवन विस्कळीत झाले याचा विचार केला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. प्रभाकर मांडे :- लोकरंगभूमी, गोदावरी औरंगाबाद. 16 डिसेंबर 1997
2. डॉ. मेरे रा.चि. :- लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती 1996
3. डॉ. देखणे रामचंद्र:- गोंधळ परंपरा, स्वरूप आणि अविष्कार प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2005
4. डॉ. ढेरे रा. चि:- लोकसंस्कृतीचे शेतीचे पद्मगंधा प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती 1971
5. डॉ. भवाळकर तारा:- लोक संचित, राजहंस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 1981
6. डॉ. ढेरे रा.चि. :- श्री तुळजाभवानी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2007
7. डॉ. रानडे अशोक:- भाषण व नाट्य विषयक विचार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती 2001
8. डॉ. खांडगे प्रकाश:- खंडोबाचे जागरण, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई. पद्मावती 2010

# भाषा आणि जनमाध्यमांची अध्यापन शास्त्रामधील उत्क्रांती

**डॉ. जनार्धन परकाळे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
**ई मेल : jdp010673@gmail.com**

**प्रस्तावना**

भाषा आणि जनमाध्यम यांचा परस्पर संबंध आहे. भाषा ही मानवी व्यवहारातील अतिशय महत्वाची गोष्ट आहे. मानवी समुह भाषेशिवाय जीवनाच्या विविध क्षेत्रात काम करु शकत नाही. जीवन व्यवहारात जितक्या मोठया प्रमाणत भाषेचा वापर होतो, तेवढी ती समृद्ध आहे. भाषा उदरनिर्वाहाचे माध्यम होते तेव्हा ती अधिक महत्वपुर्ण ठरते. भाषा ही जनमाध्यमामध्ये कशी वेगवेगळया पद्धतीने बोलली, लिहीली जाते याचे अनुभव जनमाध्यमातील वर्तमानपत्रे, दुरदर्शन, रेडिओ, मोबाईल, इंटरनेट, इत्यादी माध्यमातून घ्यावा लागेल. तेथील कार्यपध्दतीचा स्वीकार करावा लागेल. अध्यापनासाठी या सर्व माध्यमांचा आराखडा समजून घ्यावा लागेल. वर्तमानपत्रांची काही विशेष पाने असतात. अग्रलेख, वाचकांचे पत्रव्यवहार, जाहिराती, स्फुट लेख तसेच दुरदर्शन, ई लर्निंग असेच समजून घ्यावे लागते.

२१ व्या शतकांत आधुनिक तंत्रज्ञानात मोठया प्रमाणात बदल झाले. जनमाध्यमांची अध्यापन शास्त्रात मोठी उत्क्रांती झाली. तसेच माहिती तंत्रज्ञानाचे मानवाच्या नेहमीच्या सार्वजनिक जीवनात बरीच क्रांती घडवून आणली. जशी एखादी समुद्राची मोठी लाट यावी आणि त्या लाटेत आपण सर्वजण सापडावे तसे आज जनमाध्यमातील तंत्रज्ञानाने झाले आहे. हे सर्वव्यापी ठरले आहे. एखाद्या माध्यमातून पाठविलेला संदेश एकाचवेळी असंख्य लोकांपर्यंत पोहचतो. या महत्वाच्या वैशिष्टयावरून त्या सर्व माध्यमाला ढोबळ मानाने जनमाध्यम (mass media) असे म्हटले जाते. उदा. वर्तमानपत्रे, रेडिओ, दुरदर्शन, मोबाईल ॲप, तसेच ईलर्निंग माध्यमे होय. अध्यापनात यांचा योग्य पध्दतीने व विचारपुर्वक वापर केल्यास अध्ययन—अध्यापन नक्कीच आनंददायी होऊ शकते. तंत्रज्ञानाच्या वापराने विचाराची रूंदी वाढते. शिक्षक व विद्यार्थी यांना नवीन तंत्रज्ञानाचा नक्कीच उपयोग होतो. जनमाध्यमांचा तंत्रज्ञान वापराने समाजावर, लोकांवर परिणाम होतो.

**जनमाध्यमाचे महत्व**

जनमाध्यमे ही भाषेच्या सहाय्याने वाचकांशी, श्रोत्यांशी, जनसामान्याशी जोडली जातात. ही जनमाध्यमे माहितीच्या प्रसाराबरोबर भाषेचाही प्रसार करीत असतात. अनेक नवे शब्द, संज्ञा तयार करून रूढ करण्यात जनमाध्यमाचा मोठा वाटा आहे. नभोवाणी, दुरदर्शन, मोबाईल, नेट वर्किंग यामुळे बोली भाषा झपाटयाने वाढल्या आहेत. अध्ययन अध्यापनासाठी भाषेचा कौशल्याने वापर केला जाऊ लागला. प्रत्येक माध्यमाची म्हणजे आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चे स्वरूप वेगवेगळे आहे. अर्थात प्रत्येक माध्यमाची स्वत:ची गरज व त्याचे वेगळेपण म्हणून भाषेच्या अविष्कारात बदल केले. उदा. आकाशवाणीवरील निवेदनाची, दुरदर्शनवरील बातमी आणि वृत्तपत्रांतील वार्तांकनाची स्वत:ची स्वतंत्र शैली तयार झाली. बाजार, बैठका, लोककला, नाटक, चर्चा इत्यादीही पारंपारिक जनमाध्येमच आहेत. यामध्ये बोलीभाषेचा अध्ययन अध्यापनासाठी मोठया प्रमाणात वापर केला जातो. तसेच जनमाध्यमामध्ये व्यक्ती—व्यक्तीमधील संवादासाठी पोस्ट, तार, फोन, मोबाईल इत्यादीचा मोठया प्रमाणात वापर होऊ लागला. आज मोबाईलच्या माध्यमातून तो अनेक गोष्टी शिकण्याचे काम करतो. उदा. sms, message, contacts, image, menu, mailbox, erecharge, sounde clips इ. चा वापर अध्यापनासाठी करु लागला. कॉम्प्युटर आणि इंटरनेटच्या वापरामुळे अनेक गोष्टी सुलभ झाल्या आहेत. रेडिओ, दुरदर्शन, वर्तमानपत्रे यामुळेही अध्ययनामध्ये नवीन नवीन भाषेची, शब्दांची भरच पडत गेली आहे. दुरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे, इंटरनेट, चित्रपट, नाटक, ग्रंथलेखन आणि फोन मोबाईल इत्यादी सारी जनमाध्यमे ही रोजच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंधीत असल्याने अध्ययनाच्या प्रक्रियेत एक प्रगती झालेली दिसते. ही सारी जनमाध्यमे भाषेच्या कौशल्यावरच उभी आहेत. भाषा हेच या माध्यमांचे बलस्थान आहे.

भाषा आणि जनमाध्यमे

२१ वे शतक हे विज्ञान, तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. जगभरात घडलेल्या घटनांचे, माहितीचे सर्व स्त्रोत आपल्यापर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य वृत्तपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन, इंटरनेट वेबसाईट, मोबाईल सेवा इत्यादी जनमाध्यमे करीत असतात. त्यातून आपल्याला अध्यापनाची संधी प्राप्त होते. जनमाध्यमामध्ये मुद्रित माध्यमे (वृत्तपत्र, नियतकालिक, ग्रंथ, मासिके, त्रैमासिके) व दृक—श्राव्य प्रसारमाध्यमे (आकाशवाणी, दुरदर्शन, इंटननेट, वेबसाईट) आहेत. भाषा व संस्कृतीच्या जडणघडणीत जनमाध्यमांची भूमिका महत्वाची आहे. विज्ञानाने क्रांतीकारक शोध लावल्याने अध्ययन प्रक्रियेला मोठी गती प्राप्त झाली आहे. मुद्रित माध्यमांनी साक्षर लोकांच्या वैचारिक प्रगल्भतेत मोठी वाढ केली. मात्र सर्वांना समान न्याय दृक—श्राव माध्यमांनी मिळवून दिला.

दृक—श्राव्य माध्यमे ही आज लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनली आहेत. जनमाध्यमांच्या प्रगतशील उत्क्रांतीमुळे अध्ययन प्रक्रियेत प्रगती झाली आहे. ही जनमाध्यमे सर्वात प्रभावी व लोकप्रिय बनली आहेत. दुरदर्शन, कॉम्प्युटर, इंटरनेट, मोबाईल भारताच्या खेडयापाडयापर्यंत पोहोचले आहे. हे ध्वनीसह चित्रदर्शन करणारे माध्यम आहे. त्यामुळे अध्ययन प्रक्रिया प्रभावी घडते आहे. अध्ययन प्रक्रियेत ऐकण्यापेक्षा पाहणे, कमी शब्दात परिपूर्ण माहिती देता व घेता येते.

आकाशवाणी हे जनमाध्यम सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे अतिशय सुलभ, प्रभावी व स्वस्त माध्यम आहे म्हणूनच याचा लोकशिक्षणासाठी, राष्ट्रीय एकात्मतेसाठी व सांस्कृतिक संबंधासाठी अतिशय कौशल्याने उपयोग केला जातो. दैनंदिन जीवनातील विविध घडामोडीची माहिती देणे, मार्गदर्शन करणे हे याचे मुख्य उदिदष्ट आहे. या माध्यमातील कार्यक्रम विविध स्वरूपाचे असतात. कार्यक्रमाचा योग्य परिणाम साधण्यासाठी श्रोत्याचे लक्ष प्रथम पासून वेधून घेतले जाते.

वृत्तपत्र या जनमाध्यमाने केवळ समाजप्रबोधन, लोकजागृती घडली जाते असे नव्हे तर भाषेचीही श्रीमंती वाढविली जाते. वृत्तपत्रे ही सामर्थ्यसंपन्न असल्याने साक्षरतेला, लोकजागृतीला, व्यक्तीमत्व विकासाला, लोकहीत व राष्ट्रहित वाढण्यास निश्चितच हातभार लागतो. बातमीबद्दलचा अधिक तपशिल वृत्तपत्रामुळे वाचकांचा पुर्ण होतो. वृत्तपत्रात नेहमी वाचकांची आवड, अभिरूची डोळयासमोर ठेवून मजकूराची निवड केली जाते.

वृत्तपत्राचे लोकशाहीत अनन्यसाधारण महत्व आहे तो लोकशाहीचा चौथा खांब आहे ते ज्ञान व माहिती मिळविण्याचे प्रभावी साधन आहे. जनसंवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. रोज जगात कोठे काय घडते ते आपल्याला घरी बसून कळते. हे वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे वृत्तपत्र १९३२ मध्ये सुरू केले. इतर जनमाध्यमापेक्षा वृत्तपत्रे ही प्रभावी व सामाजिक बांधिलकी जपताना दिसून येतात.

जनमाध्यमांची आवश्यता

जनमाध्यमे ही दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग झालेली आहेत. या इंटरनेट, दुरचित्रवाणी, मोबाईल, वृत्तपत्रे इ. जनमाध्यमांमुळे समाज परिवर्तनशील बनविता येतो. याने शिक्षण देणे, माहिती पुरवणे, मनोरंजन प्रबोधन असे अध्ययनाचे मार्ग अवलंबविता येतात. त्याचबरोबर धावपळीच्या युगात जलदगतीने माहिती पुरविता येते. त्यामुळे सामाजिक बांधिलकी आजही टिकून आहे.

मानवी जीवनावर सर्वच जनमाध्यमांचा फार मोठा प्रभाव आहे. त्यामुळे अध्ययनामध्ये फार मोठी प्रगती झाली आहे. विविध जनमाध्यमामध्ये मुद्रित (छापील) वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, हस्तपुस्तके, माहिती पुस्तके, दिनदर्शिका, लघुचित्रपट, नियतकालिके,चित्राकिंत, तर अमुद्रिक (इलेक्टॉकि) आकाशवाणी, दुरदर्शन, संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजीटल मोबाईल, फलक इ. तून मोठया प्रमाणात अध्ययन—अध्यापन करता येते. तसेच प्रिंटमिडीया, इलेक्ट्रिक मिडीया, सायबर मिडीया इत्यादीमुळे अध्ययन अध्यापनात मोठी उत्क्रांती झाली आहे.

भाषा व समाज यांचे नाते नाजूक आहे. भाषा हे संपर्काचे माध्यम आहे. आपण भाषेच्या माध्यमातून व्यक्तिमत्वाचा विकास साधत असतो. त्यासाठी भाषिक कौशल्य माहित असणे महत्वाचे आहेत्र यामध्ये वाचन, लेखन, श्रवण, संभाषण व भाषण इ. चे अध्यापन जनमाध्यमाच्या

माध्यमातून शिकता येते. बोली भाषा ही मानवाच्या अप्रगत काळापासून प्रतिबिंबीत करण्याचे काम ही प्रसार माध्यमे करीत असतात. श्रमिकांची, श्रीमंतांची, उदयोगधंदयातील कामगारांची आणि पोटाला भरपूर मिळवणारांची भाषा ही वेगवेगळी जोखता आली पाहिजे तरच भाषा सौंदर्य प्राप्त होईल. कोणतेही जनमाध्यम असो माहिती देण्याचे काम भाषेच्या माध्यमातूनच होते म्हणून अध्ययन प्रक्रियेत जनमाध्यमांबरोबर भाषेलाही महत्व आहे.

**संदर्भग्रंथ :**

१) प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा – संपादक डॉ. भास्कर शेळके, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्र. आ. २५ एप्रिल २०१२

२) इन्टरनेट जर्नालिझन इन इंडिया ; ओम गुप्ता, अजय जसरा

३)प्रसार माध्यमे : स्वरुप विचार – संपा. प्रा. डॉ. शीला दत्तात्रय गाढे.ऋतुपर्ण प्रकाशन, अहमदनगर सप्टें २०१०

४) माहिती तंत्रज्ञान—सुजाता कोण्णूर, अनुप कोण्णूर, मेखला कोण्णूर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे १५ मे. २००९.

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Dr. Mahadeo Walunj**
Principal
College of Arts, Bhigwan, Indapur, Dist. Pune Maharashtra

**Dr. Ranjan Kalita**
Principal
Rangapara College, Amaribari, Rangapara, Assam

**Executive Editors**
Dr. Prashant Chavare, Rakesh Ch. Sarkar, Mr. Santosh P. Mane

Editorial Board

| | | |
|---|---|---|
| Dr. Bhaskar Gatkul | Dr. Surendra Shirsat | Prof. Balasaheb Kharat |
| Prof. Sham Satarle | Mr. Atul Sarmah | Mr. Nupam kr Palit |
| Prof. Sandip Sathe | Dr. Pradnya Lamture | Dr. Rakesh Moulick |

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102